
यशवंतरावांचे अंतरंग

# विरंगुळा

"इतकी ठिकाणे पाहून होतात,
वेगवेगळी माणसे भेटतात,
जंत्री ठेवतो म्हटले तरी अशक्यच.
लिहिल्यामुळे अस्पष्टशी का होईना
स्मृती राहील."



रामभाऊ जोशी



## रामभाऊ जोशी

थोर गुरुपरंपरा लाभलेले ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक चरित्रकार, कवी, दूरदर्शन, आकाशवाणीवर कथाकथन, भाषणे, मुलाखती, कौटुंबिक श्रुतिकामालांचे लेखक.

'यशवंतराव-इतिहासाचे एक पान' दूरदर्शन मालिकेचे मार्गदर्शक-निवेदनकर्ते. कोलंबिया, एच्.एम्. व्ही., यंग इंडिया रेकॉर्ड कंपन्यांद्वारे पोवाडे,
राष्ट्रीय काव्ये, वग इत्यादींचे ध्वनिक्षेपण.

यशवंतराव इतिहासाचे एक पान, सह्याद्रीवरील सूर्यास्त, ही ज्योत अनंताची, सार्वजनिक बाबूराव, विदेश-दर्शन ही पुस्तके.

नियतकालिकांतून प्रासंगिक लेख. विविध सार्वजनिक संस्थांचे विश्वस्त. पत्रकार संघटनांचे अध्यक्ष. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, संगीत क्षेत्रात कार्यरत.

श्री यशोदा प्रकाशन, पुणे.



# विरंगुळा

श्री यशोदा प्रकाशन, पुणे.

15343
08.04.05

यशवंतरावांचे अंतरंग

# विरंगुळा



यशवंतरावांचे
अंतरंग

# विरंगुळा

रामभाऊ जोशी

श्रीयशोदा प्रकाशन, पुणे

**प्रकाशक**
सौ. सुमन रा. जोशी
श्रीयशोदा प्रकाशन
'कृष्णा' पत्रकार नगर,
सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११०१६.
दूरध्वनी : २५६५२५०६

**© एस्. आर. जोशी**
'कृष्णा' पत्रकार नगर,
सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११०१६.

**प्रकाशन**
१२ मार्च २००५
यशवंतराव चव्हाण ९२ वी जयंती

**मुखपृष्ठ व पुस्तक मांडणी**
सदाशिव जंगम, पुणे.

**अक्षरजुळणी**
जंगम कलामुद्रण
स. नं. २५/१०, नांदेड फाटा,
पुणे - ४११ ०४१.

**मुद्रक :**
योगेश जंगम
जंगम ऑफसेट प्रा. लि.
स.नं. २५/१०, नांदेड फाटा,
पुणे - ४११ ०४१.
फोन -०२०-२४३९२७५९

**प्रमुख वितरक**
रसिक साहित्य प्रा. लि.
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११ ००२.

**किंमत : १२५ रुपये**



यशवंतराव-वेणूताई
दर्जेदार संसारी दांपत्य
सादर समर्पण



रामभाऊ, मैत्री दिली- आता पेलणं तुमच्यावर...

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान या विश्वस्त संस्थेने
या ग्रंथासाठी वित्तसहयोग देऊन उपकृत केले आहे.

सानंद धन्यवाद.

## धन्यवाद

'माईर्स' - पुणे, ही संस्था युनेस्कोप्रणित भारतातील 'वर्ल्ड पीस सेंटरचे' (विश्वशांती केंद्र, आळंदी) कार्य करीत असलेली एकमेव संस्था आहे. युनेस्कोने डॉ. विश्वनाथ कराड यांना केंद्रप्रमुख आणि अध्यक्षपदी नियुक्त केले आहे. जागतिक शांततेच्या ध्यासाने शिक्षण, प्रशिक्षण, शांतता, सहिष्णुता, मानवता, संशोधन, चर्चासत्रे अशा उपक्रमांत 'माईर्स' कार्यरत आहे.

जागतिक शांततेचा पुरस्कार यशवंतरावांनी विदेशमंत्री असताना प्रभावीपणे केला. शांतता, मानवता यांचा संदेश देणाऱ्या यशवंतरावांच्या वैचारिक साहित्यकृतीत 'माईर्स'चा आदरपूर्वक सहयोग - सहकार्य.

## आभार

'सिपोरेक्स', बी. जी शिर्के कॉन्सार्टियम
यशवंतरावांच्या साहित्यिक कार्यात सहभागी होऊन सहयोगी होत आहे. सिपोरेक्सच्या रौप्य महोत्सवासाठी यशवंतरावांची उपस्थिती आणि दुबईतील गृहबांधणी प्रकल्पास भेट दिली त्यावेळी त्यांनी दिलेले सहकार्य आणि प्रोत्साहन याचा संस्थेच्या प्रगतीत मोठा वाटा आहे. सहयोगाची संधी मिळाली हे महत्त्वाचे.

# प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे कार्य फार महत्त्वाचे आहे, मौलिक आहे. अशा राजकीय नेत्याच्या मनाची जडणघडण कशी झाली हे जाणून घेणे आवश्यक आहे.

'कृष्णाकाठ' हा यशवंतराव चव्हाणांच्या आत्मकथनाचा पहिला भाग वाचल्यानंतर त्यांच्या लहानपणी, आईचे त्यांच्यावर झालेले संस्कार, ज्या ग्रामीण भागात ते वाढले तो परिसर, त्यांच्या कुटुंबाचे कष्टप्रद जीवन, कराडला आल्यावर टिळक हायस्कूलमधील शिक्षण, विद्यार्थी असताना केलेले अन्य वाचन आणि कराडमधील राजकीय व सामाजिक वातावरण यामधून त्यांच्या मनाला जो आकार आला त्यामुळे सोळा-सतराव्या वर्षी मॅट्रिकच्या वर्गात असतानाच त्यांनी १९३० सालच्या स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली हे समजून येते. यशवंतरावांना दीड वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात तुरुंग हे सत्याग्रहींचे विद्यापीठ होते. येरवडा तुरुंगात यशवंतरावांनी आचार्य भागवतांची जी बौद्धिके ऐकली, एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे आदी मित्रांशी ज्या चर्चा केल्या आणि स्वत: जे वाचन केले त्यामुळे त्यांच्या राजकीय जाणिवेला वैचारिक अधिष्ठान लाभले.

तुरुंगातून सुटून आल्यानंतर कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजातून बी. ए. झाल्यावर आणि पुढे पुण्याच्या लॉ कॉलेजामधून एल. एल. बी. झाल्यानंतर यशवंतरावांच्या जीवनाला थोडे स्थैर्य आले. परंतु एक वर्षातच १९४२चा स्वातंत्र्य संग्राम सुरू झाला. यशवंतराव भूमिगत राहून कार्य करीत होते. नंतर

त्यांना अटक झाली. पुढे स्वातंत्र्यपूर्व काळातील निवडणुकीत यशवंतराव विधानसभेवर निवडून आले. बाळासाहेब खेर यांनी पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून त्यांची नियुक्ती केली.

'कृष्णाकाठ'मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या येथपर्यंतच्या वाटचालीचे निवेदन केले आहे. 'कृष्णाकाठ' वाचल्यानंतर यशवंतरावांशी माझी भेट झाली. त्यावेळी मी त्यांना म्हणालो, 'आपण आपले आत्मकथन लवकर लिहून पूर्ण करावे. माझ्यासारखे असंख्य वाचक ते वाचायला फार उत्सुक आहेत.' यशवंतराव हसले आणि म्हणाले, 'बघू या कसं जमतं ते.' परंतु पुढे दुर्दैवाने यशवंतरावांच्या पत्नी वेणूताई यांचे निधन झाले. त्यामुळे 'सागरतळी' हा यशवंतराव चव्हाण यांच्या मुंबईतील वाटचालीतील जीवनाचे चित्रण करणारा भाग आणि 'यमुनातीरी' हा त्यांच्या दिल्लीतील राजकीय जीवनाचा आलेख देणारा भाग, हे त्यांचे संकल्पित लेखन झालेच नाही. मला याची फार रुखरुख वाटते.

महत्त्वाच्या राजकीय घटनांबाबत वृत्तपत्रात माहिती येते, परंतु या घटनांमधील राजकीय प्रवाह त्याचप्रमाणे वेगवेगळ्या व्यक्तींचा, पक्षांचा आणि संघटनांचा त्या घटनांमधील सहभाग या सर्वांचे आकलन झाल्याशिवाय राजकीय इतिहासाचे सम्यक् दर्शन होत नाही. १९४६ ते १९८४ या कालखंडातील भारताच्या राजकीय जीवनातील सर्व तपशील आणि बारकावे समजण्यासाठी यशवंतरावांच्या आत्मकथनाचा फार उपयोग होईल याची जाणीव असल्यामुळे मी 'कृष्णाकाठ' नंतरच्या यशवंतराव चव्हाण यांच्या संकल्पित आत्मकथेची उत्सुकतेने वाट पहात होतो. परंतु हे लेखन करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

यासंबंधी मी माझे पत्रकार मित्र रामभाऊ जोशी यांच्याशी एकदा बोललो, तेव्हा त्यानी मला पुढील हकीगत सांगितली. रामभाऊ म्हणाले, 'तुम्हाला माहिती आहे की यशवंतरावांशी माझं नातं जिव्हाळ्याचे मित्र असं होतं. त्यांच्या आणि माझ्या ऋणानुबंधामुळे ते माझ्याजवळ त्यांचं मनोगत मनमोकळेपणाने सांगत. १९८४ मध्ये वेणूताई गेल्यानंतर मी त्यांच्याकडे दिल्लीला गेलो होतो. मला वेणूताईंचं चरित्र लिहायचं होतं. त्याच्यासाठी त्यांचा काही पत्रव्यवहार वगैरे आहे का म्हणून मी यशवंतरावांना विचारले. त्यावर ते म्हणाले, 'तसं काही असण्याची शक्यता नाही. कारण बाईंनी

आयुष्यभर फक्त दर्जेदार संसार केला.' दोन-चार दिवसांनी मी पुन्हा आग्रह धरल्यावर यशवंतरावांनी वेणूताईंची कपाटे उघडली. त्यात काही फाइल्स आणि एक छोटी बॅग होती. त्यामध्ये वेणूताईंनी त्यांना यशवंतरावांनी लिहिलेली पत्रे ठेवली होती.'

रामभाऊंना जुन्या आठवणीमुळे भरून आले. थोडा वेळ थांबून ते म्हणाले, 'मी यशवंतरावांना म्हणालो, 'हे तुमचं खाजगी आहे. ते खाजगीतच ठेवा.' परंतु यशवंतराव म्हणाले, 'हे तुमच्याकडेच असू द्या.' त्यानंतर ऑक्टोबरमध्ये 'कृष्णाकाठ'ला मिळालेलं न. चिं. केळकर पारितोषिक स्वीकारण्यासाठी यशवंतराव पुण्याला आले होते. तेव्हा मी त्यांना म्हणालो, 'आपण लिहिलेली पत्रं मी वाचली. ते ऐतिहासिक संदर्भ साहित्य आहे.' यावर यशवंतराव म्हणाले, 'याचं काय करायचं ते तुम्ही करा.' रामभाऊ पुढं म्हणाले, 'गेली वीस वर्षे मी हे लॉकरमध्ये ठेवलं होतं. ही पत्रे यशवंतरावांनी पत्नीला लिहिली असल्यामुळे खाजगी असली तरी ती ख्याली खुशालीची किंवा केवळ कौटुंबिक नाहीत. यशवंतरावांच्या पत्रांचं स्वरूप वेगळं आहे. मी ती आता संपादित करून प्रसिद्ध करणार आहे. या पत्रांमध्ये आणि अन्य राजकीय नोंदींमध्ये यशवंतरावांनी समाजासाठी ठेवलेलं विचारधन आहे. ते आता मी समाजाच्या स्वाधीन करणार आहे.'

रामभाऊ जोशी यांनी हा निर्णय घेतल्यामुळेच यशवंतराव चव्हाण यांनी लिहिलेल्या पत्रांचा हा संग्रह आणि केलेल्या अनेक राजकीय नोंदी 'विरंगुळा'मध्ये आता प्रसिद्ध होत आहेत. या पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना माझे मन संकोचून गेले आहे. रामभाऊ जोशी यांचे मन मोडवेना म्हणूनच केवळ प्रास्ताविक लिहीत आहे.

१९४६ पासून १९५२ पर्यंतच्या कालखंडातील केवळ तीन पत्रे या संग्रहामध्ये आहेत. रामभाऊ जोशी यांनी विस्तृत प्रास्ताविक लिहून या कालखंडातील यशवंतरावांच्या संसारातील आर्थिक ओढाताण, वेणूताईंना झालेला क्षयाचा विकार, यशवंतरावांच्यापासून आजारपणातही दूर रहावे लागत असल्यामुळे वेणूताईंच्या मनावर येणारा ताण, त्यातून होणारी चिडचिड, यशवंतरावांच्या मनाची वेदना हे सर्व स्पष्टपणे सांगितले आहे. यशवंतरावांची ही मानसिक स्थिती त्यांनी २७ जुलै १९४९ला लिहिलेल्या पत्रातूनही व्यक्त झालेली आहे.

१९५२च्या निवडणुकीत यशवंतरावांना अपेक्षेप्रमाणे यश मिळाले आणि नंतर मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात ते पुरवठा खात्याचे मंत्री झाले. यानंतरच 'विरंगुळा' या पुस्तकाची खरी सुरुवात होते. १९५३ मध्ये यशवंतरावांनी वेणूताईंना मुंबईत आणले. मात्र मंत्री म्हणून यशवंतरावांना सतत दौरे करावे लागले. त्यावेळी आधीच्या सवयीप्रमाणे पत्राद्वारे वेणूताईंशी संवाद करीत. सुरुवातीच्या पत्रामध्ये त्यांनी वेणूताईंना लिहिले आहे - 'तू आजारातून बरे व्हावेस याच्याइतकी प्रिय गोष्ट माझ्या आयुष्यात उरलेली नाही. तुझ्याकरता नव्हे, पण निदान माझ्यासाठी तुला बरे होणे जरूर आहे.' यापुढील सर्व पत्रांमधील राजकीय भागच रामभाऊ जोशी यांनी उद्‌धृत केलेला आहे. आणि ते उचित आहे.

१९५२च्या सप्टेंबर महिन्यात इंदूरला झालेल्या अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीचे वर्णन यशवंतरावांनी फार मार्मिकपणे केलेले आहे. मौलाना आझाद यांनी संयुक्त राष्ट्रसंघासंबंधी बोलताना, त्या संघटनेसंबंधी फार आशा नसली तरी शांतताप्रिय भारताला यूनोतच राहणे कसे आवश्यक आहे हा युक्तिवाद ढंगदार भाषेत कसा केला हे या पत्रात सांगितले आहे. राजप्रमुखपद रद्द करण्यासंबंधीचा ठराव चांगल्या रीतीने मांडला गेला. पं. नेहरूंच्या खुलाशानंतर हा तात्त्विक ठराव मागे घेतला गेला असला तरी पंडितजींच्या भाषणातील भूमिका आपल्याला पटली नव्हती हे यशवंतरावांनी स्पष्टपणे लिहिले आहे.

गांधीजींचे शिक्षण ज्या राजकोटमध्ये झाले त्या राजकोटला गांधीजयंतीला यशवंतराव गेले असताना तेथील 'रचनासमिती'त एक हजार स्त्री-पुरुष चरख्यावर सूत कातताना त्यांनी पाहिले तेव्हा गांधीजींच्या विधायक कार्याची आठवण होऊन 'आजचा दिवस माझ्यासाठी एक चांगला शिक्षणाचा दिवस होता' असे त्यांनी लिहिले. या पत्रात, ढेबरभाईंचे व्यक्तिचित्र यशवंतरावांनी पुढील तीन चार वाक्यांमध्ये बहारीने रेखाटले आहे. ''अत्यंत विनयशील आणि मृदू स्वभावाचे असे हे गृहस्थ आहेत. आपला मुद्दा सहजासहजी न सोडण्याइतके कणखरही दिसले. मनुष्य स्वभावाची पारख करण्याची धूर्तता असली पाहिजे. परंतु हा गुण कोणाच्या लक्षात येऊ नये याची ते काळजी घेत आहेत की काय असे वाटण्याइतके शब्द मोजून-तोलून धिमेपणे बोलणारे 'गृहस्थ' आहेत.''

अमेरिकेला डॉ. जिवराज मेहतांच्या घरातील जुन्या पिढीतील साधीसुधी माणसे, जिवराज मेहतांच्या पत्नी हंसाबेन आणि त्यांच्या घरात नुकतीच आलेली अमेरिकन सून यांच्या एकत्र कुटुंबाचे मनोरंजक वर्णन यशवंतरावांनी थोडक्यात केले आहे.

१ जानेवारी १९५३ पासून पुढे 'विरंगुळा' मध्ये यशवंतरावांनी वेणूताईना लिहिलेली काही पत्रे आहेत. आणि त्यांनी केलेल्या नोंदी अधिक आहेत. या सर्व नोंदी राजकीय संदर्भ म्हणून महत्त्वाच्या आहेत.

महाराष्ट्रात १९५३ हे दुष्काळी वर्ष होते. अन्नधान्याची टंचाई होती. रेशनिंगच्या त्या काळात पुरेशा धान्य पुरवठ्याअभावी लोकांचे हाल होत होते. निरनिराळ्या भागातील कार्यकर्ते तारा पाठवून, फोन करून धान्य पुरवठ्याची मागणी करीत होते. यशवंतराव हे पुरवठामंत्री असल्यामुळे त्यांना या बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागत होते. या परिस्थितीत केंद्र सरकारकडून धान्यसाठा उपलब्ध करून घेण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. ही दुष्काळी परिस्थिती हाताळताना यशवंतराव चव्हाण यांनी ज्या नोंदी केल्या आहेत त्यामधून दुष्काळग्रस्त जनतेबद्दलची त्यांची उत्कट सहानुभूती व्यक्त होते आणि त्याचबरोबर आपल्याला प्रशासक यशवंतरावांची ओळख होते. नगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील दुष्काळी गावे पहावयास ते गेले होते. तेथील अनुभवासंबंधी त्यांनी लिहिले आहे. 'घोगरगावी दुष्काळी परिस्थितीतही आमच्या गावी दूध-कॉफी घेऊन जा' असा आग्रह पाहून मन गहिवरले. ग्रामीण जीवनातील परंपरागत संस्कृती म्हणतात ती ही. कार्यकर्त्यांच्या अपेक्षा आणि शासनाच्या अडचणी यामुळे अनेकदा तणाव निर्माण होत. नगर जिल्हा काँग्रेसचे नेते स्वामी सहजानंद आणि नगरचे कलेक्टर राणा यांच्यात समझोता करण्याचे कामही यशवंतरावाना करावे लागले.

१९५३ साली रफि अहमद किडवाई हे केंद्रामध्ये अन्नमंत्री होते. यशवंतरावांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्याकडून महाराष्ट्राला स्वस्त दरात गहू मिळावा या मागणीस मान्यता मिळविली. अन्नमंत्र्यांच्या परिषदेबाबत पुढील टिपणी यशवंतरावांनी लिहिली आहे. 'अन्नधान्याची आयात कमी करण्यावर पंतप्रधान पंडित नेहरूंनी भर दिला आहे. तत्त्व सर्वांनाच मान्य होते. मी तसे उठून सांगितलेही. परंतु कोणत्या भूमिकेवर अन्नधान्याची रचना

केली तर हे करणे व्यवहार्य ठरेल हा खरा निर्णयाचा प्रश्न आहे.... नियंत्रणे म्हणजे तुटीच्या प्रांतांना शापच आहे असे वाटू लागते. मुंबई राज्यातील ज्वारी-बाजरीच्या आंशिक निर्मितीयंत्रणाचा विचार या पार्श्वभूमीवर केला पाहिजे, हे मी आग्रहपूर्वक व निर्भयपणे प्रतिपादिले. माझे म्हणणे अर्थमंत्री देशमुख यांना पटले नाही, रुचलेलेही दिसले नाही परंतु सुरुवातीस ते ज्या आक्रमक वृत्तीने चर्चा करीत होते ती वृत्ती बरीच वरमली असे दिसले.'

अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख पुण्यात आले असताना त्यानी, मुंबई सरकारने दुष्काळी कामास परिणामकारक मदत करण्यासाठी दारूबंदीसंबंधी फेरविचार करावा आणि शिक्षणावरील खर्च थोडा कमी करावा अशा सूचना केल्या तेव्हां यशवंतराव फार नाराज झाले. या संदर्भात त्यांनी लिहिले आहे - ''देशमुख पहिल्या प्रतीचे ग्रंथपंडित आहेत यात शंका नाही. परंतु राज्य कारभारासाठी वापरावयाची तत्त्वे सामान्य माणसांच्या जीवनानुभूतीवर तपासून घ्यायची असतात. बिचारे देशमुख तरी काय करणार? त्यांच्या जीवनाच्याच काही मर्यादा आहेत. नोकरशाहीच्या जुन्या चाकोरीतून पस्तीस वर्षे त्यांनी राबविली आहेत. त्यामुळे तिला थोडा बोथटपणा आला आहे. लोकजीवनाच्या संग्रामातून आलेल्या दुर्गाबाईंशी त्यांची आता भेट झाली आहे. आशा करूया की त्या त्यांना नवी दृष्टी देतील.''

यशवंतरावांचे माणसांचे निरीक्षण किती सूक्ष्म आणि भेदक होते हे त्यांनी महाराष्ट्राचे त्यावेळचे राज्यपाल (एका वेळचे आसीएस अधिकारी) गिरिजाशंकर वाजपेयी यांच्याबद्दल जे लिहून ठेवले आहे त्यावरून कळून येते. यशवंतराव लिहितात - ''दुष्काळ मदत कमिटीच्या मध्यवर्ती कमिटीच्या स्थापनेची बैठक झाली. श्री. वाजपेयी (राज्यपाल) यांनी मोठ्या कुशलतेने काम चालविले. त्यांचे भाषाप्रभुत्व, कठीण, गैरसोयीचे प्रश्न टाळताना कुशलतेने वापरलेली विनोदबुद्धि आणि उभ्या रहाणाऱ्या सर्व तपशीलवार प्रश्नांचा अगोदर विचार करून, मनाशी निर्णय करून ठेवण्याची हुशारी पाहून 'बुड्ढा मोठा अर्क आहे' असा विचार येऊन गेला.''

दुष्काळग्रस्त सोलापूर जिल्ह्याचा दौरा केंद्रीय अन्नमंत्री रफि अहमद किडवाई यांच्या समवेत करताना यशवंतराव मुद्दाम निंबर्गी येथे गेले. त्यासंबंधी पुढील नोंद वाचल्यावर दुष्काळाच्या तात्कालिक आपत्तीस तोंड देताना यशवंतराव महाराष्ट्रातील प्रश्नाचा कसा मूलभूत विचार करीत होते हे समजून येते.

त्यांनी लिहिले आहे "शेतकी खात्यातील श्री. शिरोळे हे, त्यांनी निंबर्गी येथे बरीच वर्षे चालू केलेल्या नाला बंडिंगच्या कामाचे परिणाम दाखविण्यासाठी हजर होते. छोटा ओढा अडवून केलेल्या नाला बंडिंगच्या परिणामाचे प्रात्यक्षिकच पहावयास मिळाले. जमिनीच्या पोटातील पाण्याचा प्रवाह कमी खोलीवरच लागू लागला हा मोठा फायदा दिसला. सहा ते आठ फूट खोलीत इंजिन चाललेले दिसले. चार मोठे पाण्याचे झरे दिसले. एका विहिरीवर वीस एकराच्या पुढे ऊसाचे पीक भिजत असल्याचे पाहिले. छोटे बंधारे आणि नालाबंडिंग हे दुष्काळी कामावरचे कायमचे उपाय आहेत असा माझा विश्वास होता तो खऱ्या अर्थाने द्विगुणित झाला. बंडिंगची आणि अन्य दुष्काळी कामे पाहून किडवाईंच्या मनावर खूपच चांगला परिणाम झालेला दिसला. सोलापूरच्या बैठकीत, मुंबई सरकारचे काम योजनाबद्ध चालू आहे असे त्यांनी स्पष्ट मत दिले." पुढे यशवंतरावांनी लिहिले आहे -
"दौरा संपल्यावर मुंबईमध्ये किडवाईंची त्यांच्या मुक्कामी भेट घेऊन दौऱ्यात झालेल्या चर्चांचे व प्रश्नांचे निराकरण करून घेऊन कांही निर्णय निश्चित केले."

२ मे १९५३ ला मुंबईला काणसजी जहांगिर हॉलमध्ये रेशनिंगचा दहावा वाढदिवस यशवंतरावांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. त्यासंबंधी पुढील नोंद केली आहे. "समारोपाचे भाषण करतानाही, रेशनिंगने एका कठीण काळात बजावलेली कामगिरी गौरविली. ज्यांनी ज्यांनी ही कठीण कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी श्रम केले आणि बुद्धिचातुर्य दाखविले त्यांनाही धन्यवाद दिले. परंतु शेवटी - But I cannot wish Rationing a long or Prosperous Life असे म्हटले तेव्हा त्यातील विनोद आणि सत्य दोन्ही जमलेल्या सर्वांनी खिलाडू वृत्तीने हशा व टाळ्यांच्या गजरात स्वीकारले. नोंद वाचल्यावर यशवंतरावांचा या प्रश्नाकडे पाहण्याचा वास्तववादी दृष्टीकोन समजून येतो.

भाषावार प्रांतरचनेसंबंधी ७ जानेवारी १९५३ला यशवंतरावांनी जी नोंद केलेली आहे ती त्यांच्या या प्रश्नासंबंधीच्या भूमिकेवर प्रकाश टाकणारी आहे म्हणून या महत्त्वाच्या नोंदीतील बराच भाग मी उद्धृत करीत आहे.
"मोरारजी भाईंनी हैद्राबाद येथील वर्किंग कमिटीच्या बैठकीत काय विशेष घडले ते सारांशरूपाने सांगितले. हैद्राबादचा प्रश्न निघाला असताना

'हैद्राबादची विभागणी मी होऊ देणार नाही, प्रसंग पडल्यास सैन्य नेऊन उभे करीन' असे उद्‌गार पं. नेहरूंनी काढल्याचे मोरारजी भाईंनी सांगितले.

भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व एकदा आंध्राला मान्यता देऊन स्वीकारल्यानंतर हैद्राबादच्या विरोध करण्यामागे काय विचार आहे हे मला समजत नाही. पंडितजींसारखा लोकमताच्या नाडीवर हात असणारा मनुष्य या प्रश्नाच्या बाबतीत बेफिकीर का हेच कळत नाही.

पुष्कळ वेळा माझ्या मनात येऊन जाते की पंडितजी काश्मिरी ब्राह्मणाच्या कुळात जन्माला येण्याऐवजी दक्षिणेतील एखाद्या राज्यात जन्माला आले असते तर? तर त्यांना गेली अनेक शतके अन्यावर उभे असलेले निजामाचे राज्य हे दक्षिणेतील हिंदी मानवतेच्या हृदयात शलणारे एक शल्य आहे याची अनुभूती आली असती.

जनतेच्या अंतर्मनातील स्पंदने जेव्हा नेत्यांना समजेनाशी होतात तेव्हा जनताच नेतृत्त्व व हाती घेते. भाषिक प्रांतरचनेच्या बाबतीत आमच्या देशात हे घडणार असे स्पष्ट दिसू लागले आहे.''

या नोंदीतील शेवटचा परिच्छेद फारच महत्त्वाचा आहे. यशवंतरावांच्या मनात पं. नेहरूंच्याबद्दल आदर होता, प्रेमही होते. त्यांचे नेतृत्व यशवंतरावांनी पूर्णतया स्वीकारले होते. परंतु पं. नेहरूंच्या वैचारिक भूमिकेतील कच्च्या दुव्यावर त्यांनी तेथे नेमके बोट ठेवले आहे. या नोंदीतील शेवटच्या दोन वाक्यातून यशवंतरावांची राजकीय दूरदृष्टी प्रत्ययास येते.

१६ जानेवारी १९५३ ची नोंदही अशीच महत्त्वाची आहे. ती पुढीलप्रमाणे -

ए. आय. सी. सी. प्रांताच्या पुनर्रचनेसंबंधीचा ठराव श्री. काका गाडगीळांनी मोडला. आंध्र निर्मितीनंतर त्या प्रयोगाचे 'स्टॅबिलायझेशन' झाल्यानंतर इतर प्रांतांचा विचार करावयाचा असे धोरण ठरावात नमूद करण्यात आले आहे.

मी अॅमेंडमेंट पाठविण्याचे ठरविले. 'स्टॅबिलायझेशन' ऐवजी 'फॉर्मेशन' असा शब्द घालावा अशी साधी सरळ उपसूचना मी पाठविली. मी उपसूचना मांडल्यावर काही खुलाशानंतर ती काढून घेणार नाही असे मी गाडगीळ यांना स्वच्छ बजावले. मी थोडक्यात विषय मांडला. उपसूचना मताला टाकता अनुकूल ४१ मते विरुद्ध १०० मते पडून ती नापास झाली.

महाराष्ट्राच्या प्रतिनिधींमध्ये उपसूचनेचा चांगला परिणाम झाला असे दिसले. हैद्राबादचे देविसिंग चव्हाण (पुनर्वसन मंत्री) मुद्दाम दुसरे दिवशी घरी येऊन भेटून गेले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची त्यांची तयारी दिसली.

राजकीय महत्वाच्या नोंदी बरोबर दोन अन्य नोंदी मला येथे घ्याव्याशा वाटतात. ३० जानेवारीच्या नोंदीत यशवंतरावांनी लिहिले आहे -
''राष्ट्रपित्याच्या महायात्रेचा आजचा दिवस. सुख आणि दुःख यात अंतर किती असा प्रश्न विचारला तर त्याला हिंदी मनुष्य 'तीन दिवसाचे' असे उत्तर देऊ शकेल. २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाच्या पाठोपाठ तीन दिवसांनी तीस जानेवारी हा उजाडतो. हा सुखदुःखाचा पाठशिवणीचा खेळ अखंड काळपर्यंत हिंदी जीवनात चालू राहणार.''

१ मे १९५३च्या स्टॅलिनच्या निधनानंतरची यशवंतरावांनी केलेली नोंद मला मुळीच रुचली नाही. लिहितात - ''या थोर पुरुषाच्या निधनाची वार्ता ऐकून मला फार वाईट वाटले. कुणीतरी अगदी जवळचे माणूस गेल्यानंतर जशी हुरहूर लागते अशी हुरहूर वाटली. एक अत्यंत शहाणा नेता. या शतकातील एक अत्यंत कर्तृत्ववान ध्येयवादी विचारवंत म्हणून या पोलादी पुरुषाबद्दल आदर होता.''

१७ फेब्रुवारी १९५५ला एआयसीसी बैठक अमृतसरला भरली होती. त्या दिवशी यशवंतरावांनी विस्तृत नोंद लिहिली आहे. ती महाराष्ट्राच्या संदर्भात फार महत्त्वाची आहे. तिचा मुख्य भाग पुढीलप्रमाणे आहे. -
''राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नामुळे वातावरणात अधिक गंभीरता भासली. महाराष्ट्रातील परिस्थितीमुळे आणि मुंबईतील दंगलीमुळे कडक टीका करणारे येथे अधिक भेटतात. हे वातावरण पाहिले म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुलभतेने सुटण्याची शक्यता कमी आहे हे दुःखाने कबूल करावे लागते. आमच्या प्रांता संबंधीचे हे गैरसमज सर्व देशात फार खोलवर गेलेत. ते दूर करण्याचे प्रयत्न फार महत्त्वाचे व अगत्याचे आहे.''

त्यांनी पुढे लिहिले आहे - ''दुपारी चहाच्या वेळी पंडितजींना भेटलो. दहा-पंधरा मिनिटे बाजूला अगत्यपूर्वक बोललो. मुंबईच्या प्रश्नामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीने ते अतिशय दुःखी दिसले. आम्ही राज्य का नाकारले हे त्यांच्या बुद्धीला अजूनही पटत नाही असेही ते म्हणाले. वादग्रस्त प्रश्न

शांततेच्या वातावरणात थोड्या सावकाशीने सोडवावे लागतील. आणि या पद्धतीने मुंबईचाही प्रश्न सुटेल असे ते म्हणाले. मुंबई महाराष्ट्रात जाऊ नये अशी माझी भावना नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. या सर्व बोलण्यावरून वर्ष दोन वर्षांच्या काळात योग्य संधी आणि वातावरण पाहून ते मुंबईचा निर्णय महाराष्ट्राला अनुकूल देतील असा विश्वास मला वाटू लागला आहे. द्विभाषिक राज्ये व्हावीत ही त्यांची प्रामाणिक भावना आहे. परंतु महाराष्ट्र व गुजराथ आजच्या परिस्थितीत एकत्र आणण्याचा प्रयत्न अवघड आहे असेही त्यांना वाटते.

मी त्यांना सर्व पुढारी आणि पक्ष वगळून डायरेक्टली महाराष्ट्रीय जनतेला आवाहन करायची विनंती केली तेव्हां ते गहिवरून म्हणाले, ''हां, जरूर मी तसे करीन. दंगे गुंड करतात. सर्व जनतेला दोष कोण देईल? महाराष्ट्रीय जनता शूर आहे. माझे त्यांच्यावर प्रेम आहे.''

यशवंतरावांच्या नोंदीतील उत्तरार्ध पं. नेहरूंच्या भूमिकेवर प्रकाश टाकणार आहे. या नोंदीतील यशवंतरावांचे मत वाचल्यावर त्यांच्या पुढील धोरणाचा अर्थ समजतो.

महाराष्ट्र आणि गुजराथ असे महाद्विभाषिक निर्माण झाल्यानंतर १९५६ला यशवंतरावांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. १९५५ ते १९६० हा कालखंड चव्हाणांच्या जीवनात अत्यंत कसोटीचा होता. ११ डिसेंबर १९५८ला यशवंतरावांनी दिल्लीतून वेणूताईंना लिहिलेल्या पत्रात त्यांचे मनोगत पुढील शब्दामध्ये व्यक्त केले आहे.

''गेले काही महिने, विशेषत: कांही आठवडे जसे काही एखादे वादळ निर्माण व्हावे असे आयुष्यात निर्माण झाले आहे. १९५२ ते १९५५ च्या कठीण काळांतही तू माझी खरी सोबतीण होतीस म्हणून साथ केलीस. किती तरी कठीण काळात माझ्या सल्लागाराचे आणि जिवाभावाच्या मित्राचे कार्य केलेस. तुझी साथ नसेल तर मी एकटा काही करू शकेन अशी माझी मनस्थिती नाही. येत्या वर्ष सहा महिन्याचा काळ राजकीय परिस्थितीमुळे अत्यंत कसोटीचा ठरणार आहे. ही सर्व आपत्ती आहे. यातून बचावले पाहिजे. त्यात मी यशस्वी होईन असे वाटते.''

या १९५५ ते १९६० या कालखंडात महाराष्ट्रात ज्या राजकीय घटना

घडल्या त्यासंबंधी यशवंतरावांनी राजकीय नोंदी केलेल्या नाहीत त्यामुळे रामभाऊ जोशी यांनी त्या सर्व राजकीय घटनांबद्दल विस्ताराने लिहिले आहे. नव्या पिढीतील वाचकांना समरेर ठेऊन रामभाऊंनी हे लिहिले आहे हे मी समजू शकतो परंतु ते लेखन सूत्रमय झाले असते तर ते अधिक बरे झाले असते असे मला वाटते. महाद्विभाषिकाच्या निर्मितीच्या वेळी जे घडले आणि एकूणच संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधी भाऊसाहेब हिरे आणि यशवंतराव चव्हाण यांच्या भूमिकेतील फरक काय होता. यासंबंधी यशवंतरावांनीच लिहावयास पाहिजे होते या रामभाऊ जोशी यांच्या विचाराशी मी सहमत आहे.

१९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर यशवंतरावांनी मुख्यमंत्री म्हणून अत्यंत कुशलतेने काम केले. सर्व समावेशक भूमिका घेऊन विरोधी पक्षाला त्यानी सन्मानाने वागविले. महाराष्ट्रातील जनतेला जास्तीत जास्त विशुद्ध, कार्यक्षम आणि नि:पक्षपाती कारभाराची अनुभूती या काळात आली आणि देशातले स्थिर व पुरोगामी राज्य अशी महाराष्ट्राची प्रतिमा निर्माण झाली. मुख्यमंत्री असताना यशवंतरावांना राजकीय नोंदी करण्यास फुरसत मिळणे शक्यच नव्हते. या काळातील घटनांचे विवेचन आणि विश्लेषण करणारे यशवंतरावांचे संकल्पित आत्मचरित्र लिहून झाले असते तर अनेक घटनांवर प्रकाश पडू शकला असता असे मला वाटते. १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर यशवंतरावांनी विरोधी पक्षातील अनेक तरुण कार्यकर्त्यांना सत्तेत सहभाग देऊन महाराष्ट्राचा विकास साधण्याचे आवाहन केले. यशवंतराव मोहिते, मोहन धारिया यांच्यासारखे खंबीर विरोधकही काँग्रेसमध्ये गेले. १९५७ ते १९६२ या काळात यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री म्हणून जी कामगिरी केली तिच्यामुळे १९६२च्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसला भरघोस यश मिळाले. या निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी यशवंतराव यांनी धोरणात्मक आखणी सुरू केली. आणि ६ नोव्हेंबरला अचानकपणे पं. नेहरूंनी दूरध्वनीवरून सांगितले की त्यांना संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीमध्ये तत्काळ यावे लागणार आहे. त्यानंतर २१ नोव्हेंबर दिल्लीत यशवंतरावांचा शपथविधी झाला.

संरक्षण मंत्री झाल्यानंतरच्या कालखंडातील दोन वैयक्तिक पत्रे या पुस्तकात

आहेत. तेजपूर आणि जोरहाट येथून वेणुताईंना लिहिलेल्या या पत्रामध्ये त्या प्रदेशाचे, तेथील लोकांचे आणि हिमशिखरांचे वर्णन आहे.

६ जानेवारी १९६६ला ताश्कंदला पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या समवेत असताना यशवंतरावांनी केलेल्या नोंदीमध्ये प्रेसिडेंट आयुब आणि झुल्फिकार अलि भुत्तो यांच्यासंबंधी त्यांना काय वाटले ते कांही थोड्या वाक्यातच स्पष्टपणे मांडले आहे.

यशवंतरावांनी लिहिले आहे -

''प्रेसिडेंट आयुब आणि भुत्तो या दोन्ही व्यक्तींना मी प्रथमच भेटलो. प्रे. आयुबला व्यक्तिमत्त्व आहे. उंचापुरा पठाण, चेहऱ्यावर नाटकी हास्य भरपूर, बोलणेही अघळपघळ आणि गोड. माणूस प्रामाणिक नाही असे वाटते. त्याच्या शब्दावर भरवसा ठेवणे अवघड - नव्हे धोक्याचे आहे. भुत्तोशी बोलण्याचा प्रसंग आला नव्हता. पहिले दोन दिवस थंड बसून होता. काल दुपारी पहिला सामना झाला. बोलण्या-वागण्यात करेक्ट होता. आपले म्हणणे स्पष्ट शब्दांत काही आडपडदा न ठेवता त्याने मांडले.''

या नोंदीच्या शेवटी यशवंतरावांनी लिहिले आहे– ''चेअरमन कोसिजिन किती प्रमाणात स्पष्ट भूमिका घेतील याच्यावर या बैठकीचे भविष्य आहे असे माझे मत आहे.'' यशवंतरावांचा हा अंदाज खरा ठरला.

लालबहादूर शास्त्री यांच्या आकस्मिक निधनानंतर गुलझारीलाल नंदा हे तात्पुरते पंतप्रधान झाले. त्यानंतर काँग्रेसचे अध्यक्ष कामराज आणि अन्य श्रेष्ठींनी इंदिरा गांधी यांना पंतप्रधान करण्याचा निर्णय घेतला. इंदिरा गांधी यांच्यावर आपण नियंत्रण करू शकू असे कामराज आणि अन्य श्रेष्ठींना वाटत होते. परंतु इंदिरा गांधी यांनी सुरुवातीपासून काही निर्णय श्रेष्ठींना बाजूला ठेवून घेतले आणि मंत्रिमंडळाच्या खातेपालटात गृहखाते हे यशवंतराव चव्हाण यांच्याकडे सोपविले.

१९६९ साली काँग्रेस दुभंगली. त्या साली बंगलोरला काँग्रेस वर्किंग कमिटीत जे घडले त्यासंबंधी ४ मे १९७५ ला यशवंतरावांनी वेणूताईंना लिहिलेल्या पत्रात पुढील मजकूर आहे - ''१९६९ मध्ये मी इंदिरा गांधींच्या विरुद्ध मत दिले ते त्यांना सत्तेवरून काढण्यासाठी हे निदान माझ्या बाबतीत तरी खरे नाही. मी त्यांचे मत एकसारखे विचारले होते. त्यांचे मत बनत

नव्हते. हे करू की ते करू अशी चंचलता होती. शेवटी मी जे करीन ते इतरांनी मानावे अशी त्यांची रीत होती.''

यशवंतरावांनी हे लिहिले असले तरी इंदिरा गांधीना मात्र चव्हाणांनी त्यांच्या विरुद्ध मत दिल्याबद्दल त्यांचा राग आला होता व पुढे काँग्रेस दुभंगल्यावर जरी यशवंतराव हे इंदिरा गांधींच्या बरोबर राहिले तरी यानंतर इंदिरा गांधी यांच्या मनातील यशवंतरावांच्या बद्दलचा राग कमी झाला नाही. त्यांनी यशवंतरावांवर सतत अन्यायच केला, असे पुढील घटनाक्रमावरून स्पष्ट होते. असे असूनही ४ मे १९७५ला वेणूताईंना लिहिलेल्या पत्रामध्ये पुढील शब्दात त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले आहे. ''मला हेही कबूल केले पाहिजे की श्रीमतीजी माझ्याशी कधी सूडाने वागल्या नाहीत. Fair वागणे म्हणतात तसे गेली सहा वर्षे त्यांनी माझ्याशी वर्तन केले. पण हे शेवटी सगळे वैयक्तिकच ना? सार्वजनिक जीवनात आणि राजकारणांत जी तत्त्वे मानली त्यांच्या भविष्याचे काय?''

इंदिरा गांधीनी १९६७ साली गृहमंत्रीपद यशवंतरावांच्याकडे दिले आणि १९६९ साली लहर फिरताच त्यांच्याकडे अर्थखाते सोपविले. १९७४ला त्यांच्याकडे परराष्ट्र खाते दिले. हे बदल करताना त्यांनी यशवंतरावांशी चर्चा केल्याची एकही नोंद नाही.

२६ जून १९७५ला इंदिरा गांधीनी आणीबाणी पुकारली. त्यांनी हा आदेश काढण्यापूर्वी मंत्रिमंडळातील यशवंतरावांसारख्या सहकाऱ्यांना विचारले नव्हते. जयप्रकाश नारायण आणि अन्य विरोधी पक्ष नेत्यांची धरपकड झाल्यानंतरच यशवंतराव, जगजीवनराम आदींना देशात आणीबाणी पुकारल्याचे समजले.

४ मे १९७५ ला वेणूताईंना लिहिलेल्या पत्रामध्ये यशवंतरावानी लिहिले आहे - ''काँग्रेस पक्ष मी माझे सर्व जीवन मानले. ती काँग्रेस कुठे आहे? काँग्रेसमध्ये लोकशाही राहिली आहे का? सत्ता मिळवून ती ताब्यात ठेवण्याचे यंत्र म्हणून आज काँग्रेस वापरली जात आहे.''

यशवंतरावाना काँग्रेस तत्त्वभ्रष्ट झाली हे उमजत होते. परंतु पत्रात त्यांनी लिहिले आहे 'काँग्रेस मी माझे जीवन मानतो.' काँग्रेसचा अध:पात होत आहे याची जाणीव असली तरी काँग्रेस शिवाय अन्य कोणताही पक्ष वा आघाडी

देशहित साधू शकणार नाही, असे त्यांना वाटत होते का यासंबंधी या पुस्तकात कसलीही नोंद नाही. यशवंतरावांचे आत्मचरित्र लिहून पूर्ण झाले असते तर त्यामध्ये यासंबंधीची त्यांची भूमिका त्यांनी मांडलीच असती असे मला वाटते. ४ मे १९७५ ला वेणूताईंना लिहिलेले पत्र हे यशवंतरावांच्या मनातील तडफड व्यक्त करणारे आहे. ते लिहितात - ''श्रीमतीजी अजून महत्त्वाच्या कामात सल्ला-मसलत घेतात पण सत्तेच्या वर्तुळाच्या बाहेर ठेवण्याचा समजेल असा प्रयत्न करतात असा अनुभव आहे. मग मन धुमसतच राहते. असे अपमानित राहण्याने ज्यांचा मी प्रतिनिधी आहे असे मानतो त्यांचाही अपमान तर होत नाही ना अशी बोचणी असते. मी माझी समजूत घालतो की असा वैयक्तिक भावनांचा विचार करून निर्णय घ्यावयाचे नसतात. राष्ट्रीय कार्य करीत असताना स्वत:ला विसरले पाहिजे. भविष्याकडे लक्ष ठेवले पाहिजे. रागाने मोडता येते, जोडता येत नाही. तडजोडीने वागले पाहिजे असा विचार करून मग काम चालू राहते. पण खऱ्या अर्थाने काम चालू आहे का? की एका व्यक्तीचा अहंकार सुखविण्यासाठी हे सर्व चालू आहे?''

१९६९ सालापासून १९७७ पर्यंत इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण यांनी गृहखाते, अर्थखाते आणि परराष्ट्र खाते अशा महत्त्वाच्या विभागाचे मंत्री म्हणून काम केले. त्यांनी या काळात केलेल्या कामगिरीबद्दल रामभाऊ जोशी यांनी विस्ताराने लिहिले आहे.
अर्थमंत्री असताना यशवंतरावांनी केलेल्या काही नोंदी विशेषत: अमेरिकेशी केलेल्या पी एल ४८० या ऐतिहासिक कराराबद्दलची नोंद महत्त्वाची आहे. परंतु या काळातील नोंदीच्या संबंधी मला फारसे लिहावेसे वाटत नाही. याचे कारण यशवंतरावांच्या पत्रातील 'खऱ्या अर्थाने काम चालू आहे का?' हे वाक्य आहे. आणीबाणी उठवून निवडणुका घेण्याचा निर्णयही इंदिरा गांधीनी यशवंतरावांना ते परदेशात दौऱ्यावर, बुखारेस्टमध्ये असताना कळविला. हा निर्णय घेण्यापूर्वीही त्यांनी यशवंतरावांशी सल्लामसलत केली नव्हती. यामुळेच या पुस्तकातील १९६९ नंतरच्या नोंदींच्या बद्दल फार काही लिहावे असे मला वाटत नाही.

यशवंतराव चव्हाण हे तळागाळातून वर आलेले कार्यकर्ते. त्यामुळे जनसामान्यांच्या आकांक्षा त्यांना अचूक समजत असत. १९५७ ते १९६२

या काळात महाराष्ट्रात सहकार, शिक्षण आणि अन्य क्षेत्रात जी प्रगती केली ती लक्षात घेतल्यावर १९६२ ते १९६७ या काळात यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले असते तर महाराष्ट्राची सर्वांगिण प्रगती करण्याकरिता त्यानी शर्थीने प्रयत्न केले असते. आणि महाराष्ट्रातील जनतेने त्यांना प्रतिसादही दिला असता. दिल्लीच्या राजकारणाची चाल तिरपी असते. यशवंतरावांना संरक्षण मंत्री करण्याचा निर्णय पं. नेहरू आणि लालबहादूर शास्त्री यांनी विचारविनिमय करून घेतला. या निर्णयामुळे टी. टी. कृष्णम्माचारींचा जळफळाट झाला. त्याचप्रमाणे पं. नेहरूंना संरक्षण विषयक बाबतीत सहाय्य करणारे ओरिसाचे बिजू पटनाईक हेही नाराज झाले. त्यांनी यशवंतरावांच्या कामात ढवळाढवळ केली तेव्हां यशवंतरावांनी पं. नेहरूंना पत्र लिहिले आणि पं. नेहरूंनी 'संरक्षणमंत्री तुम्हीच आहात' असे नि:संदिग्धपणे सांगितल्यावर यशवंतरावांनी पटनाईकांना बाजूला केले.

शास्त्रीजींच्या निधनानंतर सुरुवातीस पंतप्रधानपदासाठी यशवंतरावांच्या नावाचीही शक्यता होती परंतु इंदिराबाईंनी 'उत्तरप्रदेशच्या खासदारांची इच्छा मी पंतप्रधान व्हावे अशी आहे' असे सांगून चाणाक्षपणाने त्यांना स्पर्धेतून दूर सारले. १९६९ नंतर इंदिरा गांधी यशवंतरावांशी कशा वागल्या हे वरती लिहिले आहेच. असे कुटिल राजकारण दिल्लीत सतत चालत असतानाही यशवंतरावांनी त्यांच्यावर जी जी जबाबदारी पडली ती कार्यक्षमतेने पार पाडली. तसेच भारताची जगात प्रतिष्ठा वाढावी म्हणून अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री असतानाही त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पं. नेहरूंनी भारताच्या विकासाची जी दिशा निश्चित केली होती त्या दिशेनेच भारताची वाटचाल चालू रहावी अशीच धोरणे अर्थमंत्री असताना चव्हाणांनी घेतली आणि कार्यान्वित केली. पं. नेहरूंनी बड्या राष्ट्रांच्या संघर्षापासून भारताला अलिप्त ठेवून जागतिक शांततेचा पुरस्कार करण्याचे जे धोरण आखून त्याची प्रभावीपणे कार्यवाही केली तेच सूत्र यशवंतराव चव्हाण यांनी परराष्ट्रमंत्री असताना पुढे चालविले. त्यामुळे काँग्रेसमधील त्यांच्या विरोधकांनाही आक्षेप घेता आले नाहीत.

धकाधकीच्या राजकारणात सतत गुरफटलेले असताना वेणूताईंशी पत्रातून संवाद करणे हा यशवंतरावांच्या जिवाचा 'विरंगुळा' होता. त्याचप्रमाणे कृतिशील जीवन जगतानाच तटस्थेने वर्तमान कालीन घटनांवर टीकाटिपणी

करणे यातही त्यांना समाधान वाटे. अशा तऱ्हेच्या नोंदींना ऐतिहासिक संदर्भ म्हणून फार महत्त्व आहे. या दृष्टीने या पुस्तकाचे एक आगळे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.

यशवंतराव चव्हाण यांनी देशभर आणि जगातही अनेक ठिकाणी प्रवास केला. वेणूताईंची प्रकृती ठीक नसल्यामुळे त्या यशवंतरावांच्या समवेत कधी प्रवास करू शकल्या नाहीत. त्यामुळे यशवंतरावांनी प्रवास करताना जी अनेक पत्रे लिहिली आहेत त्यांचा समावेश या पुस्तकात केला आहे. या पत्रामधून यशवंतरावांचे निसर्गप्रेम, त्यांची रसिकता तसेच त्यांचे पुस्तकावरील प्रेम आणि सतत चाललेले वाचन आदींचा प्रत्यय येतो. अर्थात त्यांनी वेळोवेळी केलेली राजकीय टीका टिपणी अधिक महत्त्वाची आहे. परंतु मला सर्वात महत्त्वाचे वाटते ते त्यानी वेणूताईंना लिहिलेल्या पत्रातील केलेले आत्मपरीक्षण. यशवंतरावांनी अत्यंत प्रांजळपणे स्वत:च्या राजकीय जीवनाबद्दल जे लिहिले आहे ते पुढीलप्रमाणे आहे. ''वस्तुस्थिती आहे की सातत्याने गेली तीस वर्षे मी सत्तास्थानावर आहे. पण योजून एखादी सत्तेची जागा हस्तगत करावयाची असे मी कधीच केले नाही. जाणीवपूर्वक सत्तेचा उपयोग समाजाच्या परिवर्तनासाठी करावयाचा माझा प्रयत्न राहिला. नव्या विचारांना सामोरा गेलो. मुख्यत: दलितांबद्दल कणव ठेवून सामाजिक न्याय प्रस्थापित केला पाहिजे ही माझी धारणा प्रथमपासूनची होती. माझ्या हातातील सत्तेचा आग्रहाने आणि योजनापूर्वक दृष्टीने वर उल्लेखिलेल्या उद्दिष्टांसाठी उपयोग करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.''

मला असे वाटते की यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या राजकीय जीवनाबद्दल जे मुख्यत: निवेदन या पत्रात केलेले आहे त्यावर भाष्य करणे उचित होणार नाही.

'विरंगुळा' हे पुस्तक भारतीय राजकारणाच्या अभ्यासकांना खासच उद्‌बोधक वाटेल आणि माझ्याप्रमाणेच याबद्दल ते रामभाऊ जोशी यांना मन:पूर्वक धन्यवाद देतील.

फेब्रुवारी, २००५ **ग. प्र. प्रधान**

## मनःपूर्वक कृतज्ञता

स्वातंत्र्योत्तर पहिल्या तीस वर्षांत श्री. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात आणि केंद्रस्थानी दिल्लीत सत्तेची उच्च स्थाने भूषविली. तीस वर्षांच्या कालखंडात राजकीय, सामाजिक क्षेत्रात अनेकविध घटना घडल्या. अटीतटीचे प्रसंग निर्माण झाले. यामध्ये यशवंतरावांच्या कौटुंबिक प्रसंगांचाही समावेश आहे. घटना आणि प्रसंग, ह्या संबंधीच्या सर्व क्रिया-प्रतिक्रिया त्यांनी स्वहस्ते लिहून ठेवले. या लेखनाला केवळ टिपणे असे स्वरूप नाही. ते सर्वस्पर्शी आहे. सामाजिक, राजकीय जीवनाला स्पर्श करणारे आहे. हा साहित्य ऐवज अप्रकाशित राहिला. लिहिलेले प्रसिद्ध झाल्याचे, ग्रंथबद्ध झाल्याचे यशवंतरावांना पहाता आले नाही. तसा योगायोग नसावा! 'विरंगुळा' या ग्रंथातून त्यांनी लिहिलेले साहित्य, त्यांच्या पश्चात, वीस वर्षांनंतर प्रकाशात येत आहे.

यशवंतराव राजकीय नेते होते. उच्च सत्ताधारी होते. याहीपेक्षा त्यांची वाणी प्रभावी होती, स्पृहणीय होती आणि लेखणीचा संचार कौतुकास्पद होता. त्यांच्या वाणीचा विलास नित्य होत राहिला. त्यामानाने लेखणी क्वचित चालविली. परंतु जेव्हा चालविली तेव्हा अशा काही उत्कृष्ट दर्जाचं साहित्य त्यांच्या लेखणीनं निर्माण करून ठेवलं की वाचक थक्क होऊन जातो. राजकारण आणि राज्यकारभार याची धुरा त्यांनी खांद्यावर घेतली परंतु त्यांच्या मनाला खरं आकर्षण हे साहित्याचं आणि कलांचं होतं. यशवंतरावांचं पडलेलं भाषण जसं कुणी ऐकलं नाही त्याचप्रमाणं त्यांचा पडलेला लेख कधी वाचला नाही असा निर्वाळा ज्येष्ठ आणि प्रथितयश साहित्यिक प्रा. ना. सी. फडके यांनी लिहून ठेवला आहे.

यशवंतरावांच्या ठायी सूक्ष्म दृष्टी आहे. मुद्देसूद भाषण करतात. मोठा आशय वेचक शब्दांत थोडक्यात मांडतात. त्यात नवीन विचारांना प्रेरणा देणारा मुद्दा असतो. साहित्याची उत्तम आवड आहे. जेव्हा लिहितात तेव्हा त्यामध्ये त्यांच्या ठिकाणचे गुण प्रतिबिंबित झालेले दिसतात. हा अभिप्राय आहे महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांचा.

'विरंगुळा'च्या वाचकांना यशवंतरावांचं साहित्यिक नैपुण्य ठायी ठायी भेटणार आहे. याचं कारण ते लेखन सर्वस्पर्शी आहे. जीवनाच्या विविध अंगांचा वेध ते घेत आहेत असं जाणवतं. यशवंतरावांचे जीवन एकारलेलं नसल्याचा शोध त्यांच्या लेखणीतून मिळतो. सुसंस्कृतपणा व्यक्त होतो. त्याचबरोबर सर्व क्षेत्रांविषयी त्यांच्या ठिकाणी स्वाभाविक सहानुभूती असून सहानुभूती बाळगण्याइतपत त्यांचं व्यक्तिमत्त्व विशाल व व्यापक असल्याचं त्यांच्या लेखणीतून उमटलेले शब्दच सांगतात. त्यांच्या या लेखनात बुद्धीचं विलक्षण चातुर्य प्रत्ययास येतं.

यशवंतरावांचं हे हस्तलिखित, साहित्यिक ऐवज त्यांनी सन १९८४ मध्ये दिल्लीत माझ्याकडे सुपूर्त केला, त्यावर चर्चा केली. तेव्हापासून हे सर्व प्रकाशात यावं हा सुविचार मनात मूळ धरून राहिला. योगायोगावर कोणाचा विश्वास असो-नसो, परंतु वीस वर्षं अंधारात असलेल्या, अप्रकाशित राहिलेल्या या साहित्याला प्रकाश दिसला हा निव्वळ योगायोग!

हे साहित्य माझ्या संग्रही अप्रकाशित अवस्थेत आहे असं 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक श्री. सदा डुंबरे यांना समजलं तेव्हा या विषयी दिवाळी अंकासाठी एक विशेष लेख लिहिण्यासंबंधी त्यानी सुचविलं. तो लेख लिहिला आणि २००४ च्या दिवाळी अंकात देखण्या स्वरूपात तो प्रसिद्ध झाला. दिवाळी अंक प्रसिद्ध झाला ता. ६ नोव्हेंबरला आणि त्याच दिवशी सायंकाळी मुंबईहून वाचकाच्या पहिला अभिप्राय, पहिली पसंती दूरध्वनीवर मिळाली. समक्ष भेटून, फोनवरून, पत्ररूपाने अभिप्राय सत्र सुरूच राहिलं. व्यासंगी पत्रकार आणि मिष्कील लेखक श्री. अशोक जैन यांनी तर 'समस्त' दिवाळी अंकांतील 'ग्रेटेस्ट स्कूप' अशी या लेखाची भलावण केली. श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांनी 'अप्रतिम' या एकाच शब्दात या लेखाबद्दलचा अभिप्राय असल्याचं कळविलं. विदर्भ, खानदेश (जळगांव), मराठवाडा (औरंगाबाद), पश्चिम महाराष्ट्रातील वाई, सातारा, कराड,

कोल्हापूर, राधानगरी, सांगली येथून अनेकांनी फोन केले, पत्रं पाठविली.

सर्वांचा सांगावा हाच की, यशवंतरावांचं साहित्य, ग्रंथ वाचण्यास उत्सुक आहोत. 'विरंगुळा' ग्रंथप्रकाशनाची काही प्रकाशकांनी तयारी दर्शविली. आग्रह केला. यशवंतरावांसंबंधी आदर असणारांनी भेटीला बोलवलं. काही मित्रांकडे चर्चेसाठी मी स्वत:च गेलो. उशीर झाला आहे, तुमचंही वय झालं आहे तेव्हा ही जबाबदारी शक्य तितक्या लवकर हातावेगळी करा हा त्यांचा सल्ला.

प्रकाशनाचे प्रस्थान ठेवावंच लागले. प्रस्थान ठेवलं परंतु हा अडथळ्यांचा, जिकीरीचा प्रवास मुक्कामापर्यंत पोहोचणार का हा प्रश्न भेडसावत राहिला. येथेही यशवंतरावांची पुण्याई मदतीला आली! आयुष्यभर निरलसपणे, निरपेक्षतेने त्यांनी केलेली जनसेवा, पुण्याईच्या रूपाने प्रकट झाली की काय कोण जाणे!

ग्रंथ निर्मितीच्या प्रस्तावाला सहकार्याची आणि वित्त सहयोगाची तयारी 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान' (मुंबई) या विश्वस्त संस्थेनं सर्वप्रथम दर्शविली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष ना. शरद पवार यांनी सहयोगाची अनुमती दिली. सेक्रेटरी श्री. शरद काळे यांनी त्यानुसार पत्रद्वारे कळविलं. यशवंतरावांचे विचार महाराष्ट्रात निरनिराळ्या जिल्ह्यात, तालुक्यात नव्या पिढीमध्ये, कार्यकर्त्यांमध्ये रुजविण्याचं विघातक कार्य, प्रतिष्ठान करीत आहे. यासाठी विचार मंच, युवा व्यासपीठ, महिला व्यासपीठ माध्यमं निर्माण करण्यात आली असून चर्चा, अभ्यास शिबिरं, प्रकाशनं, व्याख्यानं प्रोत्साहनपर अनुदान असे उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांना प्रतिसाद मिळत आहे. 'विरंगुळा'मध्ये यशवंतरावांचे जे विचार ग्रथित झाले आहेत ते नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास प्रतिष्ठानच्या सहयोगामुळे बहुमोल मदत उपलब्ध होण्याचा मार्ग सुलभ झाला. सहयोग देऊन प्रतिष्ठाननं उपकृत करून ठेवले आहे.

ग्रंथ प्रकाशनासाठी उत्फूर्त प्रतिसाद मिळाला तो 'माईर्स' पुणे, वर्ल्ड पीस सेंटर (विश्वशांती केंद्र, आळंदी) या 'यूनो' प्रणित संस्थेचे संस्थापक आणि यूनोनियुक्त केंद्रप्रमुख डॉ. विश्वनाथ कराड यांचा! डॉ. विश्वनाथ कराड यांना यशवंतराव ही व्यक्ती आणि त्यांचं शैक्षणिक कार्य, जागतिक शांततेच्या

संदर्भात त्यांनी प्रसृत केलेलं कार्य आणि विचार, याबाबत कमालीचा आदर आहे. एम. आय. टी. या शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या गुणवान विद्यार्थ्याला यशवंतराव चव्हाण सुवर्णपदक देण्याचा परिपाठ त्यांनी सुरू ठेवला आहे. लातूर येथील त्यांनी स्थापन केलेल्या वैद्यकीय महाविद्यालयासाठी बांधलेल्या हॉस्पिटलचं नामकरण यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल असं केलं आहे. या आदराच्या पोटी डॉ. कराड यांनी 'विरंगुळा' साठी सक्रिय सहकार्य देण्याची तयारी दर्शविली. प्रत्यक्षात दिलं. प्राध्यापकांनी, मित्रांनी, विद्यार्थ्यांनी 'विरंगुळा' ग्रंथ संग्रही ठेवावा, वाचावा यासाठी प्रयत्नशील रहाण्याचं त्यांनी दिलेलं आश्वासन अधिक महत्त्वाचं मानलं पाहिजे.

पुण्यातील यशवंतप्रेमी उद्योजक श्री. बी. जी उर्फ बाबूराव शिर्के यांनी पहिल्या भेटीतच सहकार्यासाठी हात पुढे केला. श्री. शिर्के हे सिपोरेक्स, शिर्के कॉन्सार्टियम चे संस्थापक प्रमुख. सिपोरेक्सतर्फे त्यांनी दुबई येथे सतत दहा वर्षं बांधकाम केले. टोलेजंग इमारती, आलिशान बंगले असं या बांधकामाचं स्वरूप होतं. शेख रसिद हे दुबईचे प्रमुख सत्ताधारी होते. त्यांनी बांधकामाचा मक्ता शिर्के यांना दिला होता.

यशवंतराव विदेशमंत्री होते त्यावेळी दुबई भेटीला गेले असताना शेख रसिद यांनी बांधकामं दाखविली. बांधकामाच्या ठिकाणी श्री. बी. जी. शिर्के होते. शेख रसिद यांनी यशवंतरावांशी त्यांची ओळख करून दिली. वस्तुत: हे दोघे परिचित होतेच. येथे काही समस्या नाही ना? असे यशवंतरावांनी शिर्के यांच्याकडे विचारणा केली तेव्हा इथला राजदूत आमच्या कामगारांना व्हिसा वेळेवर उपलब्ध करून देत नसल्यानं कामात खंड पडतो असे शिर्के यांनी सांगितलं. त्यावर यशवंतरावांनी राजदूताला लगेच पाचारण करून चर्चा केली आणि व्हिसा मिळण्याचा मार्ग सुलभ करून दिला. इतकंच नव्हे तर दिल्लीस परतल्यावर कामगारांना देण्यात येणाऱ्या परवानगीच्या नियमात दुरुस्ती करून व्हिसा मिळण्याच्या अडचणीतून कामगारांना मुक्त केलं. कॉन्ट्रॅक्टरकडे व्हिसाची जबाबदारी वळविली.

सिपोरेक्सचं बांधकाम वस्तूचं उत्पादन मुंढवा येथील कारखान्यात होत असतं. सिपोरेक्सच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी यशवंतरावांनी कारखान्यास भेट दिली आणि या उद्योजकाचा गौरव केला. यशवंतरावांशी असा ऋणानुबंध

असलेल्या श्री. बी. जी. शिर्के यांनी व्यक्तीशः सक्रिय सहकार्य करून यशवंतरावांसंबंधी आदर व्यक्त करणं स्पृहणीय होय.

खानदेशातून जळगावचे डॉ. धनराज पाटील, विलासरावभाऊ पाटील, एरंडोल येथील श्री. दादासाहेब दिगंबर शंकर पाटील यांनी आणि खानदेश विभागातील शहरात असलेल्या शिक्षणसंस्था प्रमुख आणि प्राचार्यांनी यशवंतराव लिखित साहित्याचा ग्रंथ प्रकाशित होत असल्याचं समजलं तेव्हा या उपक्रमाचं स्वागत केलं. सहकार्याची तयारी दर्शविली हे विशेष होय.

डॉ. धनराज पाटील यांनी जळगाव येथे 'यशवंतराव चव्हाण स्मृतिगंध समिती' अशी विश्वस्त संस्था स्थापन केलेली असून संस्थेतर्फे यशवंतरावांसंबंधी व्याख्यानं, चर्चा, प्रसिद्धी पत्रकं असं जनजागृतीचं कार्य डॉ. पाटील करीत आहेत. श्री. दादासाहेब पाटील हे यशवंत विचारनिष्ठ आहेत. यशवंतरावांनी मोफत शिक्षणाची दारे खुली करून महाराष्ट्राचा ग्रामीण भाग शिक्षणमय केला. तीच प्रेरणा घेऊन श्री. दादासाहेब पाटील यांनी एरंडोल या तालुक्याच्या गावात विस्तीर्ण भूखंडात तीन महाविद्यालयं, माध्यमिक आणि प्राथमिक विद्यालय सुरू केलेलं असून "यशवंतराव चव्हाण शिक्षण प्रसारक मंडळ" असं संस्थेचं नामकरण केलं आहे. तालुक्यात या संस्थेच्या शाखा आहेत. हजारो विद्यार्थ्यांना अद्ययावत असं ज्ञानदान ही संस्था करीत आहे. संस्थेचा ग्रंथालय विभाग सुसज्ज आहे.

यशवंतरावांनी स्वतः लिहिलेले ग्रंथ आणि त्यांच्यासंबंधी अभ्यासकांनी लिहिलेले ग्रंथ एकत्र स्वरूपात विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना उपलब्ध व्हावेत यासाठी ग्रंथालयात स्वतंत्र 'यशवंत अभ्यास कक्ष' निर्माण करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. यशवंतरावांची स्मृती जिवंत आणि जागृत रहावी यासाठी व्याख्यानं, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून चव्हाण व्यक्तिमत्त्व नव्या पिढीत रुजविण्याचं कार्यही संस्थेनं अंगिकारिलं आहे. 'विरंगुळा'च्या पाठीशी हे सर्व यशवंतप्रेमी आहेत याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

व्यक्तिगत सहाय्यासाठी अनेक सुहृदांनी तयारी दर्शविली. हातभार लावला. इतका की, देता किती घेशिल दो कराने अशी अवस्था निर्माण केली. ज्येष्ठ साहित्यिक, ग्रंथकार, माझे साठ वर्षांपासूनचे मित्र व सहकारी

श्री. भा. द. खेर यांनी ग्रंथाची संहिता वाचली, ऐकली आणि उपयुक्त सूचना केल्या उभारी दिली. बाबूराव राशिनकर, अनिल जोशी यांनी हेच केले. श्री. राजेंद्र खेर यांनी आपुलकीने लक्ष घातले आणि ग्रंथ निर्मितीसाठी 'जंगम ऑफसेट' या पुण्यातील अद्ययावत छपाई सामग्रीने सुसज्ज असलेल्या प्रेसची जोडणी करून दिली. ग्रंथ निर्मितीचं काम सुरू झालं तेव्हा जंगम ऑफसेटचे श्री. सदाशिवराव, महेश जंगम यांनी 'विरंगुळा' ग्रंथ सौंदर्यपूर्ण, देखणा व्हावा असं आव्हान स्वीकारल्याचंच प्रत्ययास आलं. दर्जेदार, सुबक छपाईसाठी त्यांनी जातीनं देखरेख केली. ग्रंथनिर्मितीचं सारं श्रेय या पिता-पुत्रांचं.

'विरंगुळा'तील साहित्य हे यशवंतरावांच्या सिद्धहस्त लेखणीचं साहित्य. त्याचं मूल्यमापन तेवढ्याच प्रथितयश लेखणीनं व्हावं ही स्वाभाविक इच्छा. प्रा. ग. प्र. प्रधान यांनी नेटकेपणानं, नेमकेपणानं ही इच्छा प्रस्तावना लिहून पूर्ण केली. वानप्रस्थाश्रमात असणाऱ्या प्रा. प्रधान यांनी पहिल्या भेटीतच प्रस्तावना लिहिण्यास मान्यता दिली. ग्रंथसंहितेची मुद्रिते अथपासून इतिपर्यंत त्यांनी किती तपशिलाने आणि आत्मियतेनं वाचली, अभ्यासली याचं प्रत्यंतर त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत मिळतं. एका बैठकीत लेखनाचं काम पूर्ण केलं असं त्यांनीच सांगितलं. अवघ्या चार दिवसात त्यांनी प्रस्तावनेचं काम तडीस नेलं. वयाच्या ८५व्या वर्षातील त्यांची ही तडफ आणि लेखनातील तल्लीनता तरुण पिढीला अंतर्मुख बनविणारी अशीच आहे. 'साधना' साप्ताहिकाचे संपादन करणारे, समाजनिष्ठ, राजकारण धुरंधर, विचारवंत, सिद्धहस्त ग्रंथलेखन आणि साधनशुचिता कटाक्षानं जतन करणारे ग. प्र. प्रधान यांची 'विरंगुळा'साठी लाभलेली प्रस्तावना म्हणजे ग्रंथाचा कळसाध्याय म्हटला पाहिजे. त्यांनी निरंतरचे उपकृत केले आहे. ग्रंथविक्रेते, वाचनालयं, ग्रंथालयं आणि सामान्य वाचकांपर्यंत हे पुस्तक पोचविण्याची जबाबदारी प्रमुख वितरक रसिक साहित्य प्रा. लि. या मान्यवर संस्थेचे श्री. मोरेश्वर आणि श्री. योगेश नांदुरकर यांनी उचलली त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक धन्यवाद!

एम.आय.टी. तील रिसर्च सेंटरचे डायरेक्टर डॉ. अरविंद कुलकर्णी, चार्टर्ड अकौंटंट आणि देना बँकेचे संचालक श्री. दिलीप दीक्षित यांच्या आपुलकीचा उल्लेख केलाच पाहिजे. प्रा. प्रधान यांच्या भेटीसाठी, प्रस्तावना हस्तगत

करण्यासाठी हडपसरपर्यंत दूरवर जा-ये करणं डॉ. कुलकर्णी यांच्या व्यवस्थेमुळे शक्य झालं. श्री. दिलीप दीक्षित यांनी वाढदिवसाच्या निमित्तानं सहकार्याचा श्रीगणेशा केला. नागपूरचे उद्योजक श्री. बी. एम्. लांबे पति-पत्नी कुशल चौकशीसाठी आले असतांना हातभार लावून गेले. अंबरनाथचे भास्कर ऊर्फ राजा गोसावी यांनी कल्याण, डोंबिवली, ठाणे परिसरात 'विरंगुळा' पोहोचण्यासाठी मेहनत घेतली. 'सिम्बॉयसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी 'सांगाल ते सहकार्य' असं समक्ष भेटीत सांगितलं. एक ना दोन, अनेकांचे हात लागल्याने 'विरंगुळा' पेलणं शक्य होत आहे. एकाकी मी कितीसा पुरा पडणार!

परंतु सर्व काही जमून आलं. याचं श्रेय माझं एकट्याचं नाही. कुटुंबियांचं पाठबळ, मित्र, हितचिंतकांच्या दृश्य अदृश्य योगदानातून 'विरंगुळा' ची पूर्तता जमली.

यशवंतरावांनी समाजासाठी मागे ठेवलेलं विचारधन 'विरंगुळा'च्या माध्यमातून समाजाच्या स्वाधीन करण्याचं कर्तव्यकर्म माझ्याकडून करून घेतलं गेलं हे ठीकच झालं. समाजानं, महाराष्ट्रातील वाचकांनी, अभ्यासकांनी या विचारधनाचा स्वीकार करून ते संग्रहात ठेवणं यातच सर्व समाधान आहे. या समाधानाचं वाटेकरी होण्याइतकी अन्य कुठली गोष्ट यशवंतरावांना आणि स्वत: मला प्रिय आहे? अर्थातच वाचकांचा सहभाग आणि प्रतिसाद. देणं यशवंतरावांचं - ते त्यांनी दिलं. आता घेणं वाचकांचं - ते त्यांनी घ्यावं. ही माझी मागणी - पसायदान! साजिंदे, सहयोगी सहकारी यांना ग्रंथपूर्तीचा दंडवत.

रामभाऊ जोशी

'कृष्णा',
पत्रकारनगर, पुणे ४११०१६.
फोन नं. २५६५२५०६.



हां– महाराष्ट्रात जरूर येईन. महाराष्ट्राची जनता शूर आहे.



ताश्कंद करारावर सह्या करताना शास्त्रींसमवेत



एक्स्टर्नल अफेअर्स दिलंय...
...ठीक तर आहे.



किसींजरशी हितगुज




▲ धाकटा भाऊ म्हणून स्वीकारलंय... सांगायला आलोय एकसष्टीस

▼ तुमच्या स्वाधीन केलंय... बोलू काय करायचे ते !





▲ वेणूताईंचा वाढदिवस– स्वीय सहाय्यक श्रीपाद डोंगरे, राम खांडेकर

▼ शरद पवारांच्या घरी सर्वांशी चर्चा केलीय : आता पहायचं... (सकाळच्या सौजन्याने)





▲ पार्लमेंटरी सेक्रेटरी

▼ क्रुश्चेव्ह समवेत





▲ पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्रप्रसाद समवेत

▼ चिनी नेते – यशवंतराव





▲ वसंतराव नाईक, वसंतदादा, किसन वीर इत्यादी नेते – कार्यकर्ते


पेरूच्या परराष्ट्र
मंत्र्यांसमवेत





रशियाच्या अर्थमंत्र्यांसमवेत

युगोस्लावचे सत्ताधारी मार्शल
टिटो यांची भेट-चर्चा



# नांदी भैरवीची

संकल्पपूर्तीचं आव्हान स्वीकारणं आणि संकल्पसिद्धीच्या आड येणाऱ्या संकटांचं, समस्यांचं निराकरण करणं, त्या सोडविणं म्हणजेच जीवनविकास. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनात एकामागून एक अशा अनेक संकटांची, कठीण समस्यांची मालिका लागलेली आढळते. त्या समस्यांचे बंध तुटण्याची मालिकाही दिसते. अगदी जन्मापासूनची ही मालिका आहे.

ज्यांच्या जीवनाचा बोध घ्यावा, महत्ता आजमावण्याचा प्रयत्न करावा अशा आधुनिक भारतात निरनिराळ्या प्रदेशात वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालेल्या ज्या अनेक व्यक्ती आहेत त्यांपैकी थोड्या व्यक्ती अशा आहेत की, त्यांच्या जीवनात वर्तमान युगाचा मथितार्थ सूचित होतो. वर्तमान युगाच्या प्रेरणा, ध्येयवाद, स्थित्यंतरे आणि महत्त्वाच्या घडामोडी यांचा अन्वयार्थ उमटलेला असतो अशा थोड्या व्यक्तींपैकी यशवंतराव हे एक आहेत. विसाव्या शतकातील विचारवंतांनी, व्यासंगी अभ्यासकांनी, लेखकांनी यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी असा अभिप्राय नोंदवून ठेवलेला आहे.

एका घटनेमागून दुसरी घटना होत जाणे हेच जीवनाचे स्वरूप असते. व्यक्ती जीवनाप्रमाणेच सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनालाही ही गोष्ट लागू आहे. एका घटनेमागून दुसरी घटना होणे म्हणजे इतिहास नव्हे. काही विशिष्ट घटना किंवा घटनांची मालिका इतिहास या संज्ञेस प्राप्त

हे सर्व लिहिले तेव्हा मला आता थोडे बरे वाटले. मी तारीख ४ किंवा ५ ला मिरजेस येत आहे. संध्याकाळी तिथे राहणार आहे.



होतात. काही घटना महत्त्वाच्या असतात, काही नसतात. समाजात किंवा राष्ट्रात गुणात्मक, अर्थपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण होणारा बदल म्हणजेच इतिहास होय. इतिहास घडतो तो अशा घटनांच्या मालिकांमुळे घडतो. यशवंतराव इतिहासाचा विषय घडला तो वैशिष्ट्यपूर्ण घटनांतून त्यांनी आयुष्यभर जी वाटचाल केली त्यातून घडला.

यशवंतरावांची जन्मकथा ही पहिली घटना! सातारा जिल्ह्यातील (पूर्वीच्या) 'देवराष्ट्र' या खेड्यात मामाच्या घरात त्यांचा जन्म झाला. आई विठाबाई यांचा जीवनमरणाचा झगडा म्हणजे या मुलाचा जन्म. प्रसूतीतून आईची लवकर सुटका झाली नाही. विलक्षण कठीण समस्या निर्माण झाली. अर्धीअधिक रात्र उलटली तरी खेड्यातील अनुभवी सुइणींना प्रसुती घडविण्यात यश आले नाही. विठाबाई बेशुद्ध झाल्या. खेड्यात डॉक्टर, वैद्य कोणी नाही. शहर बारा-पंधरा मैल दूर. बैलगाडी हे एकच वाहन. घरात वृद्ध आजी होत्या. त्यांनी सागरोबाला हात जोडले. सागरोबा हे देवराष्ट्रचं देवस्थान. सोरटी सोमनाथचे बारा ज्योतिर्लिंगाचे स्थान म्हणजेच सागरोबा ही देवराष्ट्रवासियांची श्रद्धा. आजीनं सागरोबाला साकडं घातलं. विनवणी केली की माझ्या हाताला यश दे, तुझं नांव घरात कायम राखीन! आजीची तळमळ सागरोबापर्यंत पोहोचली असावी. विठाबाईची सुटका झाली. आजीनं सागरोबाला वचन दिलं होतं. सागरोबानं हाताला यश दिलं म्हणून मुलाचं नाव ठेवलं 'यशवंत' जन्मवेळी संकट आलं आणि मागोमाग संकटांचे बंधही तुटले.

देवराष्ट्र हे त्यांचं जन्मगाव नागरी जीवनापासून दुरावलेलं, तीन -चार हजार वस्तीचं खेडेगाव. हा सारा दुष्काळी, डोंगराळ भाग. 'सोनहिरा' या लहानशा ओढ्याच्या काठावर वसलेलं हे गाव. यशवंतरावांचे वडील बळवंतराव हे एक खेड्यातले शेतकरी. एका न्यायाधिशाच्या सौजन्यानं बळवंतरावांना बेलिफाची नोकरी मिळाली. कराड या तालुक्याच्या गावात ते नोकरीवर रुजू झाले. नागरी जीवनाचा आश्रय त्यांना परिस्थितीनं करावा लागला. यशवंतरावांना नागरी जीवनाचा वरदहस्त प्राप्त झाला तो मात्र त्यांच्यावर आणि कुटुंबावर कोसळलेल्या संकटांमुळेच. यशवंत हा मुलगा चार वर्षांचा असताना वडील बळवंतराव प्लेगमुळे देवाघरी गेले. विठाबाई देवराष्ट्र येथे भावाकडेच मुक्कामाला होती. विठाबाईची चार मुलं आणि अन्य कुटुंबीय हा सारा संसाराचा गाडा ओढणं भावाच्या कुवतीबाहेरचं आहे असं पाहून विठाबाई मुलांसह पोट भरण्यासाठी कराडात दाखल झाली. बळवंतरावांची राहण्याची जागा कराडात होतीच. शाळेसाठी म्हणून विठाईनं यशवंताला भावाच्या घरीच ठेवलं. देवराष्ट्रच्या प्राथमिक शाळेत यशवंताचं

चौथीपर्यंतचं शिक्षण झालं. देवराष्ट्रात पुढच्या शिक्षणाची, इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था नसल्यानं त्याला कराड नगरीत आणावं लागलं. यशवंतानं इंग्रजी शिकावं असा त्याच्या थोरल्या बंधूंचा आग्रह होता. कराडसारख्या नागरी जीवनात आल्यामुळं पुढच्या टप्प्यात यशवंताला जीवन-विकासाच्या वाटा दिसू लागल्या. नागरी संस्कृतीचा लाभ मिळाला.

ग्रामीण जीवनाला नागर बनविणं, नागर संस्कृतीचा संपूर्णपणे लाभ करून देणं हे एक उच्च उद्दिष्ट ठरवून आधुनिक महाराष्ट्र विकसित भारतामध्ये अग्रस्थानी विराजमान व्हावा यासाठी यशवंतरावांनी पुढील काळात, राजकीय जीवनांत कार्यरत असताना जे निर्णय केले, निर्णयांची अंमलबजावणी केली त्याचं मूळ ग्रामीण जीवनाच्या त्यांच्या अनुभवांत असलं पाहिजे.

यशवंतराव विद्यार्थी होते, कराड येथील टिळक हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होते त्या काळात सन १९२१ च्या सुमारास महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ सुरू झाली होती. सातारा जिल्हा हे या चळवळीचं केंद्र होतं. सामाजिक परिवर्तनाचा आदेश या चळवळीनं प्रखरतेनं ग्रामीण भागात पोहोचविण्याचं कार्य केलं. ग्रामीण भागातील अज्ञान, दारिद्र्य, जातीजातींमधील श्रेष्ठ-कनिष्ठ अशी निर्माण झालेली दरी याबाबत सत्यशोधकांनी लोकजागृतीचं कार्य केलं. यशवंताच्या तरल आणि प्रत्ययशील बुद्धीवर याचा परिणाम घडला.

राजकीय पारतंत्र्याविरुद्ध उभी राहिलेली आंदोलनं याच काळात देशात पसरत होती. टिळक हायस्कूलमधील शिक्षक स्वातंत्र्योत्सुक असले तरी उघडपणे चळवळीत सहभागी होणे त्यांना परिस्थितींमुळे कठीण होते. सातारा जिल्हा हा राजकीयदृष्ट्या सदैव जागृत असलेला जिल्हा. स्वातंत्र्याची उर्मी तरुण पिढीपर्यंत म्हणजे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य शिक्षकवर्ग युक्तीप्रयुक्तीने करीत होता. बुद्धिमान यशवंताच्या मनांत या विचारांचं प्रतिबिंब उमटत राहिलं. त्याचा मूळचा पिंड खेड्यातला असला तरी बुद्धीशक्तीनं तो कराडमध्ये विद्यार्थीदशेत अंकुरला. राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करणाऱ्या 'केसरी' 'ज्ञानप्रकाश' अशा वृत्तपत्रांचं वाचन, सभा, मेळावे येथील भाषणे, प्रभातफेऱ्या आणि घोषणा यातून या अंकुरातून कोंब तरारले.

ग्रामीण जीवनाविषयीची खंत या विद्यार्थ्याच्या मनांत सतत बोचत होती. विद्यार्थी म्हणून कराडमध्ये नागरवस्तीत असला तरी ग्रामीण जीवनाचा विकास हा ध्यास कमी झाला नव्हता. हा ध्यास प्रकट करण्याची संधी यशवंताला लाभली. पुणे शहरातील वक्तृत्वोत्तेजक सभेने एक वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती.

टिळक हायस्कूलच्या या विद्यार्थ्यानं त्यासाठी नाव नोंदवलं. पुण्याला स्पर्धेत भाषण केलं. विषय होता 'खेड्यांचा विकास'. वक्तृत्व इतकं प्रभावी ठरलं की परीक्षकांनी त्याला पहिल्या क्रमांकाचं पारितोषिक दिलं. परीक्षकामध्ये साहित्यसम्राट न. चिं. केळकर होते.

महात्मा गांधींनी सन १९३० ला कायदेभंगाची चळवळ सुरू केली. त्यावेळी यशवंत हा विद्यार्थी इंग्रजी सहाव्या इयत्तेचं शिक्षण घेत होता. कराडमध्ये सत्याग्रहाचं वातावरण मूळ धरीत होतं. त्यातून स्फूर्ती घेऊन या विद्यार्थ्यानं हायस्कूलच्या आवारातील झाडावर तिरंगा फडकावला आणि सत्याग्रहात उडी घेतली.

यशवंतानं इंग्रजी सातवी करून म्हणजे त्यावेळची मॅट्रिक होऊन मामलेदार व्हावं, किंवा मास्तरची नोकरी करून कुटुंबाला आधार द्यावा अशी त्यांच्या आईची - विठाबाईची तळमळ होती. ती बिचारी या मुलाच्या फी च्या पैशासाठी, दोन तीन आण्यांसाठी शेतात काबाडकष्ट करीत होती, चार घरातील दळणे दळत होती. जाहीरपणे तिरंगा फडकाविणे हा गुन्हा असल्यानं पोलिसांनी यशवंताला अटक केली. हायस्कूलवर तोहमत येणार असल्यानं एका शिक्षकानं फौजदाराशी रदबदली केली तेव्हा यशवंतानं माफी मागितली तर सोडून देण्याचं फौजदारानं मान्य केलं. दरम्यान यशवंताला पोलिसांनी पकडलं हे कळताच विठाबाई पोलिस ठाण्यात आली. शिक्षकांनी तिला फौजदार कसे दयाळू आहेत सांगितलं. परंतु ही माफीची तडजोड ऐकताच खेड्यातली ही अडाणी बाई शिक्षकाला रागावली. ''यशवंतानं कुणाचा खून केलाय का दरोडा घातलाय? माफी कशापायी मागायची? यशवंता, तब्बेतीला जपून रहा'' एवढं बोलून म्हातारी निघून गेली. या सत्याग्रहाबद्दल यशवंताला अठरा महिन्याची कारावासाची शिक्षा होऊन येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली. आईच्या त्या क्षणाच्या निर्णयानं राजकारणाच्या एका विश्वात यशवंताला फेकून दिलं ते निरंतरचं!

येरवडा कारागृहात यशवंतरावांना त्या काळात अच्युतराव पटवर्धन, आचार्य नरेन्द्र देव, युसुफ मेहेरअली, आचार्य भागवत, एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, शिरूभाऊ लिमये, बॅ. बाळासाहेब खेर असा अनेकांचा सहवास घडला. बौद्धिके ऐकली. ग्रंथवाचन केलं. पाश्चात्त्य विद्वानांनी लिहिलेले विविध विषयावरील ग्रंथ समजून घेतले. स्वातंत्र्य कोणासाठी, कशासाठी या अभ्यासानं वैचारिक पिंड तयार झाला. कारागृहात ज्या ग्रंथांचं वाचन केलं त्यातील अभ्यासपूर्ण विचार, निष्कर्ष यांची स्वतंत्रपणे नोंद करून ठेवली. सावरकरांचे 'कमला' काव्य आचार्य

भागवत यांनी दोन-तीन दिवस विस्तृत विवरण करून सांगितल्याची या टिपण वहीत नोंद आहे. महत्त्वाच्या विचारांची, निष्कर्षाची, प्रतिक्रियांची नोंद करण्याचा त्यांचा परिपाठ पुढे दीर्घ काळपर्यंत त्यांनी कायम राखला. यातील काही नोंदी पत्ररूपात आहेत. अनेकविध घटनांचा तपशील क्रिया-प्रतिक्रियांसह लिहून ठेवलेला त्यांचा हा हस्तलिखिताचा खजिना आहे. शिवाय या दस्तऐवजाला ऐतिहासिक महत्त्व आहे. पक्षाच्या अधिवेशनासाठी, कार्यकारिणीच्या बैठकीसाठी, श्रेष्ठींशी चर्चा करण्यासाठी त्यांना नेहमीच दौरे करावे लागले. मंत्रीपद स्वीकारल्यावर शासकीय कामांसाठी, परिषदांसाठी, एखाद्या जिल्हाप्रश्नाचे गांभीर्य आजमावण्यासाठी संपूर्ण देशात दौरे झाले. पुढच्या टप्प्यात जोखमीच्या कामासाठी पृथ्वीपर्यटन झालं. या प्रत्येक दौऱ्याच्या वेळी, कुठे गेलो, कोण भेटलं, काय चर्चा झाल्या याचा तपशील पत्नी वेणुबाई यांना सविस्तर पत्रं लिहून नोंद केलेला आहे. तर काही महत्त्वाच्या नोंदी स्वतंत्रपणे डायरीत किंवा वहीत लिहिलेल्या आहेत.

१९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी यशवंतरावांना कराड तालुक्याची उमेदवारी मिळाली. मतदारांनी त्यांना भरघोस पाठिंबा देऊन निवडणुकीत विजय संपादन करून दिला. आमदार म्हणून मुंबईत दाखल झाले. मुख्यमंत्री बॅ. बाळासाहेब खेर यांनी त्यांचा मंत्रिमंडळात समावेश केला नाही. पार्लमेंटरी सेक्रेटरीपद त्यांना दिलं.

मुंबईत वास्तव्य झालं परंतु मर्यादित उत्पन्न, आर्थिक चणचण यामुळे सर्व कुटुंबियांचं पोषण मुंबईत करणं अशक्य ठरल्यानं त्यांनी सारा कुटुंब कबिला कराडातील घरात ठेवला. थोरले बंधू राजकीय आंदोलनात सहभागी झाल्यानं तुरुंगात होते. तेथील छळामुळे शरीर प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला. १९४५ मध्ये कारावासातून मुक्त होऊन ते परतले आणि क्षयाने त्यांना पछाडलं. त्या काळात क्षयरोगावर रामबाण औषधं उपलब्ध नव्हती. मिरजेतील दवाखान्यात उपचार झाले पण रोगानं त्यांचा बळी घेतला. सौ. वेणुबाईंना त्यांची शुश्रुषा करावी लागली. त्या संसर्गाने सौ. वेणुबाई क्षयरोगाच्या रुग्ण बनल्या. मिरजेत त्यांच्यावरही उपचार झाले. एका अमेरिकन डॉक्टरने उपचार केल्याने त्या बचावल्या परंतु दोन्ही फुफ्फुसे निकामी बनली. संतती होण्याची आता शक्यता नाही असा डॉक्टरांनी निर्वाळा दिला. १९४५ मध्ये त्यांनी कन्यारत्नाला जन्म दिला होता. परंतु ती बालिका दहा दिवसातच देवाघरी गेली. यशवंतराव बेचाळीसच्या चळवळीत भूमिगत असताना त्यांचा ठावठिकाणी समजावा यासाठी पोलिसांनी वेणुबाईंना अटक करून दोन महिने तुरुंगात डांबलं होतं.

त्याचा परिणाम प्रकृतीवर झालेलाच होता. त्यानंतरची प्रसूती आणि थोरल्या दिराची शुश्रुषा यामुळे क्षयरोगाने त्यांचे शरीर पोखरले. कुटुंबपोषण आणि औषधांसाठी करावा लागणारा खर्च यामुळे यशवंतरावांची आर्थिक ओढाताण सुरू होती त्याचं दर्शन १९४६ ते १९५२ या काळात त्यांनी वेणुबाईंना लिहिलेल्या पत्रातून घडतं. कधी एकवेळ जेवणं, कधी मित्राच्या डब्यातील अर्धा भाग खाणं, कधी मित्राकडे भोजनासाठी जाणं अशा अवस्थेत त्यांनी आमदार आणि पार्लमेंटरी सेक्रेटरी असतानाचे दिवस ढकलले.


श्री. नानासाहेब कुंटे हे त्यावेळी सभापती होते. त्यांना कोणाकडूनतरी या आमदाराची हलाखी आणि एकूण स्थिती माहिती झाली असावी. त्यांनी एक दिवस यशवंतरावांना घरी बोलावलं आणि भोजनासाठी माझ्याकडे आलं पाहिजे असं सांगितले. यासंबंधी यशवंतरावांनी पत्रात उल्लेख केला आहे. तो असा–

---

मुंबई
२६/७/१९४९

प्रिय सौ. वेणूबाईस,

येथील बाकी सर्व ठीक आहे. मी सध्या सकाळ - संध्याकाळ नाना कुंटे यांच्याकडे जेवण करतो. त्यांनी फारच आग्रह केला म्हणून जातो आहे. मनातून मात्र अस्वस्थ आहे. नात्यातली इथली मंडळी भेटून जेवायला बोलावतात. बहुधा तू त्यांना लिहिले असावेस. परंतु या लोकांना मी साफ नकार दिला. या आठवड्यात तुमची पैशाची ओढाताण झाली असेल. गौरीहरकडे कोणाला तरी पाठवून शंभरभर रुपये आणावे. काय करीत आहात ते कळवा.



---

वेणूबाई मिरज येथे औषधोपचार घेत होत्या. दिवसेंदिवस प्रकृती खालावत जात होती. तरीपण आर्थिक टंचाई आणि सेक्रेटरीपदी असल्यानं कामाची वाढलेली जबाबदारी यामुळे पती-पत्नींची पत्ररूपानंच भेट व्हायची. हे सर्व

उभयपक्षी मानसिक ताण निर्माण करणारं होतं. जीवघेण्या आजारात पतीचं सान्निध्य असावं अशी वेणूबाईंची स्वाभाविक इच्छा असली तरी अशी सोबत ठेवणं यशवंतरावांना शक्य होत नव्हतं. परिणामी वेणूबाईंची चिडचिड सुरू झाली. हट्टीपणा वाढला. अशा असहाय्य आणि असह्य स्थितीत मन मोकळं करायला अन्य कोणी यशवंतरावांच्या आसपास नव्हतं. यशवंतरावांनी ही मानसिक स्थिती एका पत्रात नमूद केली आहे. १९४९ च्या पत्रात ते लिहितात –

मुंबई
२७/७/१९४९


दररोज पत्र लिहिण्याचा विचार करतो पण पत्र सुरू करण्याचे धैर्यच होत नाही. पत्रात काय लिहावे हेच मुळी सुचत नाही. तू खूपच रागावली असशील पण माझा स्वभाव हा आता निदान तुला तरी नवीन नाही. तुझी प्रकृती बरी आहे असे पत्रात कुणाकुणाच्या वाचून तेवढाच आनंद होतो.

तू माझ्यासाठी एक गोष्ट शिकावीस की ज्यावेळी तुझ्यापासून परगावी जायला निघतो त्या दिवशी अकारण हट्टीपणा किंवा नाराज होईन असं काही करू नकोस. मला त्यामुळे मानसिक फार त्रास होतो. माझा माझ्यावरचा ताबा सुटतो. या चिडखोरीची माझी मलाच हल्ली भीती वाटू लागली आहे. या चिडखोर स्वभावामुळे मीच माझ्या जीवाचे काही बरे वाईट करीन की काय इतकी हल्ली मला धास्ती वाटू लागली आहे. माझ्याइतकाच तूही हट्टीपणा करतेस त्यामुळे ज्याच्याबद्दल नंतर पश्चात्ताप होतो अशा गोष्टी घडतात.

हे सर्व लिहिले तेव्हा मला आता थोडे बरे वाटले. मी तारीख ४ किंवा ५ ला मिरजेस येत आहे. संध्याकाळी तिथे राहाणार आहे.

या महिन्यात तुमचेकडील खर्चाचे पैसे संपले असतील याची मला कल्पना आहे. त्या संबंधात काही तरी व्यवस्था

करण्याचे नादात आहेच. पैशाचे काम फार सावकाश होते. गोष्टी आपल्या इच्छेप्रमाणे होत नाहीत त्यामुळे थोडा त्रास होतो. पण हे चालायचेच.



---


शरीराने मुंबईत परंतु मनानं कराडात आणि मिरजेत अशी यशवंतरावांची स्थिती होती. मिरजेतील प्रदीर्घ उपचारानंतर विश्रांतीसाठी दवाखान्यातून निघून घरी जाण्याचा सल्ला वेणूबाईंना मिळाला तेव्हा यशवंतरावांना मिरजेस जावं लागलं. मिरज येथून सामानासह कराडला न जाता सरळ पुण्यास येण्याचा निर्णय त्यांनी केला आणि तसं मिरजेस पत्रानं कळविलं. १९४९ च्या ऑगस्टमधील ही घटना. त्यांनी पत्नीला पत्रात लिहिलं.

---

मुंबई

२६/८/१९४९

मिरजेचे सामान पुण्यास आणण्यास कसलीच हरकत नाही. परंतु कराडहून दुसऱ्याचे कोणाचे सामान आणलेले असल्यास ते परत करावे. त्यातील मिरजेच्या सामानात काही अपुरे वाटले तर कळवा म्हणजे ते इकडून आणता येईल. हे एकदा नक्की झाले म्हणजे फक्त कपडे घेऊन मी पुण्यास येईन तेथील काम संपवून उशिरात उशिरा ता. ७ पर्यंत मिरजेस येईन. त्याच दिवशी मिरज सोडू. पैशासाठी मी एकाला लिहीत आहे. परंतु अदमासे एकंदर पैसे किती लागतील ते मात्र कळवा म्हणजे बरे.



---

मिरज शहराच्या बाहेर माळावरील मोकळ्या हवेशीर जागेत क्षयरोग रुग्णांसाठी रहाण्याची व्यवस्था होती. एक लहानगी खोली, रुग्णाला विश्रांतीसाठी लोखंडी

पलंग एवढेच तेथे होते.

यशवंतराव हॉस्पिटलमधील या खोलीत कॉटवर (पलंग) बसले तेव्हा वेणूबाईंनी प्रकृतीची एकूण अवस्था सांगितली. डॉक्टरांनी यापुढे संतती होण्याचा संभव नाही याची त्यांना कल्पना दिलेली होती तेही त्यांनी पतीला सांगितलं. यशवंतराव स्तब्ध होते. वेणूबाईंनी त्यांना सुचविलं की तुम्ही तरुण आहात. तुम्हाला वंशाला दिवा असला पाहिजे. त्यासाठी तुम्ही दुसरं लग्न करा.

यशवंतरावांची स्तब्धता ढळली नाही हे लक्षात येताच वेणूबाईंनी पुन्हा तेच काहीशा आग्रहानं सांगितलं.

''मला वंशाच्या दिव्याची आवश्यकता नाही. येथून पुढे तुला मी आणि मला तू. हा विषय इथे बंद.'' यशवंतराव एवढेच बोलले.

१९८३ च्या जूनपर्यंत म्हणजे वेणूबाईंचं निधन होण्याच्या क्षणापर्यंत हे दोघे एकमेकांसाठी जगले.

यशवंतरावांच्या सोबतं त्यावेळी सुरक्षा अधिकारी म्हणून एक जमादार होते. खोलीच्या दारात उभा असलेला तो हे सर्व ऐकत होता. वेणूबाईंचं निधन झाल्याची बातमी वाचल्यावर यशवंतरावांना त्यांनी सांत्वनाचं पत्र लिहून– ''त्या वेणूबाई तुम्हाला सोडून गेल्या. तुमच्या मनस्थितीची कल्पनाच करता येत नाही.'' असं पत्रात नमूद केलं. सांत्वनाची सर्व पत्रं मी वाचली तेव्हा हे उमजलं.

आमदारकी प्राप्त होऊन तीन-चार वर्षं उलटली तरी प्रकृती ढासळलेल्या पत्नीला दवाखान्यातून घरी परत आणण्याच्या वेळेस खर्चासाठी कोणाकडे तरी पैशाची मागणी करावी लागावी यापरते अन्य मानसिक दु:ख ते कोणतं! हे सारं दु:ख, अवमान त्यांनी आजन्म मनाच्या कप्प्यात ठेवलं. त्याचा उच्चार केला नाही किंवा गरिबीचं भांडवल केलं नाही. इतकंच नव्हे तर सर्वसामान्य माणसांबद्दल, कुटुंबांबद्दल, त्यांच्या ओढाताणीच्या परिस्थितीबद्दल मनात कणव बाळगली आणि दैन्यावस्थेतून त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. माणसाकडे माणूस म्हणून पाहिलं आणि वागविलं. चव्हाण कुटुंबाची हलाखीची स्थिती असूनही यशवंतरावांच्या मातोश्रींनी श्रीमंत मनानं माणुसकीचा दृष्टिकोन जपण्याचा सतत प्रयत्न केला. त्यातूनच यशवंतरावांना स्वत: जगावं आणि जगवावं कसे याचे धडे मिळालेले असावेत. जगण्याची आणि जगविण्याची ही भूमिका, ते उच्चासनावर आरूढ झालेले असले तरी शाबूत राहिली. अर्थातच हे देणं जन्मापासून लाभलेल्या संस्काराचं!

◆ ◆ ◆

# प्रस्थान ठेविले प्रवासांचे

स्वतंत्र भारताच्या घटनेचा मसुदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केला आणि त्यास अधिकृत मान्यता प्राप्त होऊन भारताची घटना अस्तित्वात आली. या घटनेनुसार देशात पहिली सार्वत्रिक निवडणूक सन १९५२ ला झाली. ही निवडणूक जिंकून यशवंतराव पुन्हा आमदार बनले. त्यापूर्वी आमदार असताना त्यांनी पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मुंबईत मंत्रालयात काम केले होते.

बॅ. बाळासाहेब खेर यांच्या मुंबई इलाख्यातील पहिल्या मंत्रिमंडळात श्री. मोरारजी देसाई यांच्याकडे गृहखात्याचा कारभार होता. या खात्यातच यशवंतरावांना पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मोरारजींचा विश्वास संपादन करून काही निर्णय स्वतंत्रपणे करण्याइतपत ते वाकबगार बनले. विशेषत: सामान्यांना ज्यामुळे दिलासा मिळेल असे निर्णय त्यांनी प्रामुख्याने केले. शासनाकडून मान्यता प्राप्त करून घेऊन तमाशा या लोककलेला प्रतिष्ठा मिळवून दिली. यातूनच नंतर 'तमाशा बोर्ड' अस्तित्वात आले. नागरी संरक्षणासाठी संरक्षणाच्या कामात नागरिकांना सामील करून घेता यावे यासाठी महाराष्ट्रात 'होमगार्ड संघटना' बांधणीचा निर्णय त्यांनी केला. त्यांची प्रशासकीय कामातील कुशलता, पारदर्शीपणा, स्वच्छ कारभार याचा ठसा मोरारजींच्या मनावर उमटला असावा.



१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रातील

राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. १९४९ मध्ये येथे शेतकरी कामकरी पक्षाची स्थापना झाली. या नवीन पक्षाच्या स्थापनेत दत्ता देशमुख, पी. के. सावंत, भाऊसाहेब राऊत, शंकरराव मोरे, केशवराव जेधे, तुळशीदास जाधव असे मातब्बर राजकीय नेते होते. खेर मंत्रिमंडळाची धोरणे त्यावेळच्या मुंबई इलाख्यातील ग्रामीण जनतेला, बहुजन समाजाला मान्य नव्हती. खेर यांच्या कार्यपद्धतीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न काँग्रेस अंतर्गत एक गट करीत होता. त्याला प्रतिसाद मिळत नाही असे लक्षात येताच याच गटाने पुढाकार घेऊन शे.का. पक्षाची स्थापना केली. यशवंतराव हे ग्रामीण भागातून बहुजन समाजाचे प्रतिनिधी म्हणून राजकारणात आलेले असल्याने या गटाशी ते प्रारंभी संबंधित होते. राज्यकारभाराच्या धोरणात बदल घडावा यास त्यांची मान्यताही होती. परंतु असा बदल घडवून आणण्यासाठी काँग्रेसच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला होऊन प्रादेशिक स्वरूपाचा नवा पक्ष निर्माण करणे त्यांना मान्य झाले नाही. त्यामुळे नवीन पक्षस्थापनेच्या कारवाईपासून ते अलिप्त राहिले.

१९४८ मधील महात्मा गांधींची हत्या आणि १९४९ ला शे. का.पक्षाचा उदय यातून येथील राजकीय वातावरण गुंतागुंतीचे आणि अस्थिर बनले. काँग्रेस पक्षाला हे मोठे आव्हान होते. हे आव्हान स्वीकारूनच निवडणुकीच्या संग्रामात काँग्रेसला मतदारांना सामोरे जावे लागले. या निवडणुकीत भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ अशा अनेक काँग्रेस नेत्यांनी प्रचारसभांनी सर्व मतदारसंघ पिंजून काढले तेव्हा कुठे काँग्रेसची सरशी झाली. मोरारजींच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. या मंत्रिमंडळात मोरारजींनी यशवंतरावांना मंत्री म्हणून स्थान दिले आणि त्यांच्याकडे पुरवठा खात्याचा कार्यभार दिला.

मंत्रिपद स्वीकारले त्या वर्षापासून शासकीय कामासाठी, परिषदा, काँग्रेसची अधिवेशने, दिल्लीतील केंद्रीय मंत्र्यांशी, अधिकाऱ्यांशी चर्चा यासाठी त्यांचे दौरे सुरू झाले. मध्यप्रदेश, गुजराथ, राजस्थान, उत्तरप्रदेश, पंजाब, हिमाचल प्रदेश, काश्मीर, आंध्र, कर्नाटक असे देशातील विविध प्रांत, तेथील शहरे यांचा त्यांनी प्रवास केला. या सर्व प्रवासाचा विशेष असा की ज्या साधनांनी म्हणजे मोटार, रेल्वे, विमान यांनी प्रवास केला त्याची नोंद तर त्यांनी केलीच शिवाय त्या त्या प्रदेशाचे ऐतिहासिक महत्त्व, तेथील निसर्ग, लोकरिवाज, कौटुंबिक उल्लेख, भेटलेल्या व्यक्ती, परिषदा, सभा यातील कामकाज अशी सर्वसमावेशक माहिती लिहिली, काही लेखन पत्ररूपाने कलेले आहे. या सर्वच लेखनातून त्यांची रसिकता, निसर्गप्रेम,

कलाप्रेम आणि सूक्ष्म निरीक्षण याची प्रचिती मिळते. यशवंतरावांनी जी सत्तास्थाने भूषविली त्या सत्तास्थानांवरील कोणत्याही व्यक्तीने अशा प्रकारचे लिखाण करून ठेवलेले आढळत नाही. उच्च ध्येयवाद, सौंदर्यदृष्टी, तात्त्विक चिंतन आणि साहित्य कुशलता असेल तर असे लेखन होऊ शकते. त्यांच्या ठिकाणी हे पुरेपूर होते याचा प्रत्यय येतो. हा पत्रव्यवहार, नोंदी आणि यातील तपशील इतिहासाचे संदर्भ साधन आहे, हे त्याचे एक वैशिष्ट्य.

घटनांची स्मृती रहावी म्हणून पत्र लिहिण्याचे व्रत सांभाळत आहे असे त्यांनी एका पत्रात नमूद केलेले असले तरी व्रत स्वीकारावे लागले आणि सांभाळावे लागले याचे कारण त्यांचे सर्व प्रवास एकाकी झाले. पत्नी वेणूबाईंचे शरीर रोगाने पोखरलेले होते. अशक्त बनल्या होत्या. प्रवासासाठी शरीराची साथ नव्हती. एकट्याने घरात थांबण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. यशवंतरावांना याची खंत होती. प्रवास करणे तर क्रमप्राप्त होते. या स्थितीत घरी सुन्न मन:स्थितीत एकाकी असणाऱ्या पत्नीच्या मनाला थोडाफार विरंगुळा लाभावा यासाठी हा पत्रप्रपंच, स्मरणवही लिहिण्याचा परिपाठ राखल्याचे त्यांनी एकदा सांगितले. देशभरात त्यांचे प्रवास झाले तसे संरक्षण, अर्थ, विदेश व्यवहार खात्यांचे काम सांभाळताना पृथ्वीपर्यटन घडले. पत्र लिहिण्याचा आणि नोंदी करण्याचा नेम मात्र नित्याचा राहिला.

मनातील ही खंत त्यांनी एका पत्रात नमूद केली आहे. त्यांनी लिहिले

---

प्रिय वेणूबाईस

तू मनाची हुषारी ठेवीत नाहीस त्यामुळे अतिशय चिंता वाटते. तू मनाचा धीर ठेवून प्रकृती सुधारली पाहिजेस. मी असा भटकत रहातो यात मला समाधान का आहे? परंतु हे सर्व न केले तर कसे चालेल? यामुळे नाईलाजास्तव हिंडत आहे. तुझ्या आजारपणातसुद्धा तुझ्यापासून दूर जावे लागत आहे. मी याबाबत चूक करतो आहे असे मला वारंवार वाटते पण दुसरा मार्गच मला दिसत नाही. असहाय्यपणे हे सर्व करावे लागते.

तू आजारातून बरे व्हावेस याच्याइतकी प्रिय गोष्ट माझ्या आयुष्यात उरलेली नाही. तुझ्याकरता नव्हे पण

निदान माझ्यासाठी तुला बरे होणे जरूर आहे. किरकोळ गोष्टीकडे दुर्लक्ष कर. मन आनंदी ठेवण्याचा प्रयत्न कर. आनंदी मन हे निम्मे औषध आहे.

तुझाच

यशवंतराव

---

मंत्रीपद मिळाल्यानंतर मुंबईत त्यांना स्वतंत्र बंगला मिळाला. त्यापूर्वी चार पाच वर्षे मरिन ड्राइव्ह भागात एका मित्राच्या खोलीत मुक्काम करून होते. मलबार हिल भागात मंत्र्यांसाठी राखीव असलेल्या 'ऐरी' या बंगल्यात वास्तव्य करण्याचे निश्चित झाले तेव्हा वेणूबाईंना त्यांनी मुंबईत आणण्याची व्यवस्था केली. आई, वडील–बंधूंची मुले अन्य कुटुंबीय यांना कराडात रहावे लागले. पत्नी कराडात किंवा मिरजेत औषधोपचारासाठी असताना तिच्याशी ते पत्राद्वारे संवाद करीत असत. पत्नीला मुंबईत आणल्यानंतर तीच प्रथा राहिली.

१९५२ च्या सप्टेंबरमध्ये इंदोर येथे अ. भा. काँग्रेस कमेटीची बैठक होती. या बैठकीला उपस्थित राहाण्याच्या निमित्ताने त्यांचा दौऱ्यास प्रारंभ झाला. इंदोर येथील 'माणिक भवन' येथे त्यांची मुक्कामाची व्यवस्था झालेली होती. तेथून त्यांनी वेणूबाईंना लिहिलेले पत्र आहे.

---

**माणिक भवन, इंदोर**
१३ सप्टेंबर १९५२

इंदोर या गावात एक दिवस राहिल्यावर आता हे आपलेच गाव आहे असे वाटू लागले आहे. ज्या ठिकाणी माझी राहाण्याची व्यवस्था केली आहे ते एक इथले मीलमालक आहेत. त्यांचे दोन चिरंजीव ए. आय. सी. सी. चे जे पाहुणे त्यांच्याकडे उतरले आहेत त्यांची व्यवस्था पाहण्यात फारच रस घेतात. श्री. राजेन्द्रकुमार शेट्टी हे ज्येष्ठ चिरंजीव बरेच शिक्षित आणि माणसात मिसळणारे गृहस्थ आहेत. आपली तुंदिल तनु सावरीत सारीत जी मारे गडबड

15343
08-04-05

करीत असतात ती काही विचारू नका. हिंदी भाषेतच मुळी आदरातिथ्य फार आहे. त्यात असा आदरातिथ्यशील यजमान भेटल्यानंतर नुसती भाषा ऐकूनच पोट भरेल. एकंदरीत इथलं वातावरण एकदम चागलं आहे.

आज सकाळी श्री. टोणपे, मी व एल. जी. पाटील येथून ४५ मैलावरील उज्जैन शहर पहाण्यासाठी गेलो. विक्रमादित्याची ही ऐतिहासिक 'अर्वाचिन' नगरी पहावी अशी कित्येक दिवसांची मनीषा फार दिवसांनी पूर्ण होणार या कल्पनेनेच केवढा आनंद झाला होता. जाता जाता वाटेवरच असलेले देवास, आपल्या कोल्हापूरच्या आक्कासाहेबांची सासुरवाडी पाहिली.


इंदोरभोवती मराठी इतिहासात प्रसिद्ध असलेल्या शहरांचा जणू पुंजकाच आहे. येथून अगदी जवळच 'धार' आहे. मांडवगड आहे पण ही सर्व पाहणे काही शक्य दिसत नाही. हो, पण उज्जैनची कथा तशीच राहील. किती अपेक्षेनं मी या शहरात गेलो आणि किती भयानक निराश झालो म्हणतेस! मी शाळेत विद्यार्थी दशेतच कालिदासाचे 'मेघदूत' वाचीत होतो. त्यावेळी यक्षाचा निरोप घेऊन निघालेला मेघ जेव्हा उज्जैन शहरावर येईल तेव्हा क्षिप्रा तटाशी काय काय दिसेल याचे भावमनोहर केलेले वर्णन मनाशी अजून ताजे आहेत. वेडेपणाने ते काव्यातले वर्णन मनात ठेवून अलिकडच्या बकाल शहरात मी अपेक्षापूर्तींच्या आशेने पाऊल ठेवले तर शेवटी निराशा होणार यात काय संशय ! कापूस बाजाराचे एक प्रमुख केंद्र हे उज्जैनीचे आजचे खरे रूप ! बारा ज्योतिर्लिंगापैकी एक 'कालेश्वर' येथे आहे. त्याचे दर्शन घेतले. मौगली राज्यातील राजा जयसिंह यांनी त्यावेळी बांधलेली 'वेधशाळा' येथे आहे ती पाहिली आणि क्षिप्रा नदीच्या घाटावर जाऊन भिक्षुकांची व 'कारागिरांची' गर्दी पाहून परत निघालो. काव्यातली आणि इतिहासातील 'वांगी' काव्यात आणि इतिहासातच ठेवणे इष्ट असा नवा धडा आज शिकलो म्हटले तरी हरकत नसावी.

उज्जैनहून परत आल्यावर घाईघाईने जेवण उरकून बैठकीसाठी गेलो. प्राथमिक पंडितजी बोलले आणि नंतर घटनादुरुस्तीचे 'कंठाळे' काम सुरू झाले. सकाळीच तडजोडीची बोलणी होऊन वादग्रस्त प्रश्नाचा एकमताने निर्णय झाला होता असे दिसले. श्री. काका गाडगीळ वर्किंग कमिटीचे उपाध्यायाचे काम करीत होते. सभेतले एकंदर वातावरण निर्जीव होते. त्याला कोणाचाच उपाय नव्हता. परंतु काका ज्या निर्जीव पद्धतीने वारंवार 'माइक' पुढे येत होते आणि निर्जीव यंत्रासारखे बोलत होते त्यामुळे माझे तर अक्षरश: डोके दुखू लागले. एकदा तर त्यांनी अगदी लहान मुलासारखी चूक केली. एका कलमाखालची उपसूचना दुसऱ्या कलमाखाली वाचून दाखविली. पंडितजींच्या हे लक्षात येताच ते माईकजवळ येऊन सांगू लागले. बिचाऱ्या काकांना त्यांच्या कानांनी दगा दिला असल्यामुळे त्यांना पंडितजींचे बोलणे ऐकू येईना. माईकसमोर हे सर्व चालले असल्यामुळे सर्व सभागृहात ऐकू येत होते. त्यामुळे चांगलाच विनोद निर्माण झाला. हशा पिकला. शेवटी पंडितजींनी काकांना सांगण्याचा नाद सोडून दिला व आपणच सर्व खुलासा करून काकांनी काय गोंधळ निर्माण केला हे समजून सांगितले. काकांचा चेहरा पहाण्यासारखा होता.

आम्ही साडेसहाला बैठक सोडून पाच मैलावर असलेल्या 'कस्तुरबा ग्राम' पहाण्यासाठी निघून गेलो. एका सुंदर आंबराईत हे केंद्र वसलेले आहे. श्रीमती सुशीला पै या येथे प्रमुख आहेत. मनपसंत असे हे इथले वातावरण पाहून सर्व दिवसाचा श्रमपरिहार झाला आणि शेवटी रात्री घरी येऊन लिहितो आहे. पुन्हा उद्या सकाळी बैठक आहे. बहुतेक उद्या सर्व काम संपेल आणि परवा दिवसभर आम्ही काय करणार तेच कळत नाही.

इंदोरमध्ये येऊन इंदोरी पातळे पहाण्यासाठी बाजारात गेलोच नाही. बाहेरचे पाहुणे येतात तेव्हा ते जेथे उतरले

असतील त्या ठिकाणी तेथील व्यापारी आपला निवडक माल त्यांच्या विक्रेत्यांबराबेर पाठवतात म्हणे! मी उतरलो होतो तेथे असाच एक विक्रेता आला. मी बैठकीला गेलो होतो. त्यामुळे त्या घरातल्याच मंडळींनी त्यांना बरी वाटली अशी साडी माझ्याकरिता खरेदी करून ठेवली. ती साडी त्यांनी माझ्याकडे दिली तेव्हा आश्चर्य वाटले. पण त्यांनी सारा खुलासा केला. मनात म्हटले, ठीक झाले. त्यांचे पैसे देऊन मोकळा झालो. मला वाटते, आयुष्यात स्वत:हून खरेदी केलेली ती एकच साडी!



इंदोरची बैठक संपवून १५ सप्टेंबरला ते बडोदा भागात जाण्यासाठी म्हणून रतलामला आले. इंदोरच्या बैठकीचा विषय डोक्यात होताच. ते लिहितात–

रतलाम स्टेशन

१५ सप्टेंबर १९५२

इंदोर सफर पुरी करून बडोद्याला जाण्यासाठी रतलाम स्टेशनवर येऊन पोहोचलो. गाडीला अजून जवळ जवळ तीन तास अवकाश असल्यामुळे या वेळात पत्र लिहिण्याइतके चांगले काम कोणते?

कालचा सबंध दिवस ए. आय. सी. सी. चे बैठकीत घालविला. फक्त दुपारचे दोन तीन तास ऑफिसच्या, मुंबईहून आलेल्या कामात घालविला.


कालच्या बैठकीत चर्चेस व भाषणात थोडे 'बाळसे' आल्यासारखे वाटले. दूर बसून भाषणे ऐकण्यात काही औरच चव असते. अशा चांगल्या भाषणांत मौलाना आझादांचे विदेशी नीतिसंबंधीच्या ठरावावर भाषण झाले. तो ठराव त्यांनी मांडला. मौलाना साहेबांचे इतके चांगले

भाषण १९४५ नंतर मी प्रथम ऐकले. त्यांचे रुबाबदार व्यक्तिमत्त्व, रंगढंगदार उर्दू शब्दांची खैरात, विषय मांडण्याची हातोटी या सर्वांची पुन्हा एकदा प्रचिती आली. विशेषत: 'यूनो' च्या विफलतेविषयी शंका असतानाही तिला चिकटून राहण्याचा भारताचा निग्रह का? हे समजावून सांगताना एका पारशी काव्यपंक्तीची मदत घेऊन त्यांनी ते इतके खुलवून सांगितले की युक्तिवाद म्हणूनही तो मुद्दा किंचितसा लुळापांगळा आहे असे दिसत असतानाही ऐकणाऱ्याला त्या क्षणापुरती का होईना भुरळ पडावी. वालुकामय मैदानात असणाऱ्याला मृगजळ दिसते. तहानलेला पाणी पाणी करून त्याचे पाठीमागे धावतो आणि शेवटी निराश होतो. पुन्हा मृगजळ दिसते, पुन्हा पळतो पण पुन्हा निराश होतो. त्याची तहान खरी असते. तो म्हणतो की मृगजळाला मी फसलो नाही, किंवा फसत नाही. त्या शहाण्याला उद्देशून तो पारशी कवी म्हणतो की बाबा ते खरे आहे पण तुझी तहानच खरी नाही त्याला तू काय करणार? जागतिक शांततेसाठी तहानलेला भारत युद्धपरिस्थितीच्या रेताड जागतिक मैदानात 'यूनो' कदाचित ते मृगजळ असले तरी - पाठीमागे धावतो आहे. - समर्पक दृष्टांताचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. विचार म्हणून यातील दोष दाखविणे सोपे आहे. परंतु त्या दृष्टीने हे मी लिहीतच नाही.

काल संध्याकाळी पंडितजींचे भाषणानंतर बैठकीचे सूप वाजले. सभासदांनी पाठविलेल्या तीन ठरावांची चर्चा झाली. राजप्रमुख पद्धतीचे उच्चाटन करण्यासंबंधीचा ठराव चांगल्या पद्धतीने मांडला गेला होता परंतु हा तात्त्विक स्वरूपाचा ठराव पंडितजींच्या खुलाशानंतर मागे घेतला गेला. पंडितजींच्या भाषणाने माझे निदान समाधान झाले नाही आणि त्यामुळे मूलभूत स्वरूपाचा ठराव मागे घेतला ही चूक झाली असे मला वाटले आणि अजूनही वाटते.

दुपारी धार, मांडवगड वगैरे करून आलो. बहुतेक प्रसिद्ध शहरे पाहून घेत आहे. इंदोर येथे साडी निवडली

आहे खरी परंतु तुला ती पसंत पडणार नाही अशी 'धास्ती' मनात आहेच.



---

रतलामहून रेल्वेने बडोद्याला आणि पुढे मोरारजी देसाई यांच्या समवेत ते राजकोट, अमरेली या शहराकडे गेले. राजकोट येथून ता. १५ सप्टेंबरला ते लिहितात–

---

राजकोट
१६/९/१९५२

आता रात्रीचे ११ वाजले आहेत. जामनगर हाऊसमधे जुन्या कोणा राजाच्या शयनगृहात मी आता झोपण्याच्या तयारीत आहे. लांबलचक खोल्या, दिव्यांचा झगमगाट अशा एका विस्तीर्ण विभागात मी एकुलता एक मनुष्य आता कसा झोपणार? झोप तरी कशी येणार? सहजासहजी माणसाला भीती वाटावी असे हे शोभायमान एकाकीपण आहे.

सकाळी आठ वाजता येथे पोहोचल्यापासून ते अगदी अक्षरश: आतापर्यंत मोरारजीभाई एकसारखे कार्यक्रमाच्या गर्दीत होते. मी व डॉ. जीवराज काही वेळ सकाळी त्यांचेबरोबर होतो पण नंतर संध्याकाळी सहापर्यंत आम्ही अमरेली प्रश्नाच्या चर्चेसाठी स्वतंत्र होतो.

सकाळी बडोद्याहून आकाशमार्गे आम्ही येथे पोहोचलो. बडोदा जे राजकोट एक तासाचा प्रवास हसत खेळत केव्हा झाला तेच समजले नाही. पांढऱ्या शुभ्र मेघराजीतून प्रवास करताना आकाशाच्या पोकळीतून कोणी 'प्रवासी हिमालय' इतस्तत: फिरतो आहे असे वाटते. सौराष्ट्राचे पंतप्रधान श्री. ढेबरभाई हे बडोद्यापासून आमच्याबरोबर होते. श्री. ढेबर यांची माझी प्रथमच ओळख झाली. आज सर्व दिवसभर

या माणसाच्या संगतीत होतो. अत्यंत विनयशील आणि मृदुस्वभावाचे गृहस्थ आहेत ते. आपला मुद्दा सहजासहजी न सोडण्याइतके कणखरही दिसले. मनुष्य-स्वभावाची पारख करण्याची धूर्तताही असली पाहिजे. परंतु हा गुण कुणाच्या लक्षात येऊ नये याची ते काळजी घेत आहेत की काय असे वाटण्याइतके शब्द मोजून तोलून धीमे धीमे बोलणारे, चालणारे गृहस्थ आहेत.

राजकोटची भेट माझ्या लक्षात राहण्याइतक्या महत्त्वाच्या दिवशी मी सहजासहजी या गावात आलो. तिथीप्रमाणे आज गांधीजयंती आहे. या जयंतीचे गांधींनी 'रेटिया बारस' असे नामकरण पूर्वीच केलेले आहे. आज मोठ्या उत्साहाने ही जयंती सौराष्ट्र 'रचना समिती' ने साजरी केली. राजकोट गावाशी गांधीजींचा फार जिव्हाळ्याचा संबंध. गांधीजींचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण या गावात झालेले. गांधीजींचे जवळचे नातेवाईक आजही या गावात राहात आहेत. त्यांचा नातू कनू गांधी हा आजच्या या समारंभाचा सूत्रचालक होता. या समारंभासाठीच श्री. मोरारजी मुद्दाम आले. विशेषत: संध्याकाळी सभेच्या आधी जवळजवळ एक हजार स्त्री पुरुष ओळीने शांतपणे बसून आपापल्या चरख्यावर भक्तिभावाने सूत कातताना मी जेव्हा पाहिले तेव्हा मला गांधीजींच्या काठीयावाडमध्ये आल्यासारखे वाटले. आजचा दिवस माझ्यासाठी एक चांगला शिक्षणाचा दिवस असाच होता असे दिसले. शांतपणे, निर्विकारपणे चाललेल्या चर्चा ऐकणे-पाहणे केव्हा केव्हा अतिशय हिताचे असते. मनात विचारांची गर्दी उसळू पहात आहे. तेव्हा लेखन थांबविणे हाच मार्ग बरवा !

२५/१०/८९

अमरेली
१७ सप्टेंबर १९५२

सकाळी राजकोटहून येथे दहा वाजता पोहोचलो. ७५ मैलांचा हा मोटारीचा प्रवास वाटला होता तसा काही त्रासदायक झाला नाही. रस्ता चांगला नाही असे ऐकत होतो परंतु आपल्या भागात ज्याला आपण वाईट रस्ता म्हणू असा रस्ता एक फर्लांगभरही कोठे लागला नाही. पहिले १५ मैल तर झक्क 'टार' रोड, मधून मधून सिमेंट रोड होता.


रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या पीकपाण्याकडे सहजच लक्ष जात होते. महाराष्ट्रातील कुठल्यातरी जिल्ह्यातून जात आहोत अशी शेतीवाडी दिसली. काळी जमीन, बाभळी, लिंबाची अनेक झाडेझुडपे, विहिरीवर चालू असलेले मोटपंपाचे 'रीं रीं' संगीत. वातावरणात बरेचसे साम्य मराठी शेतीजीवनाशी दिसते. हा विचार माझ्या मनात मोटारच्या प्रवासात चालू असतानाच दुसरी सहज एक गोष्ट माझ्या लक्षात आली.

गेल्या चार-सहा दिवसात शेकडो मैलांचा प्रवास मी मोटारीने केला आणि त्यात कोणत्याही भागात जा, शेती जीवनाशी संबंधित सर्व सामाजिक जीवन कसे एकसारखे वाटते. एका प्रांतातील खेडे दुसऱ्या प्रांतातील खेड्यासारखेच दिसते. शेतीची अवजारे, वाहने, शेतधंद्यावर जाण्यायेण्याच्या चालीरीती, शेती करण्याची पद्धतीसुद्धा कशी एकसारखी आहे. नजरेत भरण्यासारखा फक्त एकच फरक ग्रामीण जीवनात दिसतो आणि तो म्हणजे स्त्रियांचा पेहराव. त्या पेहरावावरून मात्र सहजासहजी फरक लक्षात येतो.

अमरेलीला डॉ. जीवराज यांचा स्वत:चा बंगला आहे. शेजारीच त्यांचे दोन चुलत बंधू स्वतंत्र बंगल्यात

रहातात. त्यांचे वडील बंधू ८० वर्षांचे असावेत. जुने मान्यतेचे कुटुंब असावे अशा चालीरीती दिसल्या. त्यांच्या दोन विधवा बहिणीही येथे भेटल्या. 'गावाकडची' साधी सरळ माणसं दिसली ती. त्यांचे थोरले बंधू व थोरली बहीण ही अगदी ऐन जुन्या साध्या काठेवाडी जीवनाची प्रतीके आहेत. गेल्या ५० वर्षात हिंदी जीवनांत किती विलक्षण फरक झाला आहे, याचे उत्तम चित्र डॉ. जीवराज यांच्या एका कुटुंबाच्या निरीक्षणावरून येईल. जीवराजभाईंची थोरली बहीण, त्यांच्या पत्नी सौ. हंसाबेन, त्यांची कन्या व त्यांच्या घरी गेल्या दोन-तीन वर्षात आलेली त्यांची गौरकाय अमेरिकन स्नुषा या सर्वांना एकाच कुटुंबाचे संबंधित दुवे मानले तर किती मनोरंजक चित्र समोर उभे राहते नाही!

गुजराथी जिल्ह्यात पहिल्याप्रथम हिंदीत बोलण्याचा प्रसंग आज होता. परंतु निभावून नेला. त्यानंतर तीन सभांतून मी माझ्या हिंदीतून बोललो. श्री. पानसे नावाचे समाजवादी गृहस्थ येथे आहेत. त्यांनी मोठाच पेचप्रसंग निर्माण करण्याचा घाट घातला होता. डॉ. जीवराज प्रतिष्ठेला बळी पडतात की काय असे प्रथम वाटू लागले होते पण शेवटी सभेत जाऊन बोलण्यास तयार झाले. निदर्शनासाठी जमलेल्या लोकसमुदायाची आम्ही आमची प्रचारसभा बनविली ! एक दिवस तरी संपला. उद्याचे उद्या.




◆ ◆ ◆

# वर्षाची सुरवात प्रवासानेच

महाराष्ट्रात १९५३ वर्ष हे दुष्काळी वर्ष होतं. यशवंतराव पुरवठा खात्याचे मंत्री. अन्नधान्याची टंचाई होती. रेशनिंगच्या त्या काळात पुरेशा धान्य-पुरवठ्याअभावी लोकांची उपासमार सुरू होती. राज्यातल्या निरनिराळ्या भागातून मागण्या सुरू झाल्या होत्या. कार्यकर्ते तारा पाठवून, फोन करून धान्य पुरवठ्याची तसदी देत राहिले. त्या परिस्थितीत केंद्र सरकारकडून गव्हाचा साठा उपलब्ध करून घेण्याशिवाय गत्यंतर उरले नाही.

त्याच वेळी हैद्राबाद येथे काँग्रेसचे अधिवेशन होण्याचे घाटत होते. केंद्रस्थानी पुरवठा आणि अन्न मंत्री श्री. किडवाई असताना त्यांनी हैद्राबाद अधिवेशनानंतर महाराष्ट्रातील दुष्काळी भागात येण्याचा विचार असल्याचे कळविले. दौऱ्यासाठी चार दिवस देऊ केले. दुष्काळी स्थिती असताना केंद्राची ही चालढकल महाराष्ट्रात असंतोष निर्माण करणारी तर होतीच; हैद्राबादचे अधिवेशन होईपर्यंत आणि अन्नमंत्र्यांचा दौरा, पहाणी होईपर्यंत लोकांची उपासमार वाढणार होती. केंद्राकडून आर्थिक मदत मिळविण्याचा महाराष्ट्राने प्रयत्न केला तेव्हा त्यावेळचे केंद्रीय अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांनी अडसर घातला. महाराष्ट्रात दिल्लीहून उलटसुलट माहिती मिळत राहिल्याने पुरवठा मंत्र्यासमोर रोज नवी प्रश्नचिन्हे उमटू लागली. केंद्रीय अन्नमंत्री दुष्काळी दौऱ्यावर येत आहेत

प्रवासातील उशिराने इतरांना वाट पहाण्याचा त्रास होतो. माझे मन बेचैन होते.



तर त्यांना जमले तर पंचमहाल आणि विजापूर येथेही न्यावे असा मुख्यमंत्र्यांनी सांगावा दिला. चार दिवसात हे जमणार कसे असा प्रश्न यशवंतरावांना भेडसावत राहिला. रेशनिंगसाठी धान्य उपलब्ध करून देणे, केंद्राकडे विनवणी करणे आणि अर्थमंत्र्यांचा अडसर दूर करणे अशा त्रिकोणात असताना त्यांनी ज्या हालचाली केल्या, विचार केला आणि महत्प्रयासाने धान्य संपादन केले या संदर्भातील विविध नोंदी त्यांनी त्या त्या वेळी करून ठेवल्या. एक जानेवारी १९५३ पासूनच या नोंदींना प्रारंभ होतो–

---

मुंबई
१ जानेवारी १९५३

नव्या वर्षाची सुरुवात शेवटी प्रवासानेच झाली. अहमदनगरच्या कार्यकर्त्यांच्या तारा, टेलिफोन यांनी तेथे उडालेल्या घबराटीची कल्पना आली. प्रत्यक्ष गेल्याशिवाय त्यांना धीर येणार नाही म्हणून तातडीने सुटीचा दिवस कामात घालविण्याचे ठरविले. पुण्यापर्यंत विमानाने - पुढे स्टाफ कार ! या मोटारीने मात्र वाटेत खूपच खोळंबा केला. कलेक्टरच्या घरी कार्यकर्ते वाट पहात होते. श्री. भाऊसाहेब फिरोदियाही हजर होते. फार थोर मनाचा वृद्ध गृहस्थ! श्री. बापूसाहेब भापकर हजर होते. शांत व अबोल वाटले. दुपारी कर्जत भागात दुष्काळी कामे पाहिली. घोगरगावी दुष्काळी परिस्थितीतही 'आमच्या गावी दूध-कॉफी घेऊन जा' असा आग्रह पाहून मन गहिवरले. ग्रामीण जीवनातील परंपरागत संस्कृती म्हणतात ती ही! कलेक्टर श्री. राणा आणि स्वामी सहजानंद यांच्यात समझोता घडवून आणण्यात मी पुष्कळच यश मिळविले. मोटारीत प्रवासातील सर्व वेळ या एका विषयानेच घेतला. रात्रीची जाहीर सभा बरीच मोठी होती. १९३२ सालचा बारा बराकीतील 'जेलकरी' दोस्त श्री. क्षीरसागर नगर शहराचा अध्यक्ष म्हणून भेटला.

दुसरे दिवशी पहाटे पाचलाच उठून तयारीला लागलो. नगरचे 'हरिभक्त परायण' श्री. कानवडे (खासदार)

यांचेकडे सकाळचा चहा घेऊन परतलो. नगर ते पुणे प्रवास मात्र बिनतक्रार झाला. परंतु ठरल्यापेक्षा एक तास उशिरा येऊन पोहोचलो. पुण्याचे अधिकारी आणि वैमानिक बिचारे वाट पाहून कंटाळून गेलेले दिसले. प्रवासातील उशिराने इतरांना जो वाट पहाण्याचा त्रास होतो त्यामुळे मात्र माझे मन बेचैन होते.

निरभ्र आकाश होते त्यामुळे सकाळच्या सूर्यप्रकाशात विमानाच्या खिडकीतून सह्याद्रीचा नितळ माथा स्वच्छ दिसत होता. डोंगर, नद्या यांचा विचार करतो ना करतो तोच खारी खाडी आली. रुळाचा रस्ता कोठे दिसतो की काय असा प्रयत्न करतो न करतो तोच 'वुइ आर गोईंग डाऊन' अशी वैमानिकाची सूचना कानी आली. पुन्हा घरी.

श्री. भाऊसाहेब हिरे यांना नगरची कल्पना दिली. त्यांनी दिल्लीला श्री. किडवाईंशी झालेले बोलणे सारांशाने सांगितले. ऑफिसच्या कामानंतर ठाण्यास निघालो. वाटेत 'व्हेंगार्ड स्टुडिओ'मध्ये फोटोची सिटिंग्ज दिली. असे फोटो काढून घेऊन काय करतात हे लोक तेच समजत नाही.

श्री. माधवराव हेगडे यांचे घरी कार्यकर्त्यांशी चर्चा झाली. श्री. हेगडे मोठे खोल आणि धूर्त गृहस्थ दिसले. धूर्त हा शब्द मी अगदी चांगल्या अर्थाने वापरतो आहे. चर्चा चांगली दीड तास झाली. हसत खेळत सर्व काम चालले होते. शेवटी एका गृहस्थाने मला विचारले की 'तुम्ही रागावत कसे नाही ?' आणि सर्व लोक हसले. मला त्याचा अर्थ समजेना. मी चौकशी केली तेव्हा समजले की थोड्याच दिवसांपूर्वी दुसरे असेच पाहुणे येथे आले होते व तेव्हा खूपच वातावरण गरम झाले होते.

ग्राहक सहकारी परिषदेचे येथे उद्‌घाटन केले. परिषद यथातथाच होती. परंतु श्री. बर्वे यांचे भाषण ठीक वाटले. प्रांतिक सहकारी बँकेच्या प्रचाराचा भाग तेवढा अस्थानी वाटला. नगराध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील दुष्काळी

कमीटीशी खूपच लांबलचक चर्चा झाली. रात्री घरी परत. शांताराम फार दिवसांनी भेटला. कराडच्या नेहमीच्या गप्पा झाल्या.

---

मुंबई
४ जानेवारी १९५३

खऱ्या अर्थानं रविवार होता. कोठे जाणे नाही, कोणी येणे नाही. अक्षरशः निवांत दिवस जाणार असे वाटत होते. आज काही वाचण्याची इच्छा होत नव्हती.

इतक्यात फोन खणखणला आणि तो निघाला हिरे यांच्याकडे येऊन उतरलेल्या काका गाडगीळांचा. दोन वाजता त्यांना भेटलो. श्री. किडवाईंशी त्यांचीही बोलणी झाली होती. त्याचा सारांश त्यांनी सांगितला. किडवाईंचे हिरे यांच्याशी जे बोलणे झाले होते त्यांच्याहून काकांच्या बोलण्यात निराळाच सूर दिसला. किडवाई दोघांशी निरनिराळे बोलले, की दोघांनी निराळा अर्थ घेतला हे प्रत्यक्ष दिल्लीत परिषदेसाठी गेल्यावरच कळणार. श्री. काकासाहेब बोलत होते मात्र खूपच मनमोकळेपणाने. मोकळेपणाने बोलत असले की सहजगत्या 'आत्मप्रौढी' व थापा सरमिसळ करून सांगतात. आपण फक्त थंड श्रोत्याची भूमिका मात्र घ्यावयास हवी. ''पंडितजींचे आंतरराष्ट्रीय धोरण फसले असून त्यांचा धीर सुटला आहे'' असे आपले मत खाजगीत म्हणून त्यांनी सांगितले. दरम्यान श्री. किडवाई यांचे हैद्राबाद अधिवेशनानंतर महाराष्ट्राच्या दुष्काळी विभागाला येतो असे पत्र आले आहे. राजभवनवर दुष्काळ मदत कमिटीची मध्यवर्ती कमिटीच्या स्थापनेची बैठक झाली. श्री. वाजपेयी (राज्यपाल) यांनी मोठ्या कुशलतेने काम चालविले. त्यांचे भाषाप्रभुत्व, कठीण व गैरसोयीचे प्रश्न टाळताना कुशलतेने वापरलेली विनोदबुद्धी आणि उभ्या राहाणाऱ्या सर्व तपशीलवार प्रश्नांचा अगोदर

विचार करून, मनाशी निर्णय ठेवण्याची हुशारी पाहून 'बुड्ढा' मोठा अर्क आहे असा विचार येऊन गेला. निधीसाठी काही 'टारगेट' ठरवूया अशी कोणीतरी सूचना केली. 'कुठपर्यंत पोहोचायचे ते एकदा ठरवा म्हणजे निदान त्याच्या जवळपास तरी पोहोचू' असे म्हणून किती, पाच कोटी की दहा कोटीचा संकल्प सोडूया ? असा त्यांनी प्रतिप्रश्न केला तेव्हा प्रश्न विचारणारा सर्दच झाला.

---

मुंबई
६ जानेवारी १९५३

दिल्लीची फूड परिषद ६ जानेवारीला ठरल्याने या अन्नमंत्र्यांच्या परिषदेची कल्पना द्यावी म्हणून श्री. मोरारजींना भेटलो. आठ दहा दिवसांनी निवांत भेटत असल्यामुळे बरेच बोलणे झाले. गुजरात काँग्रेस कार्यकारिणी कशी झाली ते सांगत होते. महाराष्ट्रांतील घटनांची प्रतिक्रिया तेथे झाली आहे. मोरारजी गुजराथचे हितसंबंध राखू शकतील की नाही असा काही मंडळींनी अविश्वास व्यक्त केला. 'इन द इंटरेस्ट ऑफ दि नेशन आय वुइल वाइप औट गुजराथ इफ नेसेसरी' असे त्यांनी उत्तर दिले व ही त्यांची भूमिका गुजराथ कार्यकर्त्यांनी मान्य केली.

आम्ही प्रसंगोपात का होईना आमच्या सहकाऱ्यांना असे सांगू शकू का असा प्रश्न माझ्या मनात येऊन गेला.

---

मुंबई
७ जानेवारी १९५३

मोरारजी भाईंनी नंतर हैद्राबाद येथील वर्किंग कमिटीच्या बैठकीत काय विशेष घडले ते सारांश रूपाने सांगितले. भाषावार प्रांत रचनेसंबंधी चर्चा होताना हैद्राबादचा प्रश्न निघाला असताना ''हैद्राबादची विभागणी मी होऊ देणार

नाही. प्रसंग पडल्यास सर्व सैन्य नेऊन उभे करीन'' असे उद्‌गार पं. नेहरूंनी काढल्याचे त्यांनी सांगितले. मोरारजींना हे धोरण कितपत पसंत आहे कोण जाणे? परंतु भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व एकदा आंध्राला मान्यता देऊन स्वीकारल्या– नंतर हैद्राबादच्या विभागणीस विरोध करण्यामागे काय विचार आहेत मला समजत नाही.

कदाचित हल्लीच्या निजामाला आमचे नेते त्याच्या हयातीपर्यंत नैतिकदृष्ट्या बांधले गेले आहेत हे एक कारण असू शकेल. परंतु हे सर्व अनैसर्गिक आहे. इतिहासाचा रेटा एकदा सुरू झाला म्हणजे असली वचने पालापाचोळ्यासारखी उडून जातात. हे अनुभवाने आमच्या नेत्यांना शिकावयाचे असले तर कोण जाणे! पंडितजी– सारखा लोकमताच्या नाडीवर हात असणारा मनुष्य या प्रश्नाच्या बाबतीत उदासीन, बेफिकीर का हेच कळत नाही.

पुष्कळ वेळ माझ्या मनांत येऊन जाते की पंडितजी काश्मीरी ब्राह्मणाच्या कुळात जन्माला येण्याऐवजी जर दक्षिणेतील एखाद्या राज्यात कोणाच्याही पोटी जन्माला आले असते तर? तर त्यांना कदाचित गेली अनेक शतके अन्यायावर उभे असलेले निजामाचे राज्य हे दक्षिणेतील हिंदी मानवतेच्या हृदयात सलणारे एक शल्य आहे याची अनुभूती आली असती. पण हे सर्व वेडे विचार आहेत.

**जनतेच्या अंतर्मनांतील स्पंदने जेव्हा नेत्यांना समजेनाशी होतात तेव्हा जनताच नेतृत्त्व हाती घेते. भाषिक प्रांतरचनेच्या बाबतीत आमच्या देशात हे घडणार असे स्पष्ट दिसू लागले आहे.**

रु/१९१८/९

---

राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नाला १९५२ साली झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या धामधुमीत खरं स्वरूप प्राप्त झालं. निवडणूक प्रचारामध्ये कोणत्याही

पक्षानं या प्रश्नाचं भांडवल केलं नव्हतं, तरी या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात हा प्रश्न तीव्र बनू लागला. या निवडणुकीत आंध्रप्रदेशात काँग्रेस पक्षाला चांगला तडाखा बसला आणि आंध्रचा विचार करणं काँग्रेस पक्षाला क्रमप्राप्त ठरलं. चर्चेच्या पलीकडे प्रत्यक्ष निर्णयापर्यंत मात्र काँग्रेसचे नेते पोचले नाहीत. आंध्रचे लोक निर्णयाची वाट पहात होते परंतु चर्चा आणि आश्वासनं या पलीकडे काही घडत नाही असं दिसून येताच आंध्रात या प्रश्नावर आंदोलन उभं राहिलं.

आंध्रातले एक नेते पोट्टु सीतारामलू यांनी उपोषण सुरू केलं. या उपोषणात त्यांचा अंत झाला. त्यासरशी आंध्र पेटला. आंदोलनाला उग्र स्वरूप प्राप्त झालं. दहशतीचं, घबराटीचं वातावरण निर्माण होताच दिल्ली जागी झाली. निर्णयाची धावपळ सुरू झाली. आंध्रानं मद्रासवरील हक्क सोडला तर आंध्र प्रांत निर्माण करण्यास श्रेष्ठ नेत्यांनी तयारी दर्शविली. आंध्राने मद्रासवरील हक्क सोडताच आंध्र प्रांत निर्माण करण्याचे विधेयक मांडले जाईल अशी दिल्लीतून घोषणा झाली. त्यानंतरच आंध्रातील आंदोलनाला उतार पडला. पुढे आंध्र प्रांत स्थापन झाला.

संयुक्त महाराष्ट्राची मागणी १९४६ मधेच पुढे आली होती. १ मे १९६०ला संयुक्त महाराष्ट्र रीतसर अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ धगधगत राहिली. भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नासंबंधात केंद्र सरकारने निरनिराळी कमीशनं नियुक्त केली. परंतु कमिशनच्या नि:पक्षपाती मताबद्दल महाराष्ट्राच्या जनतेला कधी विश्वास वाटला नाही. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला तर कोणत्या आपत्ती निर्माण होतील यासंबंधीची काल्पनिक चित्रे मनासमोर ठेवूनच प्रत्येक कमिशन आपला अहवाल सादर करीत राहिला. या कृतीमुळं संयुक्त महाराष्ट्राचा लढा तीव्र होण्यास मदत झाली. संयुक्त महाराष्ट्राची एकमुखी मागणी महाराष्ट्रात सुरू झाल्यावर दिल्लीच्या नेत्यांनी त्यावेळचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई, मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष स. का. पाटील, केंद्रस्थानचे गुजराथी नेते आणि महाराष्ट्रांतील काँग्रेस अंतर्गत अपरिपक्व नेते यांना हाताशी धरून मूळ मागणी एकमुखी राहणार नाही असे प्रयत्न केले. मुंबई शहर महाराष्ट्रापासून अलग करण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न केला. परंतु महाराष्ट्रांतील नेते या हुलकावणीला फसले नाहीत. बळी पडले नाहीत.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा साराच इतिहास प्रदीर्घ आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात त्या काळात अनेक चढउतार निर्माण झाले. सत्तेवरील काँग्रेसपक्ष महाराष्ट्रातून कायमचा निकालात निघण्याइतका कमकुवत बनला तर काही विरोधी पक्षांना बाळसं चढलं. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी महाराष्ट्राला द्विभाषिकाचे नेते म्हणून यशवंतराव प्रथम महाराष्ट्रासमोर आले आणि

नंतर संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावांचा लाभ झाला. या घटना सर्वार्थानं अभ्यासनीय असून संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबाबत आंदोलनाच्या काळात काहीही बोललं अथवा लिहिलं गेलं असलं तरी यशवंतरावांची नेमकी भूमिका कोणती होती यावर त्याकाळातील त्यांच्या नोंदीवरून स्वच्छ प्रकाश पडण्यास मदत होते हे मात्र निश्चित. या प्रश्नाच्या अनुषंगाने श्रेष्ठ नेत्यांशी झालेल्या चर्चा आणि महाराष्ट्राची भूमिका पटवून देण्याचा त्यांचा आटापिटा याचा यातून बोध होतो. हे सर्व लेखन त्या त्या काळाशी, प्रसंगाशी संबंधित आहे. पश्चातबुद्धी असं त्यासंबंधी कोणास म्हणता येणार नाही. कारण कोणत्या शहरी, कोणत्या साली आणि कोणत्या प्रसंगी ते लिहिलं या सर्वांच्या नोंदी उपलब्ध आहेत.

दिल्लीतील अन्नमंत्र्यांच्या परिषदेबद्दल मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याशी चर्चा झाल्यानंतर दुसरे दिवशीच म्हणजे ८ जानेवारीला (१९५३) त्यांनी दिल्लीसाठी प्रस्थान ठेवलं. अन्नपरिषदेच्या संदर्भात ते लिहितात–

---

**नवी दिल्ली**
८ जानेवारी १९५३

सकाळी ८ च्या विमानाने अन्नपरिषदेसाठी दिल्लीला आलो. श्री. शेषगिरी यांना माझ्याबरोबर ठेवले आहे. दिल्ली विमान तळावर पोहोचताच किडवाई साहेबांचा निरोप होता तसेच घरी येऊन पहिले भेटा व मग परिषदेला जा. प्रकृती बरी नसल्यामुळे ते परिषदेला हजर राहाणार नव्हते. किडवाईंच्या भेटीत त्यांनी दुष्काळी भागाच्या मदतीसाठी आवश्यक तर गहू स्वस्त दरात देण्याची तयारी दर्शविली. मुंबईसाठी या वर्षासाठी किती धान्य द्यायचे याची चर्चा त्यांनी सुरू केली. परंतु मी तो विषय मुद्दाम तेथे वाढवू दिला नाही. पुन्हा भेटू असे सांगून ती भेट पुरी केली. बिछान्यात पडून पडून त्यांनी सर्व राज्यांच्या अन्नमंत्र्यांशी अशा वाटाघाटी केल्या असे समजले. मी माझ्या मनाशी ठरवले की हे महाशय आजारीपणाच्या बिछान्यात असता त्यांच्याशी सौदा करणे अवघड जाणार तेव्हा आजचे संकट उद्यावर टाकणे शहाणपणाचे!

---

दुपारी तीन वाजता परिषद सुरू झाली. पंतप्रधानांचे उद्घाटनाचे भाषण झाले. पंडितजींची नेहमीची कळकळ याही भाषणात ओतप्रोत होती. अन्नधान्याची "आयात" कमी करण्याच्या प्रश्नावर त्यांनी अधिक भर दिला खरा परंतु तो कोणत्या पद्धतीने याचा विचार कोणी स्पष्ट केला नाही. परदेशी चलन कमी होत आहे व पुढे पुढे अधिकच कमी होत जाणार म्हणून आयातीचा कार्यक्रम हळूहळू आखडता घेतला पाहिजे हे तत्त्व सर्वांनाच मान्य होते व मी ते तसे उठून सांगितलेही. परंतु कोणत्या भूमिकेवर अन्नधान्याची रचना केली तर हे करणे व्यवहार्य ठरेल हा खरा निर्णयाचा प्रश्न आहे. पंतप्रधानांचे नंतर राज्यमंत्र्यांना परिस्थिती निवेदन करण्यासाठी सांगितले तेव्हा शेवटी या प्रश्नाला तोंड पडले. अर्थमंत्र्यांनी माझी चांगली अर्धा तास उलटतपासणी घेतली म्हटले तरी चालेल. भारत सरकार सर्व राज्यात सर्वसमान धोरण ठरविण्यात आणि अमलात आणण्यात अपेशी व दुबळे ठरले आहे व त्यामुळे नियंत्रणे म्हणजे तुटीच्या प्रांताना फक्त दिलेले शाप आहेत असे वाटू लागते. मुंबई राज्यातील ज्वारी-बाजरीच्या आंशिक निर्नियंत्रणाचा विचार या पार्श्वभूमीवर केला पाहिजे, हे मी आग्रहपूर्वक व निर्भयपणे प्रतिपादिले. माझे म्हणणे अर्थमंत्री देशमुख यांना पटले नाही. रुचलेलेही दिसले नाही. परंतु ज्या आक्रमक वृत्तीने ते ही चर्चा करीत होते ती वृत्ती बरीच नरमली असे दिसले. दुसऱ्या दिवशी अन्नपरिषद पुढे चालू राहिली. किडवाई हजर होते. प्लॅनर्सपैकी फक्त श्री. कृष्णम्माचारी थोडा वेळ हजर होते. किडवाई यांचा मूड काही वेगळाच दिसला. हसत-खेळत त्यांनी दोन-तीन तासात परिषद संपवून टाकली. त्यानंतर दुपारी मुंबईच्या कामासाठी त्यांना भेटलो. तांदुळ हा वादाचा सर्वात मोठा मुद्दा! परंतु त्यांनी आमचे बहुतेक म्हणणे मान्य केले. 'मिल्स'बाबत मात्र मोठीच अडचण होणार आहे असे दिसते. पाहूया, प्रयत्न करीत राहण्याखेरीज गत्यंतर नाही. रात्री किडवाईंच्या घरी सर्व अन्नमंत्री अन्नग्रहणासाठी

(डिनर) जमले होते. सर्वांनी देशमुखांशी माझ्या झालेल्या सामन्यात मी कणखरपणा दाखवला याबद्दल माझे मनापासून अभिनंदन केले.

१० जानेवारी

परिषद आटोपून सकाळच्या विमानाने मुंबईत १२॥ वाजता परत आलो. दुपारी दोन ते सहा ऑफिसमध्ये 'थकबाकी' पुरी केली. सायंकाळी ६ नंतर काँग्रेस हाऊसमधे दुष्काळ निवारण समितीच्या सभेस हजर राहिलो.

११ जानेवारी

दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंतचा वेळ झक्क आळसात घालविला. दुपारी कार्यक्रमाची चक्कर सुरू झाली ती रात्री ११॥ पर्यंत. स्वामी रामकृष्ण मिशन संस्था आज ता. ११ ला प्रथमच पाहिली. आज मंगळवार. कॅबिनेट मिटींगनंतर कलेक्टरांची 'दुष्काळ परिषद' झाली. मी निमंत्रण लावून हजर होतो. श्री. भाऊसाहेब हिरे याबाबतीत मला टाळतात की काय अशी शंका माझ्या मनात आज अगदी प्रथमच येऊन गेली.

श्री. भाऊसाहेब हिरे यांचे कोयनेसंबंधीचे वक्तव्य वाचले. 'कोयनेचा महाराष्ट्राशी संबंध नाही. ती मुंबई शहराची योजना आहे.' अशी काकाछाप थाप त्यांनी ठोकून दिली. महाराष्ट्राशी कोयनेचा संबंध नव्हता, तर किर्लोस्करांशी सलगी करून तिचा पुरस्कार केल्याचे नाटक यांनी का केले? कोयनेची वीज मुंबई शहराला प्रमुखतः जाणार म्हणून ही योजना महाराष्ट्राची नव्हे या तर्कशास्त्राचा अर्थ मुंबईचा महाराष्ट्राशी संबंध नाही असा करावयाचा की काय? पण हे सर्व इतके सरळ आहे असे मी मानीत नाही. देअर इज सम सिस्टिम इन दि मॅडनेस !

१३ जानेवारी

आज हैद्राबादला जाण्याची तयारी केली. रात्रीच्या गाडीने निघण्याचे ठरविले. सोलापूरपासून पुढे सकाळी उजाडताच प्रवास सुरू होतो. हा प्रदेश दिवसा पहावा हा खरा हेतू आहे.

रात्री नऊची मद्रास मेल कशीतरी सापडली. अगदी ऐनवेळी येऊन पोहोचण्याची आणि घाईघाईने निघण्याची सवय केव्हा जाणार? श्री. आबासाहेब वर्तक चांगले तासभर विरार येथून येऊन बोरीबंदरवर थांबले होते. गाडीत अनपेक्षितपणे श्री. अनंत काणेकर हे तिसरे सहप्रवासी सहज लाभले. त्यांच्या परिचयाची संधी आली. ते जशी सुंदर प्रवास वर्णने लिहितात तशी प्रवासातील हकीगतीही खाजगी गप्पाटप्पात चांगल्या रंगवितात. रात्री ११ पर्यंतचा वेळ कसा गेला समजलेच नाही.

१४ जानेवारी

सोलापूर ते हैद्राबादपर्यंत नवा प्रदेश प्रथमच पहात होतो. लांबपर्यंतची सपाट जमीन, सुंदर पिके पाहून थोडा हेवा वाटला यात शंका नाही. श्री. नाना कुंटे सकाळनंतर आमच्याच डब्यात 'कट्थ्रोट' खेळण्यासाठी आला होता. तो म्हणाला, 'पेशवे व मराठे हा शेजारचा मुलूख निजामाला सोडून अटकेकडे झेंडे लावण्यासाठी का गेले होते कळत नाही.'

बेगमपेठला उतरून घेण्यासाठी रामगोपाळ लक्ष्मीनारायण मिलचे मालक व हैद्राबादचे आमचे यजमान आले होते. रात्री गावात एक चक्कर लावली. संध्याकाळी श्री. वर्तकांनी आपले तिळगूळ जेव्हा बाहेर काढले तेव्हा लक्षात आलं की आज 'संक्रांत' आहे. 'तिळगूळ घ्या गोड बोला'.

सकाळी नानल नगरकडे गेलो. महाराष्ट्र प्रांतिकचे ऑफिसमध्ये तेव्हा हळूहळू प्रतिनिधी येऊ लागल्याचे दिसले. श्री. बाळासाहेब देसाई भेटले. काहीतरी किरकोळ गोष्टीमुळे अकारण नाराज दिसले. त्यांना घेऊन नानल नगरच्या पाठीशी असलेल्या 'गोवळकोंडा'स गेलो. जुने ऐतिहासिक ठिकाण एवढेच या ठिकाणचे महत्त्व.

दुपारी ३ वाजता ए. आय. सी. सी. सुरू झाली. नेहमीचे, परराष्ट्रीय धोरण, दक्षिण आफ्रिका, पंचवार्षिक योजनेवरचे कंटाळे ठराव होते. खानबहादूर गफारखान यांच्या 'बंदी' बाबतचा दु:ख व्यक्त करणारा व त्यांना अभिवादन करणारा ठराव अधिक युक्त होता. उशिरा का होईना भारताने आपली भावना व्यक्त करणे जरूर होते. पंडितजींचे भाषण छोटेसेच परंतु हृदयस्पर्शी झाले. एकंदरीत आजचे काम अगदीच अनौपचारिक व शिळे शिळे वाटले. उद्या कदाचित भाषाविषयक प्रांतरचनेवरील ठराव 'नॉन ऑफिशल' आणला गेल्यास कारवाईमधे काही जिवंतपणा येईल.

---

## १६ जानेवारी

उस्मानिया विद्यापीठाच्या आवारात श्री. किडवाई राहातात असे श्री. ए. पी. जैन यांचेकडून समजले म्हणून त्यांना भेटण्यासाठी सकाळी ७।। वाजता प्रस्थान ठेवले. मोटारीचा मद्रासी ड्रायव्हर हैद्राबादला नवखा होता. त्यामुळे तो सारथी आणि मी हैद्राबादचा शोध घेण्याकरिता बाहेर पडल्यानंतर त्याला आंधळ्या कोशींबिरीचे स्वरूप आल्यास नवल काय? पाच मैलाचा प्रवास पंधरा मैलाचे तेल जाळून आम्ही सुमारे एक तासात पुरा केला. किडवाईजी भेटले. कार्यक्रम नक्की केला. त्यांचे येथे मद्रासचे माजी गृहमंत्री डॉ. सुब्बरामन भेटले. त्यांच्या चिरंजिवासंबंधीच्या गप्पा निघाल्या. हे मोठे सुसंस्कृत


मद्रासी कुटुंब आहे. त्यांचा मुलगा कुमारमंगलम् हा प्रख्यात कम्युनिस्ट कार्यकर्ता आहे. त्यांची एक मुलगी कम्युनिस्ट आहे. तिचा गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पराभव करण्यासाठी कोण यातायात करावी लागली याची मजेदार हकीगत त्यांनी सांगितली.

ए. आय. सी. सी. त विषय नियामक समितीचे काम मागील अंकावरून पुढे सुरू झाले.

प्रांताच्या पुनर्रचनेसंबंधीचा ठराव श्री. काका गाडगीळांनी आज मांडला. या ठरावासंबंधी त्यांच्याशी व श्री. हिरे यांच्याशी कुंटे, मी, भारदे व बॅ. जी. डी. पाटील यांनी अगोदर चर्चा केली होती. या ठरावासंबंधी आम्हाला फारसा उत्साह नव्हता. आंध्र निर्मितीनंतर त्या प्रयोगाचे 'स्टॅबिलायझेशन' नंतर इतर प्रांतांचा विचार करावयाचा असे धोरण ठरावात नमूद करण्यात आले आहे. एका अर्थाने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीवर थंड पाणी ओतण्याचा हा 'अप्रत्यक्ष' प्रयत्न काकांनी आपण काहीतरी कमाई करून मिळविलेला विजय असे भासविण्याचा प्रयत्न केला.

मला त्यांनी बोलणार काय असे ठराव मांडण्यापूर्वी सहज विचारले. पण मी 'अमेंडमेंट' पाठविण्याचे ठरविले. 'स्टॅबिलायझेशन' ऐवजी 'फॉर्मेशन' असा शब्द घालावा अशी एकदम साधी सरळ उपसूचना मी अध्यक्षांकडे दिली. काका म्हणाले, मला मान्य आहे परंतु पंडितजी मान्य करणार नाहीत. तेव्हा 'स्टॅबिलायझेशन' या शब्दाचा उदार अर्थ 'लिबरल इंटरप्रिटेशन' मी ठरावाशी सूचक म्हणून करतो आणि उपसूचना मांडल्यावर कांहीतरी खुलाशानंतर काढून घे. मी उपसूचना मांडल्यावर काहीतरी खुलाशानंतर काढून घेणार नाही असे स्वच्छ बजावले. परंतु ऐनवेळी उपसूचना उशिरा आली म्हणून पंडितजी ती मांडण्यास परवानगी देणार नाहीत असे कळले. परंतु श्री. हिरे यांनी पंडितजींशी चर्चा करून तीन मिनिटे बोलण्याच्या अटीवर उपसूचना मांडण्याची परवानगी मिळविली. तीन मिनिटात

मी थोडक्यात विषय मांडला. उपसूचना मतास टाकता ४१ मते विरुद्ध १०० मते पडून नापास झाली. गेल्या दोन वर्षात उपसूचना मतास टाकून इतकी मते मिळविली ती पहिलीच उपसूचना म्हटली पाहिजे. महाराष्ट्राच्या प्रतिनिधीमधे याचा फार चांगला परिणाम झाला असे दिसले. परंतु याचा इतरत्र परिणाम-प्रतिक्रिया काय झाल्या आहेत किंवा उमटणार आहेत हे हळूहळू दिसू लागलेच. हैद्राबादचे श्री. देविसिंग चव्हाण (पुनर्वसनमंत्री) मुद्दाम दुसरे दिवशी घरी येऊन भेटून गेले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची त्यांची तयारी दिसली.



---

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची चर्चा ठराव महाराष्ट्रात सुरू होती. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी प्रत्यक्ष आंदोलन उभे राहून ते तीव्र बनण्यापूर्वीची हैद्राबाद येथील १९५३च्या अ. भा. काँग्रेस वर्किंग कमेटीच्या बैठकीतील ही घटना आहे. यातील यशवंतरावांची सुस्पष्ट भूमिका संयुक्त महाराष्ट्रविषयक त्यांचा दृष्टिकोन कोणता होता यावर प्रकाश पाडणारी आहे असे म्हणावे लागेल. प्रांतांच्या पुनर्घटने-संबंधात श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी तयार केलेला ठराव आणि त्यातील आंध्र निर्मितीनंतर त्या प्रयोगाचे 'स्टॅबिलायझेशन' नंतर इतर प्रांतांचा विचार करण्याची सूचना याचा अर्थ भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित ठेवण्याचा विचार केंद्रीय नेते करीत असल्याचेच दर्शवितो. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीवर थंड पाणी ओतण्याचा हा प्रकार आहे असा यशवंतराव या ठरावाचा अर्थ स्पष्ट करतात. आंध्र प्रदेशमधे या नव्या निर्णयानंतर ते राज्य स्थिर पायावर उभे राहीपर्यंत इतर सर्व प्रांतांनी ताटकळत रहावयाचे किंवा त्यांना ताटकळत ठेवावयाचे आणि भाषावार प्रांतरचना हा विषयच बासनात गुंडाळून टाकावयाचा वर्किंग कमिटीचा कुटील डाव होता. गाडगीळ यांच्या ठरावाला 'स्टॅबिलायझेशन' या शब्दाऐवजी यशवंतरावांनी 'फॉर्मेशन' हा शब्द उपयोजण्याची उपसूचना देऊन केंद्रीय नेत्यांचा मुखवटा उघडा पाडण्याचा प्रयत्न केला. चव्हाण यांची उपसूचना बहुमताने फेटाळली गेली तरी आंध्रप्रांत निर्मितीसाठी जे तत्त्व मान्य करण्यात आले त्याच तत्त्वानुसार संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यात यावी अशी वर्किंग कमेटीला जाणीव करून देण्याचे

श्रेय श्री. चव्हाण यांनी मिळविले. महाराष्ट्राची जी नेते मंडळी हैद्राबादमधे उपस्थित होती त्यांनी श्री. गाडगीळ यांच्याशी ठरावाच्या पूर्वदिवशी चर्चाही केली होती तरीही उपसूचना मांडण्याबाबत श्री. हिरे यांना पंडितजींकडे मध्यस्थी करावी लागली. उपसूचनेच्या बाजूने जे मतदान झाले ते अगदीच नगण्य मानता येणारे नाही. उपसूचना नापास होऊनही इतर प्रांतांना विचाराला दिशा देण्याचे कार्य या उपसूचनेने केल्याचे नंतरच्या काळास प्रचितीस आले. हे प्रचितीला आणून देण्यांत महाराष्ट्र आघाडीवर राहिला. मान्य केलेल्या तत्त्वानुसार प्रश्नाचा निर्णय करावा हे हैद्राबादमध्ये स्वीकारलेले सूत्र संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीअखेरपर्यंत यशवंतरावांनी अबाधित राखल्याचे नंतरच्या त्यांच्या हालचाली, भेटीगाठी आणि श्रेष्ठींशी झालेल्या चर्चा सांगतात.

---

१९ जानेवारी

हैद्राबादच्या बैठकीनंतर महाराष्ट्रातील दुष्काळी भागाचा दौरा करण्याची तयारी श्री. किडवाई यांनी दर्शविली होती. त्यानुसार वर्किंग कमिटी संपली आणि त्याच रात्री किडवाई यांच्या सलून मधून प्रवास केला. ७ वाजल्यापासून रात्री ११ पर्यंत खूप मजेदार गोष्टी श्री. किडवाई यांनी सांगितल्या. पं. मोतीलालजींबद्दल त्यांना फार आदर आहे. पं. जवाहरलाल नेहरूंवर प्रेम आहे. परंतु त्यांच्या चुका दाखविण्याइतका घरोबा असल्यामुळे मोकळेपणाने सहज त्यांचे अनेक दोष दाखवून देतात.

Jawaharlal will consult only those who usually agree with him but Motilal used to consult only them who used disagree and... with him. That is the difference between the father and the son.

---

२० जानेवारी

सकाळी सोलापुरात स्नान करून मोटारने विजापूरला आलो. दुपारची चर्चा छान झाली. रात्री ९।।च्या जाहीर

सभेत किडवाईंचे भाषण प्रथम ऐकले. शांत व स्पष्टपणे बोलण्याची बरी तऱ्हा आहे. मात्र वक्तृत्वाची हौस त्यांच्यात नाही. त्याच्याविना त्यांचे काम अडतही नाही. त्यांच्या हजेरीत माझ्या 'हिंदी' भाषणाची काय त्रेधा झाली असेल कल्पना करवत नाही. पण बोललो, चांगली वीस मिनिटे! विजापूरहून सकाळी ८ वाजता परत निघालो. भीमा ओलांडून अलीकडे आल्यावर निंबर्गी गावाकडे गेलो. शेतकी खात्यातील श्री. शिरोळे, येथे त्यांनी बरीच वर्षे चालू केलेले नाला बंडिंगच्या कामाचे परिणाम दाखविण्यासाठी हजर होते. छोटा ओढा अडवून 'नाला बंडिंग.' त्याच्या होणाऱ्या परिणामाचे प्रात्यक्षिक येथे पहावयास मिळाले. 'सब् सॉइल वॉटर' जमिनीच्या पोटातील पाण्याचा जिव्हाळा कमी खोलीवरच लागू लागला हा सर्वात मोठा फायदा दिसला. सहा ते आठ फुटावर खोलीत इंजिन चाललेले असते. चार मोठे पाण्याचे झरे दिसले. एका खडकावर विहिरीवर वीस एकराच्या पुढे उसाचे पीक भिजत असल्याचे पाहिले. छोटे बंधारे, बंदिस्त आणि नालाबंडिंग हे दुष्काळी भागावरचे कायमचे उपाय आहेत असा माझा विश्वास होता तो खऱ्या अर्थाने द्विगुणित झाला.

सोलापुरात पोहोचताच आमदारांच्या बैठकीत चर्चा झाली. श्री. साने (कम्युनिस्ट) सावधरीतीने 'चढाई' करण्याच्या मूडमधे होते परंतु त्यांचे जमले नाही. दुष्काळी जिल्ह्याकडे पाठ फिरवून जिनिव्हाच्या शांतता परिषदेस गेले असल्यामुळे श्री. तुळशीदासजी हजर नव्हते. परंतु कोणी शिष्याने, पूर्वी लिहून ठेवलेले त्यांचे एक पत्र किंवा त्याची नक्कल आणून श्री. किडवाईचे हाती दिली. पत्र उद्देशून असे लिहिलेलेच नव्हते त्यामुळे कोणाचेही नाव घालून त्यास देण्यास हरकत नव्हती, असा त्या पत्राचा विनोदी थाट होता.

आज माझा उपवास होता. त्यामुळे चर्चेनंतर मी मुक्कामावर जाऊन स्वस्थ पडलो. पी. टी. आय. चा

प्रतिनिधी आला होता. त्याला माझी इंप्रेशन्स सांगितली. आंतरराष्ट्रीय बंदी उठणे जरूर आहे हे वारंवार किडवाईंचे नजरेस मी आणले होते. आज दुपारी चर्चेचे वेळीही बैठकीत माझी भूमिका स्पष्ट केली होती. तीच गोष्ट पी. टी. आय. च्या माणसाजवळ पुन्हा स्पष्ट केली. रात्रीची सभा भव्य झाली.

---

२१ जानेवारी

सकाळी ७ वाजता रेल्वेने नगरला पोहोचलो. बंगल्यावर पोहोचल्यावर समजले स्टेशनवर स्वामीची व कलेक्टरांची चांगलीच 'तोंडातोंडी' झाली. दुष्काळी परिस्थितीतील जिल्हा असताना हे चित्र काही आशादायी नव्हे! गुरवपिंपरीकडे सकाळी जाऊन आलो. सुमारे दोन हजार माणसे कामाला होती. बंडिंगची आणि या स्वरूपाची कामे पाहून किडवाईंच्या मनावर खूपच चांगला परिणाम झालेला दिसला. कालच्या सोलापूरच्या बैठकीत मुंबई सरकारचे काम योजनाबद्ध चालू आहे असे आपले स्पष्ट मत दिले.

दुपारी दीड वाजता येथील प्रसिद्ध पारशी व्यापारी इराणी, यांच्याकडे जेवणासाठी गेलो. नगर कँपमधील प्रमुख लष्करी अधिकारी सहकुटुंब जेवणासाठी निमंत्रित केले होते. दुष्काळी हवेतून काहीतरी निराळ्या वातावरणांत आल्यासारखे वाटले. किती कृत्रिम जीवन जगतात हे लोक! पुष्कळ वेळा माझ्या मनात येऊन जाते की या तऱ्हेचे जीवन घालविणारे हे लष्करी अधिकारी गरीब भारताचे खरे 'संरक्षण अधिकारी' असू शकतील का? परंतु पुन्हा असेही वाटते की अशा तऱ्हेचे विचार मनात आणून आपण त्यांच्यावर अन्याय तर करीत नाही का? मनात शेवटी उरणारी गोळाबेरीज अस्वस्थतेची आहे, हे कबूल केले पाहिजे. What a terrific gap between the way of life of the people and their...

नगर कॅम्पमधील प्रमुख अधिकारी श्री. चौधरी यांनी जेवण घेताना मला विचारले 'हैद्राबाद अधिवेशन कसे काय झाले?' मी 'ठीक' म्हणताच तो विचारतो ''पण पंडितजी किती वेळा रागावले? मला त्यांचा अनुभव आहे. अमेरिकेतील त्यांचा दौरा पार पाडण्याची माझ्यावर जबाबदारी होती. किती तत्काळ ते रागावतात आणि लगेच शांत होतात! तेही इतके की थोड्याच क्षणापूर्वी ते रागावले होते हे कुणाला खरेही वाटणार नाही.'' इतके सांगून किती छान हसले चौधरी! रात्रीच्या कलेक्टरकडील खान्यासही वरील मंडळी होतीच. श्री. व सौ. चौधरी हे जोडपे चांगलेच लोकप्रिय वाटले. रात्रीची सभा मोठीच झाली.

---

नीरा काठी हुर्डा पार्टी

२२ जानेवारी

नगरहून दौंडपर्यंत सकाळी दहापर्यंत दौड पुरी केली. पुण्याचे कलेक्टर हजर होते. दुपारी १२ वाजता इंदापूरला पोहोचलो. कार्यकर्त्यांच्या चर्चेत चांगलीच खळखळ झाली.

दुपारी २ वाजता वालचंदनगरकडे प्रयाण केले. तीन-चार तास वालचंदनगर प्रदक्षिणा केली. सायंकाळी ७ वाजता सूर्यास्ताच्या सुमारास नीरा काठी 'हुर्डा पार्टी' ऐन महाराष्ट्रीय थाटात झाली. रात्रीचे जेवण करून भिगवण स्टेशनवर मेल गाठली.

दहा-बारा दिवसांनी मुंबईस घरी पोहोचलो. इतक्या दिवसांनी दमल्या-भागल्या जिवाने घरी येण्याचा किती आनंद आहे नाही ! दुपारी १२ पर्यंत कसा वेळ गेला समजलेच नाही. दुपारी ३ वाजता नेपियन सी रोडवरील किडवाईंच्या मुक्कामी भेट घेऊन दौऱ्यात झालेल्या चर्चांचे व प्रश्नांचे निराकरण करून घेऊन काही निर्णय निश्चित केले.

२४ जानेवारी

दुसरे दिवशी सकाळी ७ वाजता परत प्रवास सुरू. १२वाजता साताऱ्याला पोहोचलो. श्री. मोरारजीभाईंना पोहोचण्यास अवधी आहे म्हणून समजताच श्री. भाऊसाहेब सोमणांचे घरी जाऊन खूप गप्पा मारल्या. श्री. भाऊसाहेब जलमंदिर प्रकरणाखेरीज दुसऱ्या कुठल्या विषयावर बोलतच नाहीत.

दुपारचे जेवण सातारच्या राणीसाहेब यांचेकडे अदालत वाड्यावर घेतले. मी आज त्यांना प्रथमच पाहिले. आपल्या चार पुत्रांसह त्या हजर होत्या. जुन्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवरील त्यांची कारुण्यपूर्ण मूर्ती पाहून माझे शिर आदराने विनय झाले.

मोरारजींचे कार्यकर्त्यांच्या बैठकीतील भाषण आणि उत्तरे निराशाजनक झाली. कार्यकर्त्यांना इतक्या कटुतेने व संशयाने वागविणे बरे नव्हे. काय करावे? संध्याकाळच्या सभेत मात्र बरे बोलले. भाषावार प्रांतरचनेचा त्यांनी भीतभीतच उल्लेख केला परंतु तो संयमपूर्ण होता. रात्री ते पुण्यास गेल्यावर जिल्हा बोर्डाच्या दिवाणखान्यात कार्यकर्त्यांची चर्चा झाली. खूप उपयुक्त आणि महत्त्वाचे मुद्दे चर्चेसाठी निघाले. ज्या सिद्धांतासाठी काँग्रेसचे अस्तित्व रहावे असे आपण मानतो त्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांची कितपत ज्वलंत श्रद्धा आहे हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. काही पक्षांची वाताहात अपयशाने होते परंतु काँग्रेस पक्षाची वाताहात त्या पक्षाला मिळालेल्या प्रचंड यशामुळे होणार की काय अशी भीती मनात येऊन जाते वगैरे विचार आज मी कार्यकर्त्यांपुढे ठेवले.

आज २५ जानेवारी श्री. भाऊसाहेब सोमण यांना बरोबर घेऊन सकाळी सांगलीत पोहोचलो. ठरल्या वेळेपेक्षा अर्धा तास आधीच गेल्यामुळे सर्वच गडबड झाली.

दुपारच्या कार्यकर्त्यांच्या संमेलनात माझे खरे मन रमले. रात्री ९ वाजता सांगलीहून निघालो. वाटेत तासभर कराडात घरी थांबलो. आईला तेवढाच आनंद झाला. परंतु लगेच एक तासाने मी मुंबईला जाणार हे कळताच बिचारीला किती वाईट वाटले. रात्री बारा वाजता कराड सोडले. रात्रभर मोटारीने प्रवास करून पहाटे ५ ।। वाजता मुंबई गाठली.

२६ जानेवारी

मुंबईत पोहोचताच समजले की श्री. किडवाई आजारी असल्यामुळे त्यांनी आपला पुढचा दौरा रहित केला असून त्यांचा मुक्काम अजून मुंबईतच आहे. सकाळची परेड आणि दुपारनंतरचा at home नेहमी सारखाच झाला. संध्याकाळी श्री. किडवाई यांना भेटलो. प्रकृती बरी आहे. उद्या फ्रॉंटियरने दिल्लीला जाणार म्हणाले. गव्हाच्या दरासंबंधी व दुष्काळग्रस्त भागासाठी मिळणाऱ्या स्वस्त गव्हाच्या मदतीसंबंधी श्री. चिंतामणराव देशमुख (अर्थमंत्री) यांनी काही अडचणी उपस्थित केल्या आहेत असे समजले. देशमुखांचे हे अडसर घालण्याचे धोरण थांबेल का?

२७ ते २९ जानेवारी

आता दोन दिवस मुंबईतच आहे. नेहमीचा दैनंदिन खाक्या सुरू आहे. ''श्री. चिंतामण देशमुख आणि मंडळी'' पुण्यात आहेत. तेथून निवेदनाचा आणि भाषणाचा पाऊस सुरु आहे. मुंबई सरकारने दुष्काळी भागास परिणामकारक मदत करण्यासाठी दारूबंदीसंबंधी फेरविचार करावा, रस्ते व शिक्षण यावरील खर्च थोड्या प्रमाणात कमी करावा वगैरे देशमुख मुक्ताफळे वर्षावातून बाहेर आली.

राष्ट्रीय नियोजनाचा विचार करणारांनी दुष्काळी

दुःखाशी शेकडो वर्षे बांधलेल्या विभागासाठी काही विशेष व स्वतंत्र विचार का करू नये? फक्त १५ कोटी रुपये या प्रश्नासाठी पाच वर्षांकरिता ठेवले आहेत म्हणे! उलट भारतातील सुपीक प्रदेशातून शेकडो कोटीच्या खर्चाळू योजना वर्षानुवर्षे चालू राहाणार आणि हे आमचे महाराष्ट्रीय अर्थमंत्री उंटावरून आम्हाला उपदेश करणार की दुष्काळ ही राज्यांची जबाबदारी आहे आणि त्याच्यासाठी शिक्षण उपाशी राहू द्या! बहुजन समाज आताशी कोठे डोळे किलकिले करून इकडे तिकडे पाहू लागला आहे तोच हे विद्वान आम्हाला सांगणार की 'पोट उपाशी नको असेल तर डोके उपाशी ठेवा आणि डोके उपाशी ठेवायचे नसेल तर राहूद्यात पोट उपाशी.' वारे अर्थमंत्री!

देशमुख पहिल्या प्रतीचे ग्रंथपंडित आहेत यात शंका नाही. परंतु राज्यकारभारासाठी वापरावयाची तत्त्वे सामान्य माणसांच्या जीवनानुभूतीवर तपासून घ्यायची असतात. बिचारे देशमुख तरी काय करणार? त्यांच्या जीवनाच्याच काही मर्यादा आहेत. नोकरशाहीच्या जुन्या चाकोरीतून पस्तीस वर्षे आपली तीक्ष्ण बुद्धी त्यांनी राबविली आहे. त्यामुळे तिला थोडा बोथटपणा आला आहे. लोकजीवनाच्या संग्रामातून वर आलेल्या दुर्गाबाईंशी त्यांची आता भेट झाली आहे. आशा करूया की त्या त्यांना ही नवी दृष्टी देतील.

---

## ३० जानेवारी

३० जानेवारी. राष्ट्रपित्याच्या महायात्रेचा आजचा दिवस. सुख आणि दुःख यात अंतर किती असा कोणी प्रश्न विचारला तर त्याला हिंदी मनुष्य, 'तीन दिवसाचे' असे उत्तर देऊ शकेल. ता. २६ जानेवारीच्या पाठोपाठ तीन दिवसांनीच तीस जानेवारी हा उजाडतो! हा सुखदुःखाचा पाठशिवणीचा खेळ अखंड कालपर्यंत हिंदी जीवनांत चालू राहाणार.

श्री. मोरारजींच्या घरी अमेरिकन निग्रो पुढारी व शांततेचे नोबल प्राइझ मिळविणारे डॉ. राल्फ बुच सकाळी चहासाठी येणार म्हणून बहुतेक सर्व मंत्री हजर होते. सर्व बोलणे गांधीजींविषयीच झाले. डॉ. राजेंद्रप्रसादांचे गांधी सेमिनॉरमध्ये गांधी तत्त्वज्ञानावर झालेले भाषण फारच उत्कृष्ट झाले असे डॉ. राल्फ वारंवार म्हणत होते. जगातील मोक्याच्या जागी जर अर्धा डझन गांधी निर्माण झाले तर मानवता मुळापासून कायमची वाचेल असे बोलता बोलता डॉ. राल्फ म्हणाले. संतजन हा काय लष्करी उत्पादनाचा आणि योजनेचा प्रश्न आहे?

---

१ फेब्रुवारी

जानेवारी संपला. आज चिमाजीआप्पा यांचा विरार येथे स्मरणोत्सव असल्याने विरारला जाऊन आलो. तेथे श्री. आण्णासाहेब वर्तक यांचा भरघोस पाहुणचार घेतला. हा पाहुणचार बरेच दिवस लक्षात राहील. श्री. शंकरराव जोशी (इतिहास संशोधक, पुणे) यांचे विचारप्रवर्तक भाषण अर्धेच ऐकले. राज्यपालांच्या शपथविधीसाठी लवकर परत यावे लागले. श्रीशिवाजी हे पितृसमान होते आणि शहाजी हे प्रख्यात सेनापती व मुत्सद्दी होते. त्यांनी पूर्व तयारी केली नसती तर श्रीशिवाजीला यशस्वी होता आले असते का? या दिशेने ते आपले विचार मांडित होते. श्री. जोशी यांच्याशी केव्हातरी बोलले पाहिजे.

रात्री श्री. मंगलदास यांनी राज्यपाल म्हणून शपथ घेतली. शपथविधीचा कार्यक्रम सुटसुटीत परंतु गंभीर वातावरणात पार पडला.

राजस्थानचे अन्नमंत्री बिकानेरच्या हरभऱ्याच्या डाळीचा भिजत पडलेला प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या अधिकाऱ्यासह भेटले. मार्ग निघू शकला नाही. आम्ही इतके कायदेशीर वागतो याचे या मंत्रिमहाशयांना आश्चर्य

वाटले असे दिसले. कोर्टात एकदा तरी केसचा निर्णय लावून घेतल्याशिवाय व कायदेशीर रीत्या पैसे देण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय काही करू शकत नाही असे मी निर्धाराने सांगताच त्यांची निराशा झाली.

---

२ फेब्रुवारी

गॉलब्लेडरचा त्रास सुरू झाला आहे. प्रकृतीच्या कारणासाठी कोल्हापूरची भेट रहित केली. सकाळीच कराडचे एकजण भेटले. घरच्या अनेक प्रश्नांनी मन आज उदास झाले. करमेना म्हणून संध्याकाळी बाहेर जाऊन काही पुस्तके खरेदी केली.

---

४ फेब्रुवारी

आज ४ फेब्रुवारी. दुपारी डॉ. धनंजयराव गाडगीळ येऊन ठरल्याप्रमाणे भेटले. मी त्यांना मुद्दाम मला येऊन भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती. भेट बरी झाली. बोलण्या वागण्यांत सोज्वळता दिसली. फारसे आग्रही दिसले नाहीत. माझी बाजू समजूतीच्या वृत्तीने त्यांच्या पुढे ठेवली आणि अर्ध्या तासातच मुलाखत संपली. आज प्रकृती यथा तथा!

---

६ फेब्रुवारी

कालचा दिवस असा तसाच गेला. आज सेक्रेटरीएटच्या सर्व नोकरवर्गाचे संमेलन झाले. मुख्यमंत्र्यापासून तो शिपायापर्यंत सर्वजण सरमिसळ होऊन वागत होते. खेळत होते. खेळाच्या मैदानावर दिलखुलास हिंडणारे व मनमोकळे हसणारे मोरारजी पाहून वातावरणांत एकदम अनौपचारिकता आली. ते व मी असे दोघेच प्रथम बराच वेळ या खेळात भाग घेऊन इकडे तिकडे हिंडत होतो.

नंतर हळूहळू इतर मंडळी आली.

मंत्री विरुद्ध सेक्रेटरी असा रस्सीखेचीचा कार्यक्रम झाला. त्यात सेक्रेटरी विजयी झाले. आमच्या टीममध्ये असलेल्या दोन तीन 'म्हाताऱ्यां'मुळे आम्ही हरलो असा माझा कयास आहे. तोंडाचा चंबू करून श्री. कुंटे रस्सी ओढत होते– अगदी मनापासून.

डोळे बांधून करावयाचा एक कार्यक्रम होऊन ही अत्यंत अवघड कामगिरी करण्यात मी चँपियन ठरलो. रात्री श्री. निंबाळकरांचेयेथे श्री. पंजाबराव देशमुखांबरोबर जेवण घेतले.

---

१ मार्च १९५३

मार्च म्हणजे बजेटचे दिवस. बजेट मांडून झाले की चर्चेला जोर येत असतो. आज ता. ४ ला बजेटवरील सर्वसामान्य चर्चा पुढे चालू झाली. पुरवठा खात्याचा साधा उल्लेखही टीकेत होत नसल्यामुळे मी निर्धास्त होतो. चर्चेचा आजचा तिसरा दिवस आहे.

संध्याकाळी चि. दिनकररावांचे (कोतवाल) (भाचा) लग्नासाठी कराडला सहकुटुंब निघालो. रात्री पुण्यात थांबलो. सकाळी ५ वाजता पुण्याहून निघून ६।। वाजता कराडला पोहोचलो. लगेच विट्याला श्री. जयंतीलाल शहा यांच्या लग्नासाठी जाऊन आलो. दुपारी श्री. गौरीहरकडे जाऊन पुष्कळ वेळ बसलो. बऱ्याच दिवसांनी अनेक गोष्टी मनमोकळेपणाने बोललो.

दिनकरचे लग्न मोठ्या थाटामाटात पार पडले. आमच्या आक्काच्या (मातोश्रीच्या) आनंदाला सीमा नव्हती. दिनकर हा आक्कांचा नातू. अनेक वर्षांच्या दुःखाचे ओझे तिच्या डोक्यावरून कमी झाल्यासारखे भासले. चि. दिनकर चार दिवसांचा असताना त्याचे वडील वारले होते. तो दुःखाचा दिवस माझ्या नजरे समोरून गेला. आज

आमचे दादा किंवा गणपतराव असते तर किती बरे झाले असते असा विचार मनात येऊन कंठ दाटून आला.

श्री. बी. बी. काळेपाटील यांनी चि. कुमारी लीलाबाईबाबत आक्काजवळ बोलणे केले. हे लग्न जमून येईल तर बरे होईल असे मलाही वाटते. पाहूया, काय योगायोग आहे तो!

कराड येथून सकाळी उठून मुंबईला जाण्याची तयारी करून मंडईत आक्काच्या (भगिनीच्या) घरी गेलो. सकाळचा रेडिओ ऐकत मुले बसली होती. तेवढ्यात बी. बी. काळे एका एकी येऊन सांगू लागला– "मामा, स्टॅलिन रात्री निधन पावल्याची बातमी मॉस्कोहून अधिकृत जाहीर झाल्याचे आत्ता सांगण्यात आले."

या थोर पुरुषाच्या निधनाची वार्ता ऐकून मला फार वाईट वाटले. कुणीतरी अगदी जवळचे माणूस गेल्यानंतर जशी हुरहुर लागते तशी हुरहुर! काही तरी जवळचे हरवले आहे अशी भावना मनाला सारखी बोचत होती. एक अत्यंत शहाणा नेता, या शतकातील एक अत्यंत कर्तृत्ववान आणि ध्येयवादी राजकीय विचारवंत म्हणून मला या पोलादी पुरुषाबद्दल आदर होता. with him ends a epoch.

मे महिना, उन्हाळा असूनही ऐन उन्हाळ्यातही मुंबईची हवा मला सोईस्कर वाटली. रात्री बारा वाजता मुंबईत पोहोचलो. श्री. दादासाहेब जगताप बरोबर होते. गेले पंधरा दिवस ज्या दगदगीत गेले त्यामुळे येथे कितीतरी निवांत व काहीसे आल्हाददायकही वाटत आहे.

---

२ मे

कावसजी जहांगीर हॉलमधे रेशनिंगचा दहावा वाढदिवस माझ्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. समारंभाची खूपच तयारी केली होती. रेशनिंग व कंट्रोल यांचा गेल्या दहा वर्षांचा इतिहास दिग्दर्शित करणारी एक

नाटिका दाखविण्यात आली. समारोपाचे भाषण करताना मी 'रेशनिंगने' एका कठीण काळात बजावलेली कामगिरी गौरविली. ज्यांनी ज्यांनी ही कठीण कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी श्रम केले आणि बुद्धिचातुर्य दाखविले त्यांनाही धन्यवाद दिले. परंतु शेवटी "But I cannot wish Rationing a long or prosperous life" असे म्हटले तेव्हा त्यातील विनोद आणि सत्य दोन्ही, जमलेल्या सर्वांनी खिलाडू वृत्तीने हशा व टाळ्यांच्या गजरात स्वीकारले.

संध्याकाळी सी. एस.डी. चे संमेलन झाले. यातील 'फिश्पाँड' मध्ये 'ए बुक ऑन ह्यूमॅनिटी' म्हणून भगवत्गीतेची एक प्रत मला दिली. बेकारीची टांगती तलवार डोक्यावर असताना पुरवठा खात्याच्या मंत्र्याला ''माणुसकीची'' आठवण करून देण्यापेक्षा त्यांनी तरी दुसरे काय करावे?

---

४ मे १९५३

पंडितजींचे कराडला भाषण झाले होते. प्रत्यक्ष सभेत अगदी पंडितजींच्या जवळ बसलो असतानाही ओळीने चार-पाच वाक्येही धड ऐकली नव्हती. अस्वस्थ मन असले म्हणजे कसे होते हा एक अनुभव आहे. मुंबईत श्री. मोटवानी यांचेकडे पंडितजींच्या भाषणाचे मुद्रित (रेकॉर्ड) ऐकावे म्हणून गेलो. श्री. तपासे हेही आले होते. मुद्रित ऐकून एक अपुरी गोष्ट पुरी केल्याचे समाधान मिळाले. श्री. मोटवानींनी हे मुद्रित सुरक्षित ठेवले असून प्रसंगी कराडला पाठविण्याचे कबूल केले.

---

८ मे १९५३

आज ता. ८ मे. दुपारी मुंबई सोडली. सायंकाळी ७ वाजता फलटण येथे पोहोचलो. घरी जाऊन लगेच वाड्यावर गेलो. जमिनीचे कबजेपट्टीवर सही करून ते काम

पुरे केले. रात्री वाड्यावर जेवण केले. श्री. बेडके यांचेकडेही नंतर जेवण घ्यावे लागले. रात्री तेथून निघालो आणि एक वाजता कराडला पोहोचलो.

---

९ मे १९५३

कराडात सकाळी प्रभात टॉकीजमध्ये चि. शामराव पवारचा विवाह यथासांग पार पडला. ९।। वाजता वऱ्हाड थिएटरमधे आले आणि १०। वाजता विवाह झाला. संध्याकाळी ४ वाजता वऱ्हाड निघून गेले. अत्यंत साधेपणाने कसलीही दगदग न होता एक मोठी जबाबदारी पार पडली.

---

१० मे १९५३

संध्याकाळी उंब्रज येथे भूदान दौऱ्यावर आलेल्या श्री. शंकरराव देव यांना भेटलो. त्यांनी सातारचा अनुभव सांगितला. त्या अनुभवाचे 'आय ओपनर' असे त्यांनी वर्णन केले. मी त्यांना या कामातील अडचणी सांगितल्या. काँग्रेसला समाजक्रांतीचे माध्यम बनवावयाचे असेल तर काँग्रेस कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक जीवनांत त्याचे काही प्रतिबिंब दिसले पाहिजे. काँग्रेस कार्यकर्ते, कार्यकर्ते म्हणून वैयक्तिक जीवनांत वैयक्तिक रीत्या भूदानासाठी काय करतात याच्यावर या चळवळीचे या जिल्ह्यातील यश अवलंबून आहे. माझ्या अनुभवाने असा माझा विचार त्यांना सांगितला. मी व्यक्तीशः काय करावे असे मला वाटते तेही मी त्यांना सांगितले. त्यांचा सल्ला घेतला.

नंतर वहागावजवळ श्री. शंकरराव देव यांचे स्वागत केले. श्री. पांडुआबाच्या विहिरीजवळील झाडांच्या राईत या मित्रांची न्याहरी झाली. वातावरण मोठे प्रसन्न वाटले.

तेथून श्री. देव यांच्याबरोबर कराडपर्यंतचा प्रवास पायाने केला. वाटेत श्री. देवांचे बरोबर बऱ्याच दिवसांनी अनेक गोष्टीवर दिलखुलास चर्चा केली. देशातील आणि प्रांतातील परिस्थिती, संयुक्त महाराष्ट्र हे विषय प्रामुख्याने चर्चिले.

संध्याकाळी श्री. माने वाडीकरांचे घरी पुष्कळ उद्‌बोधक खाजगी चर्चा झाली. संध्याकाळच्या सभेत मी अक्षरश: भूमीहीन असलेमुळे संपत्तीदान करावयाचे ठरविले असून एक षष्ठांश उत्पन्नाचा हिस्सा देईन असे जाहीर केले. एकंदर ४२ एकर जमीन या सभेत मिळाली.

श्री. शंकररावजींना गावाच्या सीमेपर्यंत पोहोचवण्यास गेलो. सुमारे अर्धा तास पुन्हा चर्चा झाली. मंत्रिमंडळ बनविताना झालेल्या घटनांचा अप्रत्यक्ष उल्लेख झाला. माझ्या आणि श्री. भाऊसाहेब हिरे यांच्या संबंधाचाही प्रश्न निघाला होता. ता. २३, २४, २५च्या पुण्याच्या बैठकीत चर्चा करू असे म्हणून हा प्रश्न मी तेथेच सोडून दिला.

यशवंतरावांच्या चरित्र लेखनाच्या संदर्भात दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी रात्री गप्पागोष्टी होत असताना द्विभाषिकाचे मुख्मंत्रिपद त्यांच्याकडे आल्याचा विषय सुरू असताना 'श्री. हिरे-चव्हाण' असा जो तिढा निर्माण झाला होता त्याबाबतचा तपशील त्यांनी ऐकवावा असा मी दोन-तीन वेळा प्रयत्न केला. परंतु प्रत्येक वेळी ''हा एक सविस्तर बोलण्याचा विषय आहे. मीच केव्हातरी सविस्तर लिहीन म्हणतो'' असे सांगून या विषयाच्या खोलात शिरण्यापासून यशवंतराव अलिप्त राहिले. मी त्यांना खोलात ढकलण्याचा प्रयत्न केला तेव्हा एक दिवस म्हणाले, ''झालं गेलं विसरून जावं. राजकारणात काही प्रसंग उद्‌भवतात. पण मतभेद उगाळीत बसण्यात अर्थ नसतो. मतभेद व्यक्त करावा पण तो तेवढ्यापुरता. महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रातील जाणत्यांनी हे पथ्य पाळलं तर तो एक आदर्श ठरेल. महाराष्ट्र आणखी मोठा होईल.''

यशवंतरावांनी १९४६ ते १९६२ या कालखंडाचं लेखन करून 'सागरतळी' हा दुसरा खंड पूर्ण केला असता तर या कालखंडातील, मुख्यमंत्रीपद स्वीकारण्याच्या वेळची एक प्रमुख घटना म्हणून कदाचित या घटनेसंबंधीचा तपशील त्यांनी सावधानतेनं लिहिला असता. ओझरता का होईना या विषयाला स्पर्श झाला असता. पण ते घडायचं नव्हतं!

११ मे १९५३

रात्री श्री. दादासाहेब जगताप यांच्याकडे जेवणास गेलो. तेथे श्री. बाळासाहेब उंडाळकर फार दिवसांनी भेटले. ''तुमचा सर्व मोठेपणा तुमच्या आईच्या सद्‌गुणामुळे व पुण्याईमुळे आहे. असे मी शेकडो लोकांना सांगतोय ते तुम्हीही कबूल केले पाहिजे'' असे ते मला म्हणाले. हे ऐकून मला अतिशय आनंद झाला. आईचे माझ्यावर किती उपकार आहेत.

सकाळी कराडहून निघून दोनच्या सुमारास मुंबईस पोहोचलो. बाबासाहेब बरोबर आहे. श्री. निंबाळकरांना बाबासाहेबांच्या प्लॅनसंबंधी बोललो. ता. १९ रोजी निश्चित करण्याचे त्यांनी कबूल केले आहे. याच विषयासंबंधी श्री. बाबूराव गोखले यांच्याशी अधिक चर्चा केली. निर्णय ता. २०ला घेऊ असे ठरले.

सिकंदराबाद
१४/०१/१९५३

दुपारी पाच वाजता सिकंदराबादला पोचलो. बेगमपेठ स्टेशनवर उतरून परस्पर येथे आलो. हैद्राबादमधील हे ठिकाण हैद्राबाद शहरापासून तीन-चार मैलांवर आहे. जसे मुंबईत खार, अंधेरी वगैरे तसे हे हैद्राबादचे उपनगर आहे. येथील यजमान (होस्ट) हे एक मारवाडी व्यापारी आहेत. ते आम्ही कोणीतरी नबाब आहोत अशा थाटामाटात आमची व्यवस्था करीत आहेत. या वातावरणाने मी मात्र गुदमरून गेल्यासारखा होतो. बरोबरची मंडळी खूष आहेत.

संध्याकाळी आंघोळी करून शहरात चक्कर टाकून आलो. रात्रीच्या वेळी सर्वच शहरे सारखी दिसतात. त्या ठिकाणची वैशिष्ट्ये दाखविणारी स्थळे सोडली तर मोठ्या

शहराचा तोंडवळा निदान रात्रीच्या वेळी तर एकसारखा दिसतो. चार कमानी आणि चार मिनार ही मात्र हैद्राबाद शहरातील मध्य वस्तीतील इस्लामी संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण प्रतिके पाहिली म्हणजे वाटते की आपण एका इतिहास प्रसिद्ध, पूर्वी न पाहिलेल्या शहरात आहोत.

रात्री ९ वाजता जेवण्यासाठी परत आलो. जेवणाला जाण्यापूर्वी तिळगूळ मिळाला. आज प्रवासाच्या सर्व धांदलीत संक्रांत असल्याची आठवणच आली नाही. मात्र कोण जाणे या १९५३च्या संक्रांतीला मला एकदम १९४३च्या संक्रांतीची आठवण झाली. बरोबर दहा वर्षांपूर्वी या संक्रांतीच्या संध्याकाळी ६ च्या सुमारास मी बबनराव गोसावीच्या घरी गेलो होतो. त्याच्या घरी त्याच्या बायकोने संक्रांतीचा हळदी-कुंकवाचा समारंभ धामधुमीने साजरा केला होता. ते सर्व पाहिले आणि अनपेक्षितपणे त्यांच्याइथे बसल्या बसल्या मी आसवं ढाळू लागलो. मी असे का करतो ते त्यांना समजेना पण माझ्या मनाला यातना होत होत्या की लग्नानंतरच्या पहिल्या संक्रांतीला पत्नी कराड जेलच्या अंधाऱ्या कोठडीत कुठतरी बसली असेल? माझे दुःख कुणाला समजू शकले नाही. मी त्यांची कशीतरी समजूत घातली. आज तो सर्व प्रसंग डोळ्यापुढे येऊन गेला खरे! निदान दहा वर्षांनी आज संक्रांत कितीतरी निराळ्या परिस्थितीत आणि आनंदाने पत्नीने साजरी केली असेल. आजचा तिचा सर्व दिवस मोठ्या गडबडीत गेला असेल असे मी मानतो.

---

**सेसिल हॉटेल - सिमला**
२८/०६/१९५४

प्रिय वेणूबाईस,

दुपारी पाऊण वाजता दिल्लीत पोहोचलो. मुंबई ते दिल्ली प्रवास फारच सुखकर झाला परंतु येथून पुढे

कालकाकडे (पंजाब) जाणारी गाडी रात्री १०-३० वाजता सुटते. तोपर्यंतचा दिल्लीतील रेल्वे स्टेशनवरील दहा रुपये भाड्याच्या 'रिटायरिंग' रूममध्ये राहणे म्हणजे भयंकर शिक्षा झाली. महागाई हा तर मुद्दा आहेच परंतु उन्हाळा फार! घाम तर येत नाही. गरम वाऱ्याच्या झळा यांमुळे मुंबई ते दिल्लीच्या थंड डब्यातील प्रवासाचे सर्व सुख सव्याज परत दिल्यासारखे वाटले.

रात्री दिल्लीतून निघून सकाळी कालका येथे पोहोचलो. हा सर्व मुलुख पूर्व पंजाबातील आहे. शीख व पंजाबी या लोकांचा हा प्रदेश मी प्रथमच पहात आहे. सिमला, पंजाबातील हिमालयाच्या ज्या प्रथम रांगा आहेत त्यातील एक ७००० फूट उंचीचे ठिकाण आहे. महाबळेश्वरपेक्षा २००० फूट जास्त उंच आहे. आता दुपारचे दोन वाजले आहेत. हवा महाबळेश्वरसारखीच वाटते आहे. संध्याकाळी काय होते ते अजून समजावयाचे आहे.

कालका येथे 'ब्रॉड गेज' (रुंद गाडी) संपते. तेथून खरी डोंगराची चढण सुरू होते. माथेरानला जाते तशी गाडी येथून पुढे आहे. परंतु ज्यांना जास्त खर्च झेपणे शक्य आहे त्यांच्यासाठी रेल्वेच्या एका डब्याच्या आकाराची, मोटारीसारखी दिसणारी परंतु रुळावरूनच चालणारी, साधारणतः वीस माणसे नेणारी स्वतंत्र अशी छोटेखानी गाडी असते. तिला 'रेलकोच' म्हणतात. याच गाडीने ७।। वाजता बसून १२।। वाजता सिमल्यास कालकापासून पोहोचलो. बाकीचे सर्व वऱ्हाड व सामान पाठीमागून गाडीने अजून यायचे आहे. सुंदर स्नान करून लिहावयास बसलो. येथील परिषद एक दिवस अधिक चालणार असे दिसते. मी निघताना तू नाराज होतीस. असे झाले म्हणजे माझा प्रवास अस्वस्थ होतो - तसाच याही खेपेस अनुभव आला.

आमची परिषद एकदाची सुरू झाली. आल्यापासून निश्चित असे काही काम नाही अशा मनःस्थितीत आवतीभोवती हिंडून फिरून स्मृतीत जेवढे साठविता येईल

तितके साठविण्याचा झपाटा सुरू ठेवला होता. आता परिषदेचे काम वेगाने सुरू आहे. काल संध्याकाळी तीन-चार तास झाली आणि आज पुन्हा सबंध दिवसभर कमिटीज् काम करतील. या रीतीने काम सुरू राहिले तर उद्या संध्याकाळी चार वाजेपर्यंत काम संपेल. या भरवंशावर मी उद्याच्या पाचच्या गाडीने येथून निघावयाचे नक्की तरतूद करून रिझर्व्हेशन केले आहे. मंगळवारी सकाळी फ्राँटिएरने मुंबईस पोहोचण्याचा विचार आहे.

काल सकाळी सिमल्यातील उंच ठिकाण आम्ही पाहिले. सिमला साधारण सात हजार फूट उंचावर आहे व हे ठिकाण त्याहून अधिक सुमारे २००० फूट उंच आहे. 'जॅकोहिल' असे या टेकडीचे नाव आहे. टेकडीवर एक छोटेखानी मंदिर असून त्यात हनुमान, राम, राधाकृष्ण अशा मूर्ती आहेत. ही टेकडी चढून जाताना नेहमीप्रमाणे मी चढून गेलो. बसत बसत दीड तासांनी पोहोचलो. रस्ता चांगला आहे परंतु वाहने जात नाहीत. खरे म्हणजे सर्व सिमल्यातच वाहने कोठे हिंडत नाहीत. राजप्रमुख किंवा काही स्थानिक मंत्र्याची एखादी मोटार हिंडताना दिसते. पश्चिम लष्करी विभागाचे हे एक केंद्रस्थान आहे. त्यामुळे क्वचित एखादी लष्करी अधिकाऱ्याची गाडी दिसते. याच्यापेक्षा वाहने नाहीत. माणसांनी ओढावयाची रिक्षा हे येथील धनिकांचे खरे वाहन आहे. पुढे दोन आणि मागे दोन अशा चार माणसांची ही ढकलगाडी. खुळखुळ्यासारखा आवाज करणाऱ्या घंटानादात जेव्हा रस्त्यावरून जाते आणि खुशाल बसणाऱ्या मिजासखोरांचे दर्शन होते तेव्हा मनाला अस्वस्थता वाटते यात काही शंका नाही.

जॅको हिल येथून सिमल्याचे खरे दर्शन घडते. चार-पाच टेकड्यांवर विस्कटून पसरलेल्या या शहराचे स्वरूप असे एक सौंदर्य आहे असे मला वाटते. आकाशात उंच उंच गेलेल्या देवदारच्या झाडांच्या गर्दीत हे शहर जणू काय लपून बसले आहे असे भासते. नदीच्या घाटावर बांधलेला

घाट जसा असतो ना तसे टेकड्यांच्या उतरणीवर हे शहर ठेवले आहे. इमारतीच्या तळमजल्यासमोरून एक रस्ता जाईल तर त्याच्यावरचा रस्ता इमारतीच्या दुसऱ्या बाजूला दुसऱ्या मजल्यासमोरून जाताना दिसतो.

मी राहतो ते सेसिल हॉटेलचे प्रवेशद्वार ज्या रस्त्यावर आहे तो महत्त्वाचा रस्ता आहे. या रस्त्यावर सर्व प्रमुख कचेऱ्या आहेत. या रस्त्याच्या काही भागाला 'लजपतराय रोड' असेही म्हणतात. कारण या रस्त्यावरील एका चौकात किंवा प्रशस्त भागात लालाजींचा एक भव्य पुतळा उभा केला आहे. पंजाबच्या या थोर जुन्या नेत्याची ही मूर्ती लाहोरहून फाळणीच्या वेळी आणली आहे. सिमला ही पंजाबची तात्पुरती राजधानी होती आणि अजूनही काही कचेऱ्या येथे काम करीत आहेत. आवती भवती सर्व हिमाचल प्रदेशच्या मुलुखामध्ये सिमला हे पंजाबातील शहर अशी मोठी चमत्कारिक परिस्थिती आहे. परंतु १९४७ ते ५० च्या बिकट काळातील परिस्थितीचा हा एक अपरिहार्य अवशेष आहे.


हिमाचल प्रदेश हे काय प्रकरण आहे आणि भूगोलात (नकाशात) नेमके कोठे आहे हे आजपर्यंत मला स्पष्टपणे समजले नव्हते. अज्ञान काही ठिकाणी तरी लपवून उपयोगी नाही परंतु कालका ते सिमला प्रवासात हे अगदी स्वच्छ होते. इतस्तत: पसरलेल्या छोट्या छोट्या वस्त्या हे या भागाचे न दिसण्यासारखे वैशिष्ट्य वाटले. दऱ्याखोऱ्यात जिकडे पहाल तिकडे व रेल्वेच्या काठाकाठाने मला 'नागरवस्ती' दिसली. डोंगराच्या उतरणीवर श्रमपूर्वक तयार केलेली शेतीही दिसते. असाच या पहाडात, दऱ्याखोऱ्यात पसरलेला दहा लाख वस्तीचा हा हिमाचल प्रदेश आहे.

काल गव्हर्नरकडे झालेल्या चहापानाच्या वेळी हिमाचल लोकनृत्याचा कार्यक्रम झाला. मला फारसा आवडला नाही. परंतु हिमाचलचे एक मंत्री सहजगत्या त्या नृत्यात सामील होऊन एकजीव झाल्याचे दृश्य मात्र समाधानकारक होते यात शंका नाही.

संध्याकाळी येथून निघण्याचे नक्की केले आहे. पंजाबचे पी. डब्ल्यू. डी मंत्री हेच स्थानिक स्वराज्य मंत्री आहेत. त्यांच्याशी गप्पा करीत असताना 'भाक्रा नानगल' आणि 'चंदीगड' पहाण्याची कल्पना निघाली. बहुधा माझी प्रकृती बरी असेल आणि रिझर्व्हेशन बदलणे शक्य असेल तर ही स्थाने पाहूनच पुढे जाण्याचे ठरवावे लागेल.

''सेसिल हॉटेलच्या माझ्या खोलीतून दिसणारा सिमला'' अशा शीर्षकाखाली एक वर्णनात्मक निबंध लिहावा असा मोह झाला पण वेळ कोठे आहे? त्यासाठी आवश्यक असणारी बैठक मारण्याचा धीर कोठून आणायचा? पहाटे दक्षिणेच्या खिडकीतून बाहेर दूरवर आणि खाली नजर टाकताना अलकावती नगरीत तर आपण नाही ना? असे वाटते. उजवीकडे एकटक पाहिले म्हणजे वाटते सिमल्याची घरे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कमी आहेत. तरी पण पुन्हा बाहेर डोकावून डावीकडे नजर टाकताच असंख्य दिव्यांनी व्यापून गेलेली ती डोंगरांची पाठ पाहिली म्हणजे आपण एका शहरात आहोत याची खात्री पटते. माझ्या खिडकीच्या खालून काही फुटावरून रेल्वे जाते हे दृश्य मोठे मजेदार आहे. पण हे सर्व सविस्तर लिहिणे शक्यच नाही.

आता सकाळच्या परिषदेच्या अधिवेशनास जाण्याची वेळ होत आली. उठलेच पाहिजे.



---

पुरवठा व स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री असताना १९५२ ते १९५५ अखेरपर्यंत यशवंतरावांना परिषदांच्या निमित्ताने, अ. भा. काँग्रेसची अधिवेशने, वर्किंग कमेटीच्या बैठकी यासाठी सतत प्रवास करावे लागले. या प्रवासात ते ज्या शहरात पोहोचले आणि दोन-तीन दिवस मुक्काम केला त्या शहरांची वैशिष्ट्ये आणि प्रवासी मार्गावरील निसर्ग, दृश्ये, भेटीगाठी इत्यादि विषयी त्या त्या वेळी तपशीलवार लिहिलेले आढळते. सिमला भेटीनंतर त्यांची काश्मीर भेट झाली,

अमृतसर भेट झाली. काश्मीरमध्ये श्रीनगरला एक परिषद होती. जून १९५६ मध्ये ही परिषद झाली. त्या अगोदर अमृतसरला १९५५ मध्ये काँग्रेस अधिवेशन झाले. अमृतसर अधिवेशनाच्या वेळी काँग्रेसचे अध्यक्ष श्री. ढेबर यांनी महाराष्ट्रातील संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा विषय आणि प्रामुख्याने मुंबई शहरासंबंधीचा प्रश्न याविषयी चर्चा केली. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षीय मंत्र्यांनी राजीनामे सादर करण्याचा निर्णय केलेला होता. श्री. हिरे यांनी त्याकामी पुढाकार घेतला होता. संयुक्त महाराष्ट्र आणि मंत्र्यांचे राजीनामे यासंदर्भात यशवंतरावांनी श्री. ढेबर आणि पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्याशी चर्चा करून आपले मत नोंदविले. या चर्चेचा सारांश त्यानी स्वत:च शब्दांकित करून ठेवला आहे. त्यावरून संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या संदर्भात यशवंतरावांचे मन, मत आणि खटपट सारा लिखित आधार असून तोही त्यांच्या हस्ताक्षरात त्यांनी नमूद करून ठेवला आहे. अमृतसर येथून त्यानी जे लिहिले आहे त्यात ते म्हणतात-

---

**अमृतसर**
१० फेब्रुवारी १९५५

''येथे येऊन पुरे दोन दिवस होऊन गेले. लिहायचे राहून गेले होते. मुंबईपासूनचा प्रवास सुखकर झाला. सोबत वसंतराव (दादा) आणि बॅ. जी. डी. पाटील होते. मामासाहेब देवगिरीकर आमच्या डब्यातच होते. त्यामुळे चर्चा, गप्पा आणि पत्त्यांचे खेळ यामध्ये वेळ केव्हा गेला समजले नाही.

ता. ८ ला (फेब्रुवारी) दुपारी अध्यक्ष श्री. ढेबर यांना भेटून राजीनाम्याबाबत दीड तासाच्यावर चर्चा केली. आमची भूमिका समजावून सांगण्याची पराकाष्ठा केली. मंत्रीपदे सोडून आम्ही काँग्रेसची व देशाची अधिक सेवा करू शकतो असेही सांगितले. परंतु फारसा उपयोग झाला नाही. त्यांनी वर्किंग कमिटीचा दृष्टिकोन मांडला. या प्रश्नाच्या पाठीमागे असणाऱ्या पं. नेहरूंच्या भावना सांगितल्या आणि काँग्रेसचा आदेश मानण्याखेरीज दुसरा मार्ग नाही असे सुचविले. मी त्यांना, मला लिहा असे

सुचविले आहे. पाहूया काय करतात ते. मुंबई बाबतही आम्ही खूप बोललो. ते माझे समाधान करू शकले नाहीत.

ए. आय. सी. सी. ची बैठक कालपासून सुरू झाली आहे. राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नामुळे वातावरणांत अधिक गंभीरता भासली. महाराष्ट्रातील परिस्थितीमुळे आणि मुंबईतील दंगलीमुळे कडक टीका करणारे लोक येथे अधिक भेटतात. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुलभतेने सुटण्याची शक्यता कमी असे हे वातावरण पाहिले म्हणजे दुःखाने कबूल करावे लागते. आमच्या प्रांतासंबंधीचे हे गैरसमज सर्व देशात फार खोलवर गेलेत. ते दूर करण्याचे प्रयत्न फार महत्त्वाचे व अगत्याचे आहेत.

दुपारी चहाच्या वेळी पंडितजींना भेटलो. दहा-पंधरा मिनिटे मुद्दाम बाजूला माझ्याशी अगत्यपूर्वक बोलले. माझ्या राजीनाम्यामुळे त्यांचा गैरसमज झालेला नाही असे दिसले. ते ''तुमची मनस्थिती आणि अडचण समजू शकतो'' असे म्हणाले. पण मुंबईच्या प्रश्नामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीने अतिशय दुःखी दिसले. आम्ही मुंबई शहर राज्य का नाकारले हे त्यांच्या बुद्धीला अजूनही पटत नाही, असेही ते म्हणाले. वादग्रस्त प्रश्न शांततेच्या वातावरणांत थोड्या सावकाशीने सोडवावे लागतील आणि या पद्धतीने मुंबईचाही प्रश्न सुटेल असे ते म्हणाले. मुंबई महाराष्ट्रांत जाऊ नये अशी माझी भावना नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. या सर्व बोलण्यावरून वर्ष दोन वर्षाच्या काळात योग्य संधी आणि वातावरण पाहून ते मुंबईचा निर्णय महाराष्ट्रास अनुकूल असा देतील असा विश्वास मला वाटू लागला आहे. द्विभाषिक राज्ये व्हावीत ही त्यांची प्रामाणिक भावना आहे. परंतु महाराष्ट्र व गुजराथ आजच्या परिस्थितीत एकत्र आणण्याचा प्रयत्न अवघड असेही त्यांना वाटते.

मी त्यांना सर्व पुढारी आणि पक्ष वगळून डायरेक्टली महाराष्ट्रीय जनतेला आवाहन करायची विनंती केली तेव्हा ते गहिवरून म्हणाले, ''हां जरूर मी तसे करीन. दंगे गुंड

करतात. सर्व जनतेला कोण दोष देईल? महाराष्ट्रीय जनता शूर आहे. माझं त्यांच्यावर प्रेम आहे.''

आता आज रात्री पुनर्रचनेच्या ठरावावर चर्चा होईल त्यावेळी ते कदाचित बोलतीलही असे वाटले. या शहीद नगरात पोहोचल्यापासून 'थंडी'चा अक्षरश: अनुभव घेतला. जवळची होती ती सर्व पांघरुणे घेऊन व शेजारी शेगडी ठेवूनही पहिल्या रात्री मी येथे ओळीने तासभर निवांत झोपू शकलो नाही. पत्र्याच्या झोपडीत आम्ही रहातो आहोत. रात्री बारानंतर पत्रे इतके थंड होतात की जणू बर्फच. मुंबईत राहाणाऱ्या लोकांना या थंडीचा अर्थच कळू शकणार नाही.

एक दिवस शहर फेरफटका मारला. शिखांचे 'सोन्याचें' मंदिर पाहिले. तांब्याच्या पत्र्यावर सोन्याचे पाणी दिलेले आहे. सभोवताली विस्तीर्ण तलाव आहे. त्यामुळे वातावरण प्रसन्न असते. 'जालियनवाला' बागही पाहिली. बाकी येथे प्रेक्षणीय असे काही नाही. पाकिस्तानची हद्द येथून १०-१५ मैलावर आहे. लाहोर येथून फक्त ३० मैल आहे. भाकरा-नानगल पहावयास जाण्याचा विचार बहुधा मला सोडावा लागणार असे दिसते. उद्या रात्री येथून निघावे लागेल. फ्रॉंटियरने मेलने नंतर पुढे मुंबईकडे.

---

**श्रीनगर (स्टेट गेस्ट हाऊस)**

५ जून १९५६

प्रिय वेणुबाईस,

आज ५ जूनला (१९५६) दुपारी एक वाजता येथे पोहोचलो. मुंबईहून दिल्लीपर्यंतचा प्रवास नेहमीप्रमाणे छान झाला. मानसिक विश्रांती त्या मानाने कमी मिळाली. ज्यावेळी मी मुंबई सोडली त्यावेळचे मुंबईचे वातावरण अस्वस्थ करणारे होते. निराश मन:स्थितीतच मुंबई सोडली. एका अर्थाने मी दूर जात होतो हेही बरेच होते. दृष्टिआड

सृष्टी झाली म्हणजे किंचित काल का होईना विस्मृतीच्या सहाय्याने मनाची विफलता कमी होण्यास मदत होते.

दिल्लीहून रात्री ९।। वाजता गाडी होती. उशिराच सुटली. सकाळी ६।।ला पठाणकोटला पोहोचलो. पठाणकोट हे हिंदुस्थानातील उत्तरेकडील रेल्वेचे शेवटचे स्टेशन आहे. फाळणीपूर्वी हे एक अगदी अप्रसिद्ध असे पंचवीस-तीस हजार वस्तीचे तालुका ठिकाण होते. पाकिस्तानच्या जन्मानंतर काश्मीरमध्ये शिरण्याने सर्वच महत्त्वाचे ठरले. पश्चिम पंजाबमधे गेले; त्यामुळे पठाणकोटला आज काश्मीरच्या प्रवेशद्वाराचे महत्त्व आले आहे. या गावची लोकसंख्या आता सुमारे सव्वा लाख आहे. बऱ्यापैकी लष्करी विमानतळ आहे. दोन-तीन तास स्टेशनच्या वेटिंगरूममध्ये काढले. या ठिकाणचा उन्हाळा ही भयंकर गोष्ट आहे. उत्तरेकडील उन्हाळा पाहिला म्हणजे हे लोक कसे दिवस काढतात याचेच आश्चर्य वाटते.

या छोट्या मुक्कामात एक तरुण काश्मिरी अधिकारी भेटला. मोठ्या गोड स्वभावाचा उमदा पोरगा दिसला. तो पंजाबातील भाषिक वादातून चाललेल्या चळवळीच्या अनेक हकीगती सांगत होता. पुढे बोलता बोलता माझे नाव त्याने काढून घेतले. मी माझे नाव सांगताच तो चकितच झाला. त्याच्या मताने मी कोणीतरी बराच वयस्क पुढारी असलो पाहिजे असे होते. त्याने माझ्या काही भाषणांचे वृत्तांत त्यांच्याकडील वृत्तपत्रातून वाचले होते. त्या माझ्या मताबद्दल मी महाराष्ट्रात अनंत शिवीगाळ खातो आहे त्याच मताबद्दल मनात आदर असलेला एक अधिकारी तरुण काश्मिरी भेटला याचा मला खूपच आनंद वाटला. पठाणकोटहून आमचे विमान सुटेपर्यंत त्याने माझी पाठ सोडली नाही. पुन्हा परत येताना तो मला पठाणकोटला भेटणार आहे.

दुपारी ११-४५ ला विमान पठाणकोटहून सुटले आणि बरोबर साठ मिनिटात, १२-४५ ला ते श्रीनगरला

उतरले. जो प्रवास विमानाने साठ मिनिटात पूर्ण होतो तोच प्रवास रस्त्याने मोटारीने करावयाचा तर ३२-३६ तास लागतात. महाबळ मोटारीने ११ वाजता निघाला आहे. उद्या तो व राणे संध्याकाळपर्यंत येथे येऊन पोहोचतील. श्रीनगरला विमानतळावर उष्मा बराच वाटला. काश्मीरमधे आल्यासारखे फारसे भासले नाही. किंचितसा गारवा वाटला.

ज्या गेस्ट हाऊसमधे उतरण्याची सोय केली आहे त्याच्या आवारात पुष्कळ झाडे आहेत. त्यामुळे आवारात पुष्कळच गारवा आहे. सोय तर खूपच शानदार आहे. सपत्निक येण्याचे मी कळविले होते त्यामुळे दोघांची सोय केली आहे. काश्मीरचे वातावरण पाहिल्यानंतर मात्र मी एकटाच आलो ही मोठी चूक आहे असे पुन्हा पुन्हा वाटत आहे. वारंवार हे प्रवास होत नाहीत. चुटपुट लागून राहिली.

श्रीनगर शहराच्या आसमंतात दुपारी फेरफटका मारला. निसर्गसौंदर्याने बहरलेले हे आसमंत आहे. शालमार, निशान, चष्मेशाही, ही जुनी मोगलकालीन उद्याने पाहिली. बादशाही विलासाची, वैभवाची उरलीसुरली चिन्हे पाहून मन उत्कंठतेने भरून आले. दाललेकच्या काठाने जाणाऱ्या रस्त्याने जाताना श्रीनगरच्या काश्मिरी मरीन ड्राइव्हवरून गेल्यासारखे वाटले. श्रीनगरचा एवढाच काय तो भाग पहाण्यासारखा आहे. बाकीचे दोन-अडीच लाख वस्तीचे गाव म्हणजे गचाळपणा व दारिद्र्य यांची जिवंत साक्ष वाटते. श्रीनगर म्हणजे हेच असेल तर येथे पळभरही राहू नये असे क्षणभर मनांत येऊन गेले.

पण काश्मीरचे वैभव श्रीनगरमधे नाही. येथून दूर आणि अधिक उंचीवर असलेली ठिकाणे पाहिल्यानंतर खरे काश्मीर समजेल असे येथे लोक सांगत आहेत. श्रीनगर समुद्र सपाटीपासून ५२०७ फूट उंचीवर आहे, म्हणजे महाबळेश्वराच्या उंचीवर आज आम्ही आहोत. गुलमर्ग, पहेलगाम ही अधिक उंचीवर आहेत. ती पहाणार आहे.

परिषदेचे कागदपत्र अजून वाचावयाचे आहेत. परंतु उद्याचा दिवस मोकळा आहे. चिंता नाही. जमले तर उद्याच पहेलगामला जाईन म्हणतो.

येथे आलो त्यादिवसापासून माझा मुक्काम स्टेट गेस्ट हाऊस नं. ३ या ठिकाणी होता. आज दोन दिवसानंतर (७ जून १९५६) माझा मुक्काम स्टेट गेस्ट हाऊस नं. २ मध्ये सुरू झाला. ही बढती का मिळाली कोण जाणे? गप्पाटप्पा मारायला येथे शेजार खूपच चांगला आहे. बरेचसे मंत्री सहकुटुंब सहपरिवार आले आहेत. त्यामुळे हे 'घर' कसे अगदी गजबजून गेले आहे. पंजाबराव देशमुख येथेच सहकुटुंब उतरले आहेत.

लिहिण्यासारखे इथे इतके आहे की केव्हा लिहावे याचीच पंचाईत पडते. म्हणून जसजशी सवड होईल त्याप्रमाणे दैनंदिन स्वरूपाचे लिहिण्याचा प्रयत्न आहे. लिहिण्याच्या निमित्ताने तेवढाच चांगला वेळ जातो नाही का?

काल सकाळी म्हणजे ६ जूनला सकाळी न्याहरी करून लगेच येथून साठ मैलावर असलेल्या 'पहेलगाम' या ठिकाणी जाण्यासाठी निघालो. काश्मीर पहावयाचे म्हणजे फक्त श्रीनगर पाहून नाही चालायचे. श्रीनगरपेक्षाही अधिक उंचीवर असलेल्या पहेलगाम, सोनमर्ग, गुळमर्ग वगैरे ठिकाणांना जाऊन आल्याशिवाय काश्मीरचे पुरेसे दर्शन झाल्यासारखे होत नाही. हे पहेलगाम सात हजार फूट उंचीवर आहे. लिहार नदीच्या खोऱ्यात हे गाव आहे. तेथे पोहोचायला आम्हास दोन अडीच तास लागले. कधी मार्तंड कालव्याच्या काठावरून तर कधी विहार नदीच्या काठावरून वळसे घेत घेत सुंदर वनश्रीच्या गर्भातून हा रस्ता गेला आहे. या प्रवासाचा आनंद अनुभवल्याशिवाय समजणार नाही. पाऊस पडेल अशी धास्ती निघताना आम्हास वाटत होती परंतु हळूहळू सोनेरी उन्ह पडली. जणू दुधात साखर पडली. वाटेत मार्तंड तीर्थ लागले. स्वच्छ निळ्याभोर पाण्याचे कुंड देवतेसमोर आहे. ते पाणी प्राशन करून उमेदीने आम्ही पुढे निघालो.

खळखळ करीत नदीचे पाणी खाली खाली जात असते. त्याच्या काठाने वृक्षराजीतून कर्णमधुर आवाज करीत असलेल्या पक्ष्यांची संगत करीत आपण वरवर जात असतो. लांब हिमाच्छादित गिरीशिखरे दिसत असतात. कुणीतरी आपणाला वरवर चालवित आहे असे सारखे वाटते. या सूचक अनुभवाची बिजली जीवनांत नवचैतन्य देते. पहेलगामला चार तास काढले. माझ्या मानसिक यातना कुठल्या कुठे गुप्त झाल्या. फार वर्षांनी मला हा निर्भेळ आनंद घेता आला. उंच उंच पर्वतराजीच्या कोंदणात हे सुंदर ठिकाण आहे. बर्फाने आच्छादलेली त्यांची पांढरी शुभ्र शिखरे वर त्याच्या खाली नदी काठापर्यंत आलेली उंच उंच झाडांची मनोहर दरी, खळखळ करीत जाणारा स्वच्छ असा नदीचा प्रवाह आणि त्याच्या काठावर हिरव्यागार छोट्या पठारावर लहान लहान तंबू टाकून आरामात राहणाऱ्या प्रवाशांची छावणी. डोळे भरून हे दृश्य मी पाहून घेतले व डोळे झाकून काश्मीरच्या या वातावरणाचे चित्र मनावर कोरून ठेवण्याचा प्रयत्न केला. या ठिकाणी पूर्व विहार आणि पश्चिम विहार या दोन प्रवाहांचा संगम होतो. पूर्व विहारच्या काठाने पुढे पुढे गेले तर २८ मैलावर अमरनाथचे प्रसिद्ध शिखर लागते. पण हा प्रवास तीन दिवस करावा लागतो. केव्हातरी हा प्रवास केला पाहिजे. पुढची गोष्ट पुढे!

नदीच्या काठी दुपारचे जेवण करून आम्ही तीन वाजता परतलो. येताना वाटेत 'अनंतनाग' येथील कुंडे व अचलबाग ही ठिकाणे पाहून ५।।च्या सुमारास या 'घरी' आलो. परत ७।। वाजता दाल सरोवराकाठी फिरण्यासाठी पायाने गेलो. 'शिकारा' म्हणून छोटीशी नाव असते त्यातून तास-दीड तास भटकलो. दिवसाचा कार्यक्रम पुरा केला.

'हाऊसबोट' म्हणून श्रीनगरचे एक वैशिष्ट्यपूर्ण अंग

आहे. याला नौकागृह म्हणता येईल. झेलम नदीवर आणि लहान दाल व डे दाल या सरोवरावर जिकडे पहाल तिकडे चांगल्या तऱ्हेने सजविलेल्या बंगलेवजा या नावा असतात. त्यांची नावेही मोठी विलक्षण असतात. 'फरगेट मी नॉट' आणि 'मिस् अमेरिका' ही वानगीदाखल दोन नांवे आठवणीत ठेवली. या नौकागृहात श्रीनगरला आलेले अनेक लोक महिने न् महिने सहकुटुंब राहू शकतात. यांची भाडी दररोज दोन रुपयापासून ४०/५० रुपयांपर्यंत असतात असे समजले. या नौकागृहाचा धंदा करणारी विशिष्ट जमातच आहे. घरांची अडचण या तऱ्हेने दूर केली जाते असे दिसले. आमचे श्री. ब्रह्मे आणि सिंगमावशी या नौकागृहातून मुक्कामाला आहेत.

आज ११ जून. गेले तीन चार दिवस कॉन्फरन्स आणि प्रवासातच गेले. त्यामुळे लिहिण्यासाठी थोडीसुद्धा फुरसद मिळाली नाही. ता. ७ आणि ८ परिषदेच्या कामात संपूर्ण गेले. संध्याकाळी लेकवर किंवा झेलमवर 'शिकारा' मधून फिरणे किंवा दुपारच्या वेळी बाजारात फेरफटका मारणे याखेरीज अन्य काही करता आले नाही. आज दुपारी परिषद संपल्यानंतर किंवा उद्या काही बाजारहाट करावा असे ठरविले आहे. परंतु विमानाचे नक्की झाले नाही तर मोटारीने निघावे लागेल. काही झालं तरी ता. १५ला निघून फ्राँटियरने मुंबई गाठली पाहिजे.

मध्यंतरी एक दिवस, मला वाटते ता. ९ला आम्ही सगळेजण गुलमर्ग, सोनमर्गच्या स्वारीवर निघालो. साधी मोटार गुलमर्गपर्यंत जात नाही. जीप जाऊ शकते. तीही लष्करी अधिकाऱ्याच्या परवानगीने. येथील फॉरेस्ट खात्याची जीप आणि लष्करी परवाना याची व्यवस्था ब्रह्मे यांनी करून ठेवली होती. त्यामुळे गुलमर्गला निघाल्यापासून दीड तासात पोहोचलो. हे ठिकाण येथून २९ मैल दूर असून पीरपंजाब रांगामधील ९।। हजार फूट उंचीवर आहे. इंग्रजी माणसाच्या मनासारखे ठिकाण

असे या स्थानाचे थोडक्यात वर्णन करता येईल. येथे येऊन मुक्कामाला राहाणारी माणसे हल्ली कमी आहेत असे दिसते. इंग्रजी राजवटीत इंग्लिश कुटुंबे येथे गर्दी करत असत. चहाच्या बशीच्या आकाराचे हे ठिकाण आहे. कडेने चोहोबाजूंनी झाडांच्या रांगा व त्यात अधून मधून डोकावणारी घरे. मधेच एखाद्या बाजूला छोट्याशा बाजारपेठेची घरांची रांग, किंचितसे उंच असे एक देऊळ. जवळ जवळ मध्यावर उंचेलीशी टेकडी. आवती भोवती विस्तीर्ण अशी हिरवी मैदाने हे या स्थानाचे रंगरूप आहे. दक्षिणेच्या बाजूला पूर्व-पश्चिम जाणारी उंचच्या उंच डोगरांची रांग आणि तीही बर्फाच्छादित शिखरे हे या स्थानाचे दुसरे ठिकाण आहे. याची उंची अकरा हजार फूट आहे. गुलमर्ग येथेच दुपारचे जेवण करून घोड्यावरून खिलनमर्ग गाठले. एक तासाचा हा प्रवास आहे. खिलनमर्ग येथून नंगा पर्वताचे दर्शन घडते असे ऐकले होते. आम्ही तेथे पोहोचल्यानंतर सूर्यप्रकाशाने आम्हाला हात दिला. उत्तरेची शिखरे पाच-दहा मिनिटासाठी अगदी स्वच्छ झाली. दूरवर मोठमोठ्या हिमाच्छादित पर्वताच्या रांगा. त्या पाठीमागे त्रिकोणी आकाराचे एक पर्वत शिखर आपली मान उंच करून अभिमानाने उभे होते. २६ हजार फूट उंचीचा नंगा पर्वत तो हा असे आम्हास सांगण्यात आले.

खिलनमर्गच्या थंड हवेत गरम चहाचे चार घुटके घेतले आणि घोड्यावर स्वार होऊन चार-पाचशे फुटावर उंचीवर असलेल्या बर्फाकडे निघालो. वीस-पंचवीस मिनिटात तेथे पोहोचलो. बारा हजार फुटावर बर्फ पायाला लागला. पर्वताच्या शिखरापासून छोटासा एक ओढाच बर्फाने भरून असा खाली आला होता. साखरेचे ढीगच्या ढीग एकत्र केल्यावर जसे दिसेल तसे हे सर्व दृश्य होते. इराण्याच्या चहाच्या दुकानात मिळतो तसा घट्ट बर्फ हा नव्हता किंवा नसतोही. ठिसूळ वाळूमधे चालताना जसे

वाटते तसा अनुभव चालताना आला. अर्थात अधिक खालचे थर घट्ट असतीलच. तसे ते असले पाहिजेत. अनवाणी पायाने काही क्षण या बर्फावर उभे राहून पाहिले. लहानपणी पावसात खेळताना मनाची जी प्रचिती होती ती मनस्थिती थोडा वेळ अनुभवली. परत जाण्यासाठी निघालो. उतरताना घोड्यावर बसणे मला अवघड झाले. परतीचा प्रवास पायानेच केला. गुलमर्गपासून परत जीपने संध्याकाळी श्रीनगरला पोहोचलो.


दहा तारखेचा सर्व दिवस जवळ जवळ दोनशे मैल प्रवास करून या राज्यातील महत्त्वाचे फॉरेस्ट पाहिले. लोळाव व्हॅलीतील देवदारचे फॉरेस्ट हे आपल्या देशातील एक महत्त्वाचे ठिकाण आहे. औद्योगिक उपयोगासाठी देवदार प्रसिद्ध आहे. परंतु त्याचे फॉरेस्ट कसे असेल याची आपल्याकडे फार कमी माहिती आहे. आपण जंगल म्हणजे चिक्कार पाऊस, ओबड धोबड झाडाझुडपांची दाटी, काट्याकुट्यांनी व्यापलेले ठिकाण मानतो. हे फॉरेस्ट तसे नाही. या भागात जास्तीत जास्त पाऊस ४० इंच. तोही सर्व वर्षभर विभागून पडत असतो. उंच झाडे, जमिनीवर स्वच्छता भरपूर. क्वचित आढळणाऱ्या अस्वलाखेरीज त्रासदायक दुसरी श्वापदे नाहीत. देवदारखेरीज जंगलाच्या दृष्टीने महत्त्वाचे झाड म्हणजे स्प्रूस. पॉपर् व विलोडा. तीही रस्त्याच्या काठाने, कॅनाल किंवा सरोवरांच्या काठाने रांगारांगाने उभी असतात. उपयोग आणि शोभा या दृष्टीने ही झाडे महत्त्वाची आहेत. माझ्या मताने वृक्ष म्हणून काश्मीरचे मानाचे असेल तर ते चिनारचे. समरकंदच्या भूमीतून काही शतकापूर्वी एका मुस्लीम राजाने हे झाड काश्मीरमधे आणले. सातशे वर्षे हे झाड जास्तीत जास्त जगू शकते असे मला सांगण्यात आले. हिरव्यागार फांद्यांचा डौलदार डोलारा घेऊन उंच झाड हलू लागले म्हणजे त्याच्या विस्तृत सावलीत बसलेल्या पांथस्थांना आपल्या डोक्यावर निसर्गाने खरोखरीची छत्र-चामरे धरली आहेत की काय

असे वाटू लागते.

लोलावनंतर वुलर सरोवराला प्रदक्षिणा घालून आम्ही परतलो. वुलर सरोवर हे आशियातले ताज्या पाण्याचे पहिल्या प्रतीचे सरोवर म्हणून प्रसिद्ध आहे. याची लांबी १२ मैल व रुंदी ५ मैल आहे असे सांगण्यात येते. सकाळी ८।। पासून संध्याकाळी ८ पर्यंत जवळ जवळ बारा तासांची ही भटकंती करून काश्मीर दर्शनाचा एक भाग पुरा केला.

आता दुपारी परिषदेचे सूप वाजले. काही उद्याने आणि जवळपासची इतर ठिकाणे पाहून परत निघण्याच्या तयारीला लागले पाहिजे. येथील आमचे यजमान, मंत्री श्री. शामलाल सराफ यांनी सर्व प्रकारची व्यवस्था उत्तम ठेवली. त्यांचे मन:पूर्वक आभार मानले.

येथील लहान थोर अनेक मंडळींशी मी स्थानिक परिस्थितीवर माहिती मिळविण्याच्या दृष्टीने चर्चा केली. येथील राजकीय परिस्थितीबाबत अधिक काळजी करण्यासारखी स्थिती आहे. याबाबत कितीतरी लिहिता येण्यासारखी माहिती मिळविली आहे. परंतु हे सर्व घाईघाईनं लिहावं अस नाही. तसं लिहिणं मला शक्य नाही. पाहू, पुढे केव्हा तरी.



---

परिषदांसाठी प्रवास करण्यांत बराच काळ यशवंतरावांना १९५५ मध्ये व्यतीत करावा लागला. ते पुरवठा, स्थानिक स्वराज्य आणि जंगल खात्यांचा कारभार संभाळत होते. या खात्यांच्या संदर्भात देशात निरनिराळ्या प्रांतात परिषदांचे आयोजन होत राहिल्याने त्यात सहभागी होण्यासाठी प्रवास करणे आवश्यक होते. या वर्षात त्यांनी उत्तरेत पंजाब-सिमला, काश्मीर तर दक्षिणेत उटकमंड पर्यंतचा प्रवास केला. या प्रवासातील स्मृति त्यांनी स्वहस्ते नोंदवून ठेवल्या. दक्षिणेतील या प्रवासाच्या संदर्भात ते लिहितात -

उटकमंड

१३ मे १९५५

प्रिय सौ. वेणुबाईस

उटकमंडला एकदाचे रात्री येऊन पोहोचलो. गेले चार दिवस अंकोला, दांडेली, बंगलोर, कोइमतूर या मार्गाने एकसारखा प्रवास करावा लागला.

उटकमंड यापूर्वी पाहिले नव्हते. रात्री येथे पोहोचलो तेव्हा महाबळेश्वर आणखी थोडे उंच केले की झाले! उटकमंड असे वाटले. खरे म्हणजे फारच सुंदर ठिकाण आहे. वृक्षराजी अधिक दाट, उंचच्या उंच विशेष म्हणजे विविध प्रकारची आहे. इथली वस्तीही वेगवेगळ्या उंचवट्यावर पसरलेली आहे. बहुतेक राजे महाराजांचे इथे बंगले आहेत. त्यातल्याच एका बंगल्यात परिषदेचे सर्व पाहुणे उतरले आहेत. याच बंगल्यातल्या एका प्रशस्त दिवाणखान्यात परिषद भरते. रात्री थंडी फार पडली होती. माझ्याकडे गरम कपडे यथातथाच आहेत याची जाणीव खऱ्या अर्थाने रात्री झाली.

येथे येऊन पोहोचेपर्यंत प्रवासाची जी दगदग झाली ती पाहून पत्नीसह आलो नाही, एकटाच आलो हे बरे झाले असे वाटले. विशेषत: बंगलोर नंतर जलारपेठमध्ये मद्रास-मुट्यापलम या गाडीचे जे कनेक्शन ठरले त्यामुळे फारच त्रास झाला. रात्रभर आमच्या गाडीचा डबा बाजूला काढून जलारपेठला सायडिंगला ठेवून दिला होता. सकाळी तो कोइमतूर पॅसेंजरला जोडला तेव्हा आमचा प्रवास पुढे सुरू झाला. दोन तासांचा हा कंटाळवाणा प्रवास. गाडीतले पाणी संपलेले. परिषदेचा पहिल्या दिवसाचा कार्यक्रम हुकला ही रुखरुख. त्यामुळे नकोशा झालेल्या या अविस्मरणीय प्रवासाची आठवणसुद्धा नको होते.

दुपारी दीड वाजता कोइमतूर येथे पोहोचलो. हे गाव मद्रासच्या दक्षिणेला पश्चिम किनाऱ्याच्या दिशेला सुमारे तीनशे मैलावर आहे. आमची मुख्य गाडी हुकल्यामुळे रेल्वेने उटकमंडला पोचणे शक्य नव्हते म्हणून कोइमतूरहून स्पेशल टॅक्सी (४० रुपये भाडे) करून हा पन्नास मैलाचा प्रवास साडेतीन तासात केला. कोइमतूर-उटी रस्ता फार चांगला आहे. भोवतालची उत्तम बागाइती शेती, संध्याकाळचा गारवा यामुळे या प्रवासाने दिवसभराचा शीण गेला म्हटल तरी चालेल. विशेषत: निलगिरी पर्वताच्या रांगांनी मनाला खूपच प्रसन्नता वाटली. मुट्यापलम हे उटीची चढण येण्यापूर्वीचे मोठे गाव आहे. या गावापासून चार मैलावर निलगिरी रांग लागते. उंचीवरच्या वळणा-वळणाचा आल्हाददायक प्रवास सुरू होतो. पुट्यापळमला आमच्या गाडीला चाकाच्या नादुरुस्तीसाठी थोडे थांबावे लागले. मी तेथे थांबण्यापेक्षा चालणे पसंत केले. दोन-तीन मैल चालत पुढे गेलो तेंव्हा एकदम सुपारीच्या बागांची रांगच रांग लागली. मावळतीच्या सूर्याची किरणे पडणार नाहीत अशी ठिकाणे सुपारीच्या बागांना लागतात. निलगिरीच्या पायथ्याशी मैलोगणती पसरलेल्या या बागा पाहिल्या म्हणजे एक नवीन अनुभूती आल्याचा आनंद होतो.

उंच व धिप्पाड लढाऊ सैनिकांच्या शिस्तीत उभ्या असलेल्या सहस्त्रावधी रांगांच्या समोरून जाताना एखाद्या सेनापतीला जसा अनुभव यावा तसे या बागांच्या मधून जाणाऱ्या रस्त्यातून प्रवास करताना वाटते. प्रत्येक दहा मैलावर २२०० फूट उंची वाढत होती. दिवसभराच्या रखरखीत प्रवासाने थकलेल्या शरीराला वाढत्या उंचीच्या वर येणाऱ्या थंड वाऱ्याची झुळूक नवजीवन देत होती. जवळ जवळ पंधरा मैल गेल्यानंतर छोट्या छोट्या वसाहती लागू लागतात. कुन्नूर आणि वेलिंग्टन ही दोन कोठी गावे विसाव्या मैलावर लागतात.

कुन्नूर किंवा वेलिंग्टन म्हणजे महाबळेश्वरजवळ जशी पाचगणी आहे तशीच म्हटले तरी चालेल. उटी चार मैलावर असताना विजेच्या दिव्यांचा विस्कटलेला विस्तार दिसू लागतो. वळणे घेत आपण प्रत्यक्ष गावात केव्हां शिरतो ते ध्यानातच येत नाही.


उटीच्या प्रथम दर्शनाबद्दल लिहिले एवढे बस्स. प्रत्यक्ष पाहिल्यानंतर सवड झाल्यास लिहावे असा विचार आहे. परिषदेचे काम दोन दिवसानंतर संपेल. त्यानंतर तीन वाजता कोइमतूर-मद्रास रेल्वेने निघावे लागेल.

दांडेलीला असताना रात्री अंदाजे दोन वाजेपर्यंत जंगलात जनावरांच्या दर्शनासाठी भटकलो. सांबराखेरीज फारसे काही दिसले नाही. एक दोन दिवस मुक्कामाला गेल्याखेरीज समाधानकारक असे काही पहाता येईल असे वाटत नाही.

बंगलोरचा बारा तासांचा मुक्काम मात्र फार सदुपयोगी ठरला. सकाळी टेलिफोन तयार करणारा आपल्या देशातील पहिला कारखाना पाहिला. त्याचप्रमाणे विमानाचे आणि रेल्वेचे डबे तयार करणारे कारखाने पाहिले. आपल्या देशाचे रूप कसे बदलते आहे आणि नवीन तांत्रिक निर्मितीच्या क्षेत्रात आपली तरुण माणसे कसे कार्य करीत आहेत हे येथे प्रत्यक्ष पहावयास मिळते. देशाच्या भविष्याबद्दल आत्मविश्वास वाढू व वाटू लागतो.

बंगलोरमधील रामन इन्स्टिट्यूट पाहिली. सर सी. व्ही. रामन यांना मी आज प्रत्यक्ष पाहिले. विज्ञानाच्या क्षेत्रात नोबेल प्राइझ मिळवून रामन यांनी आपल्या देशाच्या कीर्तीत फार मोठी भर घातलेली आहे. मी गेलो त्यावेळी बाहेरून आलेले शाळा-कॉलेजचे काही शिक्षक आणि विद्यार्थीही होते. त्यांच्याबरोबर दोन अमेरिकन्स होते. सर रामन यांच्या तोंडून 'रामन रेज' बद्दलची माहिती ऐकताना कालिदासाच्या तोंडून शाकुंतल ऐकण्याचा आनंद झाला. इथपर्यंत सर्व ठीक होते परंतु म्युझियम

दाखविण्यासाठी जेव्हा सर्वांच्या घोळक्यातून हिंडू लागले आणि त्यांच्या विषयाशी संबंध नसलेल्या विषयावर, विशेषत: देशातील अंतर्गत राजकीय प्रश्नावर आणि परराष्ट्रीय धोरणावर भराभर व भरमसाट बोलू लागले तेव्हा ते सर्व न ऐकता चालू लागावे असे मनात येऊन गेले. या बोलण्याच्या ओघात पंडित नेहरूंबद्दल फार वाईट बोलले. परक्या देशाचे लोक हजर असताना त्यांचे ते बोलणे मला रुचले नाही. सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील प्रश्नावरील त्यांची मते ऐकताना मला ते विचार प्रतिगामी वाटले. परंतु देशातील हा एक थोर माणूस. पं. नेहरू हे ही थोर. थोरांनी थोरासारखे बोललेले कोणालाही आवडते भावते. त्यांच्या समोर मी काय बोलणार ?



---


१९४६मध्ये पार्लमेंटरी सेक्रेटरीच्या रूपानं यशवंतरावांच नेतृत्व मुंबईत पोहोचलं. १९५२ साली त्यांच्याकडं मंत्रीपद आलं. त्यानंतर महाराष्ट्राच्या पातळीवर त्यांनी आपलं नेतृत्व क्रमाक्रमानं वृद्धिंगत केलं. १९५२ पासून पुढे चार वर्षात म्हणजे १९५६ पर्यंत त्यांच नेतृत्व प्रशासकीय गुणांनी उजळून निघालं. पुरोगामी, ध्येयवादी प्रशासक असा त्यांचा नावलौकिक वाढला.

राजकीय क्षितीजावर मात्र त्या काळात महाराष्ट्रांत लाव्हा रसाचे लोट वहात होते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ शिगेला पोचली होती. ते वादळ सर्वत्र घोंगावत राहिलं होतं. या काळात यशवंतरावांनी एका भाषणात 'नेहरू की महाराष्ट्र' असा एक प्रश्न उभा केला तेव्हा चव्हाण यांचेवर चौफेर टीका सुरू झाली. यशवंतरावांची भूमिका समजून घेण्याच्या मन:स्थितीत कोणी नव्हते. वृत्तपत्रातून चव्हाण विरोधी एकतर्फी टीकेचा गादारोळ माजला. तथापी यशवंतरावांची भूमिका, मनोव्यापार त्यावेळी काय होते यावर प्रकाश टाकणारे त्यांचे स्वत:चे एक पत्र उपलब्ध आहे. संयुक्त महाराष्ट्रासंबंधात त्यांची भूमिका स्पष्ट करणारे त्यांचे हे पत्र पुरेसे बोलके आहे. ते लिहितात–

मुंबई
१२/१२/५५

माझी भूमिका एकदम समजण्यास किंचित अवघड वाटेल. कारण त्याचा पूर्व इतिहास सर्वांना माहीत नाही. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी मी सोडलेली नाही. परंतु आज ज्या पद्धतीने प्रयत्न चालू आहेत त्यामुळे मुंबई तर जाईलच परंतु महाराष्ट्रातील काँग्रेसही नष्ट होईल असे दुहेरी संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे मला स्पष्ट बोलावे लागले. नेहरू की महाराष्ट्र असा प्रश्न उभा करताना नेहरू ही एक व्यक्ती या दृष्टीने आजच्या भारताचे मूर्तिमंत प्रतीक आहे. राष्ट्रीय ऐक्य आणि आर्थिक समतेचा कार्यक्रम म्हणजे नेहरू या अर्थाने इकडे पाहिले पाहिजे.

मी अत्यंत विचारपूर्वक बोलण्याखेरीज गत्यंतर राहिले नाही. तेव्हा आणि अंतिम महाराष्ट्राच्या हिताचे म्हणून माझे मत मांडले आहे. मराठी वृत्तपत्रांनी सूडबुद्धीने प्रचार चालविला आहे. एक वादळ माझेभोवथी उठविले आहे. कदाचित राजकीयदृष्ट्या माझी नाव या वादळात बुडेलही. पण माझी माझ्या विचारावर नितांत श्रद्धा आहे. मी यातून एक पाऊलही मागे घेणार नाही. कारण स्वार्थाचे दृष्टीने मी काही केलेले नाही. असे माझे मत आहे. मला ग्वाही देत आहे.



प्रशासकीय क्षेत्रातील बदलाची दखल घेण्यास कोणाचेच चित्त ठिकाणावर नव्हते, शांत नव्हते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला अन्य काही पर्याय असू शकतो हे राज्यातील जनतेला मान्य नव्हतं. दरम्यान १९५६ मध्ये द्विभाषिक राज्याचे वारे दिल्लीहून सुटले. ते महाराष्ट्रांत पोचले. तेव्हा महाराष्ट्रात खळबळ उडाली. ६ ऑक्टोबर १९५६ला मुंबई राज्य विधानसभेचं अखेरच अधिवेशन

सुरू झालं. दिल्लीच्या निर्णयानुसार महाराष्ट्राचं महाद्वैभाषिक राज्य निर्माण करण्याच्या दृष्टीनं घटनेत करायच्या दुरुस्तीस विधानसभेला मान्यता द्यावी लागणार होती. या प्रश्नाच्या चर्चेच्या वेळी द्वैभाषिक मुंबई राज्याचा निर्णय घाईनं करण्यात आल्याबद्दल विरोधी पक्षांनी कठोर टीका केली. दिल्लीकरांनी मोरारजींना विश्वासात घेऊन द्विभाषिकाचा अंतिम निर्णय केलेला नव्हता. त्यामुळे तेही नाराज होते. या निर्णयामागे कोणतंही तत्त्व नाही आणि हा निर्णय लोकशाही विरोधी आहे असं श्री. एस. एम. जोशी यांनी मत व्यक्त केलं. घटना दुरुस्तीवर विधानसभेत तीन दिवस उलटसुलट चर्चा झाल्यावर अखेरीस ता. ९ ऑक्टोबरला १४४ अनुकूल विरुद्ध २७ असं मतदान होऊन विधानसभेत घटनेत करायच्या दुरुस्तीला अखेर मंजुरी दिली.

हे सर्व सव्यापसव्य झाल्यानंतर ता. १६ ऑक्टोबरला जुन्या मुंबई राज्यातील सौराष्ट्र, कन्नड, वऱ्हाड, मराठवाडा इथल्या आमदारांची संयुक्त बैठक होऊन, यशवंतरावांच्या नेतृत्वावर ३३३ मतांनी शिक्का मोर्तब करण्यात आलं. नेतेपदाच्या शर्यतीतून मोरारजींनी माघार घेतली. दुसरे प्रतिस्पर्धी श्री. भाऊसाहेब हिरे १११ मतं मिळाल्यानं ते पराभूत झाले.

वस्तुत: यशवंतराव हे संयुक्त महाराष्ट्राचे कट्टे पुरस्कर्ते. असं असूनही विशाल द्वैभाषिकाचं मुख्यमंत्रीपद त्यानी स्वीकारलं. ते चालविण्याची जबाबदारी घेतली. हा काटेरी मुकुट डोक्यावर का ठेवून घेतला याचं उत्तर त्यानी नंतरच्या काळात, संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी चतुराईनं प्रयत्नशील राहून प्रत्यक्ष स्वत:च्या कृतीनं दिलं. १९५६ ते १९६० या काळात त्यांनी दिल्लीशी प्रतारणा तर केली नाहीच, शिवाय महाराष्ट्रातही कमालीचा विवेक पाळून द्विभाषिक राबवलं. १ नोव्हेंबर १९५६ रोजी त्यांचा मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला.

यशवंतराव द्विभाषिकाच्या चक्रव्यूहात शिरले होते. या नव्या पुनर्रचनेत राज्याचं स्वरूप संमिश्र निर्माण झालं. क्षेत्रफळाच्या बाबतीत हे राज्य भारतीय संघराज्यातील पहिलं आणि लोकसंख्येच्या बाबतीत दुसरं बनलं. क्षेत्रफळ एक कोटी नव्वद लक्ष चौरस मैलापेक्षा अधिक आकाराचं झालं. या प्रचंड राज्याचा राज्यकारभार परिणामकारक आणि सुलभ रीत्या व्हावा यासाठी त्यांना अखंड धावाधाव करावी लागली. मनस्थितीवर आणि कौटुंबिक वातावरणावर ताण पडावा अशी ही स्थिती होती. १९५८ मध्ये दिल्लीहून पत्नीला लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपली मनस्थिती नमूद केली. ते लिहितात -

नवी दिल्ली
११ डिसेंबर १९५८


प्रिय सौ. वेणुबाई,

सकाळी घरून निघताना कष्टी अंत:करणाने बाहेर पडलो. तुझ्या निराश उद्गारांनी आणि खिन्न चेहेऱ्याने सबंध प्रवासच अस्वस्थ चित्ताने झाला. मीटिंग कशीतरी आटोपून परत आल्यावर आता लिहीत आहे.

गेले काही महिने, विशेषत: काही आठवडे जसे काही एखादे वादळ निर्माण व्हावे असे आयुष्यात निर्माण झाले आहे. मी पुष्कळ विचार केला व करीत आहे की असे का व्हावे? गेल्या सोळा वर्षांचा चित्रपट डोळ्यापुढून गेला. अनेक संकटे आपण एकत्र भोगली. हृदये करपून जावीत अशा आपत्ती आल्या. अकरा वर्षापूर्वी ती. गणपतरावांच्या मृत्यूचे वेळी तर मी आता मोडून जाईन अशी माझी मलाच भीति वाटत होती. त्या सर्व यातनांना तुझ्या संगतीमुळे मी कसेतरी तोंड देवू शकलो. त्यानंतरच्या तुझ्या आजारामुळे पुन्हा वैराण वाळवंटात शिरतो की काय असा धाक निर्माण झाला. पण तू स्वत: धैयनि त्यालाही तोंड दिलेस. आणि माझी हिंमत वाढविलीस. पुन्हा नव्या आशेने पुढे जावू लागलो. १९५२ ते १९५५च्या कठीण राजकीय काळातही तू माझी खरी सोबतीण म्हणून साथ केलीस. कितीतरी कठीण काळात माझ्या सल्लागाराचे व जिवाभावाच्या मित्राचे कार्य केलेस. तुझी साथ नसेल तर मी एकटा काही करू शकेन अशी माझी मन:स्थिती नाही. तुझ्या निरागस सोबतीशिवाय मी निरर्थ व्यक्ती ठरण्याचा संभव आहे. माझ्या वाढत्या जबाबदारी-बरोबर तुझी वाढती साथ नसेल तर माझे आयुष्य अर्थशून्य गोष्ट बनेल असा धाक मनात निर्माण झाला आहे. हातातील कामाकडे पुरे लक्ष लागत नाही त्यामुळे मी माझ्या जबाबदारीच्या कामात एखादी गंभीर चूक करीन की काय

अशीही भीती वाटू लागली आहे.

येत्या वर्ष-सहा महिन्यांचा काळ राजकीय परिस्थितीमुळे अत्यंत आणीबाणीचा व कसोटीचा ठरणार आहे असे निश्चित वाटू लागले आहे. मानसिक एकाकीपणाचा मला कंटाळा आला आहे. कुठेतरी दूर निघून जाण्याचे विचार मनात डोकावतात. पण ही सर्व आपत्ती आहे. यातून बचावले पाहिजे. असाही विचार मनात येतो. ज्यामुळे दु:ख होईल ते सर्व टाळण्याचा माझा प्रयत्न राहील आणि त्यात मी यशस्वी होईन असाही विश्वास वाटतो. अधिक काय लिहू? १८ तारखेपर्यंत लांबलचक दौरा आहे. कसा पुरा होणार कोण जाणे!



---

द्विभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रीपदी यशवंतरावांची निवड झाली पण तो काटेरी मुकुट होता. द्विभाषिकाच्या निर्णयासंबंधात दिल्लीकरांनी मोरारजींना अंधारात ठेवल्यामुळं ते नाराज होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीनं सुरू केलेलं आंदोलन शिगेला पोहोचलं होतं. समितीच्या आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानं ते चिरडण्यासाठी त्या काळातले मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी हिंसेला हिंसेनं उत्तर देण्याचा पवित्रा घेतल्यानं चळवळीचा आगडोंब सर्वत्र पसरला होता. समितीच्या व्यासपीठावर सर्व विरोधी पक्ष काँग्रेसच्या विरोधात एकत्र आलेले होते. काँग्रेसविषयी लोकांच्या मनांत अप्रियता वाढली होती. काँग्रेस अंतर्गत यशवंतराव आणि भाऊसाहेब हिरे यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या उद्दिष्टाकडे जाण्याचा मार्ग भिन्न बनला होता.

काँग्रेसविरोधी भडकलेल्या लोकांच्या भावना शांत होण्यासाठी मंत्री आणि पदाधिकारी यांनी राजीनामे देण्याच्या मार्गाचा अवलंब करावा असा भाऊसाहेब हिरे आणि शंकरराव देव यांनी आग्रह धरला तर राजीनामे देऊन काँग्रेसविरोधी समितीच्या गोटात दाखल होण्याची कल्पना यशवंतरावांना मान्य नव्हती. महाराष्ट्रात काँग्रेस अंतर्गत उलटसुलट विचार होऊ लागले तेव्हा अ. भा. काँग्रेसचे अध्यक्ष श्री. ढेबरभाई यांना भेटून यशवंतरावांनी सल्लामसलत केली. राजीनाम्याचा प्रश्न त्यानंतर

उपस्थित झाला त्यावेळी राजीनामा सादर न करणारे कॉंग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते हेही कॉंग्रेसनिष्ठ आहेत असा उल्लेख राजीनाम्याचा आदेश देणाऱ्या प्रदेश कॉंग्रेसच्या ठरावात करण्यात यावा असं यशवंतरावांनी सुचवलं. भाऊसाहेब हिरे हे प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. कॉंग्रेसनिष्ठा व्यक्त करण्यासाठी राजीनामे दिले पाहिजेत हे यशवंतरावांना मंजुर नसल्याने हिरे-चव्हाण दरी अधिकच वाढली.

विधानसभेत १९५६ मध्ये नेता निवडीचा प्रसंग निर्माण झाला त्यावेळी याचे पडसाद उमटले. महाद्विभाषिकाचं नेतृत्व करणं जिकीरीचं होतं. मोरारजींबद्दल अप्रियता होती. तरीसुद्धा नेतेपणी आपली बिनविरोध निवड व्हावी असा मोरारजींनी पवित्रा घेतला. हिरे यांचा त्यास विरोध होता. एकमतानं निवड जमत नाही असं दिसताच मोरारजींनी या शर्यतीतून माघार घेतली. मोरारजी बाजूला होताच हिरे यांनी नेतृत्व संपादन करण्याची, मुख्यमंत्री पदाची महत्त्वाकांक्षा प्रकट केली. मोर्चे बांधणी सुरू केली. तथापी संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भातील हिरे यांची विचारधारा मोरारजींना खटकणारी असल्यानं त्यांनी वेगळ्या हालचाली सुरू केल्या. यशवंतरावांना त्यांनी नेतेपदाच्या स्पर्धेत ओढले. त्यातून हिरे-चव्हाण असा सामना उभा राहिला. मोरारजींनी आपली शक्ती यशवंतरावांच्या पाठीशी उभी करण्याचा चंग बांधून सौराष्ट्र, कच्छच्या आमदारांना संघटित केलं. वऱ्हाड आणि मराठवाड्यातील आमदारांचीही साथ मिळविली. पश्चिम महाराष्ट्रांत मात्र चलबिचल होती. अखेरीस बहुसंख्य आमदारांनी यशवंतरावांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केलं. मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा झाला.

यशवंतराव कराड येथून मुंबईत पोहोचले. त्यानंतरचं दुसरं दशक पूर्ण झालं होतं. दुसऱ्या दशकाच्या प्रारंभीच महाराष्ट्राच्या नेतृत्वपदी ते विराजमान होण्याचा चमत्कार घडला. वस्तुत: ते संयुक्त महाराष्ट्राचे कट्टर पुरस्कृत असूनही महाद्विभाषिकाचं मुख्यमंत्रीपद त्यांनी स्वीकारलं, ते चालविण्याची जबाबदारी शिरावर घेतली!

संयुक्त महाराष्ट्राचा वणवा भडकलेला होता. मोरारजींनी हिंसक मार्गाचा अवलंब करून, त्या वणव्यात तेल ओतून चांगला भडकून ठेवला होता. यशवंतरावांनी या आगीत उडी घ्यावी याचा अनेकांना अचंबा वाटला. मुख्यमंत्री-पदाच्या हव्यासानं या चक्रव्यूहात शिरण्याइतके ते अपरिपक्व राजकीय कार्यकर्ते नव्हते. जन्मापासून संकटांशी सामना करीत मुंबईपर्यंत पोहोचलेल्या यशवंतरावांनी चक्रव्यूहाचा भेद करून सहीसलामत बाहेर पडण्याचा, युद्ध जिंकण्याचा आराखडा मनाशी निश्चित केलेला असावा. पुरवठा मंत्री म्हणून काम करताना दिल्लीतील नेत्यांशी त्यांचा संपर्क प्रस्थापित झाला होता. दिल्लीतील राजकारणाची वक्रगतीची

चाल परिचयाची होती. मर्यादित प्रमाणात का असेना त्या वक्रगतीला छेद देऊन इप्सित साध्य करण्यात यश संपादन केलेलं होतं. महाद्विभाषिकाचं मुख्यमंत्रीपदी एक नोव्हेंबर १९५६ला त्यांचा शपथविधी झाला. त्यानंतरची त्यांची वाटचाल आणि घटनाक्रम तपासला तर मुख्यमंत्रीपद स्वीकारण्यामागे राजकीय चतुराईचा त्यांचा तो डावपेच होता असाच निष्कर्ष निघतो.

लोकशाही पद्धतीनं लोकसभेनं संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आणण्यासंबंधी रीतसर ठराव मंजूर केला तरच संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होणार होती. लोकसभेतच आंध्र राज्याची निर्मिती रीतसर केलेली होती. लोकसभेला, दिल्लीतील काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्णयापर्यंत भिडवावं लागणार असल्यानं यशवंतरावांनी यासाठी मुत्सद्देगिरीचा वेगळा पवित्रा स्वीकारला.

दिल्लीहून येणाऱ्या लाटा थोपविण्यासाठी, किमान त्यातील तीव्रता कमी करण्यासाठी आणि महाराष्ट्र जागच्या जागी स्थिर राखण्यासाठी प्रसंगी नम्रता स्वीकारण्याच्या घटना जुन्या ऐतिहासिक काळात घडलेल्या आहेत. महाद्विभाषिकाचं मुख्यमंत्रीपद स्वीकारून या इतिहासाचा त्यांनी पुन: प्रत्यय आणून दिला. १९५६ ते १९६० पर्यंत म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत यशवंतरावांनी दिल्लीशी प्रतारणा केली नाही. शिवाय मोठ्या विवेकानं, संयमानं दिल्लीकृत महाद्विभाषिक यथातथ्य राबवलं. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या सामाजिक मनाशी ते मिळून-मिसळून गेले. राजकारणाचे पत्ते पिसताना प्रतिस्पर्ध्यांना, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळकर्त्यांना एकामागून एक डाव जिंकत असल्याचा आनंदही मिळवून दिला. डाव खेळणाराला, खेळताना इतरांनाही खेळण्यास सवड द्यावी लागते. तथापि विशिष्ट वेळ प्राप्त झाली की हुकुमाचा पत्ता पुढे करून सारा डावच जिंकावा लागतो. धीरानं, सचोटीनं, धोरणीपणानं पावलं टाकीत, पत्रे पिसत महाराष्ट्राचं ग्रहण सुटण्यासाठी यशवंतरावांनी तेच केल आणि डाव जिंकला. डाव जिंकला तरी श्रेय स्वत:कडे घेतलं नाही.

बुद्धिबळाच्या डावात प्याद्यांची हलवाहलव अनुकूल करावी लागते. आणि डाव जिंकला जावा यासाठी पुष्कळदा योगायोगाचं स्वरूप येतं. महाद्विभाषिक चालविण्याची त्यांनी एवढी पराकाष्ठा केली की दिल्लीतील सर्व श्रेष्ठांची या प्रामाणिक प्रयत्नाबद्दल खात्री पटली होती. नेमकी ही वेळ साधून प्रामाणिक प्रयत्न करूनही द्विभाषिक चालणं अशक्य आहे असं पं. नेहरूंना सांगितलं. पं. नेहरूंच्या सान्निध्यात त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचं स्वस्तिवाचन करताच या प्रश्नाला पडलेल्या रेशीम निरगाठी हळूहळू ढिल्या होऊ लागल्या. दुसऱ्या बाजूला, द्विभाषिक चांगलं

चाललं आहे, स्थिर झालं आहे असा प्रचार गुजराथी बंधू करीत होते. मुंबईचा वजीर कोंडीत पकडण्याची ही खेळी होती. वजीराला कोंडीत पकडून एक दिवस आपल्या राहुटीत नेण्याचा डाव त्यांना साध्य करायचा होता. यशवंतरावांचा ते जयजयकार करू लागले. १९६२च्या निवडणुकीपर्यंत द्विभाषिक अबाधित राखण्याचा त्यांचा कावा होता. परंतु सह्याद्रीत वावरणारे यशवंतराव कच्च्या गुरूचे चेले नाहीत याची त्यांना कल्पना नसावी. यशवंतराव जागरूक होते.

दरम्यान दिल्लीत अनुकूल वारं वाहू लागलं. ढेबरभाई यांच्या जागी इंदिरा गांधी यांची काँग्रेस अध्यक्षपदी निवड झाली. यशवंतरावांनी इंदिरा गांधींशी चर्चा करून संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी इंदिरा गांधींची, काँग्रेस अध्यक्षांची अनुकूलता संपादन करण्यापर्यंत मजल गाठली. इंदिरा गांधी यांनी या प्रश्नाचा सर्वांगिण अभ्यास करून निर्णय करण्यासाठी म्हणून नव्या सदस्यांची एक समिती स्थापन केली. द्विभाषिक हा कायमचा तोडगा अशी दिल्लीची भूमिका नव्हतीच.

समितीचा अहवाल मिळाल्यानंतर या प्रश्नाचा सोक्षमोक्ष करण्याचे ठरविले आणि पं. नेहरू, पं. गोविंदवल्लभ पंत यांच्या उपस्थितीत चर्चा करण्यासाठी यशवंतरावांना पाचारण केले. मोरारजी देसाई तेव्हा केंद्रीय मंत्रिमंडळात होते तथापि या अंतर्गत हालचालींचा ह्यांना थांगपत्ता नव्हता. नियोजित चर्चेच्या बैठकीसाठी मात्र त्यांना निमंत्रण देण्यात आले.

या बैठकीत मुंबईचा प्रश्न निघताच मोरारजींनी आपलं घोडं पुढं दामटण्याचा प्रयत्न केला. द्विभाषिकाचा कारभार ठीक चालला आहे, चव्हाण चांगलं काम करीत आहेत, समितीची शक्ती कमी होत आहे वगैरे समर्थन करून या प्रश्नाचा फेरविचार करण्याचं कारण नाही असं सुचविलं. पंडितजी, पंत आणि मोरारजी यांच्यातच हा खल झाला. अखेरीस मुख्यमंत्री म्हणून चव्हाणांचं काय मत आहे असं पंडितजींनी विचारलं.

यशवंतरावांनी या संधीचा फायदा घेतला आणि सांगितलं की "राज्य ठीक चाललं आहे, पण लोकमतात बदल घडलेला नाही. महाराष्ट्र आणि गुजरात यांचं भावनात्मक ऐक्य साध्य झालेलं नाही." खरं तर इथंच या प्रश्नाची इतिश्री घडून गेली. महाराष्ट्र राज्याची प्रत्यक्षात निर्मिती आणि त्यासाठी तांत्रिक बाबींची पूर्तता एवढंच उरलं. त्या संदर्भात ९ डिसेंबर १९५९ ला काँग्रेस-कार्यकारिणीनं दोन स्वतंत्र राज्यं (महाराष्ट्र-गुजरात) आणण्याच्या तत्त्वास मान्यता दिली. दोन एकभाषिक राज्यं निर्माण करण्याबाबतच्या विधेयकाला महाराष्ट्रात, विधानसभेनं आणि दिल्लीतही लोकसभेनं मान्यता दिल्यानंतर एक मे १९६० ला संयुक्त महाराष्ट्रराज्य

रीतसर अस्तित्वात आले.

या संपूर्ण धावपळीच्या आणि डाव-प्रतिडाव सुरू असलेल्या काळात विरोधी पक्षियांनी महाराष्ट्रात यशवंतरावांची संभावना मात्र 'सूर्याजी पिसाळ' अशी चालू ठेविली होती. आणखीही प्रगट टीका केली. पत्नीला दिल्लीहून लिहिलेल्या पत्रात 'दूर कुठंतरी निघून जावं' असं यशवंतरावांनी नमूद केलं आहे. तो या मानसिक ताणाचा परिपाक आहे. पत्नीचं आजारपण आणि राजकीय चिंता, महाराष्ट्राविषयी चिंता असा हा ताण होता. '' या सर्व आपत्तीतून बचावलं पाहिजे, त्यात मी यशस्वी होईन.'' असा विश्वासही पत्रात दर्शवितात यावरून त्यांच्या व्यक्तिमत्वावर वेगळा प्रकाश पडतो.

नाट्यपूर्ण घटना घडणं हा यशवंतरावांच्या जीवनाचा विशेष आहे. पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मुंबईतील सचिवालयात फायली पाहणाऱ्या यशवंतरावांची त्यांना काही कल्पना नसताना १९५२मधे मोरारजींनी त्यांचा मंत्रिमंडळात समावेश केला. मंत्रीपद मिळविण्याच्या लटपटीपासून ते अलिप्त होते परंतु पार्लमेंटरी सेक्रेटरी असताना त्यांनी सामाजिक हिताचा विचार करून केलेलं काम आणि अचूक निर्णय, कार्यक्षमता याच्या बळावरच पुरवठा खात्याचं मंत्रिपद त्यांचा शोध घेत आलं. कारभाराची कसोटी लागावी असाच तो काळ होता.

अन्नधान्याची परिस्थिती अत्यंत बिकट, पुरवठा खात्याबद्दल जनतेत तिरस्काराची भावना, रेशनिंग आणि अन्नधान्याच्या वाहतुकीवरील नियंत्रण, सरकारच्याविषयी लोकांमध्ये अप्रियता वाढलेली - अशी एकूण परिस्थिती होती. लोकांच्या दैनंदिन जीवनविषयक गरजांशी असलेलं हे पुरवठा खातं. या खात्यासाठी व्यवहारी आणि कर्तबगार व्यक्ती असली पाहिजे असा मोरारजींचा हिशेब असावा. अशी कर्तबगार व्यक्ती म्हणून यशवंतरावांची नाट्यपूर्ण रीत्या निवड झाली.

महाद्विभाषिक राज्य १ नोव्हेंबर १९५६ला अस्तित्वात यायचं होतं. त्यावेळी विधानसभेचा नवा नेता निवडण्याच्या हालचालींना वेग आला. द्विभाषिकाचा पर्याय मूठभर प्रवर्तक वगळता, अन्य कुणालाच मान्य नव्हता. या निर्णयामागं कोणतंही तत्त्व नव्हतं. हा निर्णय लोकशाही विरोधीच होता. यशवंतराव १९५२ला पुरवठामंत्री झाल्यापासून १९५६पर्यंत त्यांचं नेतेपण प्रशासकीय गुणांमुळं उजळून निघालेलं असलं तरी राज्यातील परिस्थिती, मुख्यमंत्रीपदासाठी त्यांनी झेप घ्यावी यासाठी सुतराम अनुकूल नव्हतं. परंतु मोरारजी आणि भाऊसाहेब हिरे यांच्या वादावादीत नेता निवडीसाठी यशवंतरावांची उमेदवारी नाट्यपूर्ण रीत्या उभी करण्यात आली. यशवंतरावांना काहीशा नाखुषीनंच स्वीकारावी लागली. त्यांचा स्वभावच असा की पक्षातल्या किंवा सत्तेतल्या कुठल्याही श्रेष्ठपदासाठी कोणापुढं लाचारी करायची

नाही किंवा त्या जागेसाठी पिच्छा पुरवायचा नाही. परंतु जबाबदारी चालत आली तर मात्र मागं फिरून पहायचं नाही. यावेळीही तेच घडलं. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आवश्यक ती मोर्चेबांधणी करणं क्रमप्राप्तच ठरलं. त्यांनी ते सव्यापसव्य केलं. मुख्यमंत्री झाले. त्यांच्या कसोटीचा काळ सुरू झाला. मंत्री म्हणून काम करीत असताना राज्यकारभाराचा जो काही अनुभव त्यांच्या संग्रही जमा झालेला होता त्यातून कारभारातील उणिवांची जाणीव त्यांना झाली होती. आता तर द्विभाषिक राज्याचा आकार वाढला होता. कामाचा बोजा वाढला होता. संयुक्त महाराष्ट्र समिती, महागुजरात जनता परिषद, या दोन्ही राज्यातील जनता यांनी द्विभाषिकांविरुद्ध युद्ध पुकारलं होतं. बुद्धीजीवी वर्ग तर असंतुष्टच होता. अशा अवस्थेत मुख्यमंत्री उत्तम कारभार करू शकतात हे सिद्ध करावं लागणार होतं. त्या दृष्टीनं सर्वांच सर्वप्रकारचं सहाय्य संपादन करण्याची योजना त्यांनी मनोमन जुळविली आणि त्यानुसार निर्णय करून कामास आणि निर्णय करण्यास लगोलग प्रारंभ केला. स्वत:भोवती प्रतिज्ञांचे तट उभारूनच नव्या राज्याच्या कारभाराचा रथ ओढण्याचा आटापिटा सुरू झाला. १९५७ची सार्वत्रिक निवडणूक अवघ्या सहा महिन्यावर येऊन ठेपली होती. या निवडणुकीच्या रणांगणात द्विभाषिक प्रामाणिकपणानं राबवण्याच्या जिद्दीनं मुख्यमंत्री आणि काँग्रेस कार्यकर्ते उतरलेले असले तरी सर्वशक्तीनिशी सामना करण्याच्या तयारीत असलेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीशी झुंज देणं हे मोठ आव्हान होतं. या निवडणुकीचा जो निकाल जाहीर झाला त्यात काँग्रेसला कामापुरतं बहुमत मिळालं. स्वत: यशवंतराव कराड मतदार संघातून जेमतेम मतानं विजयी होण्याइतपत निवडणूक अटीतटीची झाली. १ नोव्हेंबर १९५६. त्यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती. सहा महिन्यात त्यांना दुसऱ्यांदा शपथ घ्यावी लागली. कार्यक्षम आणि नि:पक्षपाती राज्यकारभाराची हमी देऊन त्यांनी राजवट पुढे सुरू केली.

सरकारची धोरणं भावनात्मक दृष्टीनं न आखता सामाजिक आणि आर्थिक दृष्टीनं आखून नव्या सामाजिक आणि आर्थिक दृष्टीकोनाची अभिव्यक्ती त्यातून सिद्ध करण्याचा त्यांनी कसोशीनं प्रयत्न सुरू केला. कारभार यंत्रणेची आणि पद्धतीची पुनर्रचना केली. लोकांना जास्ती जास्त विशुद्ध, कार्यक्षम आणि नि:पक्षपाती कारभाराची अनुभूती आणून देण्यात कोणत्याही प्रकारे कसूर ठेवली नाही. त्या चार वर्षातून पुरोगामी दृष्टी बाळगून जे निर्णय केले त्यामुळे महाराष्ट्राची पक्की पायाभरणी झाली. त्यांनी जनतेचा सहकार मिळविला, प्रशासनाला गती दिली. त्यामुळे महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शेती, शिक्षण, उद्योग आणि राजकीय

चेहरा-मोहरा बदलून गेला. देशातलं स्थिर, पुरोगामी आणि सर्वच बाबतीत जागरूक असलेलं राज्य अशी महाराष्ट्राची प्रतिमा निर्माण झाली. १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर १९६२च्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी या कार्याची पावती भरघोस प्रतिसादानं काँग्रेस पक्षाला दिली. १९५७ नंतर संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा तिसऱ्यांदा शपथविधी झाला होता. आता १९६२च्या निवडणुकीनंतर चौथ्यांदा झाला. या निवडणुकीत भक्कम बहुमत मिळवून काँग्रेस सरकार स्थिर बनवलं.

या निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाचे कार्यक्रम चढत्या भाजणीनं सुरु राहतील यासाठी त्यानी धोरणात्मक आखणी सुरू केली. राज्यानं विविध क्षेत्रांत अग्रेसरत्व प्रस्थापित करण्यासाठी काही महत्वाकांक्षी योजना त्यांच्या मनात घोळत असाव्यात. एक वेगळं स्वप्न ते पहात होते. पुढच्या पाच वर्षात महाराष्ट्र राज्य हे अस्सल पुरोगामी आणि समृद्ध राज्य बनण्याचं चित्र त्यांच्या मनात तयार झालं होतं. देशाला त्याचं दर्शन घडवायचं होतं.

दरम्यान अनपेक्षितपणे नाट्यमय परिस्थितीला त्यांना सामोरं जाण भाग पडलं.

### सत्तेच्या नाटकाची नांदी

६ नोव्हेंबर १९६२! यशवंतराव मुंबईत सचिवालयात नित्याची कामं पहात होते. तेवढ्यात अचानक फोन खणखणला. नव्या नाट्यप्रसंगाची ती नांदी होती. दिल्लीहून पंतप्रधान पं. नेहरू बोलले. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या दालनात अन्य कोणी नाही ना याची खात्री करून घेतली आणि तुम्हाला मी जे सांगणार आहे त्याबद्दल 'हो' किंवा 'नाही' एवढंच उत्तर मला पाहिजे असं निर्वाणीचं सांगितलं. पुढं म्हणाले, तुम्हास दिल्लीस 'संरक्षणमंत्री' म्हणून यावं लागणार आहे. मला तुमचं मत ताबडतोब हवं आहे. यावर ''जेव्हा आणि जिथं कुठे माझी आपणास गरज पडेल तिथे आणि त्यावेळी मी निश्चित येईन; परंतु माझी तिथे येण्याची गरज आहे का, हे एकदा तुम्हीच कृपा करून मनाशी निश्चित व पक्के केलेले बरे.'' यशवंतरावांनी सांगितलं.

१९६२च्या चीनच्या भारतावरील आक्रमणानंतर देशात संरक्षणविषयक निर्माण झालेल्या आणीबाणीच्या काळात, राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ नेत्यानं – पं. नेहरूंनीच यशवंतरावांना दिल्ली येण्याची हाक दिली होती. हे सर्वच अनपेक्षित होतं. दिल्लीची भूमीच अशी आहे की, तिथे घडतं ते बहुतेक अनपेक्षित! फार फार पूर्वीपासून हे सुरू आहे. पं. नेहरूंच्या मंत्रिमंडळात दाखल होण्याची घटना अशी नाट्यपूर्ण घडली. कृष्ण मेनन त्यावेळी दिल्लीत संरक्षण मंत्री होते.

दिल्ली ही मायानगरी असली तरी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची समारंभपूर्वक घोषणा करण्यासाठी १ मे १९६०ला पं. नेहरू मुंबईत आलेले असताना, त्या समारंभात बोलताना ''हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्री धावेल'' असा 'शब्द' दिला होता. ती वेळ आता आली. पं. नेहरूंचीच हाक यावी ही महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशी घटना असली तरी सह्याद्रीवर यशवंतरावांचा मुक्काम आणखी काही काळ वाढावा, घडावा असं महाराष्ट्राला वाटणं स्वाभाविक होतं. महाराष्ट्राला त्यांच्या अस्तित्वाची नितांत गरज होती.

संरक्षणविषयक आणीबाणीच्या काळात देशाची हाक आल्यानं महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रं विदर्भाचे नेते मारोतराव कन्नमवार यांच्या स्वाधीन करून संरक्षण मंत्रीपदाची सूत्रे स्वीकारण्यासाठी यशवंतराव २० नोव्हेंबर १९६२ला जड अंत:करणानं दिल्लीला गेले. दिल्लीला जाण्यासाठी मुंबईहून निघाले त्यावेळच्या त्यांच्या मनस्थितीवर प्रकाश टाकणारे एक पत्र उपलब्ध आहे. दिल्लीत पोहोचल्यावर ता. २१ नोव्हेंबर १९६२ला त्यांनी पत्नी वेणुताईना जे पत्र लिहिले त्यात ते नमूद करतात –

---

नवी दिल्ली
२१ नोव्हेंबर १९६२

प्रिय सौ. वेणुबाईस,

काल संध्याकाळी विमान निघाल्यानंतर मुंबई सोडणे म्हणजे काय, याचा खरा अर्थ काय तो ध्यानात आला. अनेकवेळा यापूर्वी मी मुंबई सोडून दिल्लीला आलो-गेलो होतो. पण आता मी मुंबई सोडून जात आहे या भावनेने अगदी खिन्न झालो. मी विमानात चढण्यापूर्वी तू जेव्हा नमस्कार केलास तेव्हा एक क्षण जरी मी तेथे अधिक थांबलो असतो तर खसखसून रडू कोसळले असते.


आज सकाळी शपथविधी झाला. पंडितजी फार प्रेमाने वागले. पार्लमेंटमधे स्वत: घेऊन जाऊन माझ्या जागेवर बसविले. पार्लमेंटनेही मोठ्या उत्साहाने माझे स्वागत केले.

लोकांच्या अपेक्षा फार पण कठीण काम आणि कठीण वेळ या सर्व गोष्टींमुळे माझ्या मनावर १९५५-५६चे ओझे

आहे. ईश्वर जसा मार्ग दाखवील तसे गेले पाहिजे.

सह्याद्रीमधे परत न जाण्याचा तुझा निकाल मला फार आवडला. तिथली सर्व व्यवस्था झाल्यानंतर ८-१० दिवसात तू आलीस तर फार फार बरे होईल. हे मी व्यवहार म्हणून लिहीत नाही. या कठीण दिवसात तुझी सोबत म्हणजे माझी शक्ती आहे. घर पाहिले आहे. छोटेखानी पण सुरेख आहे.

मोरारजीभाई घरच्यासारखे वागतात. आज शपथविधीला जाण्यापूर्वी गजराबाईंच्याकडून ओवाळण्याची व्यवस्था केली. मला बरे वाटले. हळू हळू कामात प्रवेश करतो आहे. दोन-तीन महिन्यांत कामावर पकड बसेल. मग काहीसा निर्धास्त होईन. पण तोपर्यंत इकडे तिकडे प्रवास करू नये असे वाटते. बाकी सर्व तू आल्यावर ठरवू. ती. आईला नमस्कार.



---

त्यावर्षी ३० ऑक्टोबरला कृष्णमेनन यांनी संरक्षणमंत्रीपदाचा राजीनामा पंतप्रधानांकडे सुपूर्द केल्यानंतर प्राप्त परिस्थितीत काही मुख्यमंत्र्यांशी सल्लामसलत करण्याच्या उद्देशानं पंडितजींनी मुख्यमंत्र्यांना दिल्लीला पाचारण केलं. या बैठकीसाठी के. कामराज, प्रतापसिंह कैरॉं, बिजू पटनाईक आणि यशवंतराव चव्हाण उपस्थित राहिले. ही बैठक रात्री दीर्घकाळपर्यंत झाली. त्यावेळी मेनन यांना मंत्रिमंडळातून दूर करावं असं ठामपणे कोणी सुचवलं नाही परंतु पक्षातल्या लोकांकडून आणि देशातल्या जनतेकडून जे मत व्यक्त केलं जात आहे त्याकडे पंतप्रधानांना दुर्लक्ष करता येणार नाही असा इशारा मात्र दिला. यावर लोक म्हणत आहेत ते आपण मानलं तर ते उद्या माझ्या राजीनाम्याचीही मागणी करतील. तेव्हा आपण कुठवर पोहोचणार आहोत हे ठरवावं लागेल असं पंडितजींनी मत व्यक्त केलं. बैठकीत अंतिम निर्णय काही झाला नाही परंतु पंतप्रधानांनी कोणताही निर्णय केला तरी मुख्यमंत्री त्यांच्याबरोबर राहातील एवढाच बैठकीचा निष्कर्ष ठरला. ५ नोव्हेंबरला यशवंतराव दिल्ली येथून मुंबईला परतले.

६ नोव्हेंबरला पंडितजी आणि लालबहादूर शास्त्री यांचे खलबत झाले. केंद्रीय मंत्रिमंडळातले मंत्री आणि मुख्यमंत्री यांची नामावली तपासली. ती तपासत असताना यशवंतरावांच्या नावाशी दोघेही थांबले आणि एकमत होताच पंडितजींनी यशवंतरावांना फोनवरून आदेश दिला. मेनन यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला नव्हता परंतु काँग्रेस कार्यकारिणीच्या ६ नोव्हेंबरच्या बैठकीत सभासदांनी ''आज मेननची पाळी आली आहे, उद्या तुमच्यावर येईल'' असे पंतप्रधानांना परखडपणे सुनावल्यामुळे पं. नेहरूंना धक्का बसला. मेनन यांचा राजीनामा स्वीकारल्याचं पं. नेहरूंनी ७ नोव्हेंबरला जाहीर केलं.

घटना झपाट्यानं घडत राहिल्या. संरक्षण खात्याची जोखीम पंतप्रधानांनी स्वत:कडं घेतली. ताबडतोब दिल्लीला या असा यशवंतरावांना फोनवरून निरोप दिला. विचार करायला यशवंतरावांना अवधीच उरला नाही. १० तारखेला ते दिल्लीत पोचले.

''संरक्षणाच्या प्रश्नाचं आपल्याला काही ज्ञान, त्यासाठी कांही काळ खर्च करावा लागेल, देशभक्तीशिवाय अन्य कुठलीही पात्रता आपल्याजवळ नाही'' असं यशवंतरावांनी कृतज्ञतेनं पंडितजींना सांगितलं. मनातील काही घरगुती समस्यांचाही उल्लेख केला. त्यावर ''जे काही करायचंय ते तुम्ही लवकर आत्मसात कराल. मला इथं राजकीय नेतृत्व देईल असं कुणी हवं आहे. तुम्ही दिल्लीला असणं माझ्या दृष्टीनं आवश्यक आहे.'' पंडितजींनी स्पष्ट केलं.

''आता अधिक विचार करावा असं काही उरलेलं नाही. संरक्षणमंत्रीपद तुम्हाला बहाल करतोय हे पाहून टी. टी. कृष्णम्माचारी बरेच खवळले आहेत परंतु मी माझा निर्णय केलेला आहे. तुम्ही आता मुंबईला परत जा, कारण तुम्हाला तातडीनं परतायचं आहे'' असं दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या भेटीत पं. नेहरूंनी निर्वाणीचं सांगितलं. मागोमाग १४ नोव्हेंबरला, यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री बनल्याचं दिल्लीनं जाहीर केलं.

येथपर्यंत घटना घडल्या परंतु हे नाटक इथंच थांबायचं नव्हतं. मुंबई सोडून २० नोव्हेंबरला यशवंतराव दिल्लीत पोहोचले त्या रात्री बिजू पटनाईक त्यांना भेटण्यासाठी आले. संरक्षण खाते स्वत:कडं घेतल्यावर पं. नेहरूंनी पटनाईक यांना सल्लागार म्हणून जवळ केलं होतं. कृष्णम्माचारींप्रमाणे पटनाईक हेही संरक्षण खात्यावर कबजा करण्यासाठी उत्सुक होते. चव्हाणांच्या या पहिल्याच भेटीत पटनाईक यांनी संरक्षणविषयक विविध समस्यांची माहिती देण्याचा प्रयत्न केला. 'लष्करी डावपेच' म्हणून जे म्हणतात त्या बाबतीत यशवंतरावांना सज्ञान करावं, असा त्यांचा हेतू असावा. यशवंतरावांनी फक्त श्रोत्याची भूमिका बजावली तेव्हा गप्पांच्या अखेर

टप्प्यात ''तुम्ही दिल्लीला, इतक्या लवकर कशाला आलात?'' असा प्रश्न विचारला. चीन झपाट्यानं पुढं सरकत असून कदाचित मुंबईला धोका निर्माण होऊन मुंबई हीच युद्धभूमी बनण्याची शक्यता आहे. अशा वेळी तुम्ही मुंबईतच असलं पाहिजे असा सल्लाही दिला.

चव्हाण अजूनही संरक्षणमंत्री बनण्याचा विचार बदलतील आणि आल्या वाटेनं मुंबईला परततील अशी पट्नाईक यांची समजूत असावी! त्यासाठीच तर त्यांनी त्या रात्री काही कल्पना न देता यशवंतरावांना गाठलं.

''संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारून दिल्लीस येण्यास मी राजी नव्हतो'' असं यशवंतरावांनी पटनाईक यांना सांगितलं आणि मागोमाग असा फटका दिला की पटनाईक मुकाटपणे उठून निघून गेले. यशवंतराव ठामपणे म्हणाले, ''संरक्षणमंत्रीपदाची सूत्रं स्वीकारण्याचा मी निर्धार केला आहे. देशातील आणीबाणीच्या वेळी राष्ट्राकरिता जेवढं जास्तीत जास्त करता येईल तेवढं करण्याचा माझा निर्धार पक्का आहे.'' २१ नोव्हेंबरला यशवंतरावांचा शपथविधी झाला.

बिजू पटनाईक हे ओरिसा राज्याचे मुख्यमंत्री होते परंतु पं. नेहरूंनी, त्यांचे सल्लागार म्हणून नियुक्त केलेले पटनाईक यशवंतरावांच्या शपथ विधीनंतरही संरक्षण मंत्रालयाच्या कारभारात हस्तक्षेप करीत राहिले. मी स्वत: खरा संरक्षणमंत्री आहे असा त्यांचा पवित्रा होता. त्या ढंगानेच ते त्या खात्याचे निर्णय करू लागले. केंद्र सरकारनं, संरक्षण खात्याची काही जबाबदारी पटनाईक यांच्याकडे सोपविलेली असल्याबद्दल चव्हाण यांना कधी माहिती दिली नव्हती. पटनाईक हे मात्र स्वत:लाच संरक्षणमंत्री समजू लागल्यानं यशवंतराव अस्वस्थ बनले. पटनाईक यांच्या हस्तक्षेपामुळे त्यांची स्थिती इतकी चमत्कारिक बनली की या गोष्टीचा एकदा सोक्षमोक्ष करायचं ठरवून पंतप्रधानांपर्यंत त्यानी गाऱ्हाण पोहोचवलं. ''मुंबईहून आपण मला इथं संरक्षणमंत्री म्हणून बोलावलं, परंतु त्या खात्याचं मंत्रीपद आपण मला पूर्णत्वानं दिलेलं नाही.'' अशी आपली व्यथा पत्रातून स्पष्टपणे सांगितली. त्यानंतर मागोमाग आणखी एक खरमरीत पत्र पाठवून पटनाईक यांचे अवास्तव हस्तक्षेप वाढत असल्याबद्दल प्रत्यक्ष वस्तुस्थितीची कल्पना दिली. तेव्हा मात्र पंडितजींना निर्णय करणं भाग पडलं. त्यांनी चव्हाणांना भेटीला बोलावलं आणि ''संरक्षणमंत्री तुम्हीच आहात, तुम्ही पत्र वगैरे मला पाठवलय हे विसरून जा'' असं सांगून चव्हाणांनी रागानं लिहिलेलं पत्र त्यानी फाडून टाकलं. संरक्षणमंत्रीपदाच्या नाटकावर अखेर पडदा पडला! दिल्लीला पोचल्यावर प्रारंभीच्या काही महिन्यांत दिल्लीत ज्या घडामोडी झाल्या त्या

बेचैनीतून यशवंतराव मुक्त झाले.

देशभक्तीशिवाय आपली कुठली अन्य पात्रता नाही असं त्यांनी पं. नेहरूंना सांगितलं असलं तरी भारताचे समर्थ संरक्षणमंत्री अशी आपली प्रतिमा त्यांनी खात्याचा कारभार करताना निर्माण करून ठेवली. १९६५च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या निकालानं तर प्रतिमा अधिक उजळ बनली. त्यांना अमाप लोकप्रियता लाभली. संरक्षणमंत्रीपदाचा त्यांचा कार्यकाळ १९६६च्या नोव्हेंबरपर्यंत झाला तेव्हा त्यांच्या राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वात मोलाची भर पडली.

संरक्षण विभागाची सूत्रे स्वीकारल्यावर यशवंतरावांनी 'साऊथ ब्लॉक' येथील कार्यालयात ठाण मांडले आणि कामास प्रारंभ केला. संरक्षण खात्याची कार्यपद्धती माहिती करून घेणे आवश्यक होते. यासाठी संरक्षण विभागाचे सैन्यदल, हवाईदल आणि नाविकदल या तीनही दलाच्या प्रमुखांना विश्वासात घेऊन आणि विश्वास देऊन त्यांनी चर्चेसं प्रारंभ केला. दररोज सकाळी ९ वाजता मंत्र्याच्या मुख्य कार्यालयात एकत्रित बैठक आणि चर्चा करण्याचा उपक्रम सुरू केला. मंत्रालयाच्या प्रशासनाचे विविध विभाग प्रमुख, संरक्षण उत्पादन विभागाचे प्रमुख यांच्या क्रमश: बैठकी घेऊन विश्वासदर्शक असे वातावरण निर्माण केले. संरक्षण सिद्धतेसाठी तीनही दल प्रमुखांना योजना तयार करण्यास सुचविले. ज्या योजना रखडल्या आहेत त्यातील अडचणी, शासकीय आदेशाच्या उणिवा, आर्थिक तरतुदी आणि अंमलबजावणीतील विलंब असा कामाचा आढावा घेतला आणि क्रमाक्रमाने खात्यावर कब्जा निर्माण केला. तिन्ही प्रमुखांकडून नवीन योजना सादर झाल्या, तेव्हा पंतप्रधान आणि लोकसभेला निवेदन करून खर्चासाठी त्यांनी अंदाजपत्रात काही हजार कोटीची तरतूद करून घेतली. कामावर कब्जा प्रस्थापित होईपर्यंत उगाच इकडे तिकडे प्रवास करण्याचे टाळले.

सरहद्दीवर लष्करी जवानांचे तळ जेथे असतात तेथे परिस्थिती पाहून जवानांच्या अडचणी, उणिवा आणि त्यांची मनस्थिती जाणून घेण्याचा उपक्रम त्यांनी दुसऱ्या टप्प्यात सुरू केला. लष्करी तळावरील जवानांमध्ये मिळून-मिसळून त्यांच्याशी संवाद केला. जवानांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्याचे त्यातून साध्य झाले. देशाच्या पूर्व भागात चीनचे आक्रमण झालेले होते. या आक्रमणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे संरक्षण खात्याचा कारभार त्यांना स्वीकारावा लागला. कार्यालयीन कामाचा वकूब आल्यानंतर नोव्हेंबर १९६३ला त्यांनी प्रथम पूर्व भागाचा पहाणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी जोरहाट, तेजपूर भागाला भेट दिली. दौऱ्यावर असताना पत्रलेखनाचा त्यांचा परिपाठ होता.

तेजपूर (आसाम)
११ नोव्हेंबर १९६३

प्रिय सौ. वेणूबाईस,

हा दौरा पूर्ण होईतो दररोज एक पत्र लिहिण्याचा माझा मानस आहे. कसे काय जमते पाहूया. दररोज इतकी ठिकाणे पाहून होतात, इतकी वेगवेगळी माणसे भेटतात की त्या सर्वांची एक जंत्री ठेवतो म्हटलं तरी ते अशक्यच. या पत्रांच्या रूपाने त्यांची निदान अस्पष्टशी का होईना परंतु स्मृती राहील ती सुद्धा काही कमी नाही.

आज नेफाच्या पूर्वेकडील विभाग लोहित (फ्रांटियर डिव्हीजन) यामध्ये काही तास काढले. या नेफा विभागाचे महत्त्वाचे चार विभाग आहेत. एक - कॅमेंग, दुसरा - सुबानसिटी, तीन - सियांग आणि चार - लोहित. या चारही विभागांची नावे त्याच नावाच्या महत्त्वाच्या नद्या या विभागातून वाहतात त्यावरून त्यांना पडलेली आहेत. मी माझ्या चार दिवसांच्या प्रवासात या पैकी कॅमेंग आणि लोहित या दोन विभागास मी स्पर्श करणार आहे. त्यापैकी लोहित विभागास आज भेट दिली. कॅमेंग मध्ये उद्या प्रवेश करीन.

लोहित विभागाचे कारभार केंद्र तेजू या नावाचे छोटेखानी गाव आहे. या गावाचे नाव व स्थान मी नकाशात एकसारखे पहात होतो. त्यावरून का कोण जाणे हे डोंगराळी मुलखातील एक स्थान अशी माझी समजूत झाली होती. आज प्रत्यक्ष गाव पाहून ती माझी गैरसमजूत होती हे स्पष्ट झाले हे बरे झाले. सामान्यपणे मैदानी प्रदेशावरच या गावाची बैठक आहे. हा ब्रह्मपुत्रेच्या आणि लोहित नदीच्या काठचा सखल प्रदेश आहे. वनश्रीनी नटलेला, पाण्याच्या प्रवाहांनी वेढलेला प्रदेश आहे. विमानातून प्रवास करताना सबंध प्रदेश डोळ्याखालून जातो. त्याचे वैभव मनावर

ठसते. भारीच आकर्षक मुलूख!

एका छोटेखानी नदीच्या काठावर असलेल्या तात्पुरत्या विमान तळावर 'कॅरिवू' जातीच्या वाहतुकीच्या विमानातून आम्ही उतरलो. हे ठिकाण तेजूपासून आठ मैलांवर असावे. तेथे स्थानिक वन्यजातीच्या स्त्रिया आणि पुरुष यांनी मोठ्या प्रेमाने स्वागत केले. ते आपली शस्त्रे आणि वाद्ये सांगाती घेऊन थाटामाटाने आले होते. स्वागतासाठी इतरही अधिकारी विशेषत: तेथील पोलिटिकल ऑफिसर श्री. डुगल व त्यांच्या पत्नी सौ. डुगल हजर होत्या.

तेजूच्या वाटेवर नवीन होणारा विमानतळ आहे. त्याची जागा आणि सुरू असलेली प्रगती पाहिली. तेजू येथील पी. डी.कडे घरी चहा घेतला आणि जाहीर सभेच्या ठिकाणी आलो.

स्थानिक वन्य जमातीचे लोक, व्यापारासाठी आलेले आसामी आणि इतर लोक, सरकारी नोकर वगैरे मंडळी 'प्रेक्षकां'मध्ये होती. स्थानिक जमातीतील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा एक गटही मी तेथे पाहिला. या श्रोतृवर्गाला मी प्रेक्षक हेतुपुरस्पर म्हटले आहे. ते सर्वजण पहाण्यासाठी आले होते. त्यांची भाषा मला समजत नव्हती व माझी त्यांना कळत नव्हती. त्यांच्यापैकी हिंदी जाणणाऱ्या एका माणसाला मी जवळजवळ वेठीला धरून माझ्या भाषणातील वाक्यावाक्याचे त्यांना भाषांतर करून सांगण्यास लावले. मी थोडाच वेळ बोललो पण माझे म्हणणे त्यांच्या भाषेत त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे मला समाधान झाले.


सभेनंतर निर्वासित तिबेटी लोकांचे वसलेले हे छोटेखानी गाव जवळच आहे तेथे आम्ही गेलो. हे छोटेखानी गाव, पुरुष, स्त्रिया आणि मुले सर्वजण रस्त्यावर उभे होते. अतिथीच्या सत्कारातील या लोकांची भाविकता पाहिली म्हणजे त्यांच्या व आपल्या परंपरा एकच आहेत असा प्रत्यय येतो. प्रथमत: त्यांची ती 'गुंफ' म्हणजे बुद्धधर्मियांचे

प्रार्थना मंदिर असते तेथे सर्व गुंफा फिरत पाहुण्यांना घेऊन जातात. हे लोक दलाई लामांचे वेळी त्यांचेबरोबर अनंत अडचणी सोसून हिंदुस्थानात आले आहेत. बर्फाच्या प्रदेशातून प्रवास करीत असताना त्यांच्यापैकी शेकडो लोक थंडी, वारा, भूक, आजार यांना बळी पडले. परंतु त्यांची श्रद्धा अफाट आहे. या देशात आलेत खरे परंतु आपला दलाई लामा परत तिबेटमध्ये एक दिवस, लवकरच म्हणजे दोन वर्षातच जाणार आहे असेही ते मानतात म्हणे! श्रद्धा ठीक आहे पण हे घडणार कसे? चीनमधील कम्युनिस्ट राजवटीची उलथापालथ केल्याशिवाय हे कसे शक्य आहे? हा राजकीय प्रश्न आहे ह्याचे उत्तरही राजकीय असले पाहिजे हा तर्कवाद मी त्यांच्याशी घातला नाही. श्रद्धा म्हणजे श्रद्धा! तर्काची खटखट त्या क्षेत्रात कशाला? तेजू सोडून 'कॅरेबू' मधून आम्ही लोहित नदीच्या काठाने डोंगराळ भागात प्रवेश करून लोहितच्या खोऱ्यापासून पंधरा मिनिटे प्रवास केला. 'हिंगुलँग' हे ठिकाण मला पहायचे होते. ते पाहून परत फिरलो. जेवणापर्यंत वेगवेगळे विमानतळ पहात प्रवास करीत होतो. उशिरा जेवण करून ४ वाजता तेजपूरला येऊन पोहोचलो. तास-दीड तास ले. जनरल माणिकशॉशी चर्चा करून तेजपूरच्या जाहीर सभेस गेलो. खूपच मोठी सभा होती.

गेल्या डिसेंबरमध्ये पहिल्या प्रथम या गावी मी पंतप्रधानांच्या बरोबर आलो होतो. त्याची आठवण झाली. त्यावेळी येथेच भरलेल्या सभेमध्ये मी प्रथम बोललो होतो. त्याची आठवण मी माझ्या भाषणात लोकांनाही करून दिली. गेल्या वर्षीची आठवण या गावाला विशेष आहे. त्यावेळची धावपळ व गडबड याची आठवण झाली म्हणजे अजूनही मन शरमून जाते. तेजपूरच्या लोकांनीही जोरहाटच्या लोकांप्रमाणेच एक मानपत्र दिले आहे. मात्र त्यांनी या मानपत्राचा उपयोग आपल्या मागण्या मांडण्यासाठी मोठ्या खुबीने केला आहे. सभा संपवून मी छानदार गरम पाण्याने स्नान केले. एअरफोर्सच्या मेसमध्ये भरगच्च जेवण केले

आणि आता परत येऊन पत्र लिहीत आहे. सर्कीटहाऊसवर आहे. सगळ्या दिवसाचा हिशोब लिहिलेला आहे. शिलकेच्या बाजूला आता फक्त झोप बाकी आहे.

Good Night



---

**जोरहाट (आसाम)**

१४ नोव्हेंबर १९६३

प्रिय सौ. वेणुबाईस,

आता रात्रीचे १० वाजले आहेत. सबंध दिवसाचे कार्यक्रम संपवून थोड्याच वेळापूर्वी मोकळा झालो. उद्या सकाळी परत ७ वाजता प्रवास सुरू होईल.

जोरहाट हा आसामच्या पूर्वेकडील जिल्हा आहे. या जिल्ह्याचे प्रमुख स्थान ५०-६० हजार वस्तीचे गाव आहे. ब्रह्मपुत्राच्या दक्षिण किनाऱ्यावर पसरलेला हा जिल्हा नागाभूमीच्या शेजारी आहे. या ठिकाणी आपले वैमानिकदलाचे एक केंद्र आहे. या केंद्रात मी तीन-चार तास काढले. संध्याकाळी नागरिकांची एक जाहीर सभा झाली. या सभेत शहर नगरपालिकेने मानपत्र देऊन सन्मानही केला. कशासाठी कोण जाणे? मंत्र्यांना अजूनही मानपत्रे देणारे लोक पाहिले की मला तरी हसायला येते. पण गंभीर मुद्रेने ते स्वीकारावे लागते. तसे मी स्वीकारले.

आज सकाळी दीड तासाच्या प्रवासानंतर प्रथम अलाहाबादला उतरलो. या प्रसिद्ध शहराच्या भूमीस मी प्रथमच स्पर्श केला. सर्व वेळ विमानतळावर काढून तेथूनच पुढचा तीन तासांचा प्रवास करून येथे आलो. अलाहाबाद शहराचे दर्शन आकाशातूनच घेतले. पुन्हा केव्हा तरी शहर

पहाण्यासाठी आले पाहिजे. अलाहाबादच्या विमानतळावर आज एक छानदार कार्यक्रम झाला. तेथे शहरवासीयांची यात्राच भरली होती म्हणाना. शाळा-कॉलेजातील विद्यार्थी-विद्यार्थीनी यांची तर झुंबडच उठली होती.

अलाहाबाद ते जोरहाट हा प्रवास फारच सुरेख झाला. आम्ही १७ हजार फूट उंचीवरून चाललो होतो. आकाश अगदी स्वच्छ होते. ऐन दुपारची १२॥ ची वेळ. सूर्यप्रकाशाने अस्मान एकदम उजळून गेले होते. त्यावेळी उत्तरेकडे हिमालयाच्या हिमाच्छादित शिखरांची एक रांगच्या रांग उभी होती. जगप्रसिद्ध सर्व उंच शिखरे कवायतीसाठी जणू काही एका ओळीत, शिस्तीत उभी आहेत काय असे माझ्या मनात येऊन गेले (Peaks on parade) विशेषत: धवलगिरी मौंट एव्हरेस्ट (गौरी शंकर) आणि कांचनगंगा यांचे स्पष्ट दर्शन झाले. विशेष म्हणजे या सर्वांचे एक समयावच्छेदे-एका नजरेत एकदम दर्शन! माझे मन तर फुलून गेले. हे सर्व चित्र जवळजवळ अर्धा तास एकसारखे डोळ्यापुढे होते. हा आनंद पुन्हा मिळवतो म्हटले तरी पुन्हा मिळेलच असे सांगता येणार नाही. आमचे विमान चालले होते तेथून सुमारे १००-१२५ मैलावर ही सर्व शिखरांची रांग होती. पण दहा-वीस मैलावर असावी इतकी ती जवळ वाटत होती. दुरून रम्य दिसणारे हे दृश्य जवळ गेल्यानंतर किती कठोर होते याचा अनुभव तेथे प्रत्यक्ष गेलेल्यांनी जाहीर केलेलेच आहेत. ही गोष्टही मनात आल्यावाचून राहिली नाही. या गावात सूर्य ४॥ वाजताच मावळतो. थंडी बेताचीच वाटली. Good Night

◆ ◆ ◆

# तिरप्या चालीची प्रचिती दिल्लीची

भारत-पाकिस्तान यांच्यातील ज्या युद्धानं यशवंतरावांची प्रतिमा उजळ झाली त्या युद्धाला १९६५च्या १ सप्टेंबरपासून खऱ्या अर्थानं तोंड लागलं आणि २३ सप्टेंबरला त्याचा शेवट पाकिस्तानच्या पराभवानं झाला. त्याच दिवशी दोन्ही बाजूनं युद्धसमाप्तीची घोषणा झाली. अमेरिका, ब्रिटन, रशिया यांच्या दबावामुळेच अखेर हे युद्ध थांबलं. राष्ट्रसंघानं ६ सप्टेंबरला युद्धबंदीचा ठराव केला होता आणि शास्त्रींना तो मान्य होता. शास्त्रीजींना यशवंतरावांचा पाठिंबाच होता.

युद्धसमाप्तीनंतर या दोन देशांमध्ये शांततेचं वातावरण निर्माण व्हावं यासाठी, या दोन राष्ट्रांच्या प्रमुखांमध्ये चर्चा घडवून आणण्यासाठी रशियाचे पंतप्रधान कोसिजिन शास्त्रीजी आणि पाकिस्तानचे प्रमुख आयुबखान यांना त्यांनी ताश्कंद येथे चर्चेसाठी निमंत्रित केलं. त्यानुसार २ जानेवारी १९६६ला लालबहादूर शास्त्री, यशवंतरावांसह ताश्कंदला रवाना झाले. नियोजित कार्यक्रमानुसार ४ जानेवारीपासून सुरू झालेल्या चर्चेत संरक्षणमंत्री या नात्यानं यशवंतराव सहभागी झाले. लष्करी प्रश्नाच्या संदर्भात शास्त्रीजींना आवश्यक तो महत्त्वाचा सल्ला देण्याचं काम त्यांनी केलं. या संपूर्ण चर्चेत सातत्यानं ते शास्त्रीजींच्या सहवासात राहिले. या चर्चेमध्ये काश्मीर प्रश्नाविषयीची चर्चा उपस्थित केली जाऊ नये असा शास्त्रीजींचा आग्रह होता. आयुबखान यांना राजकीयदृष्ट्या, काश्मीरच्या प्रश्नाचा निकाल या चर्चेमधेच

प्रेसिडेंट आयुब प्रामाणिक नाही वाटत. शब्दावर भरवंसा ठेवणे धोक्याचे.



करायचा होता. यामुळे वाटाघाटीत काहीसा पेच निर्माण झाला. दोन्ही राष्ट्रांच्या दरम्यान शांतता प्रस्थापित करणं हा प्रश्न सर्वात महत्त्वाचा होता. अखेरीस कोसिजिन यांनी मुत्सद्देगिरीनं चर्चा सुरू ठेवली. ताश्कंदमधील चर्चेबाबत ६ जानेवारी १९६६ यशवंतरावांनी नोंद करून ठेवली ती अशी –

---

**ताश्कंद**

६ जानेवारी १९६६


दोन दिवस नित्याप्रमाणे नवीन वातावरणाशी समरस होण्याच्या प्रयत्नांत गेले. चर्चा, संमेलने चालूच होती. परंतु बरेच स्वरूप औपचारिक होते.

काल दुपारपासून मूळ मुद्याला हात घातला गेला आहे. आज आणि उद्या हे या चर्चेतील महत्त्वाचे दिवस आहेत.

प्रेसिडेंट आयूब आणि भुत्तो या दोन्ही व्यक्तींना मी प्रथमच भेटलो. प्रे. आयुबला व्यक्तिमत्व आहे. उंचापुरा पठाण. चेहऱ्यावर नाटकी हास्य भरपूर. बोलणेही अघळपघळ आणि गोड. माणूस प्रामाणिक नाही वाटत. त्याच्या शब्दावर भरवंसा ठेवणे अवघड - नव्हे धोक्याचे आहे.

भुत्तोशी बोलण्याचा प्रसंग आला नव्हता. पहिले दोन दिवस थंड बसून होता. काल दुपारी पहिला सामना झाला. बोलण्या वागण्यात करेक्ट होता. आपले म्हणणे स्पष्ट शब्दात, काही आडपडदा न ठेवता त्याने मांडले.

पाकिस्तानचे विचार आणि हेतू समजण्यासाठी भुत्तोचे शब्द आणि विचार आम्हाला मार्गदर्शक आणि उपयोगी ठरतील. प्रे. आयुबच्या Insincere शब्दावर अधिक भरवंसा ठेवता येणार नाही. चेअरमन कोसिजिन किती प्रमाणांत स्पष्ट भूमिका घेतील याच्यावर या बैठकीचे भविष्य आहे असे माझे मत आहे. पाहू या!



कोसिजिन यांच्या मुत्सद्देगिरीच्या मध्यस्थीमुळे, तडजोडीच्या भूमिकेमुळे १० जानेवारीला, भारत-पाकिस्तान दरम्यानच्या मुख्य प्रश्नासंबंधात अखेर सलोखा घडला. शांतता करारावर सह्या झाल्या. बैठक संपली. सलोखा आणि सह्या झाल्यानंतर शास्त्रीजींनी पाहुण्यांसमवेत खाना घेतला आणि विश्रांतीसाठी आपल्या दालनात गेले. दुसऱ्या दिवशी त्यांना दिल्लीस येण्यासाठी निघायचे होते. देशाचं दुर्दैव असं की, त्याच रात्री शास्त्रीजींना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यात त्यांची प्राणज्योत मावळली. यशवंतराव शेजारच्या दालनात होते. हृदयविकाराचा झटका आल्याचे समजताच ते शास्त्रीजींच्या दालनाकडे धावले. डॉक्टरांचे उपचार सुरू झाले. शास्त्रीजींना यशवंतरावांनी आपल्या पोटाला टेकवून धरले होते. उपचार सुरू असतानाच शास्त्रीजींची मान कलली, यशवंतरावांनी दोन्ही हातांनी मान धरून ठेवली. पण प्राण निघून गेला! शास्त्रीजींच्या निष्प्राण देहाचेच दर्शन घ्यावे लागले. भारतातील जनतेला प्रचंड धक्का बसला.

शास्त्रीजींच्या पार्थिवासह यशवंतराव दिल्लीस परतले तेव्हा त्यावेळचे गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांनी शास्त्रीजींच्या पश्चात त्यांच्या पंतप्रधान पदाची सूत्रे हंगामी स्वरूपात स्वीकारली होती. शपथविधीनंतर पंतप्रधानपदाच्या गादीचे आपणच आता खरे वारसदार आहोत अशी त्यांची भावना झाली. या उच्चपदासाठी मोरारजी देसाई डोळा ठेवून आहेत याची नंदा यांना कल्पना नसावी. पं. नेहरूंच्या निधनानंतर मोरारजींची संधी हुकली होती. आता आलेली संधी त्यांना घालवायची नव्हती. त्यामुळे त्यांनी आपली उमेदवारी जाहीर केली. पंतप्रधानपदासाठी त्यावेळी मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण आणि इंदिरा गांधी यांच्या नावांची चर्चा सुरू राहिली. के. कामराज हे तेव्हा अ. भा. काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते मद्रासला असतांना शास्त्रीजींच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी त्यांनी लगेच सहकाऱ्यांशी चर्चा आणि विचारविनिमय सुरू केला होता. यशवंतरावांची प्रतिमा त्या काळात खूपच उंचावली होती. पंतप्रधानपदाच्या संदर्भात निरनिराळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी विचारविनिमय करण्याचे कामराज यांनी योजिले. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि आणखी काहीजण दिल्लीत ठाण मांडून बसले. यशवंतराव यांच्यासाठी इतरांचे सहाय्य उपलब्ध करण्यासाठी त्यांनी मनापासून तयारी सुरू केली.

दरम्यान यशवंतरावांच्या निवासस्थानी महत्त्वाच्या चर्चा घडत राहिल्या. या चर्चेसाठी इंदिरा गांधी - सी. सुब्रह्मण्यम आणि अशोक मेहता रात्री साडेआठ वाजता यशवंतरावांच्या निवासस्थानी एकत्र बसून चर्चा करीत असत. पंतप्रधान पदासाठी

नेत्याचे नाव जाहीर होण्याच्या दिवसापर्यंत चार दिवस ही चर्चा होत राहिली. यशवंतरावांना हे पद मिळावे यासाठी एकमत असल्याचे दर्शविले जात होते.

वसंतराव नाईक यांनी तर पत्रकार परिषद घेऊन यशवंतरावांचे नांव जाहीर करण्याचा घाट घातला तेव्हा यशवंतरावांनी त्यांना ही गोष्ट सबुरीनं घेण्यास सांगितलं. उमेदवारी जाहीर होण्याच्या दिवशी सकाळी ११ वाजता सल्लामसलतीसाठी आणि अंतिम मत अजमावण्यासाठी यशवंतराव इंदिरा गांधींच्या निवासस्थानी गेले असताना त्यांना काही वेगळंच ऐकावं लागलं. इंदिरा गांधींनी सांगितलं की माझा पाठिंबा आहे परंतु उत्तर प्रदेशचे बरेच खासदार भेटले आणि त्यांनी तुम्ही स्वत:साठी का प्रयत्न करीत नाही, असे विचारले. किंबहुना तसा त्यांचा आग्रह आहे. यशवंतरावांना इंदिराजींचा चाणाक्षपणा तिथेच उमजला. त्या एकत्रित चर्चेसाठी येत होत्या, अनुकूलता दर्शवित होत्या, पण त्याचवेळी त्या गुप्तपणे स्वत:साठी वेगळ्या हालचाली करीत होत्या. ज्या व्यक्तीला उत्तरप्रदेश खासदारांचा संपूर्ण पाठिंबा लाभतो त्याची ह्या जागेसाठी हमखास निवड होते हे यशवंतराव जाणून होते. अन्य कुठल्याही राज्यापेक्षा उत्तरप्रदेशच्या खासदारांची संख्या अधिक असते. त्यामुळे ते पारडे जड ठरते.

यशवंतरावांनी याच बैठकीत आपली भूमिका मोकळेपणानं सांगितली. पंतप्रधान बनण्याची आपली इच्छा असेल आणि अन्य नेतेमंडळी याबाबतीत सहकार्य देत असतील, पाठिंबा देणार असतील, तर मी स्वत: या मैदानातून बाजूला आहे असं निश्चित समजा. माझी सर्व मतं तुम्हालाच मिळतील.

इंदिराजींनी सर्व ऐकलं आणि शांत राहिल्या. या पूर्वीच्या चर्चेच्या वेळी इंदिराजींनी स्वत:ची भूमिका कधी सांगितली नव्हती किंवा यशवंतराव निवडणूक लढवणार असतील, तर आपला पाठिंबा राहील असा शब्द उच्चारला नव्हता.

यशवंतरावांच्या पाठिंब्याची इंदिराजींना खात्री मिळताच त्यांनी लगेच पत्रकारांना सांगितलं की आम्ही दोघे एकमेकांच्या विचारानंच पावलं टाकीत आहोत! यशवंतरावांच्या पाठिंब्यामुळं इंदिराजींचा मार्ग मोकळा झाला. तसं पाहिलं तर संपूर्ण मार्ग मोकळा झालेला नव्हता. त्यांच्यातील अतुल्य घोष यांचा इंदिराजींना ठाम विरोध होता. अशा वेळी काँग्रेस अध्यक्ष के. कामराज यांनी मोठी खेळी केली. पुढेमागे विशेष प्रसंग निर्माण झाल्यास इंदिरा गांधींना दूर करण्यास विशेष कष्ट पडणार नाहीत असा पवित्रा स्वीकारून इंदिरा गांधींच्या निवडीबाबत सहकाऱ्यांना सांगितलं. मुख्यमंत्र्यांची अनौपचारिक बैठक घेतली आणि एका खोलीत बसून एकेका खासदाराला बोलावून मनोदय सांगितला. त्यांनी बोलाविलेल्या सर्व

खासदारांचा इंदिरा गांधींना पाठिंबा होता किंवा कसे हे कधीच उजेडात आले नाही. कोणी वाच्यताही केली नाही. परंतु सर्वांचा इंदिरा गांधींना पाठिंबा असल्याचं कामराजांनी जाहीर केलं. मोरारजींनी पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. अखेर प्रत्यक्ष मतदान झालं त्यावेळी इंदिरा गांधींना प्रचंड बहुमत प्राप्त झालं. पंतप्रधानपदी त्या आरूढ झाल्या.

इंदिरा गांधी आपल्या कह्यात राहतील हा कामराज यांचा अंदाज मात्र धुळीस मिळाला. पंतप्रधानपद हस्तगत होताच केंद्रीय मंत्रिमंडळाचा त्यांनी जो संच बनविला त्यामुळे कामराज अस्वस्थ बनले. नव्या रक्ताला प्रवेश देण्याच्या बहाण्यानं पूर्वीच्या काही मंत्र्यांना त्यांनी बाहेरचा रस्ता दाखवला. पुढच्या काळातही इंदिराजींनी केलेल्या काही महत्त्वाच्या निर्णयामुळे कामराज-इंदिरा मतभेदाची दरी रुंदावतच राहिली. पंतप्रधानपदाच्या निवडणुकीत यशवंतरावांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली असली तरी त्यांच्या बाबतीतही त्यानंतर एक वेगळीच खेळी केली.

संरक्षणमंत्रीपदाच्या वेळी जे नाटक घडले त्याचीच पुनरावृत्ती दिल्लीकरांनी केली. पंतप्रधानपदाच्या निवडणुकीतून मोकळं होताच यशवंतरावांनी संरक्षण-मंत्रालयाच्या दैनंदिन कामास वाहून घेतलं. कोचीनला नाविकदलाची प्रात्यक्षिक पहाण्यासाठी त्यांना जायचं होतं. त्या मार्गावर मुंबईत त्यांचा एक दिवस मुक्काम ठरला. मुंबईत आले त्याच रात्री प्रकृती अचानक गंभीर बनली. तज्ज्ञ डॉक्टरांनी तातडीनं शस्त्रक्रियेचा निर्णय केला. अल्सरचा प्रादुर्भाव झाल्यामुळे पोटावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मुंबईत विश्रांती घ्यावी लागली. त्यांच्या या विश्रांतीच्या काळातच दिल्लीतून फोनवरून संदेश मिळाला की, गृहमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारावी असा पंतप्रधानांचा मानस आहे. संरक्षणमंत्रीपद स्वीकारण्याचा संदेश पूर्वी असाच फोनवरून मिळाला होता. या दोन्ही घटनांमधील साम्य मोठं विलक्षण आहे. संरक्षणमंत्रीपद स्वीकारावं अशी पं. नेहरूंची इच्छा असूनही, त्यावेळी टी. टी. कृष्णाम्माचारी आणि बिजू पटनाईक यांनी त्यात खो घालण्याचा प्रयत्न केला. आता त्यांची कन्या इंदिराजी यांचा मानस असतानाही स. का. पाटील यांनी हे घडण्यास कट्टर विरोध केला.

गृहमंत्रीपदावर त्यावेळी गुलझारीलाल नंदा होते. दिल्लीत गोवधबंदीचं निमित्त करून हजारो साधूंनी ७ नोव्हेंबर १९६६ला लोकसभा-भवनासमोर उग्र निदर्शनं केली. दिल्लीचं जीवन उद्ध्वस्त करून सोडलं. नंदा यांना परिस्थिती नीटपणे हाताळता आली नाही त्यामुळं दिल्लीत काहूर उठलं. संसदीय काँग्रेस पक्षाच्या बैठकीत तर नंदांच्या हकालपट्टीची मागणी करण्यात आली. या बैठकीला इंदिरा गांधी उपस्थित होत्या.

परंतु त्यांनी नंदांची बाजू उचलून धरली नाही. समर्थनही केलं नाही. पंतप्रधानांनी मौन पाळल्यानं नंदा संतापले आणि त्यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा सादर केला. पंतप्रधानांनीही तो ताबडतोब स्वीकारला. नंदांना मुक्त केलं.

इंदिरा गांधी, गृहमंत्रीपद यशवंतरावांना देणार असतील तर स. का. पाटील मंत्रिपदाचा राजीनामा देणार असल्याच्या वावड्या उठल्या. ते रेल्वेमंत्री होते. स. का. पाटील मोठी समस्या निर्माण करतील असं वातावरणही निर्माण करण्यात आलं. उलटसुलट चर्चा सुरू असतानाच त्यावेळी पंतप्रधानांनी गृहमंत्रीपदासाठी यशवंतरावांची निवड निश्चित केली. नंदा यांच्या राजीनाम्यानंतर हे खातं पंतप्रधानांनी स्वत:कडं घेतलं होत. पूर्वी संरक्षण खातं पं. नेहरूंच्या अखत्यारीत असताना त्यांनी ते चव्हाणांकडं देऊ केलं होतं. आता पंतप्रधानांकडील खातं त्यांनी तसंच चव्हाणांकडं दिलं. आणीबाणीचा क्षण निर्माण झाला आणि पोलादी मनगटानं परिस्थितीशी सामना करण्याची वेळ आली की चव्हाणांकडं कामाची जबाबदारी सोपवायची असा जणू पायंडाच पडला.

१४ नोव्हेंबर १९६६ला यशवंतरावांनी नव्या पदाची जबाबदारी स्वीकारली. गृहमंत्री बनले तो काळ मोठा आणीबाणीचा होता. साधूंच्या निदर्शनाने दिल्लीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गोवधबंदीला पाठिंबा दर्शवण्यासाठी त्याचवेळी पुरीच्या शंकराचार्यांनी दिल्लीला यमुनाकाठी उपोषण सुरू केलं. विद्यार्थ्यांनी प्रचंड संख्येनं १८ नोव्हेंबरला निदर्शनं करण्याचा पुकारा केला. हे सर्व निपटून काढून गृहमंत्री मोकळे होतात न होतात तोच अकाली दलाचे नेते संत फत्तेसिंग यांच्या आत्मदहनाची समस्या त्यांच्यासमोर उभी राहिली. या सर्व समस्या यशवंतरावांनी अतिशय शांतपणानं, समतोल राखून खुबीनं पण समजूतदारपणानं काबूत आणल्या. लोकसभेच्या दोन्ही सभागृहात आपल्या व्यक्तिमत्वाचं आगळं दर्शन घडवलं. देशाचं दैनंदिन जीवन सुरळीत सुरू रहावं यासाठी या गृहमंत्र्यानं अनेक निर्णय, लोकांना त्याची गंधवार्ता लागू न देता केले. चौथी सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी १९६७मध्ये चव्हाणांच्या कारकीर्दीतच झाली. त्यांच्या या कारकीर्दीनं पोलादी पुरुष अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली. नाट्यमय रीतीनं आलेली जबाबदारी तोलामोलानं सांभाळली.

१९६६ पासून गृहखात्याचा कारभार सुरू राहून चार वर्षं होतात तोच १९७०मधे नव्या नाटकातील भूमिका त्यांच्याकडे देण्याचा प्रस्ताव झाला. १९६९मध्ये काँग्रेस दुभंगली होती. मागोमाग मंत्रिमंडळात फेरबदल घडणार असल्याबद्दल तर्क सुरू झाले. १९७०च अर्थसंकल्पीय अधिवेशन संपलं तरी फेरबदल अस काही घडलं

नव्हत. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखातं काढून घेऊन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वत:कडं घेतलं. हा बदल करण्यातील हेतू स्पष्ट होता. १९६९च्या बंगलोरच्या अधिवेशनात अर्थविषयक एक टिपणी सादर करण्यात आली होती. त्या विषयावरील ठराव यशवंतरावांनी तयार केला होता. पक्षाच्या ध्येयधोरणाच्या अंमलबजावणीचा सवाल उभा राहिला. प्रतिगामी मोरारजींकडून ही अंमलबजावणी घडेल याची शाश्वती उरली नाही. त्यामुळं पंतप्रधानांनी हे खातं स्वत:कडं घेतलं. वर्षभर खात्याचा कारभार त्यांनी पाहिला परंतु अन्य कामाचा व्याप आणि या खात्याच्या एक वर्षाच्या अनुभवानंतर, पक्षाच्या पुरोगामी ध्येय-धोरणाचा प्रामाणिक पाठपुरावा करणाऱ्या मंत्र्याकडेच अर्थखातं सोपवण्याची निकड त्यांना भासू लागली.

यशवंतरावांकडं गृहखातं होतं आणि या प्रतिष्ठेच्या, संवेदनाक्षम खात्याचा त्याग करण्यास ते राजी नव्हते. इंदिरा गांधी यांनी त्यांचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनी तसं सांगितलंही. अर्थविषयक धोरणाला गती देण्याचा प्रश्न असल्यामुळं इंदिरा गांधींनी त्यांच्याशी तीन वेळा चर्चा केली. गृहखातं आणि अर्थखातं यातील बदलाबाबतची भूमिकाही पंतप्रधानांनी सांगितली. एक-दोन महिने वाटाघाटी सुरू राहिल्या. अखेरीस १९७०च्या जूनमध्ये पंतप्रधानांनी संरक्षण, परराष्ट्र आणि शिक्षण खात्यातील मंत्री बदलले. गृहखातं आणि अर्थखातं यात बदल करण्याबाबत त्यांनी वेगळ्या तंत्राचा अवलंब केला. गृहखातं मी स्वत:कडं घेते आणि अर्थखातं तुम्ही सांभाळा अशी त्यांनी यशवंतरावांना गळ घातली. यापूर्वी दोन वेळा घडलं होतं त्याची तिसऱ्यांदा पुनरावृत्ती झाली. पंतप्रधान आणि यशवंतराव असाच परस्परात खाते बदल घडत राहिला. यशवंतरावांना असा बदल स्वीकारावा लागला.

पुन्हा आणीबाणीचा प्रसंग. १९७० हे साल अर्थखातं आणि अर्थमंत्रीपदाचं काम म्हणजे एक मोठं आव्हान होत. महागाईचा भयानक प्रश्न उभा होता. वाढलेल्या आणि वाढणाऱ्या किंमतीची दखल घ्यावी लागणार होती. अमेरिकेकडून अन्नधान्य आयात करण्याचा प्रश्न निर्माण झालेला होता. औद्योगिक उत्पादनात घट झाली होती. सरकारी गोदामात धान्यसाठा अपुरा होता. शेती उत्पादन घटलं होत. विशेषत: अर्थविषयक कुठलाही निर्णय करताना त्याचा जास्तीत जास्त लोकांवर, मुख्यत: समाजातल्या दुर्बल घटकांवर कोणता आणि कसा परिणाम घडून येणार आहे याची सावधानता ठेवावी लागणार होती. देशातील बेरोजगारीचा ३५ दशलक्षांचा बॅकलॉग भरून काढायचा होता. सर्वात महत्त्वाचं

म्हणजे वर्ष-दीड वर्षावर सार्वत्रिक निवडणुका येऊन ठेपल्या होत्या.

आर्थिकदृष्ट्या चोहोबाजूनं वेढलेल्या या काळात देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी अर्थखातं यशवंतरावांसारख्या पुरोगामी विचाराच्या व्यवहारी मंत्र्याकडे सोपविणं पंतप्रधानांना क्रमप्राप्त ठरलं असलं तरी त्यासाठी जी यातायात करावी लागली, विशिष्ट मानसिकता सांभाळावी लागली, त्याचं दर्शन अर्थखात्यात काम करीत असताना त्यांनी केलेल्या नोंदीतून घडतं. आर्थिक आपत्तीचं जे सत्र सुरू होतं त्या संदर्भात त्यांनी साकल्यानं लिहिलं आहे -

---

**आर्थिक आपत्तीचे सत्र सुरू आहे.**

आणखी एक वर्ष संपणार. तसे मोठे अडचणीचे वर्ष गेले. ७१ सालापासूनचे आर्थिक आपत्तीचे सत्र सुरू आहे. ते संपण्याची लक्षणे अजून पूर्ण दिसत नाहीत. किंमतीची वाढ कमालीची झाली आहे. जनमानसात असंतोष आहे. समजुतीने त्यांनी सहकार्य केले आहे. परंतु अधून मधून मीही अस्वस्थ होतो व धोरणाची एकसारखी तपासणी करीत आहोत. Money Supply वाढला हे एक कारण आहे. त्याचे दोन भाग -

(१) अतिरिक्त गव्हर्मेंट स्पेंडिंग

(२) एक्झॉस्टिव्ह क्रेडिट सिस्टिम.

पहिल्याबद्दल मी पराकाष्ठा करतो आहे, परंतु डिफेन्सवरचा खर्च आणि राज्याराज्यातील नैसर्गिक आपत्तीवरील खर्चास आळा घालणे कठीण झाले. या वर्षात केरळ, राजस्थान ही नेहमीची राज्ये आहेत याबाबतीत. आंध्र, यू. पी. या शेवटच्या महिन्यात काय करतात ते पहावयाचे. दुसऱ्याबाबत क्रेडिट सिस्टिम रिझर्व्ह बँकेने नोव्हेंबरमध्ये लावलेला तो नियम लावावा. परंतु या देशात कुठलीही नवीन गोष्ट केली की आरडा ओरडा करण्याची सवयच आहे. गेले दहा-बारा दिवस उत्पादन घटले, व्यवहार बंद झाल्याच्या तक्रारी येऊन राहिल्यात. क्रेडिट रिस्ट्रिक्टचे उद्देश (१) प्रॉपर एंड युज ऑफ क्रेडिट (२) स्पेक्युल्युटंड युज (३) इन्व्हेंटरीवर

बंधने परंतु पब्लिक सेक्टर जो गणला जातो त्यावर बंधने आणण्याचा वा उत्पादन आणि निर्यात व्यापार रोखण्याचा प्रश्नच नाही. उलट त्याला मदत व्हावी हा प्रयत्न राहील.

भाववाढीच्या आणि टंचाईच्या वातावरणामुळे आर्थिक आघाडीवरील आमचे सर्व प्रयत्न फुकट जात आहेत. गेल्या तिन्ही वर्षांत ज्या प्रमाणात धनराशी उभारण्याचे प्रयत्न मी केले तेवढे त्यापूर्वी दहा वर्षात क्वचितच झाले असतील. नॉन-प्लॅन खर्च आणि संरक्षण आणि दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्ती व राज्यसरकारची ओढाताण यावरील खर्च बेसुमार होत आहे. राज्यांच्या ओव्हरड्राफ्टवर नियंत्रण घालून घोडे काहीसे काबूत आणले परंतु त्यातूनही निसटण्याचा प्रयत्न करणारी केरळसारखी राज्ये आहेतच.

बहात्तर साली रब्बीची योजना आक्रमक पद्धतीने आखावी म्हणून दोनशे कोटी-बजेटच्या बाहेर-अधिक दिले. पैसे खर्च झाले पण त्यावर्षीचे रब्बीचे पीक त्याप्रमाणात हाती आले नाही. या सर्व आपत्तींमुळे एक आर्थिक अरिष्टाची परिस्थिती गेले वर्षभर राहिली. या वर्षी ऑईलच्या प्रश्नांनी या आगीत तेल ओतून समस्या अधिकच गंभीर केली आहे.

१९७३चे वर्णन श्री. रजनी कोठारीने जे केले आहे ते अर्थपूर्ण आहे. तो म्हणतो -

Nothing much happened in India in 1973. But the year was notable for one thing growing sense of discomfort among wide variety of groups. The discomforts had two dimensions.

१) Discontent at state of affairs.

२) Disenchantment at the prevailing frameworks of thought.

राजकीय आर्थिक क्षेत्रांकडे नजर टाकली तर त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या मनस्थितीचे हे वास्तव चित्रण आहे म्हटल्यास हरकत नाही.

गेले वर्ष दुष्काळग्रस्त परिस्थितीतून सुखरूप बाहेर पडणे हीसुद्धा एक महत्त्वाची कामगिरी म्हणावी लागेल. आंध्राच्या प्रश्नाचा आग्यावेताळ झाला होता. तो शांत झाला असून एका अर्थानं ही समस्या मार्गस्थ झाली आहे. जमेच्या बाजूला या गोष्टी जरुर आहेत. काश्मीरमध्ये एकूण परिस्थितीत सुधारणा आहे. पी. एम. नी शेखअब्दुल्ला यांना दूरदृष्टीनं हाताळलं आहे. त्यातून बरेच निघेल असे वाटते. एक नवा परस्पेटिव्ह शेखपुढे उभा केला आहे. बांगला देशाच्या परिस्थितीनंतर काश्मीर याच पद्धतीनं हाताळला पाहिजे होता. नेमके घडत आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

डी. एम्. के. शी संबंध काहीसे दूरचे झाले आहेत. कामराज परत येऊ इच्छितात. येवोत बिचारे! व्यक्तिशः मला समाधानच आहे. परंतु दक्षिणेचे राजकारण त्यांच्या येण्याने सुधारणार नाही. डी. एम्. के. संबंध दुरावण्यामुळे ते प्रश्न अधिक कडवट होतील ही भीती आहे. परंतु दुर्दैवाने या प्रश्नाची चर्चाच होत नाही. टीटीटी वगैरे जहालांचे व डी. एम्. के.चे बाबतीत सूडाच्या भावनेने पहात आहेत. मूल्यापेक्षा निवडणुका हा सर्वप्रथम महत्त्वाचा प्रश्न दिल्लीत मानला जातो आणि त्या केंद्राभोवती सर्व काही हालत-चालत असते. ओरिसाचा यक्ष प्रश्न - निवडणुकीत बहुमत कोणाचे होईल सांगणे अवघड झाले तरी ते किती वेळपर्यंत टिकणार हे त्यापेक्षाही अवघड. चाळीस टक्क्यापेक्षा जास्त आदिवासी व इतर उपेक्षित वर्गाचे आमदार आहेत ते पक्षांतर भराभर करतात. परिणामी अस्थिरता. या वर्गाच्या हातात राज्याचे नेतृत्व दिल्याशिवाय स्थैर्य (स्टॅबिलिटी) येणार नाही, हे माझे निदान आहे. भारतीय लोकशाही राजकारणाचा सामाजिक आशय डॉ. लोहियांना खरा समजला होता. परंतु दुर्दैवाने त्यांचे नेहरू विद्वेषाचे वेड होते. त्यामुळे ते एकांगी झाले आणि त्यांचे विचार दुर्लक्षिले गेले.

या वर्षी वॉशिंग्टनला दोन वेळा जावे लागले. मार्च अखेर आणि जुलै अखेर. आर्थिक प्रश्नावरील सी. २०च्या बैठका म्हटल्या तर महत्त्वाच्या झाल्या. म्हटल्यावर अशासाठी की निर्णयात्मक परिस्थिती अजून नजरेतही येत नाही. नैरोबीची मीटिंग धरून यावर्षी तीन बैठका झाल्या. पुढारलेल्या राष्ट्रांचे आर्थिक हितसंबंध असे गुंतागुंतीचे झाले आहेत की वरून एकमेकांशी गोड बोलतात परंतु तडजोडीसाठी आवश्यक असे खरे बोलत नाहीत. पुन्हा १९७४ला जानेवारीत रोमला सी-२०ची बैठक भरणार परंतु आता ऑइल क्रायसेसचे प्रश्न, मोनेटरी रिफॉर्मचा प्रश्न दुय्यम बनविला आहे. नैरोबीचे बैठकीला - नागिणीमुळे प्रकृती बरी नसतानाही गेलो. आफ्रिकेतील बैठकीला गैरहजर राहाणे बरोबर नाही या भावनेने गेलो ते धाडस करून गेलो. श्री. उपासनींनी माझ्या प्रकृतीची फार काळजी घेतली. हाय कमिशनर श्री. नायर, फार सज्जन गृहस्थ आहे. माझ्या प्रकृतीकडे आपुलकीने पाहिले. प्रकृती बरी नसताना या गोष्टीचे महत्त्व वाटते. या गोष्टी लक्षातही राहातात. आफ्रिकेमध्ये या संबंधांना काही अर्थ आहे असा विश्वास वाटत नाही. त्यांना संशय होता. त्यांनी तपासणी केली. आम्ही ती करू दिली. हे एका अर्थाने चांगलेच झाले. परंतु परतीचा प्रवास मानसिक यातनेने झाला. माझ्या देशाला त्यांनी अवमानित केले याबद्दल परत आल्यावर केनियाच्या सरकारची माफी घेऊन त्यांचा हायकमिशनर भेटला वगैरे ठीक परंतु मनाला लागणारी घटना घडली ती घडलीच.

वॉशिंग्टनच्या दोन्ही भेटीच्या वेळी डॉ. किसिंजरशी भेट झाली. त्यांच्या पुढाकारामुळे भेटले. एक वेळ ॲम्बॅसडर एल. के. झा व दुसऱ्या वेळी टी. एन्. कौल बरोबर होते. माझ्या दोन्ही भेटींचा वृत्तांत मी तातडीने एम्बसीमार्फत पंतप्रधानांना कळविला. दोन्ही वेळ अर्धा अर्धा तास होतो. बांगला देशाचे वातावरण पूर्णत:

बदलण्याची इच्छा व्यक्त झाली. अमेरिका व भारत यांच्यामधे मूलभूत हितावरोध नाही. बरोबरीच्या नात्याने आर्थिक आणि राजकीय संबंधाची पुनर्रचना केली पाहिजे असे त्यांना वाटते. व्यक्ती म्हणून मोठा आकर्षक माणूस आहे. प्रश्नाच्या मुळाशी जाऊन थोडक्यात आणि स्वच्छपणे मुद्दे मांडण्याचे कौशल्य आहे. बोलण्या-वागण्यात आत्मविश्वास ओसंडून जाताना दिसतो. हसत-खेळत वागण्याची बोलण्याची पद्धती. त्यामुळे मैत्रीची भावना तत्परतेने निर्माण करू शकतो. पी. एल ४८०च्या चर्चेची बीजे या बैठकीत रोवली. भारत-अमेरिका संबंधाच्या क्षेत्रांत पी. एल ४८०चा करार ही वर्षातील महत्त्वाची घटना आहे. गेल्या दोन वर्षात भारत-अमेरिकेचे आर्थिक संबंध किती अडचणीतून गेलेत! एक वेळ इन्डायरेक्टली आम्ही काही देत नाही असे घोषित करावे असा सल्ला देण्यापर्यंत मी गेलो होतो परंतु परिस्थिती काहीशी बदलली आणि त्यातून हा करार तयार झाला. माझे वित्तमंत्रालयातील प्रमुख अधिकारी, विशेषत: एम्. एस्. कौलने पुष्कळ श्रम घेतले. यावर्षी वाढत्या किमतीनी अक्षरश: हैराण केले. या वर्षी पार्लमेंटमधे तहकुबीची सूचना, अविश्वासाचा ठराव यांच्या निमित्ताने हा प्रश्न चार वेळ चर्चिला गेला. चारही वेळ मला तोंड द्यावे लागले.

किंमतीचा प्रश्न आणि डेफिसिट फायनान्स ही एकाच नाण्याच्या दोन बाजू. डेफिसिट फायनान्सवर काबू मिळविणे हे यापुढचे महत्त्वाचे लक्ष्य आणि अर्थनीतीचे सूत्र राहिले पाहिजे.

या वर्षीच्या शासकीय कामातील गोष्टी नमूद करावयाच्या झाल्यास पुढील गोष्टी डोळ्यापुढे येतात. महाराष्ट्र-शासन-प्रशासन ही महत्वाची समिती पंतप्रधानांनी माझ्या अध्यक्षतेखाली नेमली. या वर्षी काही महत्त्वाचे अहवाल तयार झाले आहेत. हे काम लवकर पुरे

व्हावे असा माझा प्रयत्न आहे. शिवाय आर्थिक मदतीबाबतचा अहवाल मूलगामी फरक करणारा ठरावा. पंतप्रधानांनी अजून निर्णय घेतलेला नाही. (२) फॉरिन एक्स्चेंज रेग्युलेशन ॲक्टची महत्वाची अट, रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीतून स्वतंत्र करून या कायद्याची नव्याने रचना करण्याचा निर्णय आणि लोकसभेत बील सादर केले. वित्तसंस्थांच्या इतिहासातील हे एक महत्त्वाचे पाऊल. (४) फिस्कल हा एक विभाग बनवून क्रियाशील बनवला आहे. या सेवेची मोठी उणीव होती. १९७४च्या बजेटच्या वेळी याचे महत्त्व समजून येईल. (५) फायनान्स कमिशनचा रिपोर्ट आता राज्यांच्या बाबतीत उदार धोरण आहे. केंद्राच्या वित्तसाधनांवर बराच ताण पडणार. तथाकथित मागासलेल्या राज्यांना खूपच मदत होणार. शिफारशी जशाच्या तशा स्वीकाराव्यात हा महत्त्वाचा आग्रह होता. पंतप्रधानांनी काहीसे आढेवेढे घेतले. एका चर्चेच्या वेळी दक्षिणेकडील राज्यांना सगळा फायदा मिळतो, उत्तरेकडील राज्यांना मी कसे तोंड देऊ असे उद्‌गार त्यांनी काढले.

वस्तुतः उत्तरेकडील राज्यांना फार कमी जास्त असे नाही, भरपूर दिले आहे. (६) पाचवी पंचवार्षिक योजना तयार झाली ही महत्त्वाची घटना आहे. याबाबतीत पुष्कळ काही सहकार्य मिळाले. त्यांना 'एन्. डी. सी.'नेही उल्लेख केला. (७) बँकिंग डिपार्टमेंटच्या क्षेत्रात 'सेपरेशन ऑफ आय डी बी आय, फ्राम आर बी आय, डिस् कंटिन्यूएशन; बील सादर केले.' (८) परदेशी पाहुणे ब्रेझनेव्ह यांची भेट ही या वर्षाची महत्त्वाची घटना. चर्चेमध्ये सामील होण्याची संधी मिळाली. त्यांचे सादरीकरण (प्रेझेंटेशन) ही बलस्थान होते. 'अ' वर्गात प्लॅनिंगचे प्रश्न किती अनिश्चित असतात त्याचे त्यांनी प्रामाणिक वर्णन केले. शेतीचे प्रश्न किती अवघड असतात तेही मनमोकळेपणाने सांगितले. आपल्या अनुभवावरून त्यांनी एक गोष्ट सांगितली. आंतरराष्ट्रीय

संबंधामध्ये राष्ट्रांच्या वैयक्तिक संबंधास फार महत्त्वाचे स्थान आहे. ते प्रयत्नपूर्वक चांगले बनवले पाहिजेत. असा त्यांचा वडिलधाऱ्या प्रमुखांचा त्यांना सल्ला मिळाला.

सी २०च्या एका फ्रेंचाशी माझी भेट व दाट ओळख झाली. दोन दिवसांसाठी जे खास निमंत्रित होते. माणूस मोठा बुद्धिमान वाटला. आंतरराष्ट्रीय संबंध प्रयत्नपूर्वक सुधारण्याची आवश्यकता आहे यावर त्यांनी भर दिला. दोन-तीन पिढ्यांपूर्वी त्यांच्या कुटुंबात पत्नीच्या बाजूने हिंदी रक्त आले असून हे त्यांच्या मुलाचे डोळे पाहिल्यावर तो हिंदी आहे असे वाटले. विशेष म्हणजे त्यांनीच याचा खुलासा केला. माझी हिंदुस्थानात येण्याची फार दिवसांची इच्छा होती हे त्यांनी आवर्जून सांगितले.

डॉ. ॲपल (जर्मन फॉरिन इकॉनॉमिस्ट) हा पुरोगामी दृष्टी असलेला सुस्पष्ट विचार बाळगणारा, ग्रामीण विकास यावर अधिक जोर देणारा असा हा मनुष्य. कृष्णनचे लेखन वाचले होते. हार्बरमध्ये त्यांची भेट झाली. त्यामुळे ओळख झाली. या वर्षीची नोंद करण्यासारखी एक गोष्ट म्हणजे व्ही. के. आर. व्ही. राव यांची, सहा अर्थशास्त्रांच्या पुस्तिकेवर आणि त्यांच्या इकॉनॉमिक पॉलिसी यावर चर्चा पुष्कळ पण अकारण गाजली. तथापि त्यातून काही फारसे निष्पन्न झाले नाही.

---

वित्तमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अर्थविषयक कामासाठी यशवंतरावांना संपूर्ण पृथ्वी प्रदक्षिणा करावी लागली. १९७०ला अर्थमंत्री म्हणून जगातील निरनिराळ्या राष्ट्रांचे दौरे सुरू झाले आणि विदेशमंत्री म्हणून १९७७ला दौऱ्यांची समाप्ती झाली. या प्रवासात प्रवासातील घटना, अनुभूती, नियोजित कार्य, त्यातील समस्या आणि उकल, नाना देशात भेटलेली नाना प्रकारची, स्वभावाची माणसं, त्यांच्याशी झालेल्या चर्चा, त्याचे निष्कर्ष, जागतिक अर्थकारण, राजनीती, भारताची भूमिका या सर्वांच्या त्यांनी नोंदी करून ठेवल्या.

देशातील मुत्सद्दी, विचारवंत म्हणून मान्यता प्राप्त झालेल्या विचारवंत नेत्याचं

अभ्यासपूर्ण, अनुभवसंपन्न असं हे विचारधन आहे. उच्च दर्जाचा ध्येयवाद, तात्त्विक चिंतन आणि साहित्य कुशलता याचं दर्शन त्यांच्या लेखनातून घडत.

आपल्या विशिष्ट मंत्रिपदाच्या गरजेनुसार विदेशातील उच्चपदस्थ, प्रथितयश व्यक्ती यांच्याशी संधान बांधणे हे यशवंतरावांनी आपले कर्तव्य मानले. भारताच्या हितसंबंधाशी उदासीन कोण, विरोधी कोण, सहानुभूतीचे कोण आणि प्रत्यक्ष मदत करणारे कोण याची त्यांनी या दौऱ्यात पहाणी केली. परिचय करून घेतला. संवाद साधला. सुसंस्कृत शिष्टाचाराच्या पातळीवर हे सर्व सुरू ठेवल्यानं त्यातील औपचारिक भाग वगळून तथ्य कशात आहे आणि वैय्यर्थ कशात आहे याची त्यांनी विलक्षण तटस्थतेनं समीक्षा केली.

जागतिक बँकेचे आणि अमेरिकेचे एकवेळचे अर्थसचिव मक्नामारा यांच्याशी त्यांनी परिचय करून घेतला. वारंवार भेटत राहिल्यानं परिचयाचं मैत्रित रूपांतर झालं. अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे पट्टीच्या मुत्सद्यांशी त्यांनी स्नेहसंबंध जोडले. या स्नेहसंबंधाचा भारताच्या संदर्भात मोठा लाभ झाला.

देशात १९७१ पासून आर्थिक आपत्तीचे सत्र सुरू झालेले होते. दुष्काळ, अवर्षण यामुळे अन्नधान्याची टंचाई, भाववाढ, चलन फुगवटा तुटीची अंदाजपत्रके अशी आर्थिक आघाडी दुर्बल बनली होती. केंद्र आणि राज्य सर्व पातळीवर ओढाताणीची स्थिती निर्माण झाल्याने जनता हवालदिल बनलेली होती. अन्नधान्याची आयात करण्यावाचून गत्यंतर उरले नाही.

अन्नधान्याची आयात अमेरिकेच्या सहकार्याने सुरू करण्याचे प्रयत्न झाले, परंतु अमेरिकेशी आर्थिक संबंध तणावाचे बनलेले होते. हा तणाव दोन वर्षे टिकून राहिला. अमेरिकेने लादलेल्या जाचक अटी पेलणे भारताला शक्य नव्हते. त्यातून एक वेळ अशी आली की, भारत कोणतीही अट मान्य करू शकत नाही असे अप्रत्यक्ष रीत्या अमेरिकेला कळवावे या मनस्थितीपर्यंत जाण्याची अर्थमंत्री यशवंतराव यांनी मनाची तयारी करून ठेवली.

अमेरिकेला असे काही सुनावण्याच्या मनस्थितीत असतानाच तेथील दौऱ्यात एक दिवस किसिंजर यांची भेट होण्याचा योग जमून आला. किसिंजर एक उमदे व्यक्तिमत्व. स्वच्छ विचाराचे, स्पष्टवक्ते. अमेरिका आणि भारत यांच्यात आर्थिक आणि राजकीय संबंधाची पुनर्रचना करायला पाहिजे ही त्यांची भूमिका यशवंतराव जाणून होते. या दोन नेत्यांच्या भेटीत जी विचारांची देवाण-घेवाण झाली त्यातून पी. एल्. ४८० कराराची बीजे रोवली गेली. पुढील टप्प्यात या बीजाला अंमलबजावणीचे अंकुर फुटले. किसिंजर या विचारावर सिंचन करीत राहिले

असावेत. अखेरीस या दोन देशात सर्व सव्यापसव्य होऊन करार अस्तित्वात आल्यावर यशवंतरावांच्या अर्थमंत्रिपदाच्या कारकीर्दीतील पी. एल्. ४८० या ऐतिहासिक कराराची कार्यवाही भारताच्या धोरणानुसार गतिप्राप्त झाली. पी. एल. ४८० करारामुळे देशातील उपासमारीवर मात मात्र करता आली.

राष्ट्राची मते बदलणे किंवा राष्ट्राच्या मतावर प्रभाव पाडणे ही गोष्ट पुष्कळ वेळा अशक्य असते. परंतु राष्ट्राच्या प्रतिनिधीभूत व्यक्तिच्या मतांमध्ये बदल करणे ही पुष्कळवेळा शक्य कोटीतील गोष्ट असते. हे लक्षात घेऊन यशवंतराव प्रयत्नशील असत. किसिंजर यशवंतराव भेट आणि चर्चा अमेरिकेच्या मतामध्ये बदल घडवून आणण्यास उपयुक्त ठरली.

विदेशात असताना परस्पर संबंध दृढ होण्याच्या दृष्टीने राजकारणी, सत्ताधारी, पत्रकार, कलाकार, कारखानदार, विदेशातील भारतीय अशांना मेजवान्या द्याव्या लागतात. समारंभांना उपस्थित रहावे लागते. यशवंतरावांनी निरनिराळ्या राष्ट्रांच्या दौऱ्यात हे सर्व केले. खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था केली. या संदर्भात ते लिहितात -

''आम्ही पिणारे नाही हे पाहून व्यवस्था ठेवण्यासाठी हजर असलेल्या लोकांची फारच निराशा होत असे.'

यशवंतरावांची अर्थमंत्रीपदाची कारकीर्द मोठी 'अर्थ'पूर्ण ठरली. धनराशी सावरल्या. त्रुटीच्या अंदाजपत्रकावर जालीम तोडगा काढला. निरनिराळ्या राज्यात होणारी आर्थिक उधळपट्टी काबूत आणून आर्थिक शिस्त निर्माण केली. स्वातंत्र्योत्तर काळात जे अर्थमंत्री झाले त्यातील बहुतेकांना या ना त्या कारणासाठी पायउतार व्हावे लागले. अर्थमंत्रीपदाचा कार्यकाळ पूर्ण करणारे यशवंतराव हे पहिलेच अर्थमंत्री म्हटले पाहिजेत. त्यांच्यानंतरही अर्थमंत्र्यांनी पायउतार होण्याची प्रथा सुरूच राहिलेली आढळते.

◆ ◆ ◆

# 'गुड बाय' ठरविले... प्रतिष्ठेचे चालत आहे.

पी एल. ४८० मधून निर्माण झालेल्या निधीचा प्रश्न त्या काळात बराच गुंतागुंतीचा बनलेला होता. अमेरिकेशी पूर्वी झालेल्या करारानुसार या व्यवहारातील पैशाचा संचय फार मोठ्या प्रमाणात झालेला होता. खास तारण म्हणून गुंतवून ठेवलेल्या या संपत्तीचा विनियोग अमेरिका आणि भारत सरकार यांच्या परस्पर संमतीनेच केला जावा अशी यामध्ये अट होता. याचा अर्थ अर्थशास्त्राच्या दृष्टीने ही सर्व संपत्ती भारताच्या दृष्टीनं निष्क्रिय स्वरूपात पडून राहिलेली होती. उभय सरकारात पी. एल. ४८०चा करार झाला त्यावेळची परिस्थिती आणि आताची परिस्थिती यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक पडला होता. त्यामुळे या अडून पडलेल्या प्रचंड रकमेचा प्रश्न गुंतागुंतीचा आणि अवघड असा बनला. या प्रश्नाची समाधानकारक सोडवणूक होऊ शकली नाही, तर हा प्रश्न निरंतरची डोकेदुखी बनवणारा प्रश्न ठरेल असं यशवंतरावांचं मत होत.

एक्स्टर्नल अॅफेअर्स ठरविले आहे ! मी म्हटले. ठीक तर आहे.



ते या निर्णयाप्रत पोहोचले की, ही संपत्ती अशा पद्धतीनं किती काळ साठवून ठेवावयाची यासंबंधी काही कालमर्यादा निश्चित करण्याची गरज आहे. त्या काल-मर्यादेनंतर मात्र तो पैसा कर्ज म्हणून शिल्लक न ठेवता हप्त्याहप्त्यानं, तो जमेच्या बाजूला धरला गेला पाहिजे. त्याचप्रमाणे या पैशाचा विनियोग समाधानकारक रीतीनं व्हायला हवा. जेणेकरून भारताच्या अर्थकारणावर दबाव

निर्माण होणार नाही. चलनवाढीला वाव मिळणार नाही किंवा आर्थिक समतोल ढासळणार नाही याचीही काळजी घ्यावी लागेल. पी. एल. ४८० करारानुसार भारतात साठून राहिलेल्या पैशातून भारतातील अमेरिकेच्या परराष्ट्रीय वकिलातीच्या खर्चासाठी काही पैसा खर्च केला जात असे. ही स्थिती बेमुदत स्वरूपात ठेवायची काय, याचा विचार करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. या सर्वच प्रश्नांचा यशवंतरावांना सातत्यानं विचार करावा लागणार होता. त्यांनी तो केला.

या अर्थमंत्र्यांच्या कारकीर्दीतच बँकांचे राष्ट्रीयीकरण घडवण्याचा महत्त्वाचा निर्णय होऊन भारताची आर्थिक वाटचाल कोणत्या दिशेने सुरू झाली आहे याची झलक पहावयास मिळाली. संपत्तीचा उपयोग जास्तीत जास्त लोकांना करून देणं आणि ऐते बसून संपत्तीचा संचय करण्यास वाव शिल्लक राहू नये; हा या निर्णयामागील हेतू होता. या दृष्टीनं १४ मार्च १९७१ला लोकसभेत यशवंतरावांनी तयार केलेला पहिला अर्थसंकल्प हा आर्थिक हालचालीच्या नव्या दिशेचा निदर्शक ठरला. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यावर आणि आर्थिक विकासावर त्यांनी प्रामुख्यानं भर दिलाच शिवाय आर्थिक विकासास प्रेरणा मिळत रहावी, संपत्तीच्या संचयातून निर्माण होणारी आर्थिक सत्ता आणि उत्पन्नातील विषमता, दरी कमी व्हावी, लोकांना कामधंदा मिळावा, आणि वस्तूंच्या किंमतीचा समतोल राखण्याच्या कामी निर्माण होणारा दबाव नाहीसा व्हावा असे काही प्रमुख उद्देश समोर ठेवून त्यांनी हा अर्थसंकल्प तयार केला. त्या काळात देशात गरीबी विरुद्ध युद्ध सुरू करण्यात आले होते या युद्धात सर्वांना हिरीरीनं सहभागी होण्यास हा अर्थसंकल्प उपयुक्त ठरला.

अर्थमंत्रीपदाच्या कारकीर्दीत यशवंतरावांनी अर्थविषयक आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अनेकदा परदेशचे दौरे केले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील चलनाच्या व्यवहारासंबंधीच्या प्रश्नाचा विचार करून त्याच्या व्यवहाराच्या पद्धतीत बदल सुचविण्यासाठी आणि अर्थविषयक तत्सम प्रश्नांचा विचार करण्यासाठी तयार झालेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील 'वीस राष्ट्रांच्या कमिटीचे' (सी-२०-कॉमनवेल्थ ट्वेंटी) यशवंतराव हे प्रतिनिधी होते. या कमिटीच्या ज्या सहा बैठका निरनिराळ्या राष्ट्रात झाल्या, या सर्व बैठकींना ते उपस्थित राहिले. भारत, बांगला देश आणि श्रीलंका या देशांच्या वतीने त्यांची या कमिटीवर निवड झाली होती. निवडलेले प्रतिनिधी हे आपल्या देशाचे अर्थमंत्री आणि सेंट्रल बँकेचे गव्हर्नर प्रतिनिधी या नात्यानं कमिटीच्या कामकाजात भाग घेत असत.

कमिटीचे कामकाज सुरू असतानाच विकसनशील २४ राष्ट्रांनी आपला एक गट स्थापन करून अर्थविषयक विविध प्रश्नांच्या संदर्भात, समान आणि एकसंध भूमिका स्वीकारून सर्वच विकसनशील राष्ट्रांच्या समस्यांसंबंधी विचार सुसंगत राखण्याचं नमुनेदार कार्य केलं. यशवंतरावांनी २४ सप्टेंबर १९७२ला या गटासमोर सर्व प्रथम आपले विचार व्यकत केले.

वीस प्रतिनिधींच्या (सी-२०) बैठकीत चलन विषयक व्यवहाराच्या बदलाच्या संदर्भात २३ मार्च १९७३ला मार्गदर्शन केलं. १९७३च्या जुलै आणि सप्टेंबर महिन्यांत कमिटीच्या आणि विकसनशील राष्ट्रांच्या ज्या बैठकी झाल्या त्या प्रत्येक बैठकीत त्यांनी पुढाकार घेतला.

कॉमनवेल्थ फायनान्स मिनिस्टर्सची नासा, बहामा येथे झालेल्या वार्षिक बैठकीत यशवंतरावांनी जागतिक बँक आणि इंटरनॅशनल मॉनिटरी फंड (नाणेनिधी) याविषयी अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले. विदेशमंत्रीपद स्वीकारल्यानंतर भारताच्या विदेश व्यवहार नीतीसंबंधात 'युनो'च्या ऑक्टोबर १९७४ ते जानेवारी १९७७ या काळातील खास अधिवेशनात आपले विचार मांडले. विशेषत: 'यूनो'च्या सातव्या विशेष अधिवेशनात न्यूयॉर्क येथे २ सप्टेंबर १९७६ ला जागतिक अर्थकारणाच्या संदर्भातील राजकीय इच्छाशक्ती आणि अपेक्षित बदल याविषयी सुस्पष्ट शब्दात त्यांनी जगातील अर्थतज्ज्ञांसमोर विचार व्यक्त करून अर्थविषयक धोरण बदलण्याची निकड प्रतिपादन केली.

अर्थमंत्रीपद स्वीकारल्यापासून, त्यांच्या कल्पनेतील अर्थविषयक धोरणाचा पाठपुरावा त्यांनी सातत्यानं केला. राष्ट्राचा आर्थिक विकास घडून येण्याच्या कामी मोलाची भर घातली. पुढील काळात या धोरणानुसारच देशाची अर्थविषयक वाटचाल सुरू राहिली. अर्थतज्ज्ञ अर्थमंत्र्यांनी अर्थखात्याचा कारभार पूर्वी केला होता. परंतु अर्थखात्याचा चेहरा-मोहरा बदलून सुसंगत धोरणाचं कान यशवंतरावांनी खात्याच्या आपल्या चार वर्षांच्या कारभारात केलं. चार वर्षे अर्थखात्याचा सुरळीत कारभार करणारे यशवंतराव हे पहिलेच अर्थमंत्री होत.

अर्थखात्याचा कारभार पहात असतानाच १९७४च्या मध्यावर केंद्रीय मंत्रिमंडळात बदलाची हवा निर्माण झाली. पंतप्रधानांनी बदल घडविला आणि यशवंतरावांना नव्या आव्हानाला सामोरं जावं लागलं. पंतप्रधानांनी त्यांच्याकडे विदेश-व्यवहार खात्याची जबाबदारी दिली. १९६२ला संरक्षणमंत्रीपद स्वीकारून दिल्लीत पोहोचल्यानंतर चढत्या श्रेणीनं ते आता परराष्ट्र खात्यात दाखल झाले.

अर्थमंत्रिपदाचा कार्यकाळ संपत आलेला असतानाच १९७४च्या अखेरीस

केंद्रिय मंत्रिमंडळात बदल घडवून आणण्याची हवा सुटली. सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यात यशवंतराव ओटावा, वॉशिंग्टन इत्यादी शहरांच्या दौऱ्यावर जाणार होते. तीन आठवड्यांचा हा सलग दौरा होणार होता. परदेशी निघण्यापूर्वी पंतप्रधान इंदिराजींची भेट झाली त्यावेळी केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल करण्याच्या विचारात त्या आहेत याचा त्यांना सुगावा लागला होता. इंदिराजींनीच त्यांना तसं सांगितलं. हे सूतोवाच झालं त्याचवेळी यशवंतरावांनी सहमती दर्शविली आणि जे काही करायचं ते लवकर करावं असेही सांगितलं.

दिल्लीत १९६२ मधे संरक्षणमंत्री म्हणून आल्यानंतर ज्या महत्त्वाच्या खात्याचा कारभार त्यांनी सांभाळला तो चोखपणे सांभाळला. अमूक खातं हवं असा हव्यास धरला नाही किंवा त्यासाठी लाचारी केली नाही. जबाबदारी स्वीकारल्यानंतर मागे वळून पाहिलं नाही. मंत्रिमंडळात फेरबदल घडणार असल्याचं त्यांनी ऐकलं आणि अस्वस्थ न बनता दौऱ्यावर निघून गेले. २५ सप्टेंबरला सुरू झालेला दौरा संपवून ८ ऑक्टोबरला ते दिल्लीस पहाटे परतले. सकाळी १० वाजता कॅबिनेट मीटिंग असल्याचा निरोप त्यांना विमान तळावर मिळाला.

कॅबिनेट मीटिंगचा निरोप मिळताच त्यांचे विचारचक्र सुरू झालं. दिल्लीस येण्यास निघाले तेव्हा मंत्रिमंडळाचा फेरबदलाचा विचार मनात नसेलही. तसा विचार करण्याची त्यांना गरजही नव्हती. आजवर जे फेरबदल झाले त्यावेळी असा काही गंभीरपणे विचार करण्यास त्यांना फुरसत मिळालीच नव्हती. काहीतरी खातं देऊ केलं तर नको म्हणण्याचा आपला प्रिव्हिलेज आहेच असं त्यांनी ठरविलं असावं. याच अनुषंगानं ८ ऑक्टोबर १९७४ त्यांनी मनातील विचार डायरीत शब्दबद्ध करून ठेवले आहेत.

---

नवी दिल्ली
८ ऑक्टोबर १९७४

दिल्लीत सकाळी पोहोचलो. विमान तळावरच समजले- कॅबिनेट मीटींग आहे.

सकाळी दहा वाजता झोपेतून उठलो होतो. परंतु मीटींगला गेलो. बाईंनी केव्हा आला, कसा काय प्रवास झाला, वगैरे कुशल विचारले. मी सांगितले, कबूल केल्याप्रमाणे ठरल्या दिवशी थेट परत आलो. अर्थपूर्ण

आम्ही दोघेही हसलो.

दिल्लीतले वातावरण मंत्रिमंडळातील बदलाच्या अफवांनी खच्चून भरले होते. आज मनात विचार आला की भेट झाली तर काय बोलायचे. सौ. वेणुबाईंशी बोललो. तिला वाटतेय की बदल करणार नाही. विषय काढलाच तर विचार करू म्हणून मोकळे व्हावे. परंतु मला ते शक्य दिसत नाही. विषय निघाला की होय किंवा नाही हे स्पष्ट सांगावे लागते. माझ्या दृष्टीने केलेल्या जुन्या कामामध्ये जाण्याची मला मुळीच हौस नाही. महत्त्वाची दोनच खाती राहतात. ॲग्रिकल्चर आणि एक्स्टर्नल अफेअर्स.

ॲग्रीकल्चरलसाठी बाबूजी त्यांचे डोळ्यासमोर आहेत असे बरेच दिवस ऐकिवात आहे. एक्स्टर्नल ॲफेअर्स मला ऑफर होईल हे मला शक्य दिसत नव्हते. यापैकी एक ऑफर आली तर होय नाहीतर Good by असे मनाशी ठरविले. भेटीच्या निमंत्रणाची वाट पहात राहिलो. परंतु भेट झाली ती मजेदारच !

श्री. गंजूच्या मुलीचे लग्नाचे रिसेप्शन त्या दिवशी होते. ते संध्याकाळी होते. गंजू मला भेटून म्हणाला, तुम्ही ७ वाजता या. पंतप्रधान ७।। वाजता येणार आहेत. म्हणजे त्या येण्यापूर्वी मी येऊन गेलो म्हणजे त्याला सोयीस्कर असा त्याचा बेत.

मी हो म्हटले. बरोबर ७ वाजता पोहोचलो. तो पाच मिनिटात माझ्या पाठोपाठ बाईसाहेब आल्या. मला पाहिले आणि म्हणाल्या इथेच बाजूला उभे राहून बोलू या का? मी म्हटले ठीक. आमची चर्चा दोन मिनिटांत संपली.

त्या म्हणाल्या, तुमच्यासाठी मी एक्स्टर्नल अफेअर्स ठरविले आहे! मी म्हटले ठीक तर आहे. मग इतरांच्या बाबतीत काय काय ठरले आहे ते त्यांनी सांगितले. 'कॅबिनेट वेटिंग' संपले.

गंजूच्या दोन्ही लेकी आणि दोन्ही जावयांना शुभेच्छा ठेवून बाहेर पडलो.

---

विदेशमंत्रीपद यशवंतरावांकडे सुपूर्त करण्याचा मनसुबा पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी समक्ष चर्चेत ९ ऑक्टोबरला व्यक्त केला परंतु मंत्रिमंडळात प्रत्यक्ष फेरबदल घडण्यासाठी नोव्हेंबरचा दुसरा आठवडा उजाडला. फेरबदलाचे सर्व सोपस्कार झाल्यानंतर ११ ऑक्टोबर १९७४ला यशवंतरावांनी नव्या खात्याची सूत्रं स्वीकारली.

खात्याचा बदल यावेळी मात्र सुरळीतपणे घडला. यापूर्वी संरक्षण, गृह आणि अर्थ खात्याचा स्वीकार नाट्यमय रीतीनं स्वीकारावा लागला होता. केंद्रस्थानचं जबाबदारीचं खातं प्रथम पंतप्रधानांनी स्वत:कडे घ्यायचं आणि आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली की त्याची जबाबदारी यशवंतरावांकडे द्यायची असे बदल घडले होते. विदेश विभागाचा कारभार मात्र थेट सोपविण्यात आला. संरक्षण आणि अर्थ खातं सांभाळताना विदेश व्यवहाराची अनुभव संपन्नता त्यांच्या संग्रही होती. याचा विचारही यावेळी पंतप्रधानांच्या समोर असण्याची शक्यता गृहित धरावी लागेलच.

विदेशमंत्री या भूमिकेतून कार्य करताना यशवंतरावांनी भारताची आणि भारताच्या नेतृत्वाची एक आगळी, समर्थ प्रतिमा जागतिक राजकारणांत निर्माण केली. भारताचं परराष्ट्रीय धोरण हे पं. नेहरूंच्या कारकीर्दीत निश्चित झालेलं धोरण आहे. अलिप्ततेचं धोरण म्हणून हे सर्वश्रुत आहे. परराष्ट्र नीतीबद्दलच्या या धोरणानं जगात मूळ धरलेलं आहे. यशवंतरावांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात या धोरणाचा सातत्यानं, हिरीरीनं अवलंब केला. अलिप्तता ही केवळ काही देशांची मर्यादित शक्ती न रहाता, परराष्ट्रीय धोरणाची ही एक चळवळ बनावी यासाठी त्यांनी प्रयत्न करून क्रमाक्रमानं त्याला मूर्त स्वरूप प्राप्त करून दिलं.

अलिप्तता धोरणाबरोबर विकसनशील राष्ट्रांसमोरील विकासाचे विविध प्रश्न यशवंतरावांनी महत्त्वाचे ठरविले. विकासाच्या स्पर्धेत बड्या राष्ट्रांच्या जोडीला बसण्याची ईर्षा प्रत्येक राष्ट्र बाळगून आहे हे त्यांनी अर्थमंत्री असताना अनुभवलं होतं. विकासाच्या रथाला अडथळा प्राप्त होणार नाही, असंच जागतिक वातावरण निर्माण करण्याचा चंग त्यांनी बांधला. त्यांनी तसे प्रयत्न सुरू केले. भारताच्या

परराष्ट्र धोरणाचा त्यांनी हा एक विशेष ठरविला. परराष्ट्र व्यवहाराचं काम हे केवळ राजकीय मुत्सद्देगिरीपुरतं मर्यादित राहिलेलं नाही, परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक धोरणाचा आशय वाढलेला असून तो आणखी वाढणार आहे याची त्यांनी सतत जाणीव ठेवली.

विकासासाठी लागणारं तंत्रज्ञान हस्तगत करणं, उद्योगधंद्यासाठी कच्चा माल मिळविणं, देशात तयार झालेल्या मालाला विदेशी बाजारपेठ उपलब्ध करून घेणं आणि त्यातून आवश्यक ते परकी चलन प्राप्त करणं, विविध स्वरूपाच्या ज्या आर्थिक संघटना आहेत त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करणं, याबाबत देशात जागृती निर्माण करणं हे त्यांनी परराष्ट्रीय आणि आर्थिक धोरणाचं सूत्र निश्चित करून विदेश व्यवहार खात्याला नवा चेहरा प्राप्त करून दिला.

विकसनशील राष्ट्रांच्या प्रश्नांबाबत यशवंतराव सहानुभूतीचा दृष्टिकोन बाळगणारे होते. विकसित राष्ट्रांच्या व्यवहारात आणि वागण्यात, भारताच्या दृष्टीनं अनुकूल बदल घडवून आणण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. भारत-अमेरिका, भारत-रशिया, भारत व मध्यपूर्वेतील राष्ट्रे, भारत-पाकिस्तान, भारत-बांगला देश आणि भारत-चीन यांच्यातील राजनैतिक संबंध सुधारावेत आणि ते दीर्घकाळ टिकून राहावेत यासाठी अलिप्ततेचं धोरण कायम ठेवून त्यांनी मोठ्या मुत्सद्देगिरीनं पावले टाकली. शेजारी राष्ट्रांशी हार्दिक संबंध निर्माण करून समाजवादी देशांशी सहकार्य करणे हे जागतिक प्रश्नांचा उलगडा होण्याच्या दृष्टीनं महत्वाची परराष्ट्रनीती ठरली आहे. अविकसित देशांशी राजनैतिक आणि आर्थिक सहकार्य राखणे आणि साम्राज्यशाही, वसाहतवादी धोरणाविरुद्ध जी शक्ती असेल तिच्याशी भागीदार असणं भारताच्या परराष्ट्र नीतीमध्ये अनुस्यूत आहे जागतिक शांतता हे भारताच्या परराष्ट्र नीतीचं महत्त्वाच सूत्र आहे. ही सूत्रं समोर ठेवूनच यशवंतरावांनी स्नेहाचे संबंध प्रस्थापित केले.

यशवंतराव १९६२ साली दिल्लीला पोहोचले ते चीनशी युद्धभूमीवर सामना करण्यासाठी! परंतु एक दशक उलटून गेल्यानंतर यशवंतरावांच्याच हातानं या दोन देशांच्या मैत्रीची निरगाठ बसावी यासाठी अनुकूल प्रक्रिया सुरू झाली. राष्ट्राच्या आणि व्यक्तीच्या जीवनांत योगायोग म्हणतात तो हा!

परराष्ट्र-व्यवहार खात्याची सूत्रं त्यांनी १९७४च्या ऑक्टोबरमध्ये स्वीकारली आणि लगेचच कामावर कबजा प्रस्थापित केला. त्यांच्या परदेश दौऱ्याचा प्रारंभ नोव्हेंबर महिन्यात झाला. १७ नोव्हेंबरला ते श्रीलंका भेटीसाठी गेले. ३ डिसेंबर ते १० डिसेंबर अशी बांगला देशास भेट दिली. या दोन्ही राष्ट्रांमधील मैत्री राजनैतिक

पातळीवर घट्ट बनविण्याचं काम पहिल्या दोन महिन्यातच केलं. त्यानंतर १९७५च्या जानेवारी महिन्यांत युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो यांच्याशी चर्चा करण्यासाठी १९ जानेवारीला गेले. मार्शल टिटो हे पाश्चिमात्य जगातले एक समर्थ राजकारणी मुत्सद्दी मानले जात असत. संपूर्ण १९७५ सालात त्यांनी आठ वेळा परदेश दौरे करून जगातल्या मुत्सद्यांशी विविध प्रश्नांच्या संदर्भात चर्चा केल्या. गियाना, क्युबा, जमेका, मेक्सिको, लेबनान, इजिप्त, पेरू-अमेरिका, युरोप-अमेरिका आणि वर्ष अखेरीपर्यंत अफगाणिस्तान, इराक, कुवेत, बहारीन, फ्रान्स या देशांचा दौरा करून मुत्सद्यांशी वाटाघाटी केल्या. त्यांचं हे देशाटन १९७७ सालापर्यंत होत राहिलं. यशवंतरावांचा मुत्सद्दीपणा, राजनीती, राजकीय चातुर्य जागतिक पातळीवर प्रस्थापित करणारा त्यांच्या राजकीय आयुष्यातील हा कालखंड होय.

यशवंतराव जागतिक दौऱ्यात मग्न होते, दौरे करत होते, भारताची प्रतिमा उंचावित होते. पण मनात कष्टी होते. याचं कारण खुद्द देशातलं वातावरण १९७४मध्ये गढूळ, अनिश्चिततेचं, घबराटीचं बनलं होतं. राजकीय स्थिती बेभरवशी, बेबंद बनली होती. केव्हा काय उलथापालथ होईल याचा भरवसा उरला नव्हता. साथी जयप्रकाश यांनी परिवर्तन आंदोलन सुरू करून न भूतो न भविष्यती असं आव्हान त्यावेळच्या दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना दिलं होत. राजकीय क्षेत्र अस्वस्थ बनण्यात या आंदोलनाचा परिपाक झाला असतानाच आंदोलन चिरडण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी पुकारली. आणीबाणीच्या अंमलबजावणीत विरोधी पक्षांच्या नेत्याची धरपकड हे सूत्र ठरून जयप्रकाशजींसह अनेकांची कारावासात रवानगी करण्यात आली. प्रसिद्धी माध्यमांवर कठोर बंधनं लादण्यात आली. सर्वत्र हाहाकार माजला. केव्हा कोणावर आपत्ती येईल याचा नेम उरला नाही.

१९७५ मध्ये आणीबाणी पुकारली ती पंतप्रधानांनी, मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना हा आदेश धरपकड सुरू झाल्यानंतरच समजला. तथापि या विरुद्ध बोलण्याची किंवा कृती करण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. सर्वत्र जबरदस्त धाक!

आणीबाणीचा पुकारा झाला त्या दिवशी मी दिल्लीत होतो. त्या काळातील एक प्रसंगाचा साक्षीदार आहे. त्या दिवशी दुपारी नॉर्थब्लॉक भागातील निवासस्थानी होतो. काही लेखन करीत होतो. तेवढ्यात दिल्लीतील ज्येष्ठ पत्रकार मित्र श्री. अनंत सात्विक यांचा फोन आला. पार्लमेंट हाऊसच्या सेंट्रल हॉलमधून ते बोलत होते. त्यांनी जे सांगितलं ते ऐकून मी अवाक् बनलो. बी. बी. सी. लंडन वरून प्रक्षेपित झालेली बातमी त्यांनी ऐकली व मला सांगितली. ''जगजीवनबाबू आणि यशवंतराव चव्हाण यांना 'हाऊस अरेस्ट' (नजरकैद) करण्यात आल्याचं प्रक्षेपित करण्यात आलं होतं.

दिल्लीत आणि इतरत्र त्या काळात अनेक अफवा उठत असत. त्यापैकीच ही एक अफवा असेल असे सात्विक यांना सांगितलं. पण ते हाडाचे पत्रकार. खात्री करून घेऊया म्हणाले.

त्यांच्या मोटारीनं प्रथम आम्ही जगजीवन बाबूजींच्या बंगल्यावर गेलो. सर्वत्र सामसूम होती. सेक्रेटरीच्या परवानगीने बाबूजींना भेटलो आणि लंडनची बातमी सांगितली. त्यावर खदखद हसून ते म्हणाले, ''आम्हाला नजरकैदेत ठेवणारा अजून जन्माला यायचाय! नजरकैद असती तर तुम्ही मंडळी बंगल्यात कसे आला असता?''

तेथून यशवंतरावांच्या बंगल्यावर गेलो. आम्हाला पाहताच ''बातमीची शहानिशा करायला आलात ना?'' असं त्यांनीच विचारलं. ''आत्ताच परदेशातून काही फोन आले. येथूनही आले. कोणा हुकूमशहाला आम्हाला नजरकैदेत ठेवायचं असेल तर ठेवोत बिचारे! राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्या निर्माण होईल आणि त्यास सामोरं जावं लागेल. एक-दोन दिवसात दौऱ्यावर निघणार आहे. पाहूया काय घडतं ते.'' यशवंतरावांनी सांगितलं. नजरकैद ही शेवटी अफवाच ठरली.


१९७४ पासूनच देशातील राजकारणाला संपूर्ण क्रांतीचं वळण लागण्यास प्रारंभ झाला होता. १९७५ मध्ये याची परिणती आणीबाणी पुकारण्यात घडली. नजरकैदेच्या अफवेचा प्रकार १९७५ला आणीबाणी सुरू झाल्यानंतर पहिल्या महिन्यातच ऐकावा लागला. पंतप्रधानांच्या गोटातूनच अफवा पसरविल्या जात असल्याचं त्यावेळी दिल्लीत कुजबुज होती. मंत्रिमंडळातील सहकारी आणीबाणीस अनुकूल नव्हते. दहशतीनं त्यांनी स्वस्थ रहावं अशासाठी अफवांचा मार्ग अवलंबिला जात असावा असा काहींचा तर्क होता. आणीबाणी सुरू होण्यापूर्वीपासूनच म्हणजे १९७४ पासूनच यशवंतरावांचं परदेश दौऱ्याचं वेळापत्रक मात्र तंतोतंत होतं.

त्यांचे हे दौरे एकाकी होत असत. वेणूताईंना आजारपणामुळे धावपळीचे दौरे झेपणारे नव्हते. ही खंत यशवंतरावांना अस्वस्थ करीत असली तरी दौऱ्यात असताना वेणूताईंशी पत्रद्वारे संवाद साधून मन मोकळं करण्याचा त्यांचा परिपाठ त्यांनी कायम राखला. १९४९मध्ये वेणूताई क्षयरोगातून सावरल्यावर मिरजेच्या दवाखान्यातून त्यांना घरी परत आणण्यासाठी यशवंतराव गेले असताना, 'आता मला संतती होणार नसल्याने तुम्ही दुसरं लग्न करा' असं वेणूताईंनी सांगितलं होतं. तेव्हा 'मला वंशाला दिवा असण्याची गरज नाही, यापुढे मला तू आणि तुला मी असं सांगून यशवंतरावांनी हा विषय तिथेच संपवला होता. पत्नीला हे जे वचन दिलं त्याला आता १९७४ पर्यंत पंचवीस पावसाळे उलटले. दोघांनीही याचं कसोशीनं पालन केलं. या वचनाची स्मृती यशवंतरावांच्या मनाच्या कप्प्यात किती घट्ट होती याचं प्रतिबिंब परदेश

दौऱ्यावर असताना त्यांनी वेणूताईंना लिहिलेल्या पत्रात उमटलेलं आढळतं.

२६ एप्रिल १९७४ला ते दिल्लीहून 'कौलालंपूर' शहराच्या दौऱ्यावर निघाले. त्याच दिवशी दुपारी कौलालंपूरला पोहोचले. वाटेत दोन तास बँकॉक येथे थांबले होते. या दोन तासात विमानतळाजवळच त्यांनी 'अयोध्या' पाहिली. ते लिहितात–

> अयोध्या पहाण्यासाठी गेलो. आज ती अयोध्या ओसाड आहे. काही पडलेल्या इमारतींचे अवशेष आणि मंदिरांचे भग्न अवशेष जुन्या वैभवाची पुसटशी साक्ष देत आहेत. तसे म्हटले तर पहाण्यासारखे काही नाही. नाही म्हटले तरी ४०० वर्षे हे शहर या देशाची राजधानी होते. १८व्या शतकाच्या शेवटी ब्रह्मी सैन्याने आक्रमण करून या शहराचा विध्वंस केला. भारतापासून हजारो मैल दूर अंतरावरील ही 'अयोध्या' पहाताना हजारो वर्षांच्या सांस्कृतिक संबंधांचा इतिहास मनात गर्दी करून गेला.



**कौलालंपूर (हिल्टन)**
२६ एप्रिल १९७४

> ए. डी. सी.च्या वार्षिक सभेचा अध्यक्ष म्हणून (चेअरमन) मी आलो असल्यामुळे स्वागत वगैरे समारंभपूर्वक झाले. त्यातून मुक्त होऊन चारच्या सुमारास हिल्टनमधे पोहोचलो.
>
> कौलालंपूर हे पाच लाख वस्तीचे शहर आहे. ब्रिटीश राजवटीची सर्व छाप, इमारतींचे बांधकाम, रस्त्यांची बांधणी आणि इतर शिल्प यावरूनच चटकन ध्यानात येते. गेल्या दहा-वीस वर्षात काही बदल झाले असणारच. परंतु गेल्या दोन-तीन वर्षात नवी हॉटेल्स मात्र बरीच झाली आहेत. आजकाल शहरांचे मोठेपण आधुनिक हॉटेल्सच्या

उंच हवेल्यांवरून मापण्याची प्रथाच पडलेली दिसते.

आम्ही ज्या हॉटिलमध्ये (हिल्टन) उतरलो आहोत ते गेल्या चार महिन्याखालीच तयार झाले. सर्वात मोठे व अत्यंत आधुनिक असे ते मानले जाते. बहुतेक सर्व देशांची प्रतिनिधी मंडळे येथेच उतरली आहेत. आम्ही सर्वजण २४व्या मजल्यावर आहोत.

माझ्या खोलीतून शहराचे फार सुरेख दृश्य दिसते. अगदी पुण्यासारखे दिसते. डोंगराच्या उतारापर्यंत शहर पसरले आहे. घरांची शेवटची रांग बहुधा लहान लहान टेकड्यांच्या कुशीत, वृक्षराजांनी झाकलेली दिसते. हॉटिलपासून जवळच विस्तृत असे 'रेसकोर्स' आहे.

उत्तम ठेवलेली, काहीशी चक्राकार, घोड्यांची धावपट्टी आणि त्याच्या दोन्ही बाजूला सुरेख राखलेली आणि मर्यादशीर पसरलेली गवत जमीन (लॉन) मन मोहून घेते. वेळ मिळाला की, या रेसकोर्सकडे पहात गरम चहा घेत बसणे हा येथील माझा आवडता छंदच झाला आहे.

कोण जाणे, हे रेसकोर्स मी पाहिले की मला पुण्याची आठवण येते. या रेसकोर्स भोवती जुन्या ब्रिटीश राजवटीत बांधलेले, वसाहती रस्त्यांना शोभणारे शैलीदार बंगले आहेत. त्यामुळे 'क्वीन्स गार्डन, पूना'ची याद मन भरून टाकते. पाठोपाठ रेसकोर्स रोड दिल्लीचा ताजाताजा सहवास मन उल्हसित करतो.

सकाळी लवकरच जाग आली. झुंजुमुंजु झाले होते. पंचवीस तीस उमदी घोडी रपेटसाठी किंवा सरावासाठी मैदानावर होती. काही आली होती, किंवा येत होती. पावसाची रिमझिम चालू होती. हे सर्व पाहिले नि डोळ्यासमोर उभी राहिली ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यातील पुण्यातील एक पावसाळी सकाळ. आठवणींनी मनात गर्दी केली.

कितीतरी आठवणी - सुखदु:खाच्या ! आशा निराशेच्या! नव्या भेटलेल्या आणि जुन्या जिव्हाळ्याच्या हरवलेल्या माणसांच्या !

मनात कसली तरी हुरहुर असावी आणि ती शोधून हुडकून काढावी म्हटले तरी सापडत नसे - ती हुरहुर कुठतरी हरवून गेली होती. आज अचानक हलकेच ती परत आली. आठवतात का तुला, पंधरा नंबर, सतरा नंबर, अकरा नंबर - क्वीन्स गार्डनमधले दिवस?

आज सारा दिवस तुझ्या आठवणीत गेला. तुझ्या संगतीत काढलेले कष्टाचे - आनंदाचे सर्व क्षण कसे अलगून बिलगून जवळ येतात आणि मन एका अर्थाने कृतज्ञतेने भरून जाते.

परवा येथे येताना मी अगदी शेवटच्या घटकेला वाचण्यासाठी जे पुस्तक उचलले ते मी बरेच दिवस राखून ठेवले होते. आवडीने खावयाचा पदार्थ जसा चाखून माखून खावा, शेलकी चांगली वस्तु जशी राखून सावरून वापरावी - तसे हे पुस्तक थांबत थांबत, त्याची रुची घेत घेत सावकाशीने वाचावे असे ठरविले होते.

हा विचार ग्रंथकर्त्याने या पुस्तकाला जी अर्पण पत्रिका दिली आहे ती वाचूनच माझ्या मनात आला. माझ्या नेहमीच्या संवयीप्रमाणे पुस्तक उलटसुलट वाचून झाल्यावर आता ते सलग, ओळीने वाचावयाचे, असे मी ठरविले.

ज्या दिवशी हे ठरविले तो दिवस होता २ फेब्रुवारीचा. रात्रीच्या निवांत वेळी पुस्तक हातात घेतले. पुन्हा फक्त अर्पणपत्रिका वाचून झाली आणि माझे वाचन तिथेच थांबले. विचारांचा आणि स्मृतींचा चाळा सुरू झाला. नि वाचन तसेच राहिले. पुन्हा सवडी-सवडीने वाचू म्हणून जे राहिले ते परवा परत हाती आले.

एका प्रसिद्ध इंग्लीश लेखकाचे हे आत्मचरित्र आहे. मला अजून ते पूर्ण वाचावयाचे आहे. त्याचा दुसरा खंडही परवा असाच खरेदीत हाती आला. इथे आल्यानंतर पुस्तक वाचनाची पुन्हा पहिल्यापासून सुरुवात केली आणि पुन्हा अर्पणपत्रिकेतच मन रेंगाळले.

सत्तर वर्षे वय झालेल्या ४०-४५ वर्षे संसार केलेल्या,

एका कर्तृत्ववान, बुद्धिमान, विचारवंताने आपल्या बहुढंगी जीवनाची खेळी कशी झाली याची कहाणी सांगताना त्याची अर्पणपत्रिका कृतज्ञता-बुद्धीने - प्रामाणिकपणाने आपल्या प्रिय पत्नीस लिहिली आहे.

लिहिली आहे असे म्हणणेही तितकेसे बरोबर नाही. कारण त्यानेही एका जुन्या पण विख्यात फ्रेंच कलावंताने आपल्या पत्नीस लिहिलेले चार ओळीचे पत्र फक्त नाव बदलून दिले आहे. ते पत्र म्हणजेच ही अर्पणपत्रिका!

या पत्रात त्या कलावंताच्या ज्या भावना आहेत व त्यांचा प्रतिसाद या लेखकाच्या अंत:करणात ऐकू आला अगदी त्याच भावना माझ्या आहेत. एकमेकांशी संपूर्ण मिळत्याजुळत्या आहेत. गेले दोन महिने हाच विचार माझ्या मनात मधून मधून, सारखा येत होता. अर्पण-पत्रिका वाचून पुन्हा मन जे तेथे रेंगाळले आहे याचे कारण हे आहे.


आता पुस्तक पुढे वाचण्यापूर्वी ते पत्रच मूळचे नाव बदलून तुझ्या नावे येथे देत आहे. त्यातल्या भावना त्या कलावंताच्या वा लेखकाच्या नाहीत. माझ्या - अगदी माझ्या आहेत. शब्द त्याचे आहेत हे खरे; परंतु अनुभूती माझी आहे - माझीही आहे.

"तुझ्या संगतीची साथ ही ईश्वराने दिलेली देणगी आहे. त्याच्या या कृपेच्या जाणिवेने माझे मन आकंठ भरलेले आहे. तुझ्या उदार अंत:करणामध्ये माझ्या या जाणिवेला जागा राहू दे, एवढे सांगण्यासाठीच हे पत्र लिहीत आहे."

◆ ◆ ◆

# चिंता करतो... पक्षाची, सामान्यांची, महाराष्ट्राची

अनेक प्रश्नांनी
मनात काहूर मांडले आहे.
उत्तरे काय असतील...
कागदावर मांडून पहावे.



यशवंतरावांनी वेणूबाईंना लिहिलेली पत्रे वाचत असताना एक अग्रगण्य, दूरदर्शी, बहुश्रुत, प्रज्ञावंत मुत्सद्दी या रूपात त्यांचे दर्शन घडते. त्यांचे हे लेखन दीर्घ कालखंडाचे आहे. दूर अंतरावरून पत्नीशी अक्षर-संवाद साधण्यासाठी म्हणून त्यांनी लिहिलेले असले तरी या लेखनाला ललित साहित्याचा सुप्रसिद्ध आकृतिबंध आहे. त्यांनी सारी पृथ्वी प्रदक्षिणा केली. ते जेथे जेथे गेले तेथील विशिष्ट समाजजीवन, तेथील निसर्ग, त्या प्रदेशाचा इतिहास, रंगमंदिरे, वस्तुसंग्रहालये, तेथील राजकारण, अर्थकारण असा सखोल वेध घेतल्याचे या लेखनात आढळते. ऐतिहासिक, धार्मिक स्थळांची दर्शने आवर्जून घेतली. संयुक्त राष्ट्रे या जागतिक संस्थेशी त्यांचे वारंवार संबंध आले. जगातील शेकडो राष्ट्रांच्या प्रतिनिधींसमोर त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये सामंजस्य स्थापन करण्याच्या उदात्त उद्देशाने जे विचार मांडले त्याचाही उल्लेख या पत्रलेखनात आहे. परराष्ट्र दौऱ्यात त्यांनी भारताच्या तटस्थतेचे सूत्र अधिक अर्थपूर्ण रीतीने विशद करीत असताना महत्त्वाच्या व्यक्तींवर प्रभाव पाडणे, त्यांच्या विरोधाची धार कमी करणे, त्यांचे मतपरिवर्तन करण्याकरता ध्येयवादी दृष्टीने झटत राहणे असा सतत प्रयत्न केला. राजकारणाबरोबरच परदेशच्या दौऱ्यात असताना तत्त्वचिंतनालाही धार येत असावी असे सूचित करणारी काही पत्रे आहेत. अशा एका पत्रातून त्यांच्या

अंतर्मनात गर्दी करून राहिलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा एका निवांत वातावरणात प्रयत्न केला आहे. माँटिगो बे (जमेका) येथून ४ मे १९७५ला त्यांनी लिहिलेल्या पत्रातून अंतर्मनात डोकावून पहाताना मनाची जी अवस्था झाली ती शब्दबद्ध केली आहे. ती अशी -

---

हॅपीडेज
माँटिगो बे (जमेका)
४ मे १९७५

प्रिय सौ. वेणूबाईस

परवा संध्याकाळपासून या ठिकाणी आहे. आज दुपारी Week end संपवून सर्वजण किंगस्टनला जाऊ.

बऱ्याच वर्षानंतर अशी सुटी मिळाली. जमेकाचे बाहेरील धनिक लोकांनी आपल्या विश्रामासाठी बांधलेली ही सुंदर वसाहत आहे. समुद्र किनारा लागून असलेल्या छोटेखानी टेकड्यांवरील हिरव्यागर्द वृक्षराजींमध्ये इतस्तत: पसरलेले तीसएक बंगले असावेत. एका पेक्षा एक उत्तम, सुरेख रंगीबेरंगी फुलांनी वेढलेला झाडोरा आपला सोबती. एकमेकांपासून अलग पण म्हटल तर शेजार आहे. खाण्या-पिण्याची व्यवस्था उत्तम. आम्ही पिणारे नाही हे पाहून आमच्यासाठी व्यवस्था ठेवण्यासाठी येथे हजर असणाऱ्या लोकांची फारच निराशा झाली.

मी काल येथील स्वीमींगपूलमध्ये फार वर्षांनी पोहून घेतले. येथून १२ मैलावर असलेले मॉटिंगो बे या शहरात फेरफटका मारला. सर्व दुपार चक्क झोपून काढली.

काल रात्री येथील बीचवर प्रधानमंत्री मॅनली यांची पार्टी होती. त्याला हजर राहिलो. सर्व Heads of Govt. हजर होती. जमेइकन संगिताची पार्श्वभूमी आणि सागराच्या तालबद्ध लाटांची लय यांची साथ, यामुळे पार्टी लगेच जमून गेली. गप्पांचा कलकलाट, अधून मधून हास्यांची उडणारी कारंजी, हातात हात घालून इकडे

तिकडे भटकणारी जोडपी, सगळे वातावरण कसे मोकळे होते. कॅनडाचे प्रधानमंत्री श्री. ट्र्यूडो आणि श्रीमति ट्र्यूडो हे जोडपे विशेष खूष दिसले. संगीत अधिक तेज होताच या जोडप्याने नृत्याचा श्रीगणेशा केला. बहुतेक सर्व जोडपी त्यात सामील झाली. अशा तऱ्हेने हा आनंद समारोह रात्री ११ वाजेपर्यंत चालू होता. या पार्टीमध्ये मोकळेपणाने दोन-चार सिंधी धनिक जोडपी होती. जगात कोठेही जा सिंधी तेथे असतातच. नुसतेच असतात असे नाही तर महत्त्वाचे व्यापारी असतात. इंपोर्ट-एक्स्पोर्टचा त्यांनी कब्जा केलेला असतो. सर्वांचा पुणे, मुंबईशी संबंध असल्यामुळे केव्हातरी ते आपल्याला भेटलेले असतात. त्या सर्वांनी तू बरोबर आहेस का म्हणून चौकशी केली आणि माझ्या एकाकीपणावर त्यांनी नेमके बोट ठेवले.

गेले दोन-तीन दिवस अनेक प्रश्नांनी माझ्या मनात काहूर मांडले आहे. या प्रश्नांची उत्तरे काय आहेत कोण जाणे. पण प्रश्न तरी नेमके काय आहेत व त्यांची उत्तरे काय असावीत किंवा असू शकतील हे एकदा कागदावर मांडून पहावे असे मनात आले आहे.

कामाच्या व प्रवासाच्या दैनंदिन गर्दीमध्ये आपल्या अंतर्मनात डोकावून पहाण्यासाठीही सवड व शांतता मिळत नाही. येथील निवांत वातावरणामध्ये कदाचित हे शक्य होईलसे वाटते. हे लिहिणे (पत्रे) म्हणजे तुझ्याशी केलेली संभाषणेच आहेत. तेव्हा हे सगळे तुझ्याशी बोलायचे नाही तर कोणाशी ?

मी सुरुवातीला म्हटले आहे की गेल्या दोन-तीन दिवसात प्रश्नांनी काहूर मांडले आहे. याचा अर्थ ते प्रश्न काही दोन तीन दिवसात निर्माण झालेले नाहीत. गेले अनेक महिने - काही वर्षे म्हटले तरी चालेल, हे प्रश्न जमून गेले आहेत.

काही प्रश्न जसजसे उभे राहात गेले त्या त्या वेळी

तात्कालिक उत्तरे मिळत गेली. पण सुसंगत उत्तरांची आखणी झालेली नाही. ही एक रुखरुख मनाला लागून आहे. येथील मुक्कामात ही रुखरुख स्वस्थ बसू देईना एवढाच त्याचा अर्थ.

पुढल्या वर्षी तीस वर्षे होतील . मी पहिली निवडणूक जिंकून सरकारमधे आलो. अनेक अडचणी आल्या. परिश्रम करावे लागले. अनेकांचे आशीर्वाद मिळाले. लौकिक अर्थाने नावलौकिक मिळाला. सत्तेची अनेक स्थाने पाहिली. राज्यात आणि केंद्रात. सामान्य अर्थाने कुणालाही हेवा वाटावा अशी!

मीही अशा स्थानांची महत्त्वाकांक्षा धरली होती हे म्हणणे खरे नाही. किंवा त्यासाठी कुणाच्या पाठीमागे लाचारीने लागलो असेही नाही. परंतु जेव्हा जबाबदारी आली तेव्हा मागे फिरून पाहिले नाही.

अडचणींची व संकटांची कल्पना माझ्या इतकीच तुलाही आहे. कोणत्या परिस्थितीत कोणते काम स्वीकारले व ते का हे तुझ्या इतके दुसऱ्या कुणाला माहिती नाही. टीकाकार स्वाभाविकच सत्तेच्या मागे लागले आहेत वगैरे म्हणणार याची मला कल्पना आहे. मी त्यांच्याशी वाद घालायला जाणार नाही. पण योजून एखादी सत्तेची जागा हस्तगत करावयाची असे मी कधीच केले नाही. पण वस्तुस्थिती आहे की सातत्याने गेली तीस वर्षे सत्तास्थानावर आहे.

जाणीवपूर्वक सत्तेचा उपयोग समाजाच्या परिवर्तनासाठी करावयाचा माझा प्रयत्न राहिला. नव्या विचारांना सामोरा गेलो. मुख्यतः दलितांबद्दल कणव ठेवून सामाजिक न्याय प्रस्थापित केला पाहिजे ही माझी धारणा प्रथमपासूनची होती. माझ्या हातात संपूर्ण (!) सत्ता होती तेव्हा त्या सत्तेचा आग्रहाने व योजनापूर्वक दृष्टीने आणि वर उल्लेखिलेल्या उद्दिष्टांसाठी उपयोग करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

त्याचा काही परिणामही झाला. त्या धोरणाने अनेक नवी माणसे महाराष्ट्रात उभी करण्याचा मी प्रयत्न केला.

**जे आपल्यासाठी कोणी केले नाही ते आपण इतरांसाठी करावे आणि सत्तेच्या केंद्रस्थानी असताना ते केले तर अधिक फलदायी होते. म्हणून अधिक मित्रभावाने, हळुवारपणे पण विचाराच्या दिशा कायम ठेवून माणसे मी वागविली आणि वाढविलीही.**

हे सर्व ठीक आहे. पण आज मी जेव्हा राजकारणातले चित्र पाहतो तेव्हा माझे मन अस्वस्थ होते. खरोखरीच आपण काही नव्या कामाचा पाया घातला होता का? खरी जिव्हाळ्याची माणसे आवती भोवती होती का? काही काही माणसांचे नमुने पाहिले म्हणजे आश्चर्यही वाटते - खरे म्हणजे दु:ख होते.

**झाले हे पुरे नाही का? हा असाच खेळ पुढे किती दिवस कुणासाठी आणि काय म्हणून चालू ठेवायचा असा प्रश्न माझ्यापुढे उभा आहे.**

**मी काही राजकारण संन्यास घेण्याचा विचार करीत नाही. विचार येतो निवडणुकांचा आणि सत्ता स्थानांचा. आज सत्ता स्थानावर राहण्याची अनेकांची धडपड चालू आहे. जे आहेत ते तेथेच कसे राहता येईल यासाठी साधनशुचितेचा कसलाही विचार न करता अगदी क्रूरपणे कारस्थाने करताहेत.**

**असल्या कारस्थानात अप्रत्यक्षपणे सामील न होता, किंवा त्या कारस्थानाचे बळी होण्यापूर्वीच, योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन बाजूला झाले तर बरे नाही का? असा प्रश्न मनात घोळतो आहे.**

याचा निर्णय कसा घ्यावयाचा. त्या निर्णयासाठी कोणत्या कसोट्या लावावयाच्या? फक्त आपल्या स्वत:च्या भावनांचा (Subjective) विचार करून निर्णय करावयाचा का? तर उत्तर 'होय' असे येते.

श्रीमतीजी अजून महत्त्वाच्या कामात सल्लामसलत

घेतात पण सत्तेच्या वर्तुळाच्या बाहेर ठेवण्याचा समजेल असा प्रयत्न करतात असा अनुभव आहे. मग मन धुमसत राहते. असे अपमानित राहण्याने ज्यांचा मी प्रतिनिधी आहे असे मानतो, त्यांचाही अपमान तर होत नाही ना, अशी बोचणी असते.

मी माझी समजूत घालतो की, असा वैयक्तिक भावनांचा विचार करून निर्णय घ्यावयाचे नसतात. राष्ट्रीय कार्य करीत असताना स्वत:ला विसरले पाहिजे, भविष्याकडे लक्ष ठेवले पाहिजे. रागाने मोडता येते, जोडता येत नाही. तडजोडीने वागले पाहिजे असा विचार करून मग काम चालू राहते.

पण खऱ्या अर्थाने काम चालू आहे का? की एका व्यक्तीचा अहंकार सुखविण्यासाठी हे सर्व चालू आहे?

काँग्रेस पक्ष हे मी माझे सर्व जीवन मानले. ती काँग्रेस कुठे आहे? काँग्रेसमध्ये लोकशाही राहिली आहे का? सत्ता मिळवून ते ताब्यात ठेवण्याचे यंत्र म्हणून आज काँग्रेस वापरली जात आहे.

आजची शासनयंत्रणा अत्यंत आधुनिक तंत्रे वापरून अधिक एककेंद्रित होत आहे. प्रसंग पडला तर ही यंत्रणा जीवघेणा निष्ठुरपणा दाखविण्यासही मागे पुढे पाहणार नाही असे आधुनिक सत्तेचे सर्व जगातच स्वरूप दिसत आहे. आपला देशही याला अपवाद नाही. या पद्धतीत माझे मन रमत तर नाहीच पण तिच्या विरुद्ध मनात विष आहे.

जनतेची काँग्रेस खऱ्या अर्थाने बनावी यासाठी जनतेत राहिले पाहिजे असे मला एकसारखे वाटते. श्रीमतीजींना विरोध करण्यासाठी नाही. माझी तशी भावनाच नाही. प्रथमपासून माझा त्यांच्याकडे ओढा होता हे तुला माहिती आहे.

१९६९ मध्ये मी त्यांच्याविरुद्ध मत दिले ते त्यांना सत्तेवरून काढण्यासाठी, हे निदान माझ्याबाबतीत तरी

खरे नाही. मी त्यांचे मत एकसारखे विचारले होते. त्यांचे मत बनत नव्हते. हे करू का ते करू अशी चंचलता होती. शेवटी मी जे ठरवीन ते इतरांनी मानावे अशी त्यांची रीत होती.

मला हेही कबूल केले पाहिजे की श्रीमतीजी माझ्याशी कधी सुडाने वागल्या नाहीत. Fair वागणे म्हणतात तसे गेली ६ वर्षे त्यांनी माझ्याशी व्यक्तीशः वर्तन केले. पण शेवटी हे सगळे वैयक्तिकच ना? सार्वजनिक जीवनांत आणि राजकारणात जी तत्त्वे मानली त्याच्या भविष्याचे काय?

आम्ही साऱ्यांनी वैयक्तिक विचार करूनच वागणे योग्य आहे का, असा संघर्ष मनात चालू आहे. निवडणुकीला उभे राहू नये आणि लोकात काम करीत रहावे किंवा निवडणूक करून, ती जिंकून सत्तेबाहेर राहावे असे दोन पर्याय आहेत. कोणता स्वीकारावा? पण निवडणुका तरी होणार आहेत का?

सत्तेच्या बाहेर राहिल्यानंतर आजची शक्ती राहाणार नाही, लोकांची दृष्टी बदलेल, दूर होतील. साधनांची कमतरता होईल. मग मनाने कष्टी होऊन एकाकी पडावे लागेल हेही शक्य आहे. पण त्याची तयारी नको का करायला?

जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांपासून दूर न होता, किंबहुना त्यांच्याशी एकरूप होऊन राहावयाचे म्हटले तर ही भीती कशासाठी?

मला महाराष्ट्र काँग्रेस पक्षालाच मार्ग दाखविला पाहिजे. छुपे शत्रू आणि आज वरवर दिसणारे मित्रही लांब जातील, विरोध करतील हे सर्व समजून उमजून निर्णय घ्यावा लागेल.

कुटुंबाचा विचार केला तर माझे कर्तव्य सर्वांच्या दृष्टीने माझ्या परीने मी पुरे केले आहे. संसारातले प्रश्न कधीच संपत नाहीत. माझे मन पूर्वीही त्यात नव्हते. आजही नाही.

प्रश्न आहे तुझा नि माझा. तू धैर्याने साथीला मनापासून असलीस म्हणजे मला कशाची पर्वा नाही.

आयुष्याची शेवटची जी काही वर्षे आता राहिली आहेत ती तेजोभंग करून घेऊन काढण्यात अर्थ नाही.


माझ्या मनात काय चालले आहे ते स्पष्टपणे लिहिले आहे. त्यामुळे ते मलाही अधिक स्पष्ट समजले आहे. निर्णय काहीच घेतलेला नाही. मनोव्यापार काय चालले आहेत ते माहीत व्हावे म्हणून लिहिले आहे.

एकमेकांच्या सल्ल्यानेच निकाल घेऊ. घाई कसलीच नाही. पण एक गोष्ट निश्चित की हा निर्णय 'हो' चा की 'नाही' चा - कसाही घेतला तरी तो माझ्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि कदाचित शेवटचाच ठरणार आहे.

मॉटेंगो बे मधील 'हॅपी डेज्' या बंगल्यातून शांत समुद्र दिसतो आहे. जसा मलबार हिलवरील 'ऐरी' बंगल्यातून दिसत असे तसा. त्यावेळी माझी जी मन:स्थिती होती तीच आज आहे की काय, न कळे!

वातावरण प्रसन्न आहे. खूप विश्रांती मिळाली. मन मोकळे झाले. आता ४।। च्या विमानाने किंग्जटनला परतावयाचे आहे.

हे सर्व लिहीत असताना तू समोर बसली आहेस असे मला एकसारखे वाटत होते.




◆ ◆ ◆

# सारी चिंता बजबजपुरीची

राज्यात आणि केंद्रात राजकारणात व्यग्र असताना वर्षांमागून वर्षे जे प्रश्न निर्माण झाले आणि मनात जमून राहिले त्या प्रश्नांची उत्तरे काय असावीत किंवा असू शकतील याविषयी यशवंतरावांनी १९७५ च्या मे महिन्यात माँटिगो बे या जमेइका देशातील निवांत ठिकाणी चिंतन केले. स्वत:शी स्वत:च केलेला संवाद हे या चिंतनाचे स्वरूप आहे. या मूक संवादाचं त्यांनी पत्ररूपानं शब्दांकन केलं आहे. ज्या कोणाच्या मनात एक किंवा अनेक प्रश्नांची गर्दी जमते तेव्हा त्या प्रश्नांच्या निकालासाठी, निर्णयासाठी स्वत:शी संवाद करावाच लागतो. अशा संवादाने तो निर्णयाशी पाहोचतोही. वेणूबाईंना लिहिलेल्या पत्रात त्यांनी 'हे सर्व लिहीत असताना तू समोर बसली आहेस असे एकसारखे वाटत होते.' या वाक्याने पत्राची इतिश्री केली आहे. हा एक अनोखा मूकसंवाद म्हटला पाहिजे.

त्यावेळच्या राजकारणातील वक्र चालीने अस्वस्थ बनलेले त्यांचे मन 'यातून वेळीच बाजूला होणे योग्य नाही का ?' असा विचार करीत असतानाच 'लोकात काम करीत राहावे' असेही त्यांचे मन त्यांना सांगते. सार्वजनिक जीवनांत आणि राजकारणांत जी तत्त्वे मानली त्याच्या भविष्याचे काय? हा एक प्रश्न त्यांना भेडसावतो. यापेक्षाही काँग्रेस पक्ष हे त्यांनी आपले सर्व जीवन मानलेले असल्याने 'ती काँग्रेस कुठे आहे ?' असा प्रश्न ते स्वत:ला विचारतात.



मला महाराष्ट्र काँग्रेस पक्षालाच मार्ग दाखविला पाहिजे असेही स्वत:ला बजावतात. छुपे शत्रू आणि वरवर दिसणारे मित्र याचाही ते उल्लेख करतात. सत्तास्थानावर राहण्यासाठी सुरू असलेली क्रूर कारस्थाने, साधन सुचितेचा अभाव, मी जे ठरवीन ते इतरांनी मानावे ही दिल्लीतील सत्ताधाऱ्याची वृत्ती असा एकूण आढावा त्यांनी त्यांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे शोधताना घेतलेला असला तरी, मी काही राजकारण संन्यास घेण्याचा विचार करीत नाही असा निर्वाळाही दिला आहे.

महाराष्ट्र काँग्रेसला मार्ग दाखविण्याचे काम त्यांनी अनेक वर्षे केले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात खिळखिळा झालेला महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष त्यांनी एकसंध, भक्कम बनवला. सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस उमेदवारांच्या पाठीशी प्रचंड जनशक्ती उभी करण्याची किमया घडविली. महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ तयार करताना दिल्लीला हस्तक्षेप करू दिला नाही. आमदारकीसाठी उमेदवार निश्चित करताना एकमताने यादी तयार करण्याची प्रथा सुरू केली. याचबरोबर महाराष्ट्र हे सर्वांगिण विकासाचे देशातील एक अग्रेसर राज्य व्हावे यासाठी धोरणसूत्री तयार करून त्याची विनाविलंब अंमलबजावणी होण्यासाठी प्रशासनात शिस्त निर्माण केली.

संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव दिल्लीला गेल्यानंतरही आठ-दहा वर्षे महाराष्ट्रातली घडी विस्कटली नव्हती. तथापी नंतर काही सत्ताकांक्षी व्यक्तींनी यशवंतरावांच्या मार्गदर्शनाला दुय्यम स्थान देऊन दिल्लीत श्रेष्ठांशी संधान बांधण्याचे कारस्थान रचले. दिल्लीतील ज्येष्ठ सत्ताधाऱ्यांना हे हवेच होते. संपूर्ण राज्याचा एकमुखी पाठिंबा प्राप्त झालेले यशवंतराव हे त्याकाळात दिल्लीतील एकमेव केंद्रीय नेते होते. त्यांचे हे पाठबळ खच्ची करण्याची संधी महाराष्ट्रातील सत्ताकांक्षी व्यक्तींमुळे दिल्लीला मिळाली. दिल्लीतून सत्तेची आणि संपत्तीची लालूच सुरू होताच महाराष्ट्रात काँग्रेस अंतर्गत गटबाजी उफाळून आली. त्याला कोणी जातीयतेची झालर जोडली. येथील विधायक आणि एकमुखी नेतृत्वाला खिंडार पाडणे दिल्लीला साधले.

महाराष्ट्र काँग्रेस छिन्न-विच्छिन्न बनत आहे आणि स्वत:ला नेते समजणारे सत्तास्वार्थाने झपाटलेले आहेत हे पाहून यशवंतराव कष्टी बनले. अस्वस्थ झाले. ही अस्वस्थता त्यांनी स्पष्ट शब्दात नोंदवून ठेवली आहे. ते लिहितात -

---

२ जानेवारी ७४

दिल्लीत आज महाराष्ट्र 'बंद' च्या हकीगती येऊ लागल्या आहेत. मुंबई तुलनेने शांत आहे. पुण्यात गडबड आहे. वणीला

गोळीबार झाला. नागपूरला पंतप्रधानांच्या सभेत गोंधळ घालण्यात आला. हे सर्व ऐकून मन विषण्ण झाले.

हा बंदचा वेडा छंद केव्हा कमी होईल कोण जाणे. असंतोष, नाराजी आहे ती मी समजतो. परंतु समाजजीवन व उत्पादन यंत्रणा खिळखिळी करून असंतोषाला कारणीभूत असलेली परिस्थिती कशी बदलणार? ही क्रांतीची चाहूल नव्हे तर अराजकाचा धांगडधिंगा आहे.

---

जानेवारी १९७४

महाराष्ट्रात दुष्काळाने मोठी आपत्ती आणली तरी महाराष्ट्राने यशस्वी तोंड दिले. जनतेनेही धीराने पुष्कळ सहन केले.

सीमाप्रश्नाने पुन्हा एकदा दंगली घडल्या. कोल्हापूर, सांगली, कराड जाळपोळीने बदनाम झालीत.

सातारा जिल्ह्याचे वातावरण कार्यकर्त्यांच्या दुफळीने दूषित झाले आहे. सहकारी निवडणुका म्हणजे राजकीय-दृष्ट्या शाप ठरत आहे. दादा-बापूंच्या वादाने कौरव-पांडवांच्या लढाईचे स्वरूप घेतले आहे. हे सर्व पाहून हे वर्ष मी मनाने कष्टी राहिलो.

महाराष्ट्र मंत्रिमंडळामध्ये गटबाजी सुरू आहे. कष्टदायी चित्र आहे. मराठा-मराठेतर वाद वाढविण्याचा 'चाणक्य' प्रयत्न सुरू आहे. या सर्व जातीय तेढीतून बाहेर येण्याचा मी गेली १०-१५ वर्षे प्रयत्न करीत आहे. पण काही धूर्त लोक या कार्याचा खेळ-खंडोबा करण्याची जणू काय प्रतिज्ञाच केल्यासारखे वागत आहेत. योग्य वेळी यांना (Expose) पूर्ण उघडे करण्याखेरीज दुसरा मार्ग नाही.

पुण्यातील एका समारंभ सभेत डॉ. वि. म. दांडेकरांशी अनपेक्षित वाद झाला. माझ्या ध्यानीमनी नव्हते. त्यांच्या वावदूकी भाषणाने वाद माझ्यावर लादला. वृत्तपत्रातून त्याची काही महिने चर्चा चालू होती.

३ जानेवारी १९७४

श्री. शंकरराव चव्हाण भेटले. मोकळे बोलताना दिसतात. विचार, मते यांना वळण देण्याचा प्रयत्न करीत असावेत. त्यांच्या दृष्टीने हे उत्तमच आहे. इतरांच्या दृष्टीनेही चांगले आहे. श्री. वसंतराव नाईक यांचा विश्वास त्यांनी संपादन करावा एवढीच माझी अपेक्षा.

शालिनीबाईंचे आणखी एक नवे भाषण. त्यावरील तळवळकरांचा लेख वाचला. बराच वेळ विचारचक्र चालू होते. शालिनीबाई महाराष्ट्राची सेवा करीत नाहीत अशी भाषणे करू नयेत असे सारखे वाटते. त्यांच्याशी याबाबतीत एकवेळ बोलले पाहिजे. अर्थात बोलल्यावर त्यावर पुन्हा एखादे भाषण होणार नाहीच याची खात्री नाही. श्री. वसंतदादा मात्र अकारण धर्मसंकटात आहेत.

३० जानेवारी १९७४

मुंबईत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीस उपस्थित राहिलो. रात्री १० वाजता सुरू झालेली बैठक फारच गाजली. सर्व रात्रभर बैठक झाली. १९६१ च्या महाबळेश्वरच्या शिबिरात अशीच रात्र जागल्याची आठवण झाली. परखड भाषणे झाली. तणाव निर्माण झाला असल्याचे उघड उघड दिसले. मंत्रिमंडळात वेगळे वेगळे गट आहेत. श्री. वसंतराव नाईक यांनी याकडे वस्तुत: कानाडोळा करू नये. अंतर्गत गटबाजीला ते प्रोत्साहन देत आहेत की काय असे मनात येऊन जाते. गटबाजीला पोषक अशी भूमिका घेणे हे काहीसे दु:खदायक आहे.

मी भाषण न करता सर्वांना एकत्र बसवून चर्चा केली. आनंद एवढाच की मला चांगला प्रतिसाद मिळाला. खेळीमेळीने ठराव तयार झाला.

दिल्ली
३१ जानेवारी

या बैठकीचे पडसाद फार दिवस निघत राहिले. श्री. नाईकांच्या विरुद्ध काही कारस्थान चालू आहे असा त्यांच्या मनात संशय निर्माण करण्यात त्यांच्या आवती भोवतीचे लोक बरेच यशस्वी झालेत. दुर्दैव असे की त्याला मराठा-मराठेतर वादाचे पिशाच्च रूप दिले गेले. फार प्रयत्नपूर्वक ते थांबविण्याचे मी परिश्रम केले. किती यश आले आहे सांगणे अवघड आहे. तिरपुडे यांना पुढले एम.एल.सी.चे तिकीट नाकारण्यात त्याची परिणती झाली आणि एक नको तो वाद रुजला की काय अशी शंका राहून जाते.

---

दिल्ली
१२ जानेवारी

सेंट्रल इलेक्शन कमेटीची दिल्लीत बैठक होती. यू.पी. लिस्ट सुरू झाली आणि मला रोमला जावयाचे आहे म्हणून निरोप घेऊन निघालो. निघताना पंतप्रधानांनी त्यांच्या मुंबईच्या भेटीबाबत काय करावे? मुंबईला जाऊन मत कळवण्यास सांगितले. दुपारी महाराष्ट्राचे राज्यपाल अलियावरजंग याना महाराष्ट्र सदनात जाऊन भेटलो. विषय पंतप्रधानांच्या मुंबई भेटीचा होता. या माणसाला त्यांच्या कार्यक्रमाचे कोडे पडले आहे. सल्ला देण्यामध्ये उत्सुकता दिसली नाही.

मुंबईत पोहोचलो तेव्हा मुख्यमंत्री भेटले. पंतप्रधानांच्या मुंबई भेटीबाबत त्यांच्या मताचा अंदाज घेतला आणि मुंबई भेटीस येऊ नये असे पंतप्रधानांना, स्वतःच सांगितले. आता त्यांचा त्या निर्णय घेवोत.

मुंबईत अकारण एक वेडे वातावरण तयार झाले आहे. मुंबई प्रदेश काँग्रेस कमेटीचा पोरखेळ होऊन खेळखंडोबा राजकारणाचा झाला आहे. लोकसभा पोटनिवडणूक हातची जाणार अशी परिस्थिती आता दिसते.

दलित पँथर - एक नवा जोशीला राग - मुंबईच्या रस्त्यावर उतरला आहे. तीव्र भावनावेग आहे, तणाव आहे. परंतु मुख्य म्हणजे कार्यक्रम कोणता? हे सर्व कशासाठी? मध्यरात्री नंतर रोमला प्रयाण केले.

---

कार्यक्रमानिमित्त यशवंतरावांचा मुंबईत एक-दोन दिवसांचा मुक्काम असेल तर नरिमन पॉईंट येथील 'रिव्हिएरा' या निवासस्थानी अनेकजण भेटीसाठी, सल्ला-मसलतीसाठी किंवा निव्वळ क्षेमकुशल जाणून घेण्यासाठी येत असत. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत अशा भेटी आणि चर्चा होत राहिल्या तरी त्यांनी त्यात आनंद मानला. भेटीसाठी येणारांमधे राजकीय क्षेत्रातले आणि अन्य विविध क्षेत्रातील लोक असत. त्यात कलाकार, शिल्पकार, साहित्यिक, संगीततज्ज्ञ, संपादक, वृत्तपत्र प्रतिनिधी, मंत्री, आमदार, सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते, उद्योजक असे असत. यातील प्रत्येकाचे चर्चेचे विषय वेगवेगळे असले तरी योग्य सल्ला मिळाल्याच्या समाधानात ते परत जात असत.

असाच एकदा मुक्काम असताना सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक सी. रामचंद्र (राम चितळकर) भेटण्यास आले. त्यांचे एक पुस्तक प्रसिद्ध झाले होते. ते पुस्तक यशवंतरावाना भेट म्हणून द्यायचे आणि थोडीफार चर्चा करायची या उद्देशाने ते आले होते. त्यांनी पुस्तकाची प्रत त्यांच्याकडे सुपूर्द केली मात्र, 'तुमचा हा ग्रंथ मी वाचला आहे' हे यशवंतरावांचे शब्द ऐकताच ते सर्दच झाले. पुस्तकासंबंधी सांगण्याच्या तयारीत ते असताना यशवंतरावांनी अभिप्राय देणे सुरू केले आणि लता मंगेशकर बाबत ज्या तऱ्हेने तुम्ही काही गोष्टी नमूद केल्या आहेत ते केले नसते तरी चालले असते. त्या लोकप्रिय ज्येष्ठ गायिका आहेत. तुम्ही ज्येष्ठ संगीत दिग्दर्शक आहात, एकमेकांच्या सहकार्याने संगीत रसिकांना तुम्ही संतुष्ट केले आहे. दिल्लीत पं. नेहरूंच्या उपस्थितीत तुम्हा दोघांच्या सहकार्याने संगीताच्या माध्यमातून एक कार्यक्रम होणार होता. त्यावेळी तुम्हाला क्लेशदायक असे काही घडले. त्यात दोषी कोण या तपशिलात मी जात नाही. ती क्लेशदायक घटना

तुम्ही पुस्तकात रेखाटली आहे. अखेर तुमच्या मनाप्रमाणे, मताप्रमाणे कार्यक्रम यथासांग पार पडला. ते संगीत ऐकून पंडितजी गहिवरले. मला वाटते तो विषय, तिथेच संपला. ज्येष्ठ कलावंतांनी अशी काही पथ्ये पाळली तर समाजमनावर याचा मोठा अनुकूल परिणाम घडतो. माणूस म्हणून कलाकार अधिक श्रेष्ठत्व पावतो.

सी. रामचंद्र शांतपणे ऐकत होते. त्यांच्या नेत्रात अश्रू जमा झाले. यशवंतरावांनी विषय बदलून, चित्रपटसृष्टी, त्यांचं व्यक्तिगत जीवन, नवीन उपक्रम वगैरे गोष्टी सुरू केल्या. 'तुम्ही म्हणता तसा विचार मी करायला हवा होता' असं अश्रूपूर्ण नेत्रानं सांगून सी. रामचंद्र यांनी निरोप घेतला.

मुंबई मुक्कामातील दोन-तीन महत्त्वाच्या नोंदी यशवंतरावांनी करून ठेवल्या आहेत त्या अशा -

---

**मुंबई**

६ जानेवारी

रात्री १२ वाजता मुंबईत पोहोचलो. सकाळी उशीरा उठलो. उठून पाहिले तर सगळा आनंद. कैलासगडची स्वारी रिव्हिएरावर. कलायोगी कांबळे यांचे प्रसिद्ध चित्र - शिवाजीराजांचे सुंदर पोर्ट्रेट घेऊन आलेत. सोबत माझ्या आईचेही पोर्ट्रेट आणले आहे. आईच्या ५३/५४ सालच्या फोटावरून काढलेले इतके हुबेहूब की आई समोर बसली आहे असे वाटते. माझे डोळे मी माझ्या आईकडून घेतले आहेत हे खरे मला आज पटले.

शिवाजीराजांचे चित्र जिवंत व तेजस्वी आहे. सर्व सकाळ उत्साहात गेली. स्वतः कांबळे आपल्या सहकाऱ्यांसह आले होते. मधुकरराव चौधरी आपुलकीने आले होते. शिवाजीराजांचे हे चित्र अधिकृत म्हणून मान्य करावे असा माझा सल्ला मी दिला.

(मंत्रालयातील प्रवेश दालनात छत्रपतींचे जे भव्य तैलचित्र आहे ते हेच. कलायोगी कांबळे यांचे.)

**मुंबई**
६ जानेवारी

संध्याकाळी श्री. धनंजय कीर यांची ६१वी साजरी झाली. जस्टिस वैद्य आणि पी.के.देशपांडे चांगले बोलले. धनंजय कीरही भावनापूर्ण बोलतो. दलित समाजाला न्याय मिळाला पाहिजे ही त्याची तीव्र तळमळ त्याने प्रखरपणे मांडली. त्याच्या सत्कारात सामील होऊन मनाला फार समाधान मिळाले.

या कार्यक्रमानंतर श्री. आदिक यांच्या निवडणुकीच्या प्रचार सभा. दंगलीचे वातावरण होते. सभा मोडणार, दगडफेक होणार अशा अफवा दिवसभर हवेत होत्या. काँग्रेसच्या प्रचाराच्या या पहिल्याच सभा. सर्वांना चिंता होती. परंतु जांबोरी मैदान (वरळी) व भोईवाडा मैदानावरील दोन्ही सभा मोठ्या होत्या. शांततेने पार पडल्या. निवडणुकीचा टेम्पो नाही. जनता अनुत्साही दिसली.

---

१० जानेवारी

कुलाबा जिल्ह्याचे भाई शेटे भेटले. दोन डोळ्यांनी आंधळा परंतु राजकारणात फार बारकाव्याने पाहणारा लढावू कार्यकर्ता आहे. बॅ. अंतुलेमुळे कष्टी आहे. बॅ. अंतुले अतिशय रुथलेस झाला आहे. ठीक नव्हे. महाराष्ट्राच्या राजकारणात हा मनुष्य विष कालवील असे मला नेहमीच वाटत आले आहे. हुषार आहे. मुस्लीम आहे. यासाठी मला सहानुभूती होती व आहेही. परंतु आता तो वाघनखे बाहेर काढू लागलाय.

◆ ◆ ◆

# अशाही नोंदी

अजब माणूस !

श्री. फडके (य. दि.) - संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास लिहिणारे - यांचे पुन्हा पत्र आले आहे. मोठा अजब माणूस आहे! मधून मधून पत्र लिहितो की मी लिहिले आहे ते तुम्हास दाखवू इच्छितो. परंतु काय लिहिले ते कधीच दाखवीत नाही. आता त्यांचा इतिहास ग्रंथ मुंबई विश्वविद्यालयाने डॉक्टरेटसाठी मंजूरही केला आहे आणि वर लिहितो आहे की 'तुम्ही' तो पहावा. तुमची बाजू बरोबर मांडली आहे की नाही ते पहा.

इतिहास पक्षपाती लिहिण्याची एक जुनी वृत्ती महाराष्ट्रांत आहे. त्यातील हे एक दिसतात. लिहायचे ते लिहिले असणार आधीच आणि आविर्भाव आहे रामशास्त्रीय न्याय द्यावयाचा. मी त्यांना भेटीस बोलावणार आहे.

---

मुख्यमंत्री वसंतराव नाईक दिल्लीत आले आहेत. त्यांच्याशी खूप गोष्टी झाल्या. त्यांचा अन्नप्रश्न कठीण झाला आहे. सर्व पोटनिवडणुकी हरल्यामुळे राजीनामा द्यावा असे तीव्रपणे मनात येऊन गेल्याचे बोलले.

---



श्री. मधुकरराव चौधरी आले होते. अंदाजपत्रकाची रूपरेखा कशी असावी विचारीत होते. डॉ. मनमोहनशी तपशीलवार चर्चा केली.

नवी दिल्ली

'पीएसी' ची बैठक झाली. धान्य परिस्थिती व त्यातून निर्माण झालेली कायदा-सुव्यवस्थेची स्थिती याबाबत पुन्हा यापूर्वीच्या चर्चेचीच पुनरावृत्ती झाली. गुजराथ-बाबतचा तपशील मिळाला. डॉ. अमूलचे आडदांडगे धोरण आहे.

रात्रीचे जेवण राष्ट्रपती भवनवर झाले. श्रीलंकेच्या पंतप्रधान होत्या. जेवणाच्या वेळी श्रीमती भंडारनायकेंच्या ज्येष्ठ कन्या सुनेत्रा रूपसिंगे बरोबर होत्या. ऑक्स्फर्डच्या पदवीधर आहेत. वडिलांच्यासारखी वाटली. गंभीर, आत्मविश्वासी, महत्त्वाकांक्षी, कर्तबगार वाटली. डिफेन्स इन्स्टिट्यूटमध्ये बराच रस दाखविला. ॲप्रोच रॅडिकल वाटला. Must watch this lady.

---

अशोकामध्ये श्रीमती भंडारनायकेंचे जेवण होते. पंतप्रधान मोकळ्या बोलल्या. जेवणासाठी शेजारी बसलो होतो. बोलता बोलता रिपब्लिक दिनाची चर्चा निघाली. त्यावरून लाहोर काँग्रेसची आठवण निघाली. इंदिराजींनी त्या थंडीत बाहेर तंबूमध्ये ते सर्वजण कसे राहिले ते सांगितले. एक प्रसंगही सांगितला.

पंडितजींची शुभ्र घोड्यावरून मोठी मिरवणूक निघाली. स्वातंत्र्याचा पुकार होणार म्हणून. परंतु बँडवाले उत्साहाच्या भरात गाणे वाजवू लागले - गॉड सेव्ह दि किंग! त्यांच्या मताप्रमाणे आनंदाच्या प्रसंगी हेच गीत गायले पाहिजे!

---

आज पुन्हा 'पीएसी'ची बैठक झाली. पंतप्रधान गैरहजर राहिल्या. सिलोन जवळचे बेटाचे भवितव्य ठरले. त्रयस्थांचे मदतीने कायदेशीर द्यावेच लागेल. मैत्री ठेवून आपणहून

देणे शहाणपणाचे. कायदेशीर आणि नैतिकदृष्ट्या श्रीलंकाचा हक्क स्पष्ट आहे अशी बोलणी झाली. निर्णय पंतप्रधानांवर सोपविला.

---

श्री. माधव आपटे यांनी मलेशियातील एका राज्याच्या मुख्यमंत्र्यांना जेवण दिले. त्यास हजर राहिलो. माणूस मोठा डायनामिक वाटला. भारताचा मनापासूनचा मित्र वाटला. भारताबाबत - 'त्याच्या देशातही फारच गैरसमज आहेत. भारताच्या औद्योगिक प्रगतीची कल्पना बाहेर फारशी नाही.' हे त्याच्या बोलण्याचे सूत्र होते. कौलालंपूर बैठकीस यावर्षी गेलो तर त्याच्या राज्यामध्ये एक दिवसासाठी जाण्याचे कबूल केले.

---



दिल्ली
२ फेब्रुवारी

आज सौ. वेणूबाईंचा वाढदिवस. ४९ संपून पन्नासावे सुरू. म्हणजे आता ती पन्नाशीत पोहोचली. तिची प्रकृती उत्तम राहो अशी मनापासून प्रार्थना केली.

माझ्या घरच्या सर्व लोकांचे ती इतके करते - परंतु त्यांच्यापैकी कुणी साधा टेलिफोन करून शुभेच्छा व्यक्त करण्याइतकीही आपुलकी दाखविली नाही. हे सर्व पाहिले म्हणजे मन उदास होते.

पण वेणूबाई आज आनंदात होती. सर्वांना गोडधोड जेवण दिले. आम्ही सुरेखसे फोटो काढले. आम्हा दोघांचे! Many happy returns of the day.

---

आज पंतप्रधानांना भेटलो. महाराष्ट्राच्या प्रदेश काँग्रेसच्या बैठकीबाबत बोलणे निघाले. विशेष चर्चा गुजराथची झाली.

गुजराथमध्ये जनतेने पोलिसांना दगड व सैन्याला मार दिला ही एक विशेष आश्चर्यकारक घटना आहे असे मी म्हटले. यावर पंतप्रधान म्हणाल्या - हे डेंजरस आहे. मी म्हटले - पोलिसांचे, सैन्याचे या पद्धतीने स्वागत होणे धोक्याचे आहे.

---

दादासाहेब रूपवते भेटले. खाडिलकरांची (र. के.) नवी चाणक्यनीती सांगत होते. ''चव्हाण ज्या पद्धतीने वागतात त्यांचे 'बरोबर' आहे हे दाखविणे खरे नाही'' असे काहीतरी पंतप्रधानांना बोलून आलो आहे असे त्यांना म्हणाले.

रूपवते म्हणाले, 'ही पुणेरी राघोबादादाची चाल अशीच चालू राहिली तर सत्यानाश होणार !'

मी म्हटलं, या दुष्टाव्याला मी कसे तोंड देणार - मी माझ्या पद्धतीने तिकडे दुर्लक्षच करणार.

◆ ◆ ◆

# महाराष्ट्रात ताणतणाव

नवी दिल्ली,
सप्टेंबर १९७४

आतापर्यंत रोम, कौलालंपूर, वॉशिंग्टन, मॉस्को आणि आय एम एफ साठी पुन्हा बाली असा पाच वेळा बाहेर जाऊन आलो. माझ्याकडील वृत्तांत सौ. वेणूबाईंना लिहिलेल्या पत्रात आहे.

महाराष्ट्राचे राजकारण अधिकच ताणतणावाचे होते आहे. मंत्रिमंडळात मतभेदाचे पीक आहे. परस्परांबद्दल वेडेवाकडे कोणाशीही बोलत असतात. यातना होतात हे ऐकून. माझ्याशी कोणी बोलत नाही परंतु ज्यांच्याशी बोलले जाते ते येऊन सांगतात.

प्रत्येक जिल्ह्यात मतभेदाचा पूर आहे. विशेषतः सातारा जिल्ह्यातील वादाने अतीव दुःख झाले. जाहीर सभातून एकमेकांचा तेजोभंग, अधिक्षेप केला गेला. शरद पवार यांचे घरी सर्वांना बोलावून एकत्र बसवून प्रयत्न केला आहे. सर्वांनी मान्य तर केले आहे परंतु कसे प्रत्यक्षात वागतात ते महत्त्वाचे.



◆ ◆ ◆

# चालच वेडीवाकडी !

इंदिराजींच्या मनात मुख्यमंत्र्यांना बदलण्याचे दिसते. परंतु मी तसे म्हटले पाहिजे असा डाव आहे. मी का म्हणावे? त्या जागी कोणी यावे याचा निर्णय त्यांनी आपल्या मनाशी घ्यावा म्हणजे चेंज (बदल) सोपा होईल. व टिकूनही राहील. असे मी त्यांना पूर्वीच सांगितले होते. पुन्हा सांगितले. Mr. Naik must be treated with grace हाही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तो मी पुन्हा पुन्हा सांगतो आहे. आता तूर्त काही नको, पुन्हा पाहू let us wate असे म्हणून सोडून दिले जाते. देशातही वातावरण अस्वस्थ आहे त्यात याची कशाला भर!

आता रजनीही (बॅ. रजनी पटेल) हे झाले पाहिजे, नाईक बदलले पाहिजेत या बॅन्डवॅगनवर आहे. बाई बोलल्या असल्या पाहिजेत. एकदा बाबूजीही मला सांगत होते की बदलाच्या आड तू कशासाठी? बाई त्यांना तसे म्हणाल्या. दिल्लीची चालच वेडी वाकडी त्याला काय करणार?

◆ ◆ ◆



# एकदा करून टाका !

दिल्ली

२१ सप्टेंबर १९७४

आज रात्री मुंबईहून पहाटेला प्रयाण करावयाचे आहे. (नाणे निधी आणि अन्य आंतरराष्ट्रीय अर्थविषयक बैठकांसाठी). जवळ जवळ दोन आठवडे बाहेर जाणार आहे. म्हणून दुपारी कॅबिनेट मीटिंगनंतर पंतप्रधानांना भेटलो.

महाराष्ट्राच्या नेतृत्वासंबंधीचा प्रश्न काढला. मोघमच बोलत होत्या. मी म्हटले, करावयाचे तर एकदा करून का टाकत नाही. वेळ तर आताच हिवाळी अधिवेशनापूर्वी आहे. 'खरं आहे' असं म्हणाल्या. परंतु सगळेजण, तुम्ही दिल्लीत कुणीही सापडत नाही असं थट्टेने म्हणाल्या. मी लगेच सांगितले की सर्वांना आदेश काढा की ठराविक काळात दिल्ली कुणीही सोडावयाची नाही. म्हणजे जमून जाईल. 'हसल्या'. म्हणाल्या मंत्रिमंडळात फेरबदल (काही मंत्र्यांची) करण्याचे मनात आहे.

मी म्हटले 'हा पंतप्रधानांचा अधिकार आहे. त्यास कोणी अडथळा निर्माण करू शकत नाही, तसा करूही नये.' हा प्रश्न मी तिथेच सोडून दिला.

परदेशाहून परतल्यानंतर बदल होणार यात आता मुळीच संशय नाही. स्वत:संबंधी आताच कशाला विचार करीत बसायचे. विचार करीत बसण्यात अर्थ नाही असे ठरविले. उगीच काहीतरी खाते दिले तर नको म्हणण्याचा आपला प्रिव्हिलेज आहेच.

## कलकत्ता

सकाळी कलकत्त्यास आलो. पुरुलिसाच्या वाटेवर 'डमडम'वर सेंट्रल बँकेचे आडारकर भेटले. कलकत्त्याच्या बँकेच्या मेन ऑफिसची बिल्डिंग आगीत भक्षस्थानी पडली. त्याची करुण कहाणी सांगत होते. सर्व रेकॉर्डस् जळाली. बँकेचे व्हाल्टरूम सुरक्षित आहे म्हणत होते.

सिद्धार्थ शंकर आणि माया रे बंगालचे निमंत्रक शंकर घोष आल्यानंतर बंगाल सरकारच्या डकोटाने पुरुलियास गेलो. तेथून ४० मैलाचा प्रवास करून वायदंडीला पोहोचलो. एका सोसायटीच्या उद्‌घाटनास ग्रामीण लोक पुष्कळ होते.

वाटेत येता जाता सिद्धार्थशी पुष्कळ चर्चा झाली. सी पी आयचे धोरण घातकी आहे हे आपल्या अनुभवावरून तो सांगतो. त्याचा मुख्य सिद्धांत असा की, सी पी आय काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा 'स्प्लिट' पाडू इच्छिते. पहिल्या स्प्लिटनंतर काँग्रेसचे पुनर्मीलन होऊन ती इतकी शक्तिशाली होईल असे त्यांना वाटले नव्हते. परंतु ही किमया घडली खरी. परंतु पुन्हा स्प्लिट झाल्यानंतर काँग्रेसला आपल्या भागीदारीत चालावे लागेल हा त्यांचा विचार बंगाल काँग्रेसच्या युवक संघटनेशी ती बीजे पेरीत आहे. त्यांच्यापुढे ती आज फारच महत्त्वाची समस्या होऊन बसली आहे. पुरुलिया शहरातून जात असता सिद्धार्थला आपल्या आजीची तीव्र आठवण झाली. दार्जिलिंगच्या वाटेवर सिलीगुडीमध्ये त्यांनी केलेले भाषण - या आवारातून मी जन्मलो की नाही माहीत नाही परंतु पुन्हा जन्माला आलो तर बंगालमधील आदिवासी मुलखात शेतमजुराच्या पोटी जन्म घेईन. सिद्धार्थचे डोळे भरून आले. आणि आजही त्या भागातील लोकात मनात तो कुणीतरी असेल असे वाटते.

दिल्लीत असताना किंवा विदेश दौऱ्यात आंतरराष्ट्रीय प्रश्नात गुंतलेले असताना चिंता करतो देशाची - महाराष्ट्राची! हीच यशवंतरावांच्या विचाराची, मनाची अवस्था सातत्याने राहिली. महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी, नेते म्हणविणारांनी, प्रदेशाचा सर्वांगिण विकास, समृद्धी, सामाजिक शांतता यासाठी एकसंधपणे, सर्व शक्तिनिशी स्वत:ला वाहून घ्यावे आणि महाराष्ट्र देशातील एक अग्रेसर राज्य अशी प्रतिमा निर्माण करावी या विचाराची पेरणी महाराष्ट्र भूमीत करण्यात यशवंतरावांनी सर्वस्व वेचले. त्या भूमीत मतभेदाची, दुहीची, गटातटाची झुडपे माजताना पाहून त्यांना विषाद वाटणे स्वाभाविकच होय. वेळ मिळेल, कार्यकर्त्यांना एकत्रित भेटण्याची संधी मिळेल त्या प्रत्येक वेळी त्यांनी त्यांना समजावण्याच्या आणि समृद्धीच्या राजमार्गाने वाटचाल करण्याचा सल्ला दिला. सल्ला देत राहिले. परंतु कार्यकर्ते प्रत्यक्षात कसे वागतात ही चिंता त्यांना पोखरीत राहिली.

काँग्रेस हा देशातील सर्वश्रेष्ठ पक्ष. सत्ता संपादनासाठी हुकमी बहुमत मिळविणारा पक्ष. परंतु हे हुकमी बहुमतच पक्षाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरेल असा इशारा निरनिराळ्या प्रसंगाने सत्ताकांक्षी नेत्यांना, कार्यकर्त्यांना यशवंतराव देत राहिले. परंतु फितुरीचे रुजलेले बीज फोफावत राहिले. महाराष्ट्राचा नियोजित विकासाच्या मार्गावरील रथ अडखळत चालत राहिला. यशवंतरावांना ही खंत होती. महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्त्यांमधील बेदिली, एकमेकांचा अधिक्षेप करण्याची वृत्ती, अपरिपक्व सत्ताकांक्षा आणि सूडाची भावना याबाबत ते परदेश दौऱ्यातील निवांत वेळी, अंतर्मुख बनून चिंतन करीत राहिले. वेणूताईंना लिहिलेल्या एका पत्रात त्यानी हे चिंतन शब्दबद्ध केले आहे.

विदेश-व्यवहार खात्याचा कारभार स्वीकारल्यानंतर पुढच्या सहा-सात महिन्यातच पंतप्रधानांनी देशात

निर्णय, परंपरास्थ भारतीय नागरिकांमध्ये तीव्रतेने उमट
यशवंतरावांना त्यांच्या प्रश्नांना सामोरं जावं लाग
सामंजस्याच्या भूमिकेतून राजकारणात कृतिशील असलेल
यशवंतरावांना आणीबाणी मानवणारी नव्हती. केंद्र
मंत्रिमंडळातील ज्येष्ठ नेत्यांना आणीबाणी मान्य नव्ह
परंतु याबाबत काही ठोस मार्गाचा अवलंब करणे किंवा स्प
शब्दात नाराजी दर्शविण्याइतपत परिस्थिती अनुकू
राहिलेली नव्हती. काही दुय्यम दर्जाचे आणि लाच
असलेले मंत्रिमंडळातील सदस्य आणीबाणीची तळी उचल
धरताना लोकांनी पाहिले.

विदेशव्यवहार खात्याचे काम करीत असताना आणि परदेश दौऱ्या निघण्यापूर्वी पंतप्रधानांच्या भेटीत, देशातील आणीबाणीची स्थिती संपवावं लोकशाहीचे निखळ वातावरण निर्माण करावे, हवा मोकळी करावी असा सल्ल यशवंतराव आवर्जून देत असत. हा प्रयत्न अर्थातच एकाकी असावयाचा. पंतप्रधा यास विरोध करीत नसल्या तरी निर्णयही करीत नव्हत्या. त्यांचा मूड वेगळा होत १९७७च्या जानेवारीत यशवंतरावाना विदेश दौऱ्यावर निघायचे असल्याने त्यांच पंतप्रधानांशी भेट व चर्चा झाली. या चर्चेच्या वेळीही आणीबाणी मागे घेऊन देशा रीतसर निवडणुका घ्याव्यात असे यशवंतरावांनी सांगितले. चर्चा झाली पण निर्ण झाला नाही.

दौऱ्याच्या वेळापत्रकानुसार यशवंतराव जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्या दौऱ्यावर गेले. १५ जानेवारीस ते फ्रँकफूर्टला पोहोचले. या दौऱ्यात त्यांची फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीचे विदेशमंत्री श्री. गेनचर यांच्याशी सविस्तर चर्चा झाली श्री. गेनचर यांना मार्चमध्ये हिंदुस्थानला भेट देण्याची इच्छा होती. ती त्यांनी य चर्चेच्या ओघात व्यक्त केली. परंतु त्यापूर्वी पार्लमेंटच्या निवडणुकी जाहीर झाल्य तर मार्चचा पहिला आठवडा सोयीस्कर ठरणार नव्हता. त्यामुळे गेनचरला कार सांगावे असा यशवंतरावांना पेच पडला.

फ्रँकफूर्टचा दौरा उरकून यशवंतराव ता. १८ जानेवारीला बुखारेस्टला पोहोचले हा एक दिवसाचा दौरा असल्याने दुसऱ्या दिवशी दिल्लीला परतण्याचे त्यांनी ठरविले. ती तयारी सुरू असतानाच दिल्लीहून त्यांना एक खास मेसेज मिळाला. तो मेसेज

आणि यशवंतरावांची मनस्थिती त्यानी वेणूबाईंना तेथूनच लिहिलेल्या पत्रात व्यक्त झाली आहे. ते पत्र असे -

बुखारेस्ट
१८ जानेवारी १९७७

सौ. वेणूबाईस,

सर्व बेत बदलून उद्या सकाळी रोमहून दिल्लीला परतण्यासाठी निघणार आहे. झेकोस्लोव्हाकियाच्या विदेशमंत्र्यांना आपल्या राजदूतामार्फत संदेश पाठवून मी येऊ शकत नसल्याबद्दल माफी मागितली आहे. कृपा ही की, माझा इथला सर्व कार्यक्रम संपला आहे.

फक्त संध्याकाळचे माझे रात्रीचे भोजन 'माकोव्हस्की' (विदेशमंत्री) यांच्यासाठी. हा इथला शेवटचा कार्यक्रम. तो संपला की उद्या परत येण्यास मोकळा.

ही नाट्यमय घटना आज दुपारी अडीचच्या सुमारास झाली. मी ॲम्बॅसडर कौल यांचे घरी दुपारचे जेवणासाठी गेलो होतो. येथील जेवणे खाऊन उबगलो होतो. तेव्हा आपली डाळ-रोटी खावी म्हणून हा बेत आम्ही योजला होता.

एकाएकी टेलिफोन वाजला. राजदूत कौल यांना बेलग्रेडचा फोन आहे असे सांगितले. तो घेण्यासाठी ते गेले. मी तोपर्यंत माझे जेवण संपविले. निवांत हात धूत होतो. राजदूत घाईघाईने माझेकडे आले आणि म्हणाले, ''तो बेलग्रेडचा कौन्सल काही सांगत नाही. तुमचेशीच प्रत्यक्ष बोलायचे म्हणतो. तुमचेसाठी काही मेसेज आहे.''

मी गेलो तेव्हा कौन्सेलने आपले नाव सांगितले आणि पंतप्रधानांचा मेसेज आहे सतरा तारखेचा, तो मी वाचून दाखवतो असे म्हणून हिंदीत असलेला संदेश वाचून दाखविला.

सारांश असा होता की, ''जो महत्त्वाचा निर्णय आपण घेणार होतो तो उद्या घेणार आहे. तुमच्याशी मी तुम्ही जाण्यापूर्वी बोलणार पण तुम्ही व मीही कामाच्या गर्दीत असल्यामुळे राहून गेले. तुम्हास निर्णय रेडिओवर समजू नये, आधी माहीत व्हावा म्हणून कळवीत आहे. शक्य असेल तर (हो सकेतो) कार्यक्रम संपण्यापूर्वी परत या.''

मी दिल्ली सोडण्यापूर्वी वातावरणात निवडणूक खच्चून भरली होती. तेव्हा तो महत्त्वाचा निर्णय कोणता हे अगदी स्पष्ट होते. पार्लमेंट-लोकसभा बरखास्त करून मार्चमध्ये निवडणुका घेणे!

राजदूताला मी विश्वासात घेतले आणि सांगितले की, पहिल्या परतीच्या प्लेनने मी दिल्लीस जाऊ इच्छितो. झेकोस्लोव्हाकियाचा कार्यक्रम रद्द. निर्णय प्रत्यक्ष जाहीर होईतो कारण कुणाला सांगू नका. परंतु परत जाण्याचा माझा निर्णय पक्का.

तोही योग्य ते समजला आणि योग्य ती कार्यवाही सुरू केली. निर्णय संध्याकाळी ६ वाजता बी. बी. सी. (येथील) वरून येथे सर्वांनाच समजला.

निवडणुका होणार! I am happy. गेल्या वर्षीच त्या घ्याव्यात असे मला वाटले होते. पंतप्रधानांना तसे बोललोही होतो. पण त्यांचा मूड वेगळा होता. इमर्जन्सी राहील पण बहुतेक सर्व राजबंदी सुटतील आणि निवडणुकीचे वातावरण प्रस्थापित होईल. This is a gain.

हवा मोकळी होईल; आज मी आनंदात आहे. परतल्यानंतर दीड-दोन महिने याच कामात एकसारखा गुंतलेला राहीन. २० तारखेस पहाटे २॥-३ वाजता येईन. तसा संदेश पंतप्रधानांना पाठवला आहे.

इथली भेट छोटी होती पण ती उत्तम प्रकारे पार पडली. आलो तेव्हा उणे २ हवा होती. पण रस्त्यावर वगैरे बर्फ दिसले नाही. ता. १६ची रात्र येथे काढून दुसरे दिवशी सकाळी 'इशॉव्ह' म्हणून येथून ९० ते १०० मैलावर

असलेल्या शहरी, मोटारने गेलो. कार्पेनियनच्या रांगा ओलांडून नावे लागते.

६० कि. मी. चा घाट हिवाळी शुभ्र सौंदर्याने नटलेला होता. डोंगर आणि डोंगरावरील झाडे, आसपासची राने बर्फाने माखली होती. निसर्ग सौंदर्याचा हा हिवाळी थाट प्रथमच पहात होतो.

तो संपूर्ण दिवस, ते संपूर्ण शहर पाहिले. दोन लाख वस्तीचे, डोंगररांगांनी वेढलेले प्राचीन शहर आहे. पॅक येथील जर्मन लोकांनी पण ६०१ वर्षे चालविलेले प्रार्थनामंदिर - ब्लॅकचर्च.' पाहिले. रोमेनियन भाषेची पहिली शाळा पाहिली. (काही शतकापूर्वीची). कारखान्यांना वगैरे गेट होती पण मी खुबीने त्यातून बाहेर पडलो.

१७ तारखेला सकाळी इशॉव्हहून निघून ३०-३५ कि. मी. अंतरावरील घाटातील प्रिंडर येथे आलो. प्रेसिडेंट चाऊशेस्की या दिवसात येथे राहतात. १० ते १२ सकाळचे दोन तास त्यांच्याशी भेटून चर्चा केली. मी त्यांना प्रथमच भेटत होतो. या देशाचे ते एकमेव सत्ताधिकारी आहेत. अत्यंत हुशार गृहस्थ म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. सी. डी. देशमुखांसारखे व्यक्तिमत्त्व चेहेऱ्यात, उंची व अंगलटीत आहे.


दुपारी चार वाजता बुखारेसला पोहोचलो. विदेशमंत्र्यांना ५ ते ६ भेटलो. त्यानंतर काल व आज त्यांना परत दोन वेळा भेटलो. प्राइम मिनिस्टरनाही सकाळी भेटलो.

दोन-सव्वादोन कोटीचा हा देश पण विदेशनीती अशी चपखल ठेवली आहे की, आश्चर्य वाटावे. वार्सा कराराचे सभासद आहेत. अमेरिका आणि चीन दोघांशीही आर्थिक, व्यापारविषयक उत्तम संबंध आहेत. अरबांचे मित्र आहेत तसेच इस्त्राएलचेही दोस्त. कॅपिकॉनचे सदस्य तर ई. सी. सी. शीही सहकार्य. आर्थिक प्रगतीही उत्तम केली आहे. १९४४ साली परकॅपिटाल ८० डॉलर्स उत्पन्न होते. आता

ते एक हजार डॉलर्स झाले आहे.

प्रखर राष्ट्रवादी देश आहे. माझे असे मत झाले आहे की, कुठल्याही देशाची विदेशनीती समजावयाची असेल तर त्या देशातील आवडत्या विनोदी कथा (जोक्स) काय आहेत ते समजावून घेतल्या पाहिजेत. सर्व विनोदाचा विषय रशियाची थट्टा करण्याच्या उद्योगात असतो. त्यांच्या गटात आहेत, परंतु स्वत्त्व घालवले नाही. अंतर्गत समाजवादी राजवट कडक आहे आणि कार्यक्षमही आहे.

असा हा छोटेखानी पण महत्त्वाचा सुंदर देश मी पाहिला. येथील नेत्यांशी मनमुराद मोकलेपणाने बोलता आले. या आनंदाने मी परत येत आहे.



---

२१ जानेवारी १९७७ला यशवंतराव दिल्लीस परतले. दिल्लीतील, देशातील आणीबाणीचा धाक संपला होता. हळूहळू वातावरण निवळले आणि लोकसभेच्या निवडणुकी जाहीर करण्याचे सोपस्कार होऊन निवडणूक जाहीर झाली.

या निवडणुकीत मतदारांनी आणीबाणी बद्दलचा असंतोष मतपेटीद्वारा प्रकट केला. काँग्रेस पक्ष पराभूत झाला. केंद्रसत्ता हस्तगत करण्यासाठी आवश्यक असणारे लोकसभेतील बहुमत काँग्रेसला मिळाले नाही. जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली नव्याने स्थापन झालेल्या जनता पक्षाने बाजी मारली. केंद्रस्थानी जनतापक्ष सत्तारूढ बनला. नवा इतिहास निर्माण झाला.

जनता पक्षाच्या खालोखाल काँग्रेस पक्ष असल्याने तो लोकसभेतील प्रमुख विरोधी पक्ष ठरला. त्यावेळी लोकसभेतील विरोधीपक्षप्रमुख ही भूमिका यशवंतरावांना सांभाळावी लागली. केंद्रस्थानी काँग्रेसची सत्ता संपुष्टात आली. विदेशमंत्रीपद जनता पक्षाकडे गेले. यशवंतरावांच्या विदेश यात्रांना पूर्णविराम मिळाला.

प्रवास थांबल्याने प्रवासातील पत्रे, नोंदी लिहिणेही थांबले. थांबले ते थांबलेच !!

केंद्रस्थानी सत्ता जनता पक्षाने हस्तगत करून पंतप्रधानपदी मोरारजी देसाई यांना स्थानापन्न केले. परंतु या पक्षाला अंतर्गत मतभेदामुळे सत्ता टिकविता आली नाही.

राजकारणाची आणि सत्ताकारणाची घसरगुंडी सुरू झाली. खटपटी, लटपटी करून सत्ता संपादन करणे आणि सोडून देणे असा खेळ होत राहिला. इंदिरा गांधींनी आणीबाणीनंतर लोकसभेची निवडणूक जाहीर केली पण या निवडणुकीत तांत्रिक कारणामुळे त्याना स्वत:लाच पराभव पत्करावा लागला. यशवंतरावांनी मात्र आपली प्रतिष्ठा शाबूत राखली. तसं पाहिलं तर १९४६च्या पहिला विधानसभेच्या निवडणुकीपासूनचा इतिहास असे दर्शवितो की यशवंतरावांना विधानसभा किंवा लोकसभा यातील कोणत्याही निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले नाही. त्यांना पराभूत करण्याचे सर्व अटीतटीचे प्रयत्न निष्फळ ठरले.

अल्पकालीन सत्तासंपादनाच्या या चढाओढीत एकदा श्री. चरणसिंग पंतप्रधान-पदी आरूढ झाले. चरणसिंग यांच्या गटाचे संसदेत पुरेसे बहुमत नव्हते. काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्याने ते पंतप्रधान झाले. काँग्रेसचेही जेमतेम पंचाहत्तर संसद सदस्य निवडून आलेले होते. काँग्रेस पक्ष हा संसदेतील बलाढ्य असल्याने उपपंतप्रधानपद काँग्रेसकडे येणे स्वाभाविक ठरले. यशवंतराव हे ज्येष्ठ नेते, ज्येष्ठ संसदपटू असल्याने उपपंतप्रधानपदी त्यांची नियुक्ती क्रमप्राप्त ठरली.

पंतप्रधान आणि उपपंतप्रधान यांचा शपथविधी झाला. त्याच दिवशी सायंकाळी पाच वाजता श्री. चरणसिंग स्वत:च १ रेसकोर्स रोड, या यशवंतरावांच्या निवास-स्थानी मंत्रिमंडळाच्या रचनेसंबंधी चर्चा करण्यासाठी दाखल झाले. मंत्रिमंडळात काँग्रेस पक्षाचे किती आणि कोण असावेत यासंबंधी प्रामुख्याने चर्चा करावी लागणार होती. उपपंतप्रधानपदी यशवंतराव असल्याने काँग्रेस पक्षियांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. शपथविधी सोहळा संपवून यशवंतराव बंगल्यावर येताच काँग्रेस इच्छुकांची रीघ सुरू झाली. त्या सर्वांना त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे अनुमती मिळविण्यासाठी पाठविले. इंदिरा गांधी या सर्वेसर्वा असल्याने त्यांच्या सल्ल्यानुसार मंत्रिमंडळाची रचना करण्याचे यशवंतरावांनी निश्चित केले होते. चरणसिंग यांच्याशी झालेल्या चर्चेतही त्यानी हीच भूमिका ठेवली. पक्षाची म्हणून काही शिस्त असते आणि शिस्तीचे पालन जबाबदार व्यक्तीने करावेच लागते ही त्यांची भूमिका.

चरणसिंग मंत्रिमंडळ विचार विनिमयानंतर अस्तित्वात आले, राज्यकारभार सुरू झाला. काँग्रेसच्या पाठिंब्याने सर्व काही सुरळीत सुरू राहील असे वातावरण निर्माण होण्याची चिन्हे दिसत असतानाच काँग्रेसच्या वरिष्ठ गोटात वेगळ्याच हालचाली होत राहिल्या. चरणसिंगाना पाठिंबा देण्याचे धोरण अवलंबिले गेले त्यावेळी चरणसिंगाना विशिष्ट कालावधीपर्यंत कारभार करण्यास मुभा द्यावयाची आणि एक दिवस त्यांना पायउतार होण्यास भाग पाडून केंद्रीय सत्ता काँग्रेसकडे

घ्यावयाची असा मनसुबा ठरला होता. तसे घडले असते तर उपपंतप्रधान असलेले यशवंतराव पंतप्रधान पदावर आरूढ होण्याची शक्यता गृहीत धरण्यात आली होती. दिल्लीत तशी कुजबुज ऐकिवात येत होती. परंतु अचानक एक दिवस काँग्रेसच्या वरिष्ठांनी चरणसिंगांचा पाठिंबा काढून घेतला. चरणसिंगांचे मंत्रिमंडळ कोसळले! 'दिल्लीची चालच तिरपी' या यशवंतरावांच्या अनुभवाचा प्रत्यय आला. महाराष्ट्राचा नेता पंतप्रधान बनण्याची संधी पुन्हा एकदा निसटली.

(यशवंतराव मरहट्टे आहेत. कुशल प्रशासक आहेत. मुत्सद्दी राजकारणी आहेत. चारित्र्यसंपन्न आहेत. ते प्रमुख सिंहासनावर आरूढ झाले म्हणजे कोणी कितीही युक्त्या प्रयुक्त्या केल्या तरी त्या पदावरून त्यांना हटविणे शक्य होणार नाही या विषयी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची समजूत करून देण्यात आल्याचे दिल्लीत बोलले जात होते.)

या कुजबुजीविषयी यशवंतरावांना विचारले असता, 'तसे असेलही कदाचित पण मला त्याची कल्पना नाही. पक्षाने निर्णय केला, तो मी तंतोतंत पाळला एवढेच मी सांगेन.' असा खुलासा करून मोकळे झाले. आणखी खोदून विचारले तेव्हा "नेता म्हणविणारा जो कोणी असेल त्याचा केवळ देह सोन्याचा असून भागत नाही, कानही सोन्याचे असावे लागतात. कान पितळेचे असतील तर घोटाळा होतो." हा निष्कर्ष ऐकविला.

◆ ◆ ◆

यशवंतरावांनी सन १९३० मध्ये कराडात टिळक हायस्कूलच्या आवारातील झाडावर तिरंगा फडकावून स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली त्यावेळी देशाला पारतंत्र्यातून मुक्त करणे हे एकच ध्येय त्यांच्यासमोर होते. अन्य कसलाही संकल्प नव्हता. भारताचे स्वातंत्र्य अद्याप दूर होते त्यामुळे कांही संकल्प करून राजकारणात उतरण्याची परिस्थितीच नव्हती. नंतरच्या टप्प्यातही, स्वातंत्र्यप्राप्ती-नंतर, विशिष्ट हव्यास धरून त्यांनी आपली राजकीय वाटचाल सुरू केली नाही.

सौ. वेणूबाईना सन १९७५मध्ये माँटिगो बे (जमेका) येथून लिहिलेल्या चिंतनपत्रात त्यांनी स्वहस्तेच नमूद केले आहे की, ''सत्तेच्या तीस वर्षात मी काही नव्या स्थानाची महत्त्वाकांक्षा धरली होती हे म्हणणे खरे नाही, किंवा त्यासाठी कुणाच्या पाठीमागे लाचारीने लागलो असेही नाही. परंतु जबाबदारी आली तेव्हा मागे फिरून पाहिले नाही. योजून एखादी सत्तेची जागा हस्तगत करावयाची असे मी कधीच केले नाही. पण वस्तुस्थिती आहे की, सातत्याने तीस वर्षे सत्तास्थानावर आहे.''

योजनापूर्वक पंतप्रधानपद हस्तगत करण्याचा त्यांचा संकल्पच नसल्याने उपपंतप्रधान पदानंतरचे पंतप्रधानपद हुकले म्हणून ना खेद ना खंत ! सत्तेचा उपयोग जाणीवपूर्वक समाजाच्या परिवर्तनासाठी करावयाचा हा संकल्प मात्र त्यांनी केला होता. तो त्यांनी मन:पूर्वक अखेरपर्यंत सांभाळला.



सत्तासंपादनासाठी संकल्प करण्यापासून ते अलिप्त राहिले पण आपल्या जीवन चरित्राचे तीन खंड प्रकाशित करण्याचा संकल्प त्यांनी केला होता. तथापि संकल्प आणि सिद्धी हे द्वंद्व त्यांच्याबाबतीत कायम राहिलं. जीवनचरित्र्याच्या तीनही खंडांची रूपरेषा तयार करून ठेवली होती. सन १९८३-८४च्या डिसेंबर-जानेवारीत एक महिना, दिल्लीत १ रेसकोर्स रोड या त्यांच्या बंगल्यात मी त्यांच्या सहवासात मुक्कामाला होतो. सौ. वेणुताईंचे चरित्र त्यांच्या पहिल्या 'पुण्यतिथीस', १ जून १९८४ला प्रसिद्ध करण्याचा त्यांचा मानस होता. चरित्र लेखनाची जबाबदारी मी स्वीकारली आणि सविस्तर चर्चेसाठी दिल्लीला गेलो होतो. त्यावेळी या तीन खंडांपैकी पहिला 'कृष्णाकाठ' हा खंड लिहून झालेला होता. १९८३च्या दरम्यान सत्तेच्या राजकारणातून ते कांहीसे अलिप्त होते. लेखनासाठी फुरसद मिळाली तेव्हा वेणूताईंनी त्याना लेखनाची प्रेरणा दिली. १९८३ मध्ये त्यांनी पहिल्या खंडाचा श्रीगणेशा केला आणि त्या सालातच संकल्पाची सिद्धी केली. जे काही अक्षरबद्ध झाले त्याच्या पहिल्या वाचक सौ. वेणूताई होत्या. पहिल्या खंडासाठी त्यांनी जन्मापासून १९४६ पर्यंतचा म्हणजे १९४६ची पहिली विधानसभा निवडणूक जिंकून मुंबईत आमदार (पार्लमेंटरी सेक्रेटरी) म्हणून पोहोचेपर्यंतचा तेहतीस वर्षांचा कालखंड समाविष्ट केला. या कालखंडातील काही घटना, प्रसंग याच्या काही प्रमाणात वेणूताई साक्षीदार-साथीदार असल्यानं, लेखनांत पारदर्शकता निर्माण होण्याच्या दृष्टीनं वेणूताईंचं वाचन आणि मार्गदर्शन मोलाचं ठरलं.

'कृष्णाकाठ' हा पहिला आत्मचरित्रपर ग्रंथ सन १९८४ च्या ५ फेब्रुवारीस, रंगपंचमीच्या दिवशी प्रसिद्ध झाला तेव्हा त्याची खूप प्रशंसा झाली. साहित्य सम्राट न. चिं. केळकर पारितोषिक या ग्रंथासाठी जाहीर झालं. या पारितोषिकानं जणू काही यशवंतरावांच्या साहित्यगुणावर शिक्कामोर्तबच केलं.

'कृष्णाकाठ' ग्रंथाच्या अखेरच्या प्रकरणांत ग्रंथाचा समारोप करताना, त्यांच्या मनांत विचारांचं जे काहूर उठलं त्याची आणि भवितव्यतेसंबंधीची केलेली नोंद त्यांच्या मनोव्यापारावर नेमका प्रकाश टाकते. नव्या कामाची, पार्लमेंटरीपद स्वीकारण्याची - जबाबदारी सांभाळण्यासाठी पुणे मार्गे डेक्कन-क्वीनने ते मुंबईला जात असतानाच्या दिवसाची ही नोंद आहे. ते लिहितात -

> गाडीत निवांत बसल्यानंतर भूतकाळातील सुख-दुःखाची धूसर क्षणचित्रे डोळ्यासमोर येऊ लागली. त्याचप्रमाणे अनोळखी पण रंगतदार भविष्याची बोटेही आपल्याला पाळवताहेत असे वाटले.

माझ्या मनांत येऊन गेले की माझ्या जीवनांत मोठा बदल झाला आहे. कृष्णाकाठी हिंडलो, वाढलो, फिरलो, झगडलो, अनेक नवी कामे केली, मैत्री केली, माणसे जोडली, मोठा आनंदाचा आणि अभिमानाचा काळ होता. आता मी कृष्णाकाठ सोडून नव्या क्षितिजाकडे चाललो आहे. आता ती क्षितिजे रंगीबेरंगी दिसत आहेत. परंतु प्रत्यक्षात तेथे पोहोचेपर्यंत ती तशीच राहतील का? कोण जाणे?

अशा विचाराच्या तंद्रीत असताना आमच्या जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचे एक पुढारी रावसाहेब मधाळे हे मज-जवळ आले आणि म्हणाले, कुठे चाललात?

''अर्थातच मुंबईला, नवे काम अंगावर घ्यायला'' - मी सांगितले.

त्यांनी आनंद व्यक्त केला आणि म्हणाले, ''तुम्ही फार चांगल्या दिवशी हे काम अंगावर घेत आहात.''

''मी काही पंचांग पाहून निघालो नाही, पण आज असा कोणता महत्त्वाचा दिवस आहे'' - मी म्हटले.

''आज १४ एप्रिल आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आज जन्मदिवस आहे.'' - ते म्हणाले.

'फारच चांगला योगायोग आहे'' - मी म्हटले.

माझ्या ध्यानीमनी नसताना सुद्धा हा दिवस निवडला गेला, ही माझ्या जीवनातील महत्त्वाची घटना आहे, असे मी मानतो.

डेक्कन क्वीन खंडाळ्याच्या घाटातून एका पाठोपाठ एक बोगदे मागे टाकीत वेगाने पुढे चालली होती. कधी अंधार तर कधी प्रकाश असा खेळ करीत आमचा प्रवास चालला होता. पुढच्या जीवनाचे हे प्रतीक तर नव्हते?

'कृष्णाकाठ'चा समारोप करताना लिहिण्याच्या ओघात 'पुढच्या जीवनाचे हे प्रतीक तर नव्हे? असे त्यांच्या लेखणीने लिहिलेले असले तरी पुढील आयुष्यातील घटना तपासताना त्यांच्या लेखणीने भवितव्यताच नमूद करून

ठेवल्याचं प्रत्ययास येतं!

'कृष्णाकाठ' नंतर 'सागरतळी' आणि 'यमुनातीरी' हे दोन खंड लिहून पूर्ण करण्याचा त्यांचा संकल्प होता. १९४६ ते १९६२ येथपर्यंतचा म्हणजे मुंबईत मंत्री, मुख्यमंत्री असतानाच कार्यकाल ''सागरतळी'' खंडात समाविष्ट करणे आणि १९६२ नंतरचा दिल्लीतील कार्याचा समावेश 'यमुनातीरी'त होणार होता. त्यांचा हा संकल्प पूर्णत्वाला गेला असता तर मराठी सारस्वताचं आत्मचरित्राचं दालन समृद्ध बनलं असतं, वैभवपूर्ण ठरलं असतं. परंतु नियतीला ते मंजूर नसावं!

१९८३च्या डिसेंबरमध्ये दिल्लीला जाणं मला आवश्यक वाटलं त्यास यशवंतरावांनी स्वत:च्या हस्ताक्षरात मला पाठविलेलं पत्र कारणीभूत होतं. त्यावेळी १ रेसकोर्स रोड येथे ते एकाकी अवस्थेत होते. पत्नी सौ. वेणूताई या १ जून १९८३ला परलोकी निघून गेल्यावर दिल्लीतील त्यांच्या या निवासस्थानाला अवकळा प्राप्त झाली. वेणूताईंनी राहत्या घराचं देवघरात रूपांतर केलेलं होतं. त्या देवघरातील गृहलक्ष्मीच निघून गेली होती. यशवंतराव त्यावेळी कुठल्याही उच्चस्थानावर नव्हते. बंगल्यातील राबता ओसरला होता. दहा-वीस वर्षापासूनचे नोकर चाकर त्या आवारात वस्ती करून होते. बंगल्यात फक्त यशवंतराव! उध्वस्त मनानं बसलेले! प्रकृती क्षीण. कोणी भेटण्यास येतील तेव्हा डोळ्यात अश्रू! मला लिहिलेल्या पत्रात प्रकृती आता साथ देत नाही असं यशवंतरावांनी नमूद केलं होतं. माझं मन गलबललं. त्यांना थोडीफार सोबत करावी यासाठी मी दिल्लीकडे धाव घेतली.

११ डिसेंबर १९८३ला दिल्ली येथून स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिलेलं पत्र मला १३ डिसेंबरला पुण्यात मिळालं. निमित्त होतं माझं एकसष्ठीनिमित्त अभीष्टचिंतन करण्याचं. पत्र वाचून मी अवाक बनलो. मनानं दु:खी असताना माझं अभीष्टचिंतन करण्याचं भान त्यानी राखावं याचं अप्रूप वाटलं.

---

**नवी दिल्ली**


११ डिसेंबर १९८३

''तुम्ही मागे वळून पाहिलं तर समाधान वाटावं असं तुमचं जीवन आहे. पत्रकाराचं जीवन तसं कटकटीचं - पण तेही तुम्ही रस घेऊन पार पाडलेत. अनेक क्षेत्रात जिवाभावाचे मित्र मिळविलेत. पत्रकारितेच्या क्षेत्राच्या बाहेर संगितादी कलाक्षेत्रात, कार्यरत राहिलात. तुमच्या

कौटुंबिक जीवनाचा आनंद तुम्ही मनापासून चाखला आहे. या जीवनाला यशस्वी जीवन म्हणावयाचे नाही तर कशाला म्हणावयाचे.

गेली बावीस-तेवीस वर्षे जे मित्रप्रेम तुम्ही मला दिलेत ते अतिशय अकृत्रिम असे आहे.

तुमच्या घरी येऊनच अभीष्टचिंतन करायला हवे पण प्रकृती साथ देत नाही. नुकताच तिकडून आलो. पुन्हा येईन तेव्हा तुम्हाला घरी भेटेन. दीर्घायुषी व्हा. सुखी व्हा.



---

या पत्रात त्यांनी आमच्यातील मैत्रीला, जिव्हाळ्याला 'अतिशय अकृत्रिम' असं अधोरेखित केल्यानं वाढदिवसाचा माझा आणि माझ्या कुटुंबियांचा आनंद शतपटीनं वाढला. यशवंतरावांसारख्या सावध नेत्यानं स्वहस्ते लिहिलेलं मैत्रीचं, मित्रप्रेमाचं हे शिफारसपत्र कुठल्याही मानपत्राहून माझ्यादृष्टीनं मोलाचं असं आहे.

त्यानंतरचा एप्रिल महिना उजाडला. कसलीही पूर्वसूचना न देता एक दिवस सकाळी ११ वाजता यशवंतराव माझ्या पुण्यातील घरी अचानक आले. अगदी एकटे. अभीष्टचिंतन केलं. शब्द पाळणं म्हणतात ते हे असं!

त्यांनी घरात प्रवेश केला तेव्हा मी विश्रांती घेत होतो. प्रकृती ठीक नव्हती. ते शेजारी येऊन बसले. प्रकृतीची विचारपूस केली. विश्रांती घ्या म्हणाले. खरीखुरी विश्रांती घ्या हे सांगताना म्हणाले, ''घरात आलो तेव्हा वहिनी मनानं हललेल्या मला दिसल्या.'' हातात हात घेऊन या थोर माणसानं मला मोठा दिलासा दिला. तासाभरानं परत जाण्यास निघाले तेव्हा निरोप देण्यासाठी उठून बसू लागलो तेव्हा ''उठून बसण्याचे कष्ट घेऊ नका, पूर्ण विश्रांती घ्या,'' म्हणाले आणि परतले.

राजकीय दृष्ट्या यशवंतराव निश्चितच शक्तिमान होते. पण याहीपेक्षा राजशक्ती आणि देशभक्ती, मानवता यांचं विलक्षण मिश्रण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात संक्रमित झालेलं होतं. मित्रप्रेमाची आगळी-वेगळी झालर या व्यक्तिमत्त्वाला होती. या मैत्रीत निर्व्याजता होती.

यशवंतरावांचं माझं नातं जिव्हाळ्याचे मित्र असं होतं. वस्तुतः ते राजकीय

नेते. मी एक पत्रकार. मैत्री ही व्यवहाराशी आणि स्वार्थाशी निगडित असते. अशा मैत्रीत प्रसन्नता उरत नसते. त्यांच्या संपर्कात आलो तेव्हापासून का कुणास ठाऊक, पण मी कसली ऐहिक लाभाची, भौतिक लाभाची, व्यवहाराची अपेक्षा ठेवू शकलो नाही. माझ्याकडून त्यानी काही साध्य करावं असं माझ्याकडं काही नव्हतंच. पण मनं जुळत गेली. गुंतत गेली. गुंफण पक्की होत राहिली. या मैत्रीत प्रसन्नता होती. मैत्रीत स्वतःचे रूप नष्ट व्हावं लागतं. मनाचा 'मी'चा दुर्गुण जायला हवा. मैत्रीतही प्रसन्नता त्यांनी अखेरपर्यंत राखली. सहजगत्या असं काही घडत नसतं. सत्तेत असलेल्या त्यांच्यासारख्या नेत्याच्या मनात कोणाला विश्वासानं जवळ घ्यावं, मैत्री करावी याबाबत कसोट्या असणारंच. त्या कसोट्यातून मलाही जावं लागलं असेल. पण याचा थांगपत्ता मला कधी लागला नाही.

दिल्लीत त्यांच्या बंगल्यात लोळत बसलो होतो. रात्री दहानंतरची वेळ. सहज कौटुंबिक गोष्टी सुरू होत्या. त्यांनी माझ्यासमोर एक प्रश्नचिन्ह उभं केलं. म्हणाले, ''आपण मध्यमवर्गीय माणसं. वय वाढतं तसं जबाबदाऱ्या वाढतात. मुलांची शिक्षणं, मुलींचे विवाह, वृद्धत्व, आजारपण, अकस्मात निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्या याचा विचार करावाच लागतो. तुम्ही तो करीत असणारच. नोकरीत असल्यामुळे काही वेतन मिळत असेल पण ते कितीसं पुरणार? मोकळेपणानं बोलाल तर मला आवडेल.''

स्वस्थपणानं मी ऐकलं. मला हे सर्व नवीन होतं. आला दिवस गेला असं माझं आयुष्य सुरू होतं. कौटुंबिक स्वास्थ्याचा विचार ऐकून बुचकळ्यात पडलो. त्यांनी याचा विचार करावा हे सारं नवीनच होतं.

''तुम्ही म्हणता ते खरं आहे. विचार करून सांगेन केव्हातरी'' असं म्हणून सुटका करून घेतली. विषय तिथेच संपवला.

काही महिने उलटले. पुन्हा जेव्हा बोलत बसलो तेव्हा काय विचार केलात असं त्यांनी पुन्हा विचारलं. तेव्हा बोलावच लागलं.

''दिल्लीत आणि महाराष्ट्रात अनेकजण तुम्हाला भेटतात. अपेक्षा व्यक्त करतात. मागणी सांगतात. गाऱ्हाणी सांगतात. या ना त्या रूपानं तुम्ही ते निस्तरता. समाधान करता. मागणी मान्य असल्याची अनुभूती देता. मी पण एक मागणी करणार आहे.'' एवढं बोललो आणि थांबलो. सांगणं पूर्ण झालं नव्हतं तरी थांबलो. सांगावं न सांगावं असा गोंधळ मनात सुरू होता.

''बोला, बोला. मोकळेपणानं सांगा. तुमच्या मागणीची पूर्तता करण्याचं समाधान

मला मिळू द्या. बोला.'' - यशवंतराव

''मागणी अशी. मी तुम्हाला मनोमन मित्र मानलं आहे. आता मित्र म्हणून तुम्ही माझा स्वीकार करावा आणि मैत्री पूर्णपणानं द्यावी. एवढंच'' मी सांगितलं.

स्तब्धता. यशवंतराव शून्य दृष्टीनं छताकडे बघत राहिले. मी गोधळलो. पण काही क्षणच. ते कोचावरून उठले. मीही उभा राहिलो. त्यानी मला मिठीत घेतलं. म्हणाले, ''या जगात खरोखरीचा मित्र लाभल्याचं समाधान तुम्ही मला दिलंत.'' हे म्हणत असताना त्यांच्या डोळ्यांतील समाधानाचे अश्रू पाहून मी थरारलो! याचा अन्वयार्थ लावणं कठीण ठरलं.

दुसरे दिवशी, त्यांचे विश्वासू स्वीय सहायक श्रीपाद डोंगरे यांना रात्रीची घटना सविस्तर सांगितली. अन्वयार्थ विचारला. नेहमीच्या लकबीनं ते हसले. म्हणाले, ''तुमची जबाबदारी वाढली आहे. तुम्ही मैत्री दिली आणि मागितली. आलिंगन देताना अश्रू ओघळले. कुटुंबातील एक म्हणून तुमच्या मैत्रीचा स्वीकार त्यांनी केला आहे आणि मैत्री प्रदान केली आहे. ती पेलणं ही आता तुमची जबाबदारी.''

श्रीपाद डोंगरे यांनी जो अन्वयार्थ सांगितला त्यातून आम्हा दोघांमध्ये अंतर नसलेल्या विशुद्ध मैत्रीचा बोध मिळाला. आमच्यातील 'मी', 'तू' अंतरच संपलं होतं. ही मैत्री मला किती पेलता आली हे सांगणे अवघड आहे. यशवंतरावांनी मात्र मित्रत्वाचं नातं पूर्णपणे पेललं. आमच्या दिल्लीतल्या या चर्चेनंतर काही वर्षं उलटल्यावर अभीष्टचिंतनासाठी लिहिलेल्या पत्रात 'अकृत्रिम मैत्री' असा उल्लेख करून एक प्रकारे शिक्कामोर्तबच केलं.

आणखी एका वेगळ्या समारंभात त्यांनी याची प्रचिती आणून दिली. कराड नगरपालिका, शिक्षणसंस्था आणि नागरिक यांनी एकषष्ठीनिमित्त माझं अभीष्टचिंतन करण्याचं योजिलं. प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी यशवंतरावांना निमंत्रित केलं. ते आवर्जून उपस्थित राहिले. त्यांचं भाषण मोठं अर्थपूर्ण झालं. इतकं की श्रोते अचंबित झाले.

रामभाऊ जोशी हे पत्रकार आहेत म्हणून मी येथे आलो नाही. त्यांनी माझे चरित्र लिहिले म्हणूनही आलो नाही. असे प्रारंभी सांगून म्हणाले, ''आमच्या कुटुंबात आम्ही तीन भाऊ. दोघे ज्येष्ठ बंधू निवर्तले आणि मी घरातला लहान, घरातला मोठा बनलो. नंतर असं लक्षात आलं की, बाहेरचं मोठेपण सांभाळता येतं पण घरातल्या लहानाला घरातलं मोठेपण सांभाळता येत नाही. रामभाऊंचं तेच झालं. त्यांचे दोन ज्येष्ठ बंधू गेले आणि घरातले ते लहान घरातले मोठे बनले. पण त्यांचा अनुभव माझ्याहून वेगळा असेल असं नाही. तसं पाहिलं तर

रामभाऊंपेक्षा वयानं मी काहीसा मोठा आहे. आपला मोठा भाऊ म्हणून त्यांनी मला पूर्वीच स्वीकारलेलं आहे. माझा लहान भाऊ म्हणून मी त्यांचा स्वीकार केला आहे हे सांगण्यासाठी दिल्लीहून मी आलो आहे.''

असे त्यांचे-माझे ऋणानुबंध. सन १९८३-८४ च्या दिल्लीतील त्यांच्याकडील मुक्कामात या ऋणानुबंधावर कळस चढला.

त्याचं असं झालं. वेणूताईंचं चरित्र लिहावयाचं होतं. त्याच्या तपशिलासंबंधात दोन-तीन आठवडे सविस्तर बोलणं झाल्यावर वेणूताईंचा काही पत्रव्यवहार वगैरे साहित्य असल्यास ते वाचण्याची आवश्यकता एकदा रात्री बोलत बसलो असताना मी सांगितली. त्यावर असं काही असण्याची शक्यता नाही कारण बाईंनी कधी कुणाला पत्रं लिहिली नाहीत, मुलाखती दिल्या नाहीत किंवा महिलांच्या कुठल्या सभेला उपस्थित राहून भाषण केलं नाही, कुठल्या महिला मंडळात सहभागी झाल्या नाहीत. आयुष्यभर त्यांनी दर्जेदार संसार केला. यशवंतरावांनी सांगितलं.

दोन-चार दिवसानंतर पुन्हा मी तोच आग्रह धरला. रात्रीचे १० वाजून गेले होते. बेडरूममध्ये बोलत बसलो होतो. तेथे वेणूताईंची दोन लोखंडी कपाटं होती. ती पहा असा आग्रह धरला.

नाखुषीनंच त्यांनी कपाटे उघडली. काही फाईल्स आणि छोटीशी बॅग त्यांनी पाहिली. कोचावर बसले आणि त्यात काय आहे पहाणं सुरू केलं. दहा-पंधरा मिनिटानंतर ते साहित्य त्यांनी मला दिलं. म्हणाले, 'वाचून पहा. हे वेगळं आहे. मी लिहिलेलं आहे. बाईंनी हे सर्व जपून ठेवलंय याची मला कल्पना नव्हती. आज प्रथमच पहातो आहे.''

ते सर्व मी दिल्लीतच वाचलं. दोन दिवसानंतर ते त्यांच्या स्वाधीन केलं. म्हणालो, ''हे तुमचं खाजगी आहे. तुम्ही स्वतंत्रपणे लिहिलेलं काही आहे पण बरचसं पति-पत्नीमधील लिखित संवाद स्वरूपाचं आहे. खाजगीतील खाजगीतच ठेवा.''

''बरोबर आहे तुमचं. खाजगीतलं आहे आणि होतं. ज्या क्षणाला ते मी तुमच्या स्वाधीन केलं त्याच क्षणाला त्यातलं खाजगीपण संपलं. हे असंच, खाजगीत मी ते किती काळ ठेवणार कोण जाणे! तुमच्याकडं ठेवा. याचं काय करायचं ते आपण बोलू.'' - यशवंतरावांनी भावनापूर्ण शब्दांत सांगितलं.

१९८४ च्या जानेवारीतील रात्रीच्या या बोलण्यानंतर त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये 'कृष्णाकाठ'साठी जाहीर झालेलं केळकर पारितोषिक स्वीकारण्यासाठी ते पुणे

येथे आले त्यावेळी या साहित्याच्या संदर्भात आमची सविस्तर चर्चा झाली. राजकीय ज्येष्ठ नेत्यानं लिहून ठेवलेलं हे ऐतिहासिक संदर्भ साहित्य आहे वगैरे मी बोलू लागलो तेव्हा हसले आणि म्हणाले, ''ते ठीक आहे. संदर्भ साहित्य म्हणून त्याला कमी-अधिक महत्त्व असेलही. त्याचं काय करायचं तुम्ही ठरवा. हे साहित्य तुम्हाला सोनं वाटत असेल तर दागिना घडवा. तसं नसेल तर राहू द्या तुमच्या लॉकरमध्ये.''

गेली वीस वर्षं ते मी लॉकरमध्ये ठेवलं. अगदी गुप्त. परंतु सोन्याची शोभा लॉकरमध्ये नाही. दागिना घडविण्यात असते. पैलू पाडले तर ते आणखी चकाकते. या विचारानं मला ग्रासलं. 'हे साहित्य खाजगीत मी आणखी किती काळ ठेवणार कोण जाणे!' या यशवंतरावांनी सांगितलं होतं. ते त्यांनी माझ्या स्वाधीन केल्यावर त्यातलं खाजगीपण संपुष्टात आलं असलं तरी ते खाजगीतच राहिलं. पत्नीला लिहिलेली पत्रे खाजगी असतात हे मान्य पण अशी पत्रे ख्याली खुशालीची किंवा कौटुंबिक हितोपदेशाची असतात. यशवंतरावांनी लिहिलेल्या पत्रांचे स्वरूप वेगळं आहे. आशय वेगळा आहे.

प्रवासात असतानाचं हे लेखन असल्यानं त्यात प्रवासवर्णनं, निसर्गदर्शन, वेगवेगळ्या ठिकाणी भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे स्वभाव विशेष, चालिरीती, विविध प्रदेशातील लोकरीती हे सर्व आहे. त्याच बरोबर राजकीय चर्चा आहेत, ज्येष्ठ नेत्यांशी झालेला संवाद आहे, त्यावरील प्रतिक्रिया असं सविस्तर काही आहे. हे लिहिताना त्यांच्यासमोर समाज आहे. पत्नीला म्हणून पत्र लिहिलं असलं तरी समाजातील एक घटक म्हणून पत्नी त्यांच्या समोर असल्याचं जाणवतं. यशवंतरावांनी समाजासाठी मागे ठेवलेलं हे विचारधन, समाजाच्या स्वाधीन करण्यानंच त्यातील खाजगीपण संपुष्टात येणार आहे.

आयुष्याची ८४ वर्षे मागे टाकीत असताना त्यांचं हे विचारधन मी आणखी किती काळ खाजगीत, गुप्त ठेवणार आहे कोण जाणे? या विचारानं मनात फेर धरला. हे सर्व अप्रकाशित, प्रकाशात यावं यासाठी सरस्वतीपूजनाचा श्रीगणेशा केला.

यशवंतरावांनी जे लिहून ठेवलं ते सारं सुगम आहे. सुगम-संगीत थाटाचं आहे. मधून मधून ख्यालगायकीचाही थाट आढळेल. पण त्यात दुर्बोधता नाही. शब्दात आणि वाक्यात मनांतलं प्रतिबिंबाचं दर्शन घडत रहातं.

'सागरतळी' आणि 'यमुनातीरी' हे दोन चरित्रखंड लिहून प्रकाशित करण्याचा यशवंतरावांचा संकल्प सिद्धीस गेला असता, तर या हस्तलिखित साहित्याचा

समावेश त्यात झालाच असता. १९८४ च्या ऑक्टोबरमध्ये बोलणं झालं त्यावेळी तसं निश्चित झालं होतं. १९८५ च्या जानेवारीनंतर दिल्लीला तीन-चार महिने मुक्कामाच्या तयारीनं या म्हणजे सर्व हातावेगळं करू असं सांगून ते दिल्लीला गेले.

परंतु आले देवाजीच्या मना.... पूर्वीच्या प्रवासात करून ठेवलेल्या नोंदी, पत्रं मागे ठेवून अनंताच्या प्रवासाला ते निघून गेले. त्यांच्याबरोबर बुद्धिनिष्ठा, ध्येयनिष्ठा, पक्षनिष्ठा, लोकनिष्ठा, महाराष्ट्र आणि राष्ट्रनिष्ठा सारेच प्रवासी बनले! नव्या पिढ्यांना इतिहास उमजावा, काही बोध घडावा यासाठी लिहून ठेवलेलं हे सिद्धहस्त साहित्य फक्त मागे राहिलं. विचारधन, शब्दसंपत्ती एवढंच काय ते यशवंतरावांचं ऐश्वर्य !!

या सर्व धनावर समाजाचाच अधिकार आहे. समाजात वाढलेल्या या नेत्यानं समाजासाठीच हे मागं ठेवलं. माझ्या स्वाधीन करून त्यातलं खाजगीपण संपवलं ते यासाठीच.

संगिताच्या मैफलीची सांगता ''भैरवी''नं करण्याची परंपरा रूढ आहे. यशवंतरावांच्या शब्दसंगिताची सांगता म्हणजेच 'विरंगुळा' भैरवी ! बंदिशीचे शब्द आणि रचना सारंच काही यशवंतरावांचं !

◆ ◆ ◆



यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय



# विरंगुळा

श्री यशोदा प्रकाशन, पुणे.

## श्रीयशोदा प्रकाशनाची प्रकाशित पुस्तके

**ही ज्योत अनंताची**
सौ. वेणूताई चव्हाण यांचे चरित्र

**विदेश-दर्शन**
यशवंतराव चव्हाण - विदेश पर्यटन

**ओव्या विठाईच्या**
विठाबाई चव्हाण रचित ओव्या

**सार्वजनिक बाबूराव**
महापौर बाबूराव शेटे - चरित्र

**संवाद तर्कतीर्थांशी**
लेखक - अनिल जोशी

**आधारवड**
श्री. रा. शं. ताटके-चरित्र

**अष्टपैलू जयराम**
गौरव ग्रंथ

**वृक्ष छाया**
लेखक - अनिल जोशी

---

## रामभाऊ जोशी यांचे ग्रंथ

यशवंतराव-इतिहासाचे [illegible]
सह्याद्रीवरील सूर्यास्त
ही ज्योत अनंताची
विदेश-दर्शन
ओव्या विठाईच्या
सार्वजनिक बाबूराव

# विरंगुळा

शब्दप्रभु यशवंतराव चव्हाण यांनी शब्दसुमनाने बांधलेली मराठी सारस्वताची ही महापूजा.

माझे ६० वर्षांपासूनचे मित्र ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक श्री. रामभाऊ जोशी हे या महापूजेचे उपाध्याय! पूजेसाठी जाणकार उपाध्याय असावाच लागतो.

रामभाऊ हे यशवंतरावांना जाणणारे, मानणारे इतकेच नव्हे तर बरोबरीने, महाराष्ट्र आणि देशात सतत प्रवास करणारे. दिल्लीत त्यांच्या बंगल्यात राहणारे. हे मी किमान २० वर्षे पाहिले आहे, अनुभवले आहे.

यशवंतराव मला एकदा म्हणाले, 'रामभाऊ हे माझे *कॉन्शस कीपर* आहेत.' मी तर सर्दच झालो. यशवंतरावांनी आपले सर्व हस्तलिखित, पत्रे रामभाऊंच्या स्वाधीन केली ते *'कॉन्शस कीपर'* म्हणूनच.

'विरंगुळा' हा ग्रंथ हे यशवंतरावांचे हस्तलिखित रामभाऊंनी वाचकांना उपलब्ध करून देणे म्हणजे महापूजेनंतरचे प्रसाद-वाटप आहे. 'विरंगुळा' ग्रंथाची 'भैरवी' डोळयांच्या कडा ओल्या करते.

- भा. द. खेर

